
IRBK-0100247

म ग्र स वाचनालय शाखा ठाणे

विषय चारित्र

दा क्र २४७



IRBK-0100247

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना : – खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल

16 FEB 1985

# प्रिन्स बिस्मार्क.

( द्वितीय खंड )

भारत गौरव-ग्रंथमाला-पुष्प तेविसावें.

# प्रिन्स बिस्मार्क.

( द्वितीय खंड. )



नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।

—भगवान् श्रीकृष्ण.

१९१८

IRBK-0100247

साधी प्रत बारा आणे ] सर्व हक्क स्वाधीन [ कापडी सव्वा रुपया.

Published By

**P. S BHASE,**

Manager,

**Bharat Gourav Granth Mala.**

**GIRGAON BOMBAY.**

Printed by
G. N Kulkarni
at the Karnatak Press,
434 Thakurdwar,
Bombay

# प्रकाशकाचे दोन शब्द.

भगवान् श्रीकृष्णकृपेनें हें तेविसावें पुष्प तयार झालें असून तें आम्ही आमच्या आश्रयदात्याच्या हातीं प्रेमपूर्वक देत आहों. बिस्मार्क याच्या चरित्राचें कार्य हातीं घेतल्यावर शक्य तितक्या लवकर तें पुरें करण्याचा आमचा मनोदय होता; परंतु अनेक ग्रंथावरून हें चरित्र लिहिण्याचें काम पुरें करावयाचें असल्यामुळें या दुसऱ्या भागास साहजिक इतका उशीर झाला. पहिला भाग प्रसिद्ध झाल्यानंतर हा दुसरा भाग सहा महिन्यापेक्षा थोड्या अधिक दिवसानीं प्रसिद्ध होत आहे. दुसऱ्या भागाकडे ज्याचे डोळे लागले असतील, त्याना हा षण्मासीचा वायदा वराच असह्य झाला असेल, हें आम्ही जाणतों व हा अपराध जरी अक्षम्य असला, तरी आमचे दिलदार आश्रयदाते सहानुकंपेनें आम्हास क्षमा करतील, अशी आम्ही आशा बाळगतों. पुस्तकाच्या प्रसिद्धीसाठीं आम्ही पुष्कळ घाई करतों, परंतु पुस्तक निर्दोष, सुंदर व उपयुक्त झालें पाहिजे, या भावनेनें आम्हांस बांधून टाकल्यामुळें ही मर्यादा ओलांडून आम्हांस मुळींच पळतां येत नाहीं तेव्हा आमच्या आश्रयदात्यांना आम्ही पुन्हःपुन्हां विनंति करतों कीं, त्यानीं आपली तीक्ष्ण दृष्टि पुस्तकप्रकाशनाच्या कालांतराकडे न ठेवता पुस्तकाच्या अंतरंगाकडे ठेवावी आणि हें अंतरंग पाहून जर त्याना संतोष झाला, तर त्यानीं ग्रंथमालेस असेंच वागवून घ्यावें.

पुस्तकप्रकाशनाच्या दिरंगाईस युरोपांतल्या महायुद्धानें क्षणोक्षणीं कशी मदत होत आहे, हें आतां सर्वांना समजून चुकलें आहे. या व्यवसायास लागणारीं कागद वगैरे प्रत्येक वस्तु कल्पनेच्या बाहेर महाग झाल्यामुळें या ग्रंथमालेस तरी एकेक पाऊल मोठ्या कष्टानें पुढें टाकावें लागत आहे कागदाचें माहेरघर—जेथें खंडोगणती कागद उत्पन्न होतो—त्या खुद्द इंग्लडांत कागदाच्या महर्गतेमुळें कांहीं वर्तमानपत्रे व ग्रंथमाला हीं बंद झालीं, कित्येकांनीं आपले आकार अर्ध्याहून कमी केले आणि कित्येकांनीं आपल्या किंमती दुपटीहून अधिक वाढविल्या. ही जेथें इंग्लंडची स्थिति तेथें या धंधाची हिंदुस्थानात किती दुर्दशा उडाली असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. त्यांत आणखी दुःख हें कीं, भारत–गौरव–ग्रंथमालेनें हा व्यवसाय व्यापारी दृष्टीनें हातीं घेतलेला नसल्यामुळें इतर पत्रें, मासिकें व माला यापेक्षां ही महागाई या ग्रंथमालेला

फारच जाचक झाली. स्वताईचे वेळीं ग्रंथमालेच्या प्रत्येक पुस्तकाची किंमत सहा आणे असतानाच ग्रंथमालेला आपला खर्च मोठ्या काटकसरीनें चालवावा लागे. आतां कागदाचे भाव चौपटीपेक्षां अधिक झाले असून ग्रंथमालेनें पुस्तकाची किंमत मात्र दोनच आण्यांनीं वाढविली आहे. या किंमतींत कसेंतरी भागेल, असें आम्हांस वाटलें होतें; परंतु हलुहळू ग्रंथप्रकाशनाच्या सर्वच वस्तु बेसुमार महाग झाल्यामुळें गेल्या पाळीचें 'सुखाचा शोध' हें पुस्तक व हें 'प्रिन्स बिस्मार्क द्वितीयखंड' हीं दोन्ही पुस्तकें बरेंच नुकसान सोसून प्रसिद्ध करावीं लागलीं. इंग्लंडातील जीं पुस्तकें पूर्वीं येथें बारा आण्यांनीं मिळत, तींच आतां सव्वारुपयांनीं मिळतात हिंदुस्थानांत प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकांच्या व वर्तमानपत्राच्या किंमतींतहि याच प्रमाणानें वाढ झाली आहे; परंतु भारत–गौरव-ग्रंथमालेनें मात्र या महागाईच्या प्रमाणानें किंमत न वाढविल्यामुळें व पुस्तकाचें आकारमानहि कमी न केल्यामुळें ग्रंथमालेस यापुढेंहि असेंच नुकसान सोसण्यास आमचे आश्रयदाते भाग पडतात कीं काय, अशी आह्मांस भीति वाटू लागली आहे. 'आम्ही आमचीं पुस्तके अर्ध्या किंमतीनें देऊ' अशी सवड असली म्हणजे वेळ पाहून पुस्तकाची किंमत ठेवतां येते व मग अर्ध्या किंमतींतहि नुकसान होण्याची भीति उरत नाहीं. या ग्रंथमालेस ही किंवा अन्य सवलत नसल्यामुळें या महागाईच्या प्रक्षुब्ध वातावरणात ग्रंथमालेचें तारू कसें हेलकावे खात असेल, हें न्यायी व विचारी आश्रदात्याना आम्ही स्पष्ट समजाऊन सांगितलें पाहिजे असें नाहीं. आश्रयदात्यांनीं आपल्या परिस्थितीचा विचार केला, म्हणजे त्यावरून ग्रंथमालेची स्थितीहि त्यांच्या लक्षांत सहज येईल. अशा बिकट स्थितींतहि आलेल्या सगळ्या संकटाशीं झगडून हातीं घेतलेलें कार्य सतत चालू ठेवण्याचा ग्रंथमालेचा विचार आहे, परंतु आमच्या उदार व गुणग्राहक आश्रयदात्यांकडून जर या वेळीं भरपूर सहाय्य आह्मांस मिळेल, तरच या संकटास तोंड देण्यास आह्मी समर्थ होऊ

वास्तविक ही वेळ अशी आहे कीं, पुस्तकाची आणखी थोडी किंमत वाढविल्यावांचून ग्रंथमालेचें कार्य सुरळीत चालणें अशक्य झालें आहे; तथापि क्षणोक्षणीं किंमतींत बदल करणें; हें जरी आतां अवश्य असलें, तरी शक्य तोंपर्यंत किंमत वाढवू नये, अशी आमची अंतःकरणपूर्वक इच्छा आहे. ग्रंथमालेला आपल्या परिस्थितीप्रमाणें आश्रयदात्यांच्या परिस्थितीचीहि पूर्ण कल्पना आहे प्रपंचास लागणारी प्रत्येक वस्तु कल्पनेच्या बाहेर महाग झाल्यामुळें कांहीं

काहीं आश्रयदात्याना आपल्या प्रपचाचा गाडा सुरळीत चालविणें दुष्कर झालें असेल, हें आम्ही जाणतों. अशा स्थितींत ग्रथमालेचा आश्रय त्यानीं कायम ठेवला, हेंच त्याचे आह्मी उपकार समजतों आमच्या आश्रयदात्यांत अशाच साधारण स्थितींतील, पण रसिक व गुणग्राहक आश्रयदात्याची सख्या अधिक असल्यामुळें या आश्रयदात्यांना पुस्तकें घेण्यास जड जाऊ नये, ही गोष्ट या विकट स्थितीतहि आह्मांस डोळ्याआड करता येत नाहीं. सर्व महाराष्ट्रातच काय, पण सर्व हिंदुस्थानात भारत–गौरव–ग्रंथमालेला जें सर्वोत्कृष्टपणाबद्दल अग्रस्थान मिळाले आहे, त्याला या साधारण आश्रयदात्याचेच श्रम कारणीभूत झाले आहेत व ग्रथमालेविषयीं जो सर्वत्र आदरभाव वाढत चालला आहे, त्या यशाचे खरे वांटेकरीहि हे साधारण आश्रयदातेच आहेत. केवळ या आश्रयदात्यांसाठीं भारत-गौरव ग्रथमाला झीज सोसून आपलें कार्य चालविण्यास पुढें झाली आहे.

ग्रथमालेच्या आश्रयदात्यांत काहीं श्रीमान् आश्रयदाते नाहींत, असें नाहीं शेकडों काय पण हजारों आहेत, तथापि ग्रंथमालेस पाठबळाची आशा या श्रीमानाची नसून सर्वसाधारण आश्रयदात्यांचीच आहे स्थिति बिकट आहे, पूर्वीपेक्षां कागद चौपट महाग झाला आहे आणि काहीं वस्तूंच्या किंमती कल्पनेच्या बाहेर वाढल्या आहेत; तरी या वेळीं ग्रथमालेनें श्रीमतांच्या दाराशीं पदर न पसरता तो सर्वसाधारण आश्रयदात्यांपुढें पसरला आहे कारण ते जसे सदुद्यमशील आहेत, तसे ते आम्हांस दूर लोटण्या इतके निष्ठुर नाहींत असा ग्रथमालेला विश्वास आहे जे अडचणींत असतात, अडचण म्हणजे काय, हें ज्यांना समजतें, त्यांच्याच अत करणात दुसऱ्याना अडचणीत पाहून दया उत्पन्न होते या न्यायानें आतां जर ग्रथमालेविषयीं कोणाच्या मनांत सहानुकपा उत्पन्न झाली असेल, तर ती या साधारण आश्रयदात्याच्याच चित्तात होय. या वेळी त्यानीं जर सद्धेतुपूर्वक प्रयत्न करून ग्रथमालेस काहीं नवीन आश्रयदाते मिळवून देण्याचा प्रयत्न केला, तर हें सकटाहि मार्गे लोटून ग्रंथमाला खचित पुढच्या रम्य भागांत जाईल आणि तिच्या हातून वाङमयाचें अधिक संवर्धन होईल आमचे सर्व आश्रयदाते ही ग्रंथमाला आपली आहे, असा अभिमान बाळगून जर प्रयत्न करतील, तर त्यांचा प्रयत्न यशस्वी झाल्यावाचून राहणार नाहीं. सोबत कार्ड पाठविलें नाहीं. खाजगी कार्डें पुष्कळ प्रसगीं पोष्टांत 'नाटपेड' होण्याचा सभव असल्यामुळें आश्रयदात्यानीं सरकारी पोष्टकार्ड घेऊन त्यावर नवीन आश्रयदात्यांचीं नावें कळविण्याची कृपा करावी.

व्ही पी परत करण्याचा जो एक रोग महाराष्ट्रात सरसहा दिसून येतो, त्याची पीडा ग्रंथमालेला होऊं नये म्हणून आम्ही पुष्कळ खटपट करून पाहिली; परंतु त्या खटपटीस यावें तसें यश न आल्यामुळें **प्रवेश फी एक रुपया** करणे आम्हांस भाग झालें आहे ग्रंथमालेचें नवीन निघणारें पुस्तक ‘ पूर्व आणि पश्चिम ’ हें तयार होण्याच्या आधीं जे कोणी बिस्मार्कच्या चरित्राचे दोन्ही भाग घेऊन ग्रंथमालेच्या आश्रयदात्यांत नांवें दाखल करतील, त्यांच्या कडून मात्र पूर्वीप्रमाणे चारच आणे प्रवेश फी घेण्यांत येईल बिस्मार्क यांच्या दोन्ही भागाची किंमत एक रुपया, प्रवेश फी चार आणे व ट. खर्च तीन आणे मिळून एक रुपाया सात आण्यांची व्ही पी नवीन होणाऱ्या आश्रयदात्यांकडे पाठविण्यात येईल त्यासोबत मागचीं पुस्तकें ज्याना पाहिजे असतील, त्याना ती पूर्वीच्याच किंमतीनें देऊ; परंतु ही सवलत ‘ पूर्व आणि पश्चिम ’ हें पुस्तक प्रसिद्ध होई पावेतोंच आहे. या नवीन पुस्तकापासून होणाऱ्या आश्रयदात्याना **एक रुपया प्रवेश फी** द्यावी लागेल

यापुढें ‘ पूर्व आणि पश्चिम ’ ही अगदीं स्वतंत्र, नवी व सर्वोत्कृष्ट कादंबरी आश्रयदात्याकडे लवकरच पाठविण्यात येईल पौर्वात्य संस्कृति आणि पाश्चात्य संस्कृति या दोहोंची उठावदार चित्रें या कादंबरींत कुशलतेनें रेखाटली असून दोन्ही संस्कृतींची तुलनाहि फार मनोरमतेनें केली आहे कादंबरींतील प्रत्येक पात्राचें वृत्तिचित्र अगदी नवीन असें असून जुनी वाचलेली कादंबरीच आपण पुन्हा वाचीत आहों, हा जो दोष अलीकडे प्रसिद्ध होणाऱ्या नवीन कादंबऱ्यातून आढळतो, तो दोष या कादंबरीच्या एका पानावरहि आढळून येत नाहीं. सगळें नवें, पण चित्ताकर्षक, आरंभापासून अखेरपर्यंत रहस्यमय, पण अत्यंत सुबोधक आणि काव्यमय, पण परिणामकारक अशी ही कादंबरी असून इतकी उत्कृष्ट कादंबरी मराठी वाङ्मयांत एकादी दुसरीच मिळाली तर मिळेल, असें कोणासहि वाटेल. या कादंबरीनंतर बिस्मार्क यांच्या चरित्राचा तिसरा म्हणजे अखेरचा भाग प्रसिद्ध होईल. तिसऱ्या भागांतच हें चरित्र पुरें करावयाचें असल्यामुळें तेंहि पुष्कळ मोठें होईल या भागातहि दोन चित्रें देण्यात येतील

मुंबई,
गिरगांव, ता. १५।१।१८

सर्वांचा नम्र साहित्य सेवक,
**प्रभाकर श्रीपत भसे.**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.



युद्धविद्याविशारद कौंट मोल्टके.

जर्मनीचे वज्रबाहु प्रधान

# प्रिन्स बिस्मार्क.

## द्वितीय खंड.

### प्रकरण तेरावें.

### विजयश्रीचा स्वयंवर.

इ. स. १८७०–७१ च्या फ्रॉंकोजर्मन युद्धाचा प्रत्यक्ष संबंध बिस्मार्क याच्या चरित्राशीं नसला, तरी बिस्मार्क याच्या राजकारणाचें धोरण नीट लक्षात येण्याकरता त्याचें थोडेंसें वर्णन येथें अप्रासंगिक होणार नाहीं. जर्मनराष्ट्राची संहति कोणत्याहि उपायांनीं घडवून आणावयाची हें बिस्मार्क यांच्या राजनीतीचें अखेरचें साध्य होतें. हें सिद्ध करण्याच्या मार्गांत अनेक प्रकारच्या अडचणी होत्या व त्या अडचणी तरवारीशिवाय नाहींशा होणें शक्य नव्हतें. बिस्मार्क याच्या राजकारणास जय्यत लष्कराचें पाठबळ नसतें, तर त्याचें राजकारण दरिद्र्याच्या मनोरथाप्रमाणें निष्फल आणि वेडेपणाचें ठरलें असतें. इंग्लंडचे माजी प्रधान लॉर्ड बिकन्सफील्ड यानीं एका प्रसंगीं असेंच मत प्रगट केलें होतें.

सर्व सैन्याची 'जमवाजमव झाल्यानंतर त्याचे तीन विभाग करून जर्मन सेनापति तीन दिशांनीं शत्रूस तोंड देण्यास निघाले. या एकंदर लष्कराची संख्या सुमारें पांच लक्ष होती. सैन्याच्या मुख्य व्यूहाची रचना फ्रान्समध्यें व्हावी व युद्धाचा आखाडा शत्रूच्या मुलुखांत पडावा अशा बेतानीं या सैन्याची चाल सुरू केली होती.

फ्रेंचांचें लष्कर सुमारें तीन लक्ष होतें. त्यांनींहि आपल्या लष्कराचे तीन विभाग केले होते. सपाट्यानें शत्रूच्या मुलुखात शिरून व मेननदी पार होऊन दक्षिण जर्मन संस्थानें, उत्तरेंतील संयुक्त जर्मन संस्थानापासून वेगळीं पाडावयाचीं, असा फ्रेंच सेनापतींचा आरभीं हेतु होता; पण ज्या शिस्तीनें सैन्यें डेरेदाखल झालीं, ती शिस्त आरंभातच अपुरी पडल्यामुळें पहिली जमवाजमव होण्यासच उशीर लागला. यामुळें शत्रूच्या मुलुखात शिरण्याचें बाजूसच राहून आरंभापासूनच बचावाचें धोरण फ्रेंच सेनापतींस स्वीकारावें लागलें. फ्रेंचशिपायी स्वभावतःच तिखट व यत्किंचित कारणानें विकारवश होणारा असल्यामुळें बचावाच्या धोरणास त्याचा अंगस्वभाव फारसा अनुकूल नसतो.

सारब्रुकन येथें त्यांनीं मेजर फॉं पेस्टेल याजवर पहिला हल्ला केला. याच्या हाताखालीं ४० वी प्रशियन पायदळ पलटण व उल्हान स्वाराचें एक पथक होतें. या लढाईत फ्रेंचास थोडेंबहुत यश आलें; पण पुढें लवकरच तारीख ४ आगष्ट रोजीं विसेन्बर्ग येथें व तारीख ६ रोजीं वोर्थ येथे प्रशियन युवराजाच्या हाताखालील तिसऱ्या नंबरच्या सैन्यानें फ्रेंचाचा पुरा मोड केला. तारीख ६ रोजीं स्पिचर्नची आणखी एक मोठी लढाई होऊन तींतहि जर्मनाचा विजय झाला. तेव्हा फ्रेंच सेनापति मार्शल म्याक्‌माहन हे पिछेहाट करून शॉलान्सच्या ठाण्यावर आले. या ठिकाणीं एक लक्ष वीस हजार लोक त्यांनीं जमविले. मेट्झ येथील सैन्याचें आधिपत्य खुद्द बादशाहाकडे होतें. वरील लागोपाठ झालेल्या तीन पराभवामुळें बादशाहा घाबरून गेले व त्यांनीं आपल्या हातातलें रणकंकण मार्शल बॅझेन याच्या हातीं बांधलें. शॉलान्स येथें येऊन म्याक्‌माहन याचें व आपलें सैन्य एक करावें या हेतूनें मेट्झचा किल्ला सोडून बॅझेन यानीं पीछेहाट सुरू केली. तेव्हा मेट्झच्या आजुबाजूस

कोलंबे, नुइली, व्हियानिव्हिल, ग्रेव्हलाट, सेन्टप्रायव्हॅट इतक्या ठिकाणीं मोठ्या लढाया झाल्या. मेट्झचा तळ उठूं द्यावयाचा नाहीं व म्याक्माहनशीं बॅझेन यांची गांठ पडूं द्यावयाची नाहीं, असा जर्मन सेनापति मोल्टके याचा डाव होता. वरील सर्व लढायांत जर्मनांचा एक सारखा विजयच होत गेला व मेट्झ भोंवतीं त्याचे पाश पडूं लागले. मेट्झच्या किल्ल्यात फ्रेंचाचें ऱ्हाईनवरचें लष्कर कोंडलें जाणार, असा रंग दिसूं लागला. अखेरीस मेट्झच्या किल्ल्यात मार्शल बॅझेन पुरा वेढला गेला. यामुळें जर्मनीचें तिसरें सैन्य म्याक्माहनशीं दोन हात करावयास मोकळें झालें. बेल्जमच्या सरहद्दीकडून जर्मनसैन्याची बगल मारून मेट्झचा वेढा उठवावा, अशी म्याक्माहन यानीं खटपट करून पाहिली. लष्करी दृष्टया ही चाल वरीच धोक्याची होती. यामुळें असली धाडशी गोष्ट म्याक्माहन करील कीं काय याबद्दल मोल्टके यांच्या मनात जबर शंका होती; पण म्याक्माहनचें लष्कर बेल्जमच्या दिशेनें चाल करून निघालें आहे, अशी पक्की बातमी जर्मनांस लंडनहून तारेनें कळली; तेव्हां दुसरें व तिसरें जर्मनसैन्य म्याक्माहनच्या सैन्यास तोंड देण्याकरतां उत्तरेकडे वळलें. उत्तरदिशेकडे फ्रेंचसैन्याच्या पाठीशीं बेल्जम देशाची सरहद्द होती. बेल्जम देश तटस्थ असल्यामुळें ती हद्द ओलांडणें फ्रेंचांना शक्य नव्हतें. यामुळें त्याचा उत्तरेकडील रस्ता आपोआपच बंद झाला होता. तारीख १ सपटंबर सन १८७० रोजीं सेडन मुक्कामीं हें सर्व सैन्य वेढलें जाऊन दुसऱ्याच दिवशीं खुद्द नेपोलियन बादशाहा या लष्करानिशीं जर्मनांच्या स्वाधीन झाला.

राजे वुइलियम याजबरोबर बिस्मार्क आपल्या सल्लागार मंडळासह हजर होते. काहीं राजकारणाचा संबंध उपस्थित झाल्यास बिस्मार्क यांचा सल्ला तावडतोब मिळे. बिस्मार्क याचे दोन मुलगे पहिल्या ड्रागून

ार्ड पलटणीबरोबर शिपाई म्हणून लढाईत हजर होते. तारीख १६ ागष्ट रोजीं व्हिऑनव्हिल येथें झालेल्या लढाईत राजाबरोबर बिस्मार्क ातीनें हजर होते. एका प्रसगीं एका लहान जर्मन तुकडीला बऱ्याच ंच सैन्यानें गाठलें. तेव्हा त्या बाजूनें व्यूह फुटूं नये म्हणून तेथें कुमक येईपर्यंत त्या तुकडीला शत्रूशीं तोंड द्यावें लागलें. अर्थात् या तुकडीची बरीच नासाडी झाली. या तुकडींतच बिस्मार्क याचे दोन्ही मुलगे होते. आपल्या मुलांचें काय झालें, हें बराच वेळ न समजल्या-मुळें बिस्मार्क साहजिक काळजींत होते. अखेरीस फिरता फिरता त्याचा वडील मुलगा रणक्षेत्राजवळील एका शेतात जखमी होऊन पडलेला आढळला. त्याला तीन जखमा झाल्या असून त्यातील मांडीची जखम बरीच काळजी करण्यासारखी होती. जखमी लोकाच्या तोंडून अन्नपाण्याची चागलीशी व्यवस्था नाहीं, असें बिस्मार्क यास समजलें. नेव्हां आजुबाजूंचीं कोंबडीं धरून आणण्यास काहीं लोकांस पाठवून ते स्वत' पाण्याच्या शोधाला गेले. सुदैवानें त्याचा दुसरा मुलगा वुइलियम याला कोठेंहि जखम झाली नव्हती. तथापि त्याच्या घोड्याला जबर जखम होऊन शत्रूच्या रांगेपासून पन्नास कदमाच्या अंतरावर तो घोड्यावरून खालीं पडला व शत्रूच्या भयंकर भडिमारातून बचावून आपल्या सैन्यात सुखरूप दाखल झाला. या पितापुत्राची गाठ सेडा-नची लढाई होऊन जाईपर्यंत पडली नव्हती.

बिस्मार्क यांच्या दोन्ही मुलाना लष्करात बढती मिळाली, तेव्हा बडे बापके बेटे या नात्यानें त्यास ती मिळाली नसून या युद्धातल्या कर्तबगारीनें त्यानीं ती मिळविली, असें बिस्मार्क ह्मणत असत. मोल्टके याच्या आप्तेष्टासबंधींहि अशीच गोष्ट होती. जर्मन सेनापतीं-बद्दल बिस्मार्क यास वृथाभिमान केव्हांच वाटला नाहीं. व्हेर्सेलेट येथें

झालेल्या भयंकर लढाईसंबंधीं ते ह्मणतात, 'आमच्या सेनापतींच्या परस्पर मत्सरामुळें या लढाईत आह्मांस जबर नुकसानी सोसावी लागली.' त्याचप्रमाणें स्टीनमेट्झ नावाच्या सेनापतीसंबंधानें ते ह्मणाले, 'आमचें सैन्य निधड्या छातीचें आहे; पण स्टीनमेट्झनें आमच्या लोकाच्या धैर्याचा दुरुपयोग केला. माणसांच्या जीवाची त्याला कांहींच किंमत नाहीं.' तथापि सेनापतींचें कौशल्य व शिपायाचें धैर्य याची कदर ते जाणून नव्हते असेंहि नाहीं. योग्य प्रसंगीं या दोघाची स्तुतीहि ते करीत. ग्रेव्हलॉटच्या लढाईत बिस्मार्क आणि राजे वुइलियम लढाईच्या भर गर्दीत जातीनिशीं हजर होते. त्याच्या चाऱ्ही बाजूनीं शत्रूचा तोफखाना गोळ्याचा वर्षाव करीत होता. सायंकाळच्या सुमारास बिस्मार्क हे आपल्या तोफखान्याच्या एका तुकडीजवळ उभे असता शत्रूच्या बंद पडलेल्या तोफखान्याला नवी कुमक मिळून बिस्मार्क याच्या तुकडीवर प्रचंड मारा सुरू झाला. बिस्मार्क यांचा घोडा याच वेळीं जखमी झाल्यामुळें राजाची व त्याची ताटातूट झाली होती. या वेळीं फ्रेंच पायदळ पलटणानें चाल केली असती, तर जर्मन साम्राज्याचे पहिले वज्रबाहु प्रधान फ्रेंचांच्या हातीं जिवंत सापडले असते; पण इतक्यांत त्यांस दुसरा घोडा मिळून ते त्यावर बसून राजाच्या बाजूकडे निघून गेले. तेथेंहि गोळ्याचा वर्षाव कांहीं कमी नव्हता. रात्र पडल्यानंतर बिस्मार्क व राजे जवळच्या रेझानव्हिल नांवाच्या खेड्यात मुक्कामास गेले. लढाईचा निकाल काय होतो, हें जाणण्यासाठीं अगदी आतुर होऊन राजे एका मरून आडव्या पडलेल्या घोड्यावर बसले होते. त्या ठिकाणीं त्यास जयाची बातमी समजली. तेथूनच राजाच्या सांगण्यावरून बिस्मार्क यानीं ही जयाची बातमी तारेनें आगस्टा राणीला कळविली.

केवढाहि जय झाला, तरी भुकेची पीडा मनुष्याच्या मागची चुकत नाहीं. लढाई चालू असेपर्यंत राजास खाण्यापिण्याची फारशी आठवण राहिली नव्हती; पण जयाची बातमी समजल्यानतर राजांच्या पोटात भुकेनें गोंधळ उडविला. तेव्हां बिस्मार्क यानीं आपल्या थैलींतली वाळलेली भाकरी राजांस दिली. खुद्द बिस्मार्क याना दोन अड्यांवाचून दुसरें काहींच मिळालें नाहीं. ही रात्र बिस्मार्क यांनीं शेतकऱ्याच्या एका लहानशा खोपटात काढली. सेडारक्रीकचा योद्धा या नावानें प्रसिद्ध असलेला सेनापति शेरीडॉन हा बिस्मार्क याचा या वेळीं सोबती होता. तारीख २० आगष्ट रोजीं प्रशियाचे युवराज यांनीं बिस्मार्क यांची भेट घेऊन जर्मन बादशाही पुकारण्याविषयीं त्यांच्याशीं वाटाघाट केली. तथापि या वेळीं या दोघात या प्रश्नाचा निकाल लागला नाहीं. दुसऱ्याच दिवशीं बिस्मार्क यास आमांशाच्या विकारानें पछाडलें; तथापि दुखणें विकोपास न जाता ते एकदोन दिवसात हिंडूं फिरूं लागले व जखमी शिपायाच्या तैनातीस जातीनें हजर राहूं लागले. त्यांचा मुलगा हर्बर्ट जखमी झाला होता. त्याची त्यानीं काळजीपूर्वक शुश्रूषा केली. तारीख २३ रोजीं सैन्याचा तळ कामर्सी गावीं जावयास हलला, तेव्हां दोन मैलपर्यंत बिस्मार्क व मोल्टके हे बोलत बोलत पायींच चालत गेले.

फ्रेंच मुलुखातील प्रजाजनांनीं घाबरून जाऊं नये ह्मणून वुइलियम राजांनीं जागोजाग जाहिरनामे लावून कोणासहि इजा पोहोंचणार नाहीं, असें आश्वासन दिलें. मात्र युद्धाचे नियम प्रजाजनानीं पाळले पाहिजेत, असें त्यानीं या जाहिरनाम्यांत फर्माविलें होतें.

फ्रेंच प्रजाजनांसंबंधीं वुइलियम राजांनीं जो हा उदारपणा दाखविला, त्याचा फ्रेंचानीं सदुपयोग केला असें दिसत नाहीं. चुकूनमाकून मागें

राहिलेल्या जर्मन शिपायाची ते खुशाल कत्तल करीत. या कामासाठीं कांहीं फ्रेंच गावाच्या लोकानीं एक ल्हानसें पथकच तयार केलें होतें. यातले बरेचसे लोक पुढें लवकरच जर्मन स्वारांच्या हातीं पडले. त्याना बिस्मार्क याच्यापुढें उभें केलें, तेव्हां बिस्मार्क त्यास ह्मणाले, "तुह्मी योद्धे नसून खुनी आहां. तुह्माला फासावर चढविणेंच योग्य आहे. कालच एका उल्हान अम्मलदाराचा तुह्मी खून केला."

असो. ही हकीकत इतकीच सोडून आपण युद्धाच्या इतिहासाकडे वळूं. तारीख १ सपटंबर रोजीं सायंकाळीं ७ वाजतां नेपोलियन बादशाहाकडून राजे वुइलियम यांस पत्र घेऊन जनरल रेली हे राजाच्या हुजुरास आले. हें पत्र असें—

"महाराज–माझे बधु,

माझ्या सैन्याच्या अग्रभागीं उभें राहून मरणें माझ्या नशिवीं आहे, असं दिसत नसल्यामुळें महाराजांच्या चरणीं माझी तरवार सादर करण्यावांचून मला दुसरा उपाय दिसत नाहीं.

सेडान १ सपटंबर.

महाराजाचा बधु,
**नेपोलियन.**"

हें पत्र वाचून राजे वुइलियम यांचा कंठ भरून आला. कांहीं न बोलता तें पत्र त्यांनीं बिस्मार्क याच्या हातीं दिलें. वुइलियम राजाच्या तर्फे बिस्मार्क यांनीं पुढील उत्तर लिहिलें.

"महाराज–माझे बधु,

ज्या परिस्थितींत आपली मुलाखत होत आहे, तिजबद्दल मला फार वाईट वाटतें. तथापि आपल्या तलवारीचा मी स्वीकार करतों आणि आपल्या आधिपत्याखालीं जें सैन्य इतका वेळ मोठ्या शौर्यानें लढलें, तें कोणत्या अटीवर आमच्या स्वाधीन व्हावें हें ठरविण्याकरितां आपण पूर्ण अधिकार असलेल्या एकाद्या अम्मलदाराची योजना करावी, अशी मी आपणास नम्रपणें सूचना कर

तों. या बाबतींत बोलणें करण्याकरतां सेनापति फॉ मोल्टके याची नेमणूक माझ्या तर्फे मी केली आहे

महाराजाचा बंधु,

**वुइलियम.** ”

हें पत्र घेऊन जनरल रेली निघून गेल्यानंतर वुइलियम राजानीं युवराजास आलिंगन दिलें व बिस्मार्क यांशीं हस्तांदोलन करून त्यांस म्हटलें, “आजचा आणीबाणीचा प्रसंग आपणास शांततादायक होईल असें मला वाटत नाहीं.” राजाचें हें मत बिस्मार्क यासहि पूर्णपणें मान्य झालें. रेली निघून गेल्यानंतर राजे वुइलियम आपल्या व्हेंड्रेसीच्या हुजूर मुक्कामावर परत गेले. बिस्मार्क, मोल्टके, ब्ल्यूमेंथाल आणि मोल्टके याचे काही अम्मलदार डानचेरी येथें गेले. या ठिकाणीं नेपोलियन बादशाहा तर्फे जनरल वुइफेन, जनरल क्यासलनो, व जनरल फॉर असे रात्री दहा वाजता पुढील बोलणें करण्यासाठी आले. तहाचें बोलणें सुरू असल्यामुळें उभय दळें पहाटे चार वाजेपर्यंत स्वस्थ रहावीं, असें ठरलें होतें.

डानचेरीच्या किल्ल्यांतील दिवाणखान्याच्या मध्यभागीं आरक्त वस्त्रांनी आच्छादिलेलें एक मोठें मेज होतें. त्याच्या शेजारी असलेल्या मध्यभागींच्या खुर्चीवर सेनापति मोल्टके बसले. त्याच्या उजव्या हाताला क्वार्टर मास्तर जनरल फाँ पॉड बिल्स्की हे असून डाव्या हातास बिस्मार्क बसले होते. या तिघाच्या समोरच्या बाजूस फ्रेंचाचे मुख्य सेनापति जनरल दि वुइफेन, जनरल क्यासलनो व जनरल फॉर बसले होते. याशिवाय लेफटेनंट कर्नल फाँ होलेनडार्फ व लेफ्टेनंट कर्नल व्हर्नाय हे दोन प्रशियन अम्मलदार होते. क्यापटन कौंट नास्टटिट्झ हे लघुलिपीनें भाषणें टिपून घेण्यासाठीं बसले होते. बराच वेळ झाला, तथापि कोणी

काही बोलेना. बुइफेन यास आरंभ कोठून करावा हेंच सुचेना आणि शत्रुपक्षाकडून आरंभ झाल्यावाचून आपण तोंड उघडावयाचें नाहीं, असा मोल्टके याचा निश्चय होता. बऱ्याच वेळानंतर जनरल बुईफेन म्हणाले,

"प्रशियाचे महाराज आम्हास कोणत्या अटी सांगतात, हें जाणण्याची माझी इच्छा आहे."

यावर मोल्टके यानीं उत्तर दिलें, "अटी अगदीं सोप्या आहेत. सर्व फ्रेंच सैन्यानें लढाईचे कैदी या नात्यानें आपलीं हत्यारेंपात्यारें व बाडबिछाईत यासह आमच्या स्वाधीन व्हावें. अम्मलदाराच्या तरवारी आम्ही काढून घेऊं इच्छित नाहीं. तथापि शिपायाबरोबर त्यानींहि आमच्या स्वाधीन व्हावें."

जनरल बुईफेन म्हणाले, "या अटी फारच कडक आहेत. फ्रेंच लष्करानें दाखविलेलें शौर्य लक्षात घेता, त्याला अधिक सवलती मिळणें योग्य आहे. किल्ला व तोफखाना आम्ही तुमच्या स्वाधीन करतो, पण प्रशियाविरुद्ध पुन्हा शस्त्र उचलणार नाहीं या अटींवर सैन्यातील लोकांजवळ शस्त्रें, निशाणें आणि बाडबिछाईत राहू देण्याची परवानगी द्यावी."

यानंतर फ्रेंच बादशाहीच्या प्रशियानें ठरविलेल्या कोणत्याहि भागात हें लष्कर जाऊन राहील, असें बुईफेन म्हणाले. यानंतर बुईफेन यानीं स्वतःसंबधीं बोलतांना म्हटलें. "अगदीं आयत्या वेळीं ही सारी जबाबदारी मजवर येऊन पडली आहे. यामुळें गतगोष्टींची जबाबदारी मजवर नाहीं, हें लक्षात घेऊन तरी काहीं अधिक सवलती द्या." अशा प्रकारें केलेल्या सामदामाच्या भाषणास मोल्टके यत्किंचितहि दाद देत नाहींत, असें पाहून बुईफेन यांनीं दंडनीतीचाहि प्रयोग करून पाहिला. ते म्हणाले, "याहून

अधिक चांगल्या अटी आम्हांस न मिळाल्या, तर या अटीवर लढाई थांबविणें मला अशक्य आहे. सैन्याचें नशीब पुन्हा एकवार मी अजमावून पाहीन. एकतर तुमची फळी फोडण्याचा यत्न मी करीन अथवा कुमक येईपर्यंत सेडानचा गड भाडवीन."

यावर मोल्टके यांनीं उत्तर दिलें, "सेनापतीसाहेब, आपल्या स्वत.-च्या कर्तबगारीसंबंधीं माझ्या मनात पूर्ण आदर वसत आहे. आपल्या अडचणी मला समजतात. तथापि आपलें म्हणणें मला मान्य करता येत नाहीं, याबद्दल मी फार दिलगीर आहें. आमची फळी फोडण्याबद्दल अथवा सेडानचा गड भाडविण्याबद्दल ह्मणाल, तर या दोन्ही गोष्टी शक्य नाहींत, असें मला म्हटलें पाहिजे. चांगल्या सैन्यापैकीं काहीं भाग आपल्या हातीं अद्यापि आहे, हें खरें व आपलें निवडक सैन्य कोणासहि हार जाणार नाहीं, हेंहि खरें; तथापि आजच वीस हजार बिनजखमी शिपायी आमच्या हातीं पडले, यावरून आपल्या पायदळात किती बेदिली माजली आहे, हें उघड दिसून येतें. आपणापाशीं आजच्या तारखेस ऐंशीं हजार लष्कर असून आमच्यापाशीं दोन लक्ष चाळीस हजार लष्कर व पाचशें तोफा आहेत. माझें ह्मणणें खरें कीं खोटें, हें प्रत्यक्ष आपल्या अम्मलदारानींच वाटल्यास पहावें. आपला दारूगोळा संपत आला असून अन्नसामग्री फक्त अट्ठेचाळीस तासापुरतीच शिलुक आहे. अशा स्थितींत गड भांडविणें अथवा फळी फोडणें या दोन्ही गोष्टी अशक्य आहेत"

शत्रूला लष्करी परिस्थितीची पूर्ण माहिती आहे, हें लक्षात येताच जनरल वुइंफेन यानीं आपल्या भाषणाचा रोख बदलला. ते ह्मणाले, "फ्रेंच राष्ट्र उदार बुद्धीचें व उच्च मनोविकारानीं युक्त असें आहे. त्याच्यावर कोणी उपकार केल्यास त्या राष्ट्राच्या औदार्यास भर आल्यावांचून रहात

नाहीं. उलट पक्षीं तुह्मी फ्रेंच लोकाशीं कठोरपणें वागल्यास, त्याचा क्रोध मात्र जागृत होईल. आमचे सारे शिपाई तुमच्या वागणुकीनें खवळून जातील. आपला अपमान होत आहे, असें त्यांच्या राष्ट्रास वाटेल. संस्कृतीमुळें जे पाशवी गुण लोकांच्या चित्तात लुप्तप्राय होत आले आहेत, ते पुन्हा जागृत होतील आणि अशानें फ्रान्स आणि प्रशिया यांजमधील वैराग्नी कायमचा धुमसत राहील."

यावर जनरल मोल्टके काहीं उत्तर देणार, तोंच बिस्मार्क ह्मणाले, "सेनापती साहेब, तुमच्या भाषणांत सत्याचा आभास बऱ्याच अशीं आहे; पण त्याचा काळजीपूर्वक विचार केल्यास त्यात काहीं तथ्य आढळून येत नाहीं. सामान्य दृष्टीनें पाहता कोणाच्या कृतज्ञता बुद्धीवर अवलंबून राहणें धोक्याचें आहे. विशेषत· साऱ्या राष्ट्राकडून कृतज्ञपणाची अपेक्षा करणें राजकीय दृष्ट्या चुकीचें आहे. एकाद्या राजावर कोणी उपकार केला, तर तो राजा अथवा फार झाल्यास त्याचें कुटुंब हीं कृतज्ञ राहू शकतील; पण संबध राष्ट्रास ही गोष्ट लागू पडत नाहीं. फ्रान्सच्या राज्यपद्धतींत गेल्या ऐशीं वर्षांत इतक्या वेळा फेरफार झाला आहे कीं, तेथील अमुक एक राज्यपद्धति चिरस्थायी स्वरूपाची आहे, असें कोणासहि ह्मणता यावयाचें नाही. फ्रेंच लोक विकारवश असल्यामुळें आजची पद्धति उद्यांहि नाहींशी होते. अशा स्थितींत तुमच्या देशाच्या भरंवशावर अवलंबून राहणें मूर्खपणाचें आहे. आम्हाला एकसारखे जय येत गेले, हेंच फ्रेंचाच्या चिडण्याचें कारण आहे. या जयाची विस्मृती फ्रेंच लोकास कधींकाळीं पडेल, अशी समजूत करून घेणें हें मूर्खपणाचें आहे. फ्रेंच राष्ट्र यत्किंचित कारणानेंहि हातघाईवर येतें. तसेंच तें मत्सरी असून उद्दामवृत्तीचें आहे. केवळ दोन शतकाच्या अवधींत जर्मनीविरुद्ध त्यानें तीस वेळां तरवार बाहेर काढली आहे. आजचें युद्धहि याच कार-

णामुळें घडून आलें आहे. सॅडोवा येथें आमच्या तलवारीस यश आलें, हें तुम्हास देखवलें नाहीं. वास्तविक पाहता आमच्या जयानें तुमच्या कीर्तीस उणीव येत नव्हती अथवा तुमचें काहीं नुकसानहि झालें नाहीं. असें असता केवळ मत्सरानें प्रेरित होऊन तुम्ही आम्हावर चालून आला. तरवार गाजविण्याचा ताम्रपट परमेश्वरानें जणूं काय फ्रेंच राष्ट्रासच दिला आहे, असें तुम्हास वाटतें. जय मिळविणें हा आपला जन्मसिद्ध हक्क आहे असा तुमचा समज आहे. आपल्या शेजाऱ्यानें पराक्रम गाजविले, तर तें, तुम्हास सहन होत नाहीं. सॅडोवाचा जय तुमच्या डोळ्यात सलूं लागला. ज्यात तुमचें यत्किंचितहि नुकसान नव्हतें, तो सॅडोवाचा जय जर तुह्मी विसरूं शकत नाहीं, तर सेडान तुमच्या ध्यानातून जाईल, ही कल्पना तरी संभवतें काय? मी निश्चयानें त्रिवार सागतों कीं, सेडानबद्दल तुम्ही आम्हास कधींहि क्षमा करणार नाहीं. तुमच्या म्हणण्याप्रमाणें तह करण्यास आज आम्हीं राजी झालों, तर पांचदहा वर्षांच्या अवधींतच आमच्या देशात युद्धाचा वणवा पेटविण्यास तुम्हीं कमी करणार नाहीं. याहून अधिक कृतज्ञताबुद्धीची अपेक्षा फ्रेंच राष्ट्राकडून आह्मी करीत नाहीं. आह्मी लोक जात्याच शातताप्रिय आहों. जाणून बुजून आम्हास कोणी त्रास न दिला, तर सुखासमाधानानें राहण्याची आमची इच्छा आहे. आज बाण आमच्या हातीं आला आहे, त्याचा पुरा उपयोग करून घेणे आमचें कर्तव्य आहे. फ्रान्सच्या उद्धटपणाबद्दल आणि इतरास गिळंकृत करण्याच्या हांवरे-पणाबद्दल त्यास शिक्षा लावणें जरूर आहे. आमचीं मुलेंबाळें शांततेनें नादावीं अशी आमची इच्छा आहे. आणि हें साधण्यासाठीं सर्व उपाय योजणें आम्हास भाग आहे. या करता आमची सरहद्द योग्यप्रकारच्या तट-बदीनें संरक्षित झाली पाहिजे. या बाजूनें आमच्या देशावर पुढें घाले न पडतील अशी व्यवस्था करणे आह्मास भाग आहे.”

यावर वुइंफेन यानीं उत्तर दिलें, "इ. स. १८१५ सालनतर फ्रान्सच्या लोकमतात विलक्षण क्राति घडून आली आहे. बेजबाबदार वर्तमानपत्रकाराच्या वरळण्यावरून साऱ्या देशाची किंमत तुह्मीं करू नका."

यावर बिस्मार्क मध्येंच ह्मणाले, "सेनापति साहेब, फ्रान्सच्या मनोवृत्तींत कोणत्याहि प्रकारची सुधारणा झालेली नाहीं. याप्रसगींहि फ्रान्सलाच हें युद्ध हवें होतें. आपला रणगाजीपणा दाखवावा व त्यायोगें आपलें तक्त आपल्या घराण्यात कायमचें चालेसें करावें, एवढ्याचसाठीं नेपोलियन बादशहानें आह्मावर शस्त्र धरलें. तुमच्या देशातील विचारी लोकास हें युद्ध नको होतें, हें आह्मास चांगलें ठाऊक आहे; तथापि युद्ध टाळण्यासाठीं त्यानींहि शिकस्त केली नाहीं. तुमच्या लष्करासहि युद्ध नको होतें; पण तुमच्या देशातील चळवळे लोक आणि बेजबाबदार पत्रकार यानीं हा वणवा पेटविला. हेच लोक तुमच्या देशात प्रधानमडळाच्या उलथापालथी करतात. हेच लोक जुनी राज्यपद्धति नष्ट करून नवी अमलांत आणतात. याच लोकाना शासन करण्याची आमची इच्छा आहे. याच लोकांसाठीं पारीस राजधानीवर ढाला फिरविणें आह्मास भाग आहे. आज आमच्या हातीं आलेलें सैन्य आह्मी मोकळें सोडून दिलें, तर निरर्थक युद्ध लाबविण्याचें व उभय राष्ट्राचें नाहक नुकसान करण्याचें श्रेय मात्र आमच्या पदरांत पडेल. हें सैन्य मोकळें झालें, तर आमच्या विरुद्ध तेंच पुन्हा शस्त्र उचलील. सेनापति साहेब, तुमच्या झालेल्या दुर्दशेबद्दल आह्मास मनःपूर्वक वाईट वाटतें. तसेंच तुह्माबद्दल व तुमच्या सैन्याच्या शौर्याबद्दल आह्मास आदरहि वाटतो; तथापि आमच्या कोणत्याहि अटी आह्मास मागें घेता येत नाहींत."

जनरल वुइंफेन ह्मणाले, "असें असेल, तर आह्मासहि आमच्या अटी मागें घेता येत नाहींत. आता आह्मी युद्धास पुन्हा सुरुवात करणार."

जनरल क्यासलनो ह्मणाले, "माझी कामगिरी बजावण्याची मी परवानगी मागतों. नेपोलियन बादशहानीं कोणत्याहि अटीशिवाय आपली तलवार प्रशियाच्या राजाच्या स्वाधीन केली आहे, हें लक्षात घेऊन प्रशियाच्या राजानीं फ्रेंच सैन्यास योग्य सन्मानानें वागवावें, अशी बादशहाची इच्छा आहे."

यावर बिस्मार्क यानीं विचारलें, "बादशहानीं कोणती तलवार आमच्या स्वाधीन केली आहे? ती फ्रेंच राष्ट्राची तलवार कीं, त्याची स्वतःची? ती राष्ट्राची तलवार असेल, तर आमच्या अटी बऱ्याच नरम होतील आणि त्या प्रमाणानीं तुमच्या कामगिरीचें स्वरूपहि फारच अधिक महत्वाचें होईल."

यावर क्यासलनो यानीं उत्तर दिलें, "ही फक्त बादशहाची तलवार आहे."

हें उत्तर ऐकतांच मोल्टके एकदम ह्मणाले, "तर मग आमच्या अटींत कांहीं फेरफार करता येत नाहीं. तथापि बादशहांना मात्र त्यांच्या इच्छेप्रमाणें वागविण्यांत येईल."

नंतर वुइंफेन याजकडे वळून ते ह्मणाले, "लढाईच्या तहकुबीची मुदत उद्या पहांटे चार वाजता संपते. बरोबर पहाटे चार वाजता मी शहरावर तोफा लावीन."

अशा रीतीनें कोणताहि शेवट न लागता ही बैठक बरखास्त झाली. 'यापुढें लढाई चालविणें ह्मणजे दोन्ही पक्षांचें नाहक नुकसान करणें होय' असें बिस्मार्क ह्मणाले. 'युद्ध पुढें चालू ठेवण्यात कांहीं फायदा

नाहीं, अशी वुईंफेन याची खात्री मोल्टके यानीं करून दिली असताहि फ्रेंच सेनापती पुन्हा युद्धास सज्ज झाले, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.' हें बिस्मार्क याचें मत मोल्टके यास बरोबर पटलें. ते ह्मणाले, "सेडान शहरावर दोन तास तोफखाना चालला, तर सर्व शहरभर आगी लागतील. आमच्या ठाण्याच्या आजुबाजूंच्या प्रदेशाचे नकाशे, फ्रेंच अम्मलदारांजवळ असतील, तर आमची नाकेबदी कोठेंहि ढिली पडण्यासारखी नाहीं, हें त्याच्या लक्षात आल्यावांचून राहणार नाहीं." वास्तविक फ्रेंच सेनापतींस फ्रान्स ऐवजीं जर्मन मुलुखाचे नकाशे पुरविण्यात आले होते, हें महशूर होतें. यानंतर बिस्मार्क याच्या अनुमतीनें लढाईच्या तहकुबीची मुदत सकाळीं नऊ वाजेपर्यंत वाढविण्यात आली.

नंतर रात्रीं एक वाजता सर्व मंडळी आपापल्या तंबूंत गेली. सकाळीं सहा वाजता बिस्मार्क जागे होतात, तोंच नेपोलियन बादशहाकडून निरोप घेऊन जनरल रिली आले असल्याचें त्यास समजलें. बादशाहा बिस्मार्क यांस भेटावयास येत आहेत, असा निरोप रिली यानीं सांगितला. हा निरोप ऐकताच बिस्मार्क घोड्यावर बसून सेडानच्या बाजूस गेले. डानचेरीपासून दोन मैलावर असलेल्या फ्रेनॉट नावाच्या खेड्याजवळ बादशहांची गाडी त्यास दिसली. नेपोलियन याच्या गाडींत तीन लष्करी अमलदार बसले असून दुसरे तीन गाडीच्या बाजूनें चालले होते. बिस्मार्क यानीं मोठ्या नम्रपणें बादशहास सलाम केला. बादशाहांनीं आपली टोपी काढली, हें पाहून बिस्मार्क यानींहि आपली टोपी काढली. लष्करी शिस्तीप्रमाणें पहाता बिस्मार्क यांस टोपी काढण्याची जरूरी नव्हती. बिस्मार्क यास टोपी घालण्यास सांगून बादशहा ह्मणाले; "मला वुइलियम राजांची भेट घ्यावयाची आहे."

बिस्मार्क यानीं उत्तर दिलें, "महाराजांचा मुक्काम येथून चवदा मैलांवर व्हेन्ड्रेसी गांवीं असल्यामुळें त्याची मुलाखत होणें शक्य नाहीं."

यासंबंधीं पुढें एकवार बोलत असता बिस्मार्क ह्मणाले, "सिडानचें सैन्य आमच्या स्वाधीन होईपर्यंत नेपोलिन व वुइल्यिम याची गांठ पडावी, अशी माझी इच्छा नव्हती. राजाची गाठ पडणें शक्य नाहीं, असें मी सागितल्यानंतर 'माझ्या स्वतःच्या मुक्कामाची तजवीज कोठें तरी करा.' असें बादशाहा ह्मणाले. सिडान शहरीं राहणें, त्यास धोक्याचें वाटलें असावें. फ्रेंच शिपायी दारूनें मस्त होऊन साऱ्या गावभर फिरत व रहिवाश्याशीं मारामाऱ्या करीत. अशाप्रसंगीं खुद्द बादशाहाचीहि मुरवत कदाचित् कोणी ठेवली नसती. डानचेरी येथें ज्या घरात माझा मुक्काम होता, तेंच घर बादशाहास मी देऊं केलें व बादशाहानीं तें मान्य करून ते तिकडे यावयास निघाले; पण वाटेंतल्या म्यूज नदीच्या पुलाजवळ त्याची गाडी येताच बादशाहा मला ह्मणाले, "डानचेरीसहि मी येत नाहीं. हें लहानसें घर जवळच दिसतें आहे, येथेंच मी मुक्काम करतों." बादशाहा गाडींतून उतरून त्या घराच्या वरच्या मजल्यावर गेले. मीहि त्याजबरोबर गेलों. सर्व मंडळी खालीं बसल्यावर बादसाहा मला ह्मणाले, "हें युद्ध व्हावें, अशी माझी इच्छा नव्हती. केवळ फ्रेंच लोकाच्या ओरडाओरडीस मला मान वाकवावी लागली." यावर मी उत्तर दिलें, "हें युद्ध आह्मासहि नको होतें. आमच्या महाराजाचीहि शातता राखण्याची इच्छा होती. स्पेन देशाच्या भानगडीशीं जर्मनीचा कोणताहि संबंध नव्हता." एवढें भाषण झाल्यानंतर बादशाहानें सेडानचा प्रश्न पुन्हा उपस्थित केला व आमच्या अटींत काहीं सवलत मिळावी असें सुचविलें. तेव्हां मी ह्मटलें, "या विषयासंबधीं मला काहीं बोलता येत नाहीं. ही केवळ लष्करी बाब असल्यामुळें तिचा

निकाल लावणें, फक्त मोल्टके याच्याच हातीं आहे; तथापि तहाच्या अटींसंबंधीं कांहीं बोलावयाचें असल्यास माझी तयारी आहे," असें मीं बादशहास सुचविलें. तेव्हां बादशहा ह्मणाले, "मी स्वतःच लढाईंतील कैदी असल्यामुळें मला या विषयात बोलतां येत नाहीं." मीं बादशहास विचारलें, "तर मग या प्रश्नाची वाटाघाट करण्याचा अधिकार सध्यां कोणाकडे आहे? राजदंड सध्यां कोणाच्या हातीं आहे?" तेव्हां बादशहा ह्मणाले, "ही सत्ता तूर्त पारीस येथील संरक्षक मंडळाकडे (Regency) आहे." सेडानसबधीं पुन्हां प्रश्न निघताच मीं ह्मटलें, "कालच्या लष्करी परिस्थितींत आज कांहीं बदल झाला आहे, असें नाहीं. याकरतां कालच्याच अटींवर सेडान येथील सैन्यानें आमच्या स्वाधीन झालें पाहिजे. आमच्या हातीं आलेला बाण आह्मास फुकट घालविता येत नाहीं." आमच्या मुलाखतीसबधीं मोल्टके यांस मीं अगोदरच निरोप पाठविला होता, त्याप्रमाणें तेहि इतक्यात येऊन दाखल झाले. माझ्याच मताचा अनुवाद करून मोल्टके यानींहि तसेंच मत दिलें व बादशहास सर्व लष्करी परिस्थिति समजावून सागितली.

नंतर बादशहा उठून बाहेर आले व मलाहि त्यानीं बाहेर बोलाविलें. त्या घराच्या दाराशीं आह्मी दोघें बसलों. बादशहा मजकडे वळून ह्मणाले, "सेडानचें सैन्य बेल्जमसरहद्द ओलांडून पलीकडे गेलें व तेथें आपलीं हत्यारें खालीं ठेऊन, तें बेल्जम सरकारच्या स्वाधीन झालें, तर त्यास तुमची काय हरकत आहे?" मी उत्तर दिलें, 'हें सर्व मोल्टके यांचें पाहणें आहे.'

मध्यंतरीं बादशहाच्या मुक्कामासाठीं जागा पहावयास कांहीं अम्मलदार गेले होते, ते परत आले व फ्रेनॉय जवळ बेलेव्ह्यू नावाचा बंगला रिकामा आहे, अशी बातमी त्यांनीं आणली. या बंगल्यांत तोंपर्यंत

कोणीहि जखमी लोक आले नव्हते. या बंगल्यात बादशहांनीं आपला मुक्काम ठेवावा, अशी मीं सूचना केली व त्यांनीं ती मान्य केली. इतकें झाल्यानतर मी डानचेरीस घोड्यावरून परत आलों. मी बादशहाच्या भेटीला गेलों, तेव्हां मीं मुखमार्जनहि केलें नव्हतें आणि माझ्या अंगावर जो लढाईचा पोशाक होता, तो धुळीनें मळला असून त्यावर चिखलाचे डागहि पडले होते."

सेडानचें सैन्य स्वाधीन होईपर्यंत बादशहांची मुलाखत आपणास घेता येत नाहीं, असा निरोप वुइलियम राजानीं बेलेव्ह्यू मुक्कामीं पाठविला. यानंतर मोल्टके यानीं सागितलेल्या अटींत कोणताहि फेरफार न होतां, सेडानचें सैन्य मोल्टके यांच्या स्वाधीन झालें. या साऱ्या हकीकतीचें पत्र बिस्मार्क यानीं आपल्या पत्नीस पाठविलें होतें, पण तें न पोहोंचता मध्येंच फ्रेंचांच्या हातीं पडलें. यानंतर दोन वर्षांनीं पारीस येथील 'फिगारो' नावाच्या वर्तमानपत्रात तें पत्र फोटोच्या स्वरूपात प्रसिद्ध झालें. तें पत्र असें:—

" व्हेंड्रेसी, ता ३ सप्टेंबर.

प्रिये,

परवाच्या दिवशीं पहांटेस मी येथचा मुक्काम हालवून बाहेर गेलों होतों, तो आज परत आलों. १, ल्या तारखेस सिडानची मोठी लढाई होऊन तींत तीस हजार फ्रेंच शिपाई आह्मीं पाडाव केले बार्लेडकपासून आह्मी या सैन्याचा पाठलाग करीत होतों सिडानच्या लढाईंत या सैन्याचर मोड करून आह्मीं त्याला सिडानच्या किल्ल्यात कोंडलें अखेरीस बादशहासुद्धा हें सैन्य आमच्या हातीं पडलें. काल पहांटे, पाच वाजता माझ्या ओळखीचे फ्रेंच सेनापति जनरल रीली मजकडे आले व बादशहा माझी भेट घेऊ इच्छित आहेत, असें त्यांनीं मला कळविलें मी उठलों व तसाच घोड्यावर बसून सिडानकडे गेलों. सिडानच्या रस्त्यावर बादशहांची व माझी भेट झाली बादशहा उघड्या गाडींत बसले असून त्याजबरोबर तीन लष्करी अम्मलदार बसले होते व तीन

अम्मलदार घोड्यावर बसून गाडीबरोबर चालले होते. बादशहास पाहताच मी घोड्यावरून खालीं उतरलों व मोठ्या लीनतेनें कुर्निसात करून काय हुकूम आहे, ह्मणून विचारलें. आपल्या महाराजाची भेट घेण्याची इच्छा बादशहानीं कळविली महाराजाचा मुक्काम चौदा मैलाच्या पल्यावर असल्यामुळें भेट होऊं शकत नाहीं, असें मीं त्याना सांगितलें. नंतर 'आपल्या मुक्कामाची कोठें तरी सोय करा,' असें ते मला ह्मणाले. आजूबाजूच्या प्रदेशाची माहिती मला नसल्यामुळें डानचेरी येथील माझ्या मुक्कामाचें घर मीं बादशहास दिलें. डानचेरी हं गाव सेडानजवळ म्यूज नदीच्या कांठीं आहे. त्या घरी बादशहा जावयास निघाले, परंतु गांवाजवळ येताच काय असेल ते असो, त्याना गावात जाणें बरें वाटलें नाहीं. तेव्हां रस्त्याच्या बाजूस असलेल्या एका मजुराच्या खोंपटात जाण्याची इच्छा त्यांनीं दर्शविली तें घर पाहण्यासाठीं काले यांस मी पाठविलें तें अगदीं लहान व घाणेरडें आहे, असें त्यानें सांगितलें. 'काहीं हरकत नाहीं' असें ह्मणून बादशहा त्या खोपटात शिरले व मीहि त्यांजबरोबर जिना चढून वर गेलों आह्मी आतल्या एका खोलींत जाऊन बसलों. ही खोली दहा फूट रुंद व दहा फूट लांब होती आत एक टेबल व दोन खुर्च्या होत्या बाकीची मंडळी तळमजल्यावरच राहिली. इ स १८६७ सालीं बादशहांच्या राजमहालांत मी त्याच्या दर्शनास गेलो होतों, त्या प्रसगाची या वेळीं मला आठवण होऊन त्या वेळच्या स्थितीशीं तुलना करतां मला अत्यंत विषाद वाटला. उभयपक्षीं फारसें संभाषण होणें शक्यच नव्हतें. चालू युद्धाच्या गोष्टीचा उल्लेख करणें मला बरें वाटलें नाहीं बिचाऱ्या बादशहावर परमेश्वराचा आधीच कोप झालेला. तेव्हां त्या दुःखदायक प्रसगाची आठवण त्यास पुन्हा करून देणें मला बरें वाटलें नाहीं.

मोल्टके यांस व दुसऱ्या कांहीं अम्मलदारांस घेऊन येण्यासाठीं मीं काले यास पाठविलें होतें माझ्या निरोपाप्रमाणें ही मंडळी येताच बादशहाकरता एखादी जागा पाहण्यास मी एका अम्मलदारास रवाना केलें. फ्रेनॉयपासून अर्ध्या तासाच्या रस्त्यावर एक लहानसा बंगला रिकामा असल्याचें त्यांनीं मला सांगितलें इतक्यात आमच्या गार्ड पलटणीचेहि काहीं लोक येऊन दाखल झाले. तेव्हा त्यास बरोबर घेऊन बादशहांस त्याच्या मुक्कामावर पोहोंचविण्यासाठीं मी त्यांजबरोबर गेलों या ठिकाणीं जनरल वुइंफेन, खुद्द बादशहा व सिडानमधील

फ्रेंच लष्कर आमच्या स्वाधीन झालें कैद्याची नक्की सख्या मला समजली नाहीं; तथापि ती ४० पासून ६० हजार असावी असा अजमास आहे केवळ दोन दिवसाच्या अवधींत एक लक्ष लोक व बादशहा इतक्यास फ्रेंच राष्ट्रास मुकावे लागलें आपला सर्व लवाजमा व गाड्याघोडी बरोबर घेऊन बादशहा वुइल-हेल्मशो गांवीं निघून गेले

हा प्रसंग इतिहासांत चिरस्थायी होऊन राहण्यासारखा आहे आम्हांस एवढा जय दिल्याबद्दल अत्यंत नम्र अंत करणानें आपण परमेश्वराचे आभार मानले पाहिजेत आता बादशहा नसला, तरी फ्रेंच राष्ट्र काहीं काळ युद्ध लांबवील हें खरें; तथापि या गोष्टीमुळें युद्धाचा निकाल आजच लागल्यासारखा झाला आहे.

आता मला आटोपतें घेतले पाहिजे मेरीचें व तुझें पत्र आज मला मिळालें. हर्बर्ट सुखरूप घरीं आल्याचा मजकूर वाचून मला मनापासून आनंद झाला बिलची प्रकृति बरी आहे हॅन्स आणि फ्रिट्झ् हे व बुलो यांचे दोन मुलगे कालच मला भेटले ही सर्व तरुण मंडळी आनंदांत आहे मुलांस आशिर्वाद.

बी."

आपल्या प्रियपत्नीला हें पत्र बिस्मार्क यानीं लढाईच्या गर्दीतच लिहिलें असल्यामुळें, तें विशेष महत्वाचें आहे. शत्रूच्या पतनामुळें झालेल्या आनंदाचा अतिरेक येथें दृष्टीस पडत नाहीं. स्वदेशबांधवांच्या शौर्याची व्याजस्तुति यांत आढळून येत नाहीं. परमेश्वराच्या कृपेनें हा दिवस दिसला, ह्मणून त्या ईश्वराचा जयजयकार बिस्मार्क करीत आहेत! बिस्मार्क यांचें अंत करण किती उदार आणि शुद्ध होतें, हें या पत्राव-रून कोणासहि कळून येण्यासारखें आहे. बिस्मार्क हे दांभिक होते, बढाईखोर होते, युद्धप्रिय होते, आत्मप्रौढी वाढविणारे होते; असल्या प्रकारचे आरोप करणाऱ्या लोकांस त्याच्या अंत:करणाची पारख झाली नाहीं, असें ह्मणण्यास काय हरकत आहे?

डानचेरी गावाजवळील एका टेकडीवर राजे वुइलियम हे फ्रेंच लष्कर ताब्यात घेण्यासाठीं आले होते व नंतर बेलेव्ह्यूच्या बंगल्यात

नेपोलियन बादशहाच्या भेटीसाठीं ते गेले. जर्मनींत जाण्याकरता बादशहानीं तेथून आपला मुक्काम हलविला, तेव्हा त्याचे डोळे अश्रूंनीं भरून आले होते, असें बिस्मार्क यानीं दुसऱ्या एका पत्रात ह्मटलें आहे.

कौंट वुइलियम बिस्मार्क याला तारीख ३ सप्टंबर रोजीं बढती मिळून त्याचें नाव अम्मलदाराच्या यादींत पडलें व त्याच दिवशीं वुइलियम राजानीं आपल्या अम्मलदारमंडळीस मेजवानी दिली. मेजवानीचे वेळीं भाषण करताना वुइलियम राजे ह्मणाले,

"आज प्रथम माझ्या शूर लष्कराचें शुभचिंतन आपण केलें पाहिजे. युद्धमंत्री फॉं रून, तुह्मी आमची तरवार धार देऊन सज्ज केली! सेनापति फॉं मोल्टके, वज्रप्रहार तुह्मी केलात! आणि कौंट फॉं बिस्मार्क, गेलीं कित्येक वर्षें राज्यशकटाची धुरा सभाळून प्रशियाला आजच्या उच्च पदास तुह्मी चढविलें!!! याकरता आमचें लष्कर व तुह्मी तिघे आणि याशिवाय या कार्याला ज्या ज्या कोणीं मदत केली असेल, त्या सर्वांचें शुभ चिंतून ही 'शापेन' आपण घेऊं."

प्रशियन सैन्य तयार करण्यात ज्याची मदत झाली, त्याची यादी याप्रमाणें राजे वुइलियम यानीं वाचली खरी, तथापि तींत महत्वाचें एक नाव चुकून राहिलें. तें नाव ह्मणजे त्याचें स्वतःचेंच होय. रून यानीं ज्या शस्त्राला धार दिली व मोल्टके यानीं ज्याचा उपयोग केला, तें शस्त्र वुइलियम यानीं स्वतः निर्माण केलें होतें. वुइलियम यांनीं हें शस्त्र जन्मास घातलें नसतें, तर रून, मोल्टके अथवा बिस्मार्क यापैकीं एकाच्याहि बुद्धिमत्तेचा उपयोग झाला नसता. राज्यधुरेची सर्व जबाबदारी त्याच्या माथ्यावर होती. आपल्या स्वतःच्या उदाहरणानें साऱ्या जर्मनसैन्याच्या हृदयात त्यानीं उत्साह उत्पन्न केला. कर्त्तव्य ह्मटलें कीं, त्याला मान वाकविलीच पाहिजे. हा धडा स्वतःच्या उदाहरणानें सर्व सैन्यास त्यानीं शिकविला. कर्त्तव्यतत्परतेच्या एकाच गुणावर साऱ्या जर्मन राष्ट्राचें जीवित आजहि अवलंबून आहे. प्रशियन सैन्य वुइलियम राजानें निर्माण

केलें व अखेरीस शेलेपागोटीं देण्याची वेळ आली, त्या वेळीं शालीनपणें स्वत: मागें राहून आपले सेनापती आणि आपलें सैन्य यांची स्तुति त्यानीं केली.

सैन्यातील शिपायानीं रणभूमीवर जशी अतुल मर्दुमकी गाजविली, त्याचप्रमाणें शत्रूच्या मुलुखात असता तेथील रहिवाशाशीं सौम्यतेनें वागून त्यानीं आपल्या अंत:करणाचा दयार्द्रपणाहि व्यक्त केला. एक ठाणें सोडून प्रशियन सैन्य पुढें चाल करूं लागलें, ह्मणजे खेड्यापाड्यातील फ्रेंच कुटुंबें त्याजबरोबर खुशीनें चालत. असें असताहि 'प्रशियन सैन्यें नरभक्षकासारखीं आहेत,' 'गावचे गांव त्यांनीं बेचिराख केले आहेत' असल्या प्रकारची वर्णनें फ्रेंच पत्रें करीत असत.

क्रमाक्रमानें सिडानच्या भयंकर अपजयाची बातमी पारीस येथें पोंहोंचली. ती बातमी ऐकताच राणी आपल्या मुलाला घेऊन इंग्लंडांत पळून गेली. पॅरीसमध्यें यापुढें राहणें शहाणपणाचें होणार नाहीं, ही गोष्ट तिला कळून चुकली. या राजपुत्राचा शेवट दक्षिण आफ्रिकेंत अत्यंत शोचनीयावस्थेंत झाला. प्यारीसमध्यें तात्पुरत्या प्रधानमंडळाची नेमणूक होऊन त्याकडे देशाच्या संरक्षणाचें काम आलें. जूल्सफेव्हर, ग्याम्बेटा, जूल्स फेरी, रॉशफोर, आणि जूल्स सायमन हे ऱ्याडिकल पक्षाचे मुख्य पुढारी असून त्यांचें नेतृत्व जनरल ट्रोशू याजकडे होतें. याच पक्षाच्या हातीं सर्व सत्ता एकवटून जनरल ट्रोशू हे या नव्या संरक्षकमंडळाचे अध्यक्ष झाले. या संरक्षकमंडळाची स्थापना तारीख ४ सप्टंबर रोजीं झाली व तारीख ६ सप्टंबर रोजीं केलेल्या भाषणात जूल्स फेव्हर ह्मणाले, "आमच्या देशातील एक इंच जागा अथवा आमच्या किल्लेकोटाचा एक दगडहि आह्मी शत्रूच्या हातीं पडूं देणार नाहीं."

जर्मनसैन्यानें फ्रान्समध्यें एकामागून एक इतक्या सपाट्यानें जय मिळविले कीं, या देखाव्यानें सारें युरोप चकित होऊन गेलें. केवळ तीस दिवसाच्या अवधींत नेपोलियन आणि त्याचें शूर सैन्य हीं अस्तंगत झालीं. इ. स. १८६६ च्या युद्धांत प्रशियाच्या सैन्यापुढें आस्ट्रियाच्या सैन्याची जी वाट लागली, तीच फ्रान्सचीहि दशा या युद्धात झाली. युरोपात समतोलपणा रहावा, कोणत्याहि राष्ट्रानें अधिक बळवान् होऊ नये, यासाठीं सदासर्वदा डोळ्यात तेल घालून जपणारें इंग्लंड आस्ट्रियाच्या साह्यानें या वेळीं जर्मनीचा हात धरण्यास एकदम पुढें झालें. या युद्धात इंग्लंडकडून दगडी कोळसा, शस्त्रास्त्रें आणि इतर युद्धोपयोगी साहित्य याचा पुरवठा फ्रान्सला होत होता. यामुळें सारा जर्मन देश इंग्लंड विरुद्ध अगोदरच चिथरून गेला होता. त्यातच या नव्या कृतीची आणखी भर पडली.

इंग्लंड मध्यें पडल्याबरोबर एकदर परिस्थितीची माहिती सर्व युरोपीय प्रधानमंडळास देण्याकरतां बिस्मार्क यानीं पुढील माहितीपत्रक सर्व राष्ट्राकडे पाठावल.

"जर्मनराष्ट्र आज जशाप्रकारचे अविश्रात श्रम करीत आहे, तशा प्रकारचे श्रम तें वारवार करील, अशी समजूत करून घेणें चुकीचें आहे याकरतां फ्रान्सच्या भावी हल्लयांपासून जर्मनीची सरहद्द सुरक्षित रहावी म्हणून तशा प्रकारची हमी घेणें आम्हास इष्ट आहे तशा प्रकारची हमी आजच घेतल्यावाचून गत्यंतर नाहीं

फ्रान्सची राज्यपद्धति कोणत्या प्रकारची असावी, हें पाहणें आमचें काम नाहीं. आम्हास कोणत्या प्रकारचा तह पाहिजे, हें ठरविणें त्याच्या राज्यपद्धतीवर अवलबून नसून तें परिस्थितीवर अवलबून आहे. आमच्या शेजारीं असलेलें राष्ट्र भाडखोर स्वभावाचें व जुलमी आहे, असा अनुभव आम्हांस असल्यामुळें केवळ आत्मसरक्षणासाठीं योग्य ती तजवीज आजच करणें आम्हास भाग आहे. मेट्झ आणि स्ट्रासबर्ग हे दोन गड फ्रेंचाच्या हातीं असेपर्यंत

लष्करी दृष्ट्या त्याचें चढाईचें बळ आम्हावर अधिक राहील. अशा स्थितीत त्याजविरुद्ध आम्हापाशीं बचावाचें साधन राहणार नाही. स्ट्रास्बर्गचा दरवाजा फ्रेंचांच्या हातीं राहील, तोपर्यंत दक्षिण जर्मनींत शिरण्याचें द्वार त्याच्या हातीं राहणार आहे. केवळ आत्मसंरक्षणासाठीं आज जे प्रचंड श्रम आम्हास करावे लागले आहेत, त्याचें बक्षीस म्हणून भावी बचावाचीं साधनें आमच्या हातीं घेण्याचा आमचा बेत आहे अशा स्थितींत आमच्या मागण्या मित नाहींत, असें कोणीहि म्हणू शकणार नाहीं. आमच्या या मागण्या सर्वथा न्याय्य आणि समतोलपणाच्या आहेत, असेंच सर्व म्हणतील "

सिडान येथें बादशाही सैन्य शरण गेल्यानंतर फ्रान्सच्या लोकसत्ताकानीं युद्ध पुढें सुरू केलें. त्यांचा प्रथम प्रयत्न राजधानी सुरक्षित ठेवण्यापुरताच होता. तारीख १९ सप्टेंबर रोजीं जर्मनीच्या विजयी सैन्यानें पारीस शहराभोंवतीं पुरा वेढा घातला. तात्पुरत्या बनलेल्या प्रधानमंडळानें हा वेढा उठविण्यासाठीं प्रांतोप्रांतीं नवीं सैन्यें निर्माण करून आटोकाट यत्न केला, पण त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. फ्रान्सचीं नवीं सैन्यें उत्साहानें भरलेलीं होतीं. फ्रेंच लोक जात्याच शूर व धाडसी; पण युद्धपद्धतींत या वेळीं जो बदल झाला होता, त्यामुळें शूर आणि धाडसी पण गबाळ आणि बेशिस्त अशा सैन्याचा टिकाव शिस्तींत मुरलेल्या सैन्यापुढें लागण्यासारखा नव्हता. दक्षिण जर्मनीचें केवळ नाकेंच, असा जो स्ट्रास्बर्गचा गड तो तारीख २८ सप्टेंबर रोजीं जर्मनांच्या स्वाधीन झाला व आणखी तीन दिवसांनीं टूलच्या किल्ल्यानेंहि पांढरें निशाण उभारलें. तारीख ९ नवंबर रोजीं ऑर्लियन्सजवळ कूल्मायर्सगांवीं फ्रेंचास एक जय मिळाला. यामुळें त्याची आशा काहीं काळ पुन्हा दुणावली; पण पुढें तीन आठवड्यांनीं ऑर्लियन्स येथें फ्रेंच लष्करास जबर मार बसला. तारीख २९ अक्टोबर रोजीं मेट्झचा किल्ला जर्मनांच्या स्वाधीन झाला व त्याबरोबर

किल्यांतील १७३००० सैन्य शत्रूंच्या स्वाधीन झालें. पारिसमधील सैन्य बाहेर पडण्यासाठीं धडपडूं लागलें व रातबेरात शत्रूच्या गोटावर तें छापे घालूं लागलें; पण जर्मनांची फळी अखेरपर्यंत फुटली नाहीं. ता. १९ जानेवारी सन १८७१ रोजीं या सैन्यानें एक अखेरचा प्रयत्न ह्मणून मॉंटव्हॅलेरीन येथें निकराची लढाई केली; पण हाहि प्रयत्न फसला. ता. २८ जानेवारी रोजीं कांहीं काळपर्यंत उभयपक्षाच्या संमतीनें युद्ध तहकूब झालें. प्यारीसच्या दक्षिणेकडे फ्रेंच सेनापति बूरबाकी हा आपल्या सैन्यासह होता. आता फ्रेच राष्ट्राची सारी भिस्त या सैन्याच्या पराक्रमावर अवलंबून होती. बूरबाकीनें तलवार गाजविली, तर तहात काहीं तरी सवलती मिळतील, अशा आशेनें सारें राष्ट्र या सैन्याकडे डोळे लावून बसलें होतें; पण बूरबाकीच्या हातून कांहीं न होता तारीख १ फेब्रुआरी रोजीं जर्मनसैन्यानें त्याला ऐशीं हजार लोकांसह स्वित्झरलँडच्या हद्दींत ढकललें. तेव्हां तटस्थ राष्ट्रांच्या कायद्यास अनुसरून स्वित्झरलंडनें या लोकांचीं हत्यारें काढून घेतलीं. इ. स. १८७०–७१ च्या फ्रँको-जर्मन युद्धांतील ही अखेरची लढाई होय.

तारीख १९ सप्टेंबर रोजीं जर्मनसैन्याचें हुजूर ठाणें पारीस नजीक फेरिवर्स येथें आलें व पारीसच्या वेढ्यास सुरुवात झाली. याच दिवशीं पारिसच्या संरक्षकमंडळातील इतर कोणाचीहि सल्ला न घेतां जूल्स-फेव्हर हा बिस्मार्क याजकडे तहाची वाटाघाट करण्याकरता आला. सरदार रॉथशाईल्ड याच्या हॉट मेसन नावाच्या बगल्यात या दोन मुत्सद्यांची भेट झाली. या भेटीची हकीकत जूल्स फेव्हर यानें तारीख २१ सप्टेंबर रोजीं प्रसिद्ध करून प्रशिया हा फ्रान्सला दुय्यम प्रतीच्या राष्ट्रात ढकलूं पहात आहे, असें त्यात त्यांनीं ह्मटलें होतें. तेव्हा बिस्मार्क यानीं एक जाहीरपत्रक काढून आपलें ह्मणणें सर्व राष्ट्रापुढें ठेवलें.

त्याच दिवशीं सध्याकाळीं तहाची वाटाघाट पुन्हा सुरू झाली. या भेटीची हकीकत प्रसिद्ध करताना जूल्स फेव्हर यानें बिस्मार्क याजसंबंधीं पुढील उद्गार काढले आहेत.

"बिस्मार्क हे शरीराने धिप्पाड, मोठ्या डोक्याचे व रेखीव चेहऱ्याचे आहेत. बाह्यत: ते मोठे कडक आणि लष्करी बाण्याचे दिसतात; तथापि बोलण्याचालण्यात त्याचा कडकपणा फारसा भासत नाहीं. त्यांची रीतभात सभ्यपणाची व गंभीर अशी आहे. बोलण्यात दांभिकपणाची अथवा उद्धटपणाची छटाहि नाहीं. आमच्या भाषणास सुरुवात झाल्याबरोबर त्यानीं निष्काळजीपणाची व आनंदी मुद्रा धारण केली व ही आपली वृत्ति त्यानीं अखेरपर्यंत कायम ठेवली. त्याच्या विचारपद्धतींतील सूक्ष्मपणा, बुद्धीचा तीव्रपणा व मनाची अपूर्व कल्पकता याचें मला मोठें नवल वाटलें. त्याच्या वृत्तींत डौलीपणा मुळींच नाहीं, हें लक्ष्यात ठेवण्यासारखें आहे. सांप्रतच्या काळीं, हे गुण असलेला, दुसरा एकहि मुत्सद्दी माझ्या पाहण्यात आला नाहीं. त्याचें भाषण केवळ वस्तुस्थितीस धरून चाललें असून त्यांत पोकळ कल्पनेची भरारी कोठेंहि आढळून आली नाहीं. प्रत्येक प्रश्नाचा विचार ते केवळ व्यावहारिक दृष्टीने करीत होते गैर लागू अथवा बिन मुद्याची एकहि गोष्ट त्यांच्या भाषणात आली नाहीं. ते विलक्षण आत्मसंयमी आहेत व आपल्या प्रतिपक्ष्याच्या भाषणाचा आपल्या चित्तावर कांहींहि परिणाम होऊ देत नाहींत अथवा झाला, तरी दिसू देत नाहींत. 'मुत्सद्देगिरीच्या कामांत मी अद्यापि बच्चा आहें' असा त्याचा खास समज झाला असावा; तथापि शिष्टाचारास अनुसरून त्यानीं माझ्याविषयींचें हे मत बाहेर दिसू दिलें नाहीं.

## प्रकरण चवदावें.

# जर्मन साम्राज्य.

अशाप्रकारें जर्मनीचीं सैन्यें एकामागून एक विजय मिळवीत असतां तिकडे रशियांत एक निराळाच प्रकार घडून आला. त्यामुळें रशियाकडून थोडीबहुत मदत मिळेल, अशी जी आशा फ्रान्सला वाटत होती, ती समूळ नष्ट झाली. इ. स. १८५६ सालीं, पारीसचा तह ह्मणून जो तह झाला होता, त्याप्रमाणें वर्तन करण्यास आपण बांधलेले नाहीं, अशा अर्थाचें जाहीरपत्रक प्रिन्स गार्शेचेकॉफ यानीं सर्व राष्ट्रांकडे पाठविलें. यामुळें सर्व युरोपियन दरबारें मोठ्या अचंब्यांत पडलीं. या कामीं रशियन दरबारास आपलें पूर्ण पाठबळ आहे, अशा अर्थाचा खलिता बिस्मार्क यानीं रशियन प्रधानाकडे पाठविला व प्रशियाचा पाठिराखेपणा अशा रीतीनें रशियानें केल्याबद्दल झारचे आभारहि त्यांनीं मानले.

तारीख ३१ अक्टोबर सन १८७० रोजीं फ्रेंचांच्या तर्फे काहीं सवलतींचा तह घडवून आणण्याकरतां मॉंशर थियर्स हे जर्मन हुजुरास आले. तह घडवून यावा अशी त्याची मनापासून इच्छा होती; तथापि फ्रान्सच्या तात्पुरत्या प्रधानमंडळानें विलक्षण अटी मागितल्यामुळें त्याची खटपट फुकट गेली. फ्रान्सच्या प्रधानमंडळास अद्यापि लढाई पुरेशी झाली नव्हती, असें स्पष्ट दिसून येण्यासारखें होतें. तारीख ६ नवंबर रोजीं थियर्स हे पुन्हा पारीसहून आले व या वेळीं आपल्या सरकारतर्फे आपण प्रतिनिधी ह्मणून आलों आहों, अशा अर्थाचा खलिताहि त्यांनीं बरोबर आणला होता. युद्धाचा अखेर निकाल काय होणार, याबद्दल राजे वुइलियम व बिस्मार्क हे केव्हांच साशक नव्हते. यापुढें युद्ध चालू ठेवणें ह्मणजे उभयपक्षाचें निरर्थक नुकसान आहे,

असें त्यास वाटत असल्यामुळें तह घडून यावा अशी त्याची मन:पूर्वक इच्छा होती; पण फ्रेंचाचा वृथाभिमान अद्यापि नाहींसा झाला नव्हता. अद्यापि त्यांची चोहोंकडून निराशा झाली नव्हती, यामुळें हें तात्पुरतें प्रधानमंडळ तहास राजी होईना. मध्यंतरीं निवडणुकी होऊन संघटित राज्यघटनेची स्थापना फ्रेंचास करता यावी ह्मणून कांहीं दिवस युद्ध तहकूब ठेवण्यास वुइल्यम राजे कबूल होते व आलसेसप्रांतातहि वाटल्यास निवडणूक करावी, असें बिस्मार्क यानीं कबूल केलें होतें; पण याबरोबरच 'पारीस शहराला अन्नसामग्रीचा नवा पुरवठा करण्यास परवानगी द्या' अशी मागणी थियर्स यानीं केली. असली भलतीच मागणी बिस्मार्क यांस कबूल होण्यासारखी नव्हती. तारीख ८ नवंबर रोजीं बिस्मार्क यानीं जाहीर खलिता काढून या मागणीस पुढील उत्तर दिलें —

"आमच्या अटी फ्रेंचवकिलानें नाकारल्या, हें ऐकून मला मोठें नवल वाटतें. या अटीवर युद्ध तहकूब झालें असतें, तर फ्रेंच राष्ट्राचाच त्यात फायदा होता. 'पारीस शहरांला नवी सामग्री घेऊं देत असाल, तरच आह्मी युद्ध तहकूब ठेवतों' असें त्यानीं आम्हास कळविलें. अशा प्रकारची अट कबूल करणें अमच्या आवाक्याबाहेर आहे, असें मी त्याना उत्तर दिलें ही अट आह्मी कबूल केली, तर तिच्या मोबदल्यात तुम्हीं आम्हास काय द्याल, असा सवाल मीं त्याला विचारला लष्करी दृष्टया या मागणीचा कोणत्याहि प्रकारचा मोबदला देण्यास आपल्यास सरकाराकडून अधिकार मिळालेला नाहीं, असें उत्तर मॉशर थियर्स यानीं दिलें फ्रेंचराष्ट्रानें प्रतिनिधी मंडळ निवडलें ह्मणजे त्यातून सत्ताधारी प्रधानमंडळाची नेमणूक होईल व त्याजबरोबर आह्मास तहाची वाटाघाट करता येईल, असें थियर्स यांचें ह्मणणें होतें

पारीसला रसद पोहोंचू द्यावी, ही भलतीच मागणी वुइल्यम राजासहि कबूल होण्यासारखी नव्हती दोन महिन्याच्या अवधींत जर्मनलष्करानें जीवापाड मेहनत करून व प्राणहानी सोसून जो फायदा मिळविला होता, तोही मागणी कबूल केल्यानें समूळ नाहींसा झाला असता

लढाईच्या खोट्यानाट्या बातम्या देऊन व मन मानेल तशा विपर्यस्त हकीकती प्रसिद्ध करून प्रधानमंडळानें फ्रेंच राष्ट्रास कसें तरी झुलवीत ठेवलें होतें, पण त्याच्या या कृतीचीं कडू फळें चाखण्याची वेळ जवळ येऊन ठेपली. देशात चोहोंकडे बंडें उठूं लागलीं. मेट्झचा किल्ला अद्यापि भाडत आहे, असें पारीसच्या रहिवाशास सागण्यांत आलें होतें. दुसरीं मोठीं राष्ट्रें मध्ये पडत आहेत, असें या प्रधानमंडळानें लोकास भासविलें होतें. ल बुर्जेचें ठाणें मोठी प्राणहानी सोसून फ्रेंच सैन्यानें काबीज केलें होतें; पण जर्मन सैन्यानें तें पुन्हा घेताच, तें महत्त्वाचें नाहीं, असें हें प्रधानमंडळ म्हणू लागलें. अशा रीतीनें अनेक गप्पा या प्रधानमंडळानें लोकास सागितल्या होत्या. हळूहळू या गप्पाचें खरें स्वरूप लोकास कळूं लागलें व त्यामुळें राष्ट्र बेदील होण्याच्या पथास लागलें. प्रधानमंडळाच्या कचेरीवर लोकांनीं हल्ला केला व हें प्रधान-मंडळ पदच्युत करा, अशा आरोळ्या ते मारूं लागले; तथापि पारीसचें सैन्य अद्यापि प्रधानमंडळाच्या स्वाधीन असल्यामुळें बराचसा रक्तस्राव होऊन हें बंड मोडलें.

जूल्स फेव्हरपेक्षा थियर्सबद्दल बिस्मार्क यांचें अधिक चांगलें मत झालें. या फ्रेंच वकिलासबंधीं ते म्हणतात,

“मॉशर थियर्स हा बुद्धिवान आणि सभ्य गृहस्थ आहे तह घडवून आण-ण्याबद्दल तो फार उत्सुक दिसला तथापि मुत्सद्देगिरीचे डावपेंच त्याच्या अंगीं मला दिसून आले नाहींत तो सरळ स्वभावाचा असल्यानें या कामीं लागणारी वक्रता अर्थातच त्याच्या आगीं नाहीं फेव्हरपेक्षा तो अधिक उदार आणि सरदारी बाण्याचा आहे तथापि मुत्सद्देगिरीची बोलणीं करण्यास तो योग्य नाहीं. मनातले विकार चेहऱ्यावर दिसू न देण्याची विद्या त्याला ठाऊक नाहीं. आडवे तिडवे प्रश्न विचारले म्हणजे त्याच्या पोटात कांहीं न राहता तो सगळें-च्या सगळें ओकून टाकतो. सागू नयेत अशा अनेक गोष्टी त्यानें मला सागि-

तल्या पारीसमध्यें आता फक्त तीनचारच आठवड्यांपुरती अन्नसामग्री आहे, असें त्याच्याकडूनच मला समजलें "

यानतर जर्मन संस्थानात आपआपसात अधिक भक्कम पायावर संहति उभारली जावी यासाठीं सस्थानाच्या काहीं बैठकी झाल्या होत्या. यात जे अनेक प्रकारचे वादविवाद झाले, त्यामुळें बिस्मार्क यास विनाकारण फार त्रास झाला. या विषयासंबंधाने बोलताना बिस्मार्क एका अम्मल-दाराजवळ म्हणाले, "या बैठकींत अखेरीस काहीं सुद्धां निष्पन्न होत नाहीं. हें असें का आणि तें तसें का, असल्या अनेक निरर्थक प्रश्नाचीं उत्तरें देता देतां माझा जीव बेजार होतो. एकादी साधी गोष्टसुद्धा या लोकाना खडे माडून सागावी लागते. असल्या वादविवादांचा कधीं तरी शेवट येईल कीं नाहीं कोण जाणे ? अमुक गोष्ट अशीच झाली पाहिजे, असें ह्मणण्याची सत्ता माझ्या हातीं असती, तर या साऱ्या भानगडींचा निकाल पाच मिनिटाच्या अवधींत मीं लावला असता."

शिपायाच्या खाद्यावर पट्टे कोणत्या रंगाचे असावेत, अशासारख्या क्षुल्लक गोष्टीवरहि मोठालीं रणें माजून अखेरीस त्यांचा निकाल न लागतां रात्रीच्या रात्रीं निघून जात. तथापि अखेरीस ही वाटाघाट सपून जर्मन संहति निर्माण करण्यात बिस्मार्क यास यश आलें. बेडन-हेसे, बव्हेरिया आणि वर्टेम्बर्ग हीं संस्थानेंहि असेरीस अनुकूल होऊन ता. २५ नवंबर रोजीं जर्मन बादशाही निर्माण झाली. या सस्थानात जे परस्पर करारमदार झाले होते, त्यासबधीं बिस्मार्क ह्मणाले,

या करारमदारानीं वर्तमानपत्रें सतुष्ट होणार नाहींत असें दिसतें. त्याच-प्रमाणें सामान्य दर्जाचे इतिहासकारहि आह्मास नावें ठेवतील. 'एकाद्या सस्था-नानें अमुक एक अधिक हक्क मागितला असता, तर बरें झालें असतें' प्रशियाचा एकादा हक्क कमी झाला असता, तर त्याहून चांगलें झालें असतें,' अथवा 'प्रशियानें

काहीं नवे हक्क मागितले असते, तर ते देणें इतरांना भाग पडलें असतें,' अस ल्या प्रकारची टीका करावयास हे लोक चुकावयाचे नाहींत, हें मला ठाऊक होतें, तथापि कोणतीहि गोष्ट परस्पराच्या समाधानानें झाली पाहिजे याविषयीं मी फार काळजी घेतली होती जोर जुलमानें जो करारनामा होतो, त्याचा अतीं काहींच उपयोग होत नाहीं. आमच्या करारनाम्यात पुष्कळ उणीवा राहिल्या असतील, तथापि सर्व सस्थानांच्या खुषीनें हे करारमदार झाले आहेत. सर्व आनदात आणि समाधानांत आहेत, एवढी माझी खात्री आहे. आज कांहीं परिस्थितीमुळें प्रशियाचें बूड जड झालें असलें, तरी त्याचा दुसऱ्यावर जुलूम करण्यात उपयोग करणें इष्ट नाहीं. या करारनाम्यात कांहीं दोष असले, तरी आहे त्या स्थितींत त्याला सर्व चिकटून राहतील हाच त्याचा मोठा गुण आहे. अलीकडच्या काळात जे डाव आह्मी केले, त्या सर्वांचें हें अत्यत महत्वाचें फळ आहे असा माझा समज आहे"

पारीस भोंवतीं वेढा पडला, तेव्हां लष्करी दृष्ट्या पाहतां शहरावर ताबडतोब तोफ लावणें इष्ट होतें; तथापि अनेक कारणामुळें ही मुख्य गोष्ट कित्येक दिवस मागें पडली. या बाबतींत कांहीं उच्च दर्जाच्या स्त्रियाचें अंग होतें अशी लोकवार्ता आहे. पारीस शहराला तोफा न लावल्यामुळें लोकाचे हाल उगीच लाबत आहेत, असें रून याचें ह्मणणें होतें. व बिस्मार्क याचेंहि हेंच मत पडलें. यामुळें आपल्या सैन्याचा निरर्थक खराबा होतो, असें मोल्टके ह्मणत होते. याखेरीज युद्धाचा निकाल दिवसगतीवर पडल्यास आणखी एकादें राष्ट्र फ्रेंचाच्या तर्फें मध्यें पडण्याचाहि संभव होता. अखेरीस 'ना हो' करतां करता तारीख २७ दिसेंबर रोजीं मोल्टके यांनीं दहा दिवसांची आगाऊ सूचना देऊन पारीस शहरावर तोफ लावली. या तोफखानी माऱ्याचा परिणामहि ताबडतोब दिसून आला. मॅांटअव्हरान नावाचें मजबूत डोंगरी ठाणें सॅक्सन लष्करानीं एकाच हल्यानें हातोहात सर केलें. तोफाचा मारा शहराभोंवतालच्या किल्ल्यावरच होत होता, असें नाहीं, तर त्यांतील कित्येक गोळे खुद्द शह-

रातहि पडत. या भडिमारानें झालेल्या नुकसानीचीं वर्णनें करता करता पारीस मधील वर्तमानपत्राचे रकाने भरून जात होते.

पारीसचे सेनापती जनरल ट्रोश् यानीं मोल्टके याजकडे एक खलिता पाठवून जर्मन सैन्याचें हें कृत्य नीतीच्या व दयेच्या विरुद्ध आहे अशी तक्रार त्यात केली होती. यावर जर्मन सैन्यातर्फे मोल्टके यानीं पुढील जबाब दिला.

"तारीख ४ सप्टबरपासून जर्मन सैन्यानें या युद्धांत जो दयाभूतपणा दाखविला आहे, तेवढ्यावरून जर्मन लष्कर कोणतेंहि अनन्वित कृत्य करणार नाहीं, अशी कोणाचीहि खात्री होईल."

तारीख १३ जानेवारी रोजीं पारीसमधील सर्व युरोपियन वकिलानीं स्वीज वकील डॉ. कर्न यांजमार्फत एक खलिता बिस्मार्क यांजकडे पाठविला. तोफांच्या माऱ्यास सुरुवात करण्यापूर्वीं परराष्ट्रीय वकिलास सुरक्षित जागीं जाण्याबद्दल अगाऊ इशारा देणें कायद्याप्रमाणें अवश्य होतें, अशी तक्रार या खलित्यात केली होती. या खलित्यास बिस्मार्क यानीं पुढील उत्तर दिलें.

"आज माझ्याकडे आलेल्या खलित्यात परराष्ट्रीय वकिलांनीं जो आपला हक्क सांगितला आहे, तो राष्ट्रीय कायद्यास धरून आहे, असें मला ह्मणतां येत नाहीं, याबद्दल मला फार वाईट वाटतें. एका मोठ्या राष्ट्राची राजधानी असलेलें आणि जवळ जवळ तीस लक्ष वस्तीचें अशा शहराचें सरक्षण पक्के किल्लेकोट बांधून केल्याचें उदाहरण अर्वाचीन इतिहासात हे पहिलेंच आहे. यामुळें या शहराची परिस्थिति फार चमत्कारिक आणि अर्थातच मोठी दुःखजनक झाली आहे. आतां शहराची कांहीं नासधूस होत असेल, तर किल्लेकोट बांधून ज्यानीं त्याची समरभूमि बनविली, त्याच्याच माथ्यावर ही जबाबदारी आहे. युद्ध सुरू असतां किल्ल्यात जे कोणी स्वखुषीनें राहतात त्यानीं सर्व प्रकारचें नुकसान सोसण्याची तयारी ठेवली पाहिजे. पारीस हा फ्रान्सांतील अत्यत

महत्वाचा किल्ला आहे. आपलें सारें मुख्य सैन्य फ्रान्सनें येथेंच जमा केलें आहे. आपल्या सरक्षित जागेंत राहून तेथून हेंच सैन्य जर्मन सैन्यावर छापे घालीत आहे व हल्ले करीत आहे इतक्या गोष्टी उघड असतां जर्मन सेनापतींनीं पारी-सवर हल्ला करू नये अथवा हल्ला केलाच तर इतर किल्ल्यावरील, हल्ल्याच्या शिस्तीनें तो चालवू नये, अशी अपेक्षा कोणीहि करणार नाहीं. वेढा पडल्यावर ज्या गोष्टी नेहमी अवश्य घडतात, त्याजपासून नि:शस्त्र व तटस्थ रहिवाशाचें रक्षण करण्यासाठीं शक्य ते उपाय जर्मन सेनापतींनीं अगोदरच योजिले आहेत."

याशिवाय तारीख २६ सपटबर रोजीं जी आगाऊ सूचना देण्यात आली होती, तिचीहि बिस्मार्क यानीं या परराष्ट्रीय वकिलास आठवण करून दिली. या लष्करी सूचनेशिवाय तारीख १० व २९ आक्टो-बर रोजीं बिस्मार्क यानीं पारीसमधील सर्व वकिलाकडे पुढील खलिता पाठविला होता.

" जिनीव्हाच्या करारनाम्याप्रमाणें शक्य तितके उपाय योजून व अनेक अडचणी सोसूनहि आम्ही हें युद्ध युद्धनीतीच्या शास्त्रास पूर्णपणे अनुसरून चालविलें आहे. ज्या घरांत बायकामुलें व जखमी लोक ठेवण्यात येतात, त्या घरावर जर्मन गोलंदाज जाणून बुजून कधींहि मारा करीत नाहीत. शहरात नि:शस्त्र आणि तटस्थ राष्ट्रांचे लोक राहतात अथवा शहरात रुग्णालयें आहेत असल्या सबबीवर कोणालाहि आपल्या किल्ल्याकोटाचें सरक्षण करण्याचा अधिकार नाहीं. फ्रेंचानीं जाणून बुजून हें युद्ध आम्हावर लादले आहे. शहरांत पुष्कळ सशस्त्र सैनिक असून ते आम्हांवर हल्ला करण्याची तयारी करीत आहेत. अशा स्थि-तीत बायका मुलाच्या मागें लपून आमचे हल्ले चुकविण्याचा अधिकार त्यांस नाहीं "

प्यारीसच्या वेढ्याचें काम इतक्या दिरंगाईनें चाललें होतें, ही गोष्ट प्रिन्स बिस्मार्क यांस पसंत नव्हती. आपल्या हातीं लष्करी सत्ता असती, तर आपण ही गोष्ट इतक्या लांबणीवर कधींच टाकली नसती, असें बिस्मार्क यानीं स्पष्ट बोलून दाखविलें. प्यारीसवर निकराचे हल्ले करण्यातच जर्मन लष्काराचें अखेरीस खरें हित आहे, असें त्यांचें मत

होतें. पण काहीं उच्च दर्जाच्या स्त्रिया आणि कांहीं रडके उपदेशक याच्या मोहक गोष्टींस जर्मनसेना बळी पडली. जर्मन शिपायाचें अखेर हित कोणत्या मार्गानें होईल आणि युद्धाबरोबर अवश्य येणाऱ्या आपत्ति लवकर कशा बंद होतील, एवढाच प्रश्न बिस्मार्क यांजपुढें होता. फ्रेंच लोकाना काय बरें वाटेल अथवा तटस्थांना कोणती गोष्ट पसंत पडेल, हें पाहण्याचें आपलें काम नाहीं, असें त्यांचें मत होतें. सामान्य जर्मन शिपायावर त्याचें फार प्रेम आणि या प्रेमाचा मोबदला शिपायाकडूनहि त्यास मिळे. सर्व सैन्य अंतःकरणपूर्वक त्याजवर प्रेम करीत असे. एके वेळीं व्हर्सेलीस येथील राजवाड्यांतील एका खोलींत काहीं जखमी व आजारी जर्मन शिपायी ठेवण्यात आले होते. या खोलींत दोहों बाजूंनीं वारें खेळत असल्यामुळे तेथें गारठा इतका असे कीं, तो आजाऱ्यास सहन होण्यासारखा नव्हता. खोलीत शेगड्या पेटवून ती ऊबदार करणे अवश्य होतें; पण तसें केल्यास धुरानें तेथील काहीं मौल्यवान् चित्रें खराब होतील या भीतीमुळें तसें करण्याचें धैर्य डॉक्टरास होईना. ही स्थिति पाहून बिस्मार्क ह्मणाले, 'अशा शेंकडों चित्रांच्या किंमतीपेक्षा आमच्या एकाहि जर्मन शिपायाचा जीव अधिक मौल्यवान् आहे,' असें ह्मणून तेथें शेगड्या पेटविण्याचा हुकूम त्यांनीं डॉक्टरास दिला.

याच संधीस बिस्मार्क संधिवाताच्या विकाराने आजारी पडले. तथापि ते अंथरुणास खिळले असताहि आपलीं सर्व कामें इतक्या मेहनतीनें आणि उत्सुकतेनें करीत कीं, तें पाहून सर्वांस मोठें नवल वाटे. या कष्टमय दिवसातहि काहीं आनंदाच्या गोष्टी घडून आल्या. वोर्म्स शहरानें तारीख ११ दिसेंबर रोजीं त्यास मानपत्र दिलें व त्याच दिवशीं पहिल्या वर्गाचा आयर्नक्रासचा चाद राजाकडून त्यांस मिळाला. याशिवाय

जर्मनीच्या सर्व भागातून हजारों प्रकारचे नजरनजराणे त्याच्या मुक्कामीं येऊन पडले. जो गृहस्थ थोड्या काळापूर्वी जर्मनींत अत्यत द्वेष्य समजला जात होता, तोच आता जर्मनीच्या गळ्यांतला ताईत बनून गेला होता. हजारों प्रकारच्या उंची उंची पक्कान्नाच्या भेटी रोज त्यांच्या मेजावर येऊन पडत; तथापि दिवसातून फक्त एकच वेळ आहार घेण्याचा आपला नियम त्यांनीं कायम ठेवला होता. रात्रीं दहा अकराच्या सुमारास एक पेला कॉफी मात्र ते घेत असत. सध्याकाळीं पांच आणि सहाच्या दरम्यान त्याचें मुख्य भोजन होई. याच वेळीं कांहीं विशेष पदार्थ असला, तर त्याचा आस्वाद ते घेत असत व मद्य घ्यावयाचें असेल, तर तेंहि याच वेळीं पीत असत.

असें होता होता अखेरीस इ० स० १८७१ चा जानेवारी महिना उगवला व या नव्या वर्षाच्या उदयाबरोबरच फ्रेंचांची जयाची आशा अस्तास गेली. लालभैरव (Red Prince) नांवानें प्रसिद्ध असलेल्या फ्रेड्रिक् चार्लस यांनीं पश्चिम रणभूमीवरील फ्रेंच सैन्याचा नुसता धुव्वा उडवून दिला. जनरल फॉं वॅर्डर व जनरल फॉं मँटुफेल यानीं बूरबाकीच्या सैन्याचा पराभव करून त्यास स्वीज् हद्दींत रेटून दिलें. उत्तरेकडे सेन्ट क्वेन्टीन ठाण्यावर असलेल्या सैन्याचा पराभव होऊन जनरल फॉं गोबेन यानीं त्यास वेढा घातला.

रणभूमीवर असे प्रकार घडत असता जर्मन बादशाहीचा जन्म जगजाहीर करण्याची तयारी झपाट्यानें चालली. व्हर्सेलीस येथील ऐने महालात राजे वुइलियम यास जर्मन बादशाहीचा मुगुट घालण्याचा दिवस तारीख १८ जानेवारी हा ठरविण्यात आला. हा दिवस प्रशियाच्या दृष्टीनें विशेष महत्वाचा होता. कारण १७० वर्षांपूर्वी याच दिवशीं तिसऱ्या फ्रेड्रिकनें आपली इलेक्टर ही पदवी सोडून प्रशियाचा राजा ह्मणून

राजमुकुट धारण केला. या ऐतिहासिक दृष्टीनें तारीख १८ जानेवारी हा दिवस प्रशियन लोकाना फार पवित्र वाटतो. हा समारंभ व्हर्सेलिस येथील सुप्रसिद्ध फ्रेंच राजवाड्यात झाला, हें एका अर्थी योग्यच झालें. कारण जर्मनीच्या कल्याणाला विघातक अशा मसलतींचा हा राजवाडा ह्मणजे एक अड्डाच होऊन बसला होता. जर्मन राष्ट्राला विघातक अशा अनेक मसलती या अड्ड्यांत कित्येक शतकापासून चालत आल्या होत्या. इतका काळ स्वप्नसृष्टींत असलेली जर्मन बादशाही अशा रीतीनें प्रत्यक्ष अस्तित्वात आली. चवथ्या फ्रेड्रिक वुइलियमनें केलेलें भविष्य अखेरीस खरें ठरलें. "जर्मन बादशाहीचा राजमुगुट रणभूमीवरच निर्माण होणें शक्य आहे" हें चवथ्या फ्रेड्रिक वुइलियमचें भविष्य होतें. निरनिराळ्या संस्थानांतून गोळा झालेल्या जर्मन शिपायानीं एकजीव होऊन चोहोंकडे तलवार गाजविली आणि अशारीतीनें शत्रूचा पूर्ण निःपात झाल्यानंतर जर्मन राष्ट्रानें आपली एकी जगजाहीर केली. यापुढें सर्व जर्मन राष्ट्र प्रशियाच्या आधिपत्याखालीं अभेद्य बनलें असून पुढेंहि तसेंच तें अभेद्य राहील, ही गोष्ट इ० स० १८७१ च्या जानेवारीच्या १८ व्या तारखेस सर्व जर्मन संस्थानानीं एकदिलानें जाहीर केली.

एवढी महत्वाची गोष्ट घडून येण्यास राजे वुइलियम, कौंट बिस्मार्क आणि इतर जर्मन सस्थानें या सर्वांचे श्रम कारणीभूत झाले होते. या महत्कार्यासाठीं हे सर्व एकदिलानें परस्परास मदत करीत होते. या कार्यांत अनेक प्रकारचे अडथळे होते. खुद्द जर्मनींतच परस्पर संस्थानात एक मत नव्हतें. बिस्मार्क याचे शत्रू त्याची प्रत्येक खटपट हाणून पाडण्याचा यत्न करीत आणि कित्येक वेळा त्याचे मित्रहि त्याच्या विरुद्ध जात. याशिवाय परक्याकडून आलेल्या अडचणी वेगळ्याच. अशा-प्रकारच्या परिस्थितींत इ० स० १८६१ पासून इ० स० १८७१

पर्यंतच्या दहा सालात जें महत्कार्य घडून आलें, तें इतिहासाच्या वाचकास अत्यंत आश्चर्यकारक व रमणीय वाटेल यांत शंका नाहीं. इंग्रज इतिहासकार चार्लस लो ह्मणतो, "अनेक प्रकारचे विलक्षण आणि मनास चक्क करून सोडणारे प्रसंग इतिहासात आजपर्यंत अनेक नोंदले गेले आहेत; तथापि जर्मन साम्राज्याचा जन्म ही गोष्ट या सर्वांत अत्यंत आश्चर्यकारक आहे."

राजे वुइलियम यांनीं जर्मन बादशाहीचा मुगुट धारण करावा, एतदर्थ ज्यानीं ज्यानीं खटपट केली होती, त्या सर्वांत बव्हेरियाचे राजे दुसरे लुई हे अग्रगण्य होते. जर्मन साम्राज्याचा बादशाही मुगुट राजे वुइलियम यास अर्पण करण्याचा समारंभ तारीख १८ जानेवारी सन १८७१ रोजीं दुपारीं सव्वाबारा वाजता चवदाव्या लुईच्या व्हर्सेलीस येथील राजवाड्यात झाला. या प्रसंगांत बहुतेक जर्मन संस्थानिक जातीनें हजर असून लष्कराचे प्रतिनिधीहि हजर होते. मोठमोठ्या छपन्न संस्थानाचीं निशाणें वेदीवर लावण्यात आलीं होतीं.

राजे वुइलियम हे आपले सेनापती, प्रधान आणि संस्थानिक यास बरोबर घेऊन ऐनेमहालांत शिरले, तेव्हा लष्करी वाजांतून परमेश्वराच्या स्तोत्राचे मंजुळ ध्वनि निघू लागले. ऐनेमहालाच्या एका टोंकास उंच वेदी उभी करून तिजवर लाल रंगाचें आस्तरण पसरलें होतें. या आस्तरणावर आयर्नक्रॉसचा चांद मुद्रित केला होता. राजमंडळ स्थानापन्न झाल्यावर प्रथम परमेश्वराची प्रार्थना करण्यांत आली. नंतर राजे वुइलियम हे आपल्या परिवारासह दुतर्फा उभ्या राहिलेल्या मंडळींतून फिरून आले व अखेरीस त्यांनीं एक लहानसें भाषण केलें.

यानंतर राजाच्या डाव्या बाजूकडील आपल्या जागेवरून उठून कौंट बिस्मार्क महाराजांचा जाहीरनामा वाचण्यासाठीं पुढें आले. ज्या कार्या-

साठीं त्यानीं आपणास वाहून घेतलें होतें, तें कार्य अशा रीतीनें पुरें झालें आहे, हें जगजाहीर करण्याकरतां हे वज्रबाहू प्रधान जेव्हां पुढें झाले. तेव्हा त्याचा कंठ थोडा सद्गदित झाल्यावाचून राहिला नाहीं. पुढील जाहीरनामा त्यानीं वाचून दाखविला.

"घनघोर लढाया करून व आपल्या रक्ताची तिलांजली देऊन जर्मन राष्ट्रांनीं जें बादशाही वैभव आज आह्मांस अर्पण केलें आहे, त्याचा आह्मी स्वीकार करतों. यापुढें अखंड शांतता नांदेल व परकीयाच्या हल्ल्यापासून जर्मनी सुरक्षित राहून अतस्थ शांततेचें सुख जर्मन साम्राज्यास लाभेल, अशी आह्मास आशा आहे गेलीं कित्येक शतकें फ्रान्सच्या हल्ल्यामुळें ज्या शांतीचा लाभ आह्मास झाला नाही, ती शांति आह्मास आता तरी लाभो. आमच्या मागून हा बादशाही राजमुगुट जे कोणी धारण करतील, त्याच्या हातून जर्मन साम्राज्याचें वैभव उत्तरोत्तर वाढलें जावो असा मी परमेश्वराजवळ आशीर्वाद मागतों. ही गोष्ट तलवारीनें नव्हे, तर शांततेच्या साधनानें व संस्कृतीच्या कल्याणप्रद आशीर्वादानें घडून यावी, असें मागणें मी परमेश्वराजवळ मागतों."

राजे वुइल्यिम याच्या मस्तकावर त्याचे जांवई बेडन संस्थानाधिपति फ्रेड्रिक यानीं मुगुट घातला व आपल्या मस्तकावरील टोपी हवेंत वर करून 'वुइल्यिम बादशहाचा त्रिवार जयजयकार असो' असा घोष केला! तेव्हा सर्व सभेनें टोप्या काढून वरील जयघोषानें सर्व सभागृह दणाणून सोडलें! अखेरीस राष्ट्रगीत गाण्यांत येऊन हा समारंभ आटोपला. बादशाहा वुइल्यिम यानीं अश्रुपूरीत नेत्रानीं युवराजास आलिंगन दिलें व बाकीच्या साह्यकारी मंडळींबरोबर हस्तांदोलन केलें. या हस्तांदोलनाचा पहिला मान साम्राज्याचे प्रधान कौंट फॉं बिस्मार्क यांस मिळाला, हें निराळें सांगावयाला नको. वरील हकीकत घडल्यानंतर दहा दिवसानीं बादशहा वुइल्यिम यानीं बर्लिन येथें राणीला पुढील संदेश पाठविला.

"काल सध्याकाळीं तीन आठवडे युद्ध तहकूब रहावें, अशा अर्थाच्या खलित्यावर दोन्ही पक्षाच्या सह्या झाल्या. फ्रेंच लष्कर आमच्या स्वाधीन झालें

असून त्यास नि:शस्त्र करून पारीसमध्यें ठेवण्याचें ठरलें. पारीस शहरात शांतता रक्षणाचें काम फ्रेंचाच्या न्याशनल गार्ड नावाच्या तुकडीकडे सोंपवि-ण्यांत आलें आहे. पारीस भोंवतालच्या सर्व किल्ल्यांत आह्मी आमची शिबंदी बसविली आहे. पारीस शहराला अद्यापि रसद पोहोंचत नाहीं; पण शहरां-तील सर्व युद्धसामग्री आमच्या हातीं आल्यानंतर रसद मिळण्यास आह्मी परवानगी देऊं. आणखी चवदा दिवसांच्या अवधींत बोर्डो येथें एक प्राथमिक सभा भरून पुढील राज्यपद्धति कोणत्या प्रकारची असावी, हें ती ठरविणार आहे. आमचें सैन्य सध्या जेथें आहे, तेथेंच राहणार असून फ्रेंचाचें सैन्यहि आपल्या जागीं रहावयाचें आहे. दोन्ही तळांच्या मध्यें कांहीं जमीन तटस्थ प्रदेश ह्मणून रहावयाची आहे. आमच्या सैन्यानें जी चिकाटी दाखविली, जो भयंकर स्वार्थत्याग केला व जें धैर्य व जो देशाभिमान दाखविला, त्याचें हें पहिलें बक्षिस होय परमेश्वराच्या या दयेबद्दल मी त्याचे आभार मानतों. आतां तह लवकरच होवो, एवढेंच त्याजपाशीं आमचें मागणें आहे.

विल्यम."

या तहकुबीचें सारें बोलणें जूल्स फेव्हर याजमार्फत चाललें होतें. ही तहकुबी पक्की ठरण्याच्या अगोदर आपणास आपल्या मुला-माणसासुद्धां इंग्लंडात सुरक्षित जाऊं द्यावें असें मागणें जूल्स फेव्हर यानें बिस्मार्क याजकडे केलें होतें. तेव्हां बिस्मार्क त्यास ह्मणाले, 'अशा तुमच्या कृत्यानें पारीसमधील लोक किती नाराज होतील, याचा तुह्मी विचार करा. फ्रेंचाची मन:प्रकृति सध्या फार नाजुक झाली आहे. यामुळें तुमचें हें कृत्य स्वजनद्रोहाचें आहे, असें ते समजतील हें ध्यानांत आणा.' जूल्स फेव्हर यालाहि बिस्मार्क याचें हें ह्मणणें पटलें व वेळींच आपली कानउघाडणी केल्याबद्दल बिस्मार्क यांचे त्यानें आभारहि मानले. आपल्या कुटुंबातील माणसांना कोठेंतरी सुरक्षितस्थळीं नेऊन ठेवावें, अशी इच्छा त्याला होणें स्वाभाविक होतें. कारण शहराची परिस्थिति मोठीशी संतोषकारक होती, असें नाहीं. शहरांत अन्नाचा तुटवडा पडला होता. दंगेखोर रस्तोरस्तीं हिंडून लोकांस अनेक प्रकारें छळीत होते. रोगांच्या

सांधी उद्भवून मृत्यूचें साम्राज्य सर्वत्र पसरलें होतें. सदोदित आनंदी-आनंद करणाऱ्या पारीस शहराची स्थिति अशा प्रकारची झाली होती. अशा स्थितींत तारीख २३ जानेवारी रोजीं बिस्मार्क यास भेटण्याकरता जूल्स फेव्हर व्हर्सेलिस येथें आले. त्याजपाशीं थोडावेळ संभाषण करून बिस्मार्क हे बादशाहास भेटावयास गेले. बादशाहाची भेट घेऊन ते बाहेर आले, त्या वेळीं त्याच्या चेहऱ्यावर पूर्ण संतोष दिसत होता.

फ्रेंच लष्करातर्फे प्रतिनिधि ह्मणून जनरल बोफर्ट हे फेव्हर याजबरोबर आले होते. त्याचा चेहरा इतका लाल दिसत होता व त्याची वर्तणूकहि इतकी चमत्कारिक होती कीं, ते मद्यपानानें बेहोष झाल्याचा संशय बिस्मार्क याना साहजिकच आला. या सेनापतिसंबंधानें बोलतांना बिस्मार्क ह्मणाले, "हा गृहस्थ शुद्ध रानटी मनुष्यासारखा वागत होता. दर शब्दागणिक शिव्याचा उपयोग तो करी. बोलताना तो मोठ्यानें ओरडून बोले. फ्रेंचाच्या या शूर सेनापतीचा मला तर अगदीं वीट आला. आपण सडेसोट शिपायी आहों, असें वारंवार ह्मणून मोल्टके याजपाशीं तो सलगी करावयास जाई. मोल्टके तर कित्येक वेळा त्यास धक्के मारण्याच्या तयारींत होतेसे दिसले. खुद्द फेव्हर यानासुद्धा आपल्या सेनापतीच्या वर्तणुकीची लाज वाटू लागली."

युद्धतहकुबीची वाटाघाट संपल्यानंतर फ्रेंच प्रतिनिधीस बिस्मार्क यानीं आपले घरीं भोजनास बोलाविलें. देशाच्या प्रत्यक्ष शत्रूच्या घरीं भोजन करणें फेव्हर यास प्रथम पसंत नव्हतें, तथापि अखेरीस बिस्मार्क यांच्या आमंत्रणास त्यांनीं मान दिला. न्याशनल गार्ड पलटणीचीं हत्यारें त्याजपाशीं राहूं देण्याची सवलत फेव्हर यानीं मिळविली. त्याप्रमाणें खंडणीच्या रकमेंतहि त्यानीं बरीच सूट मिळविली. अशा रीतीनें इ० स० १८७१ च्या जानेवारीच्या २८ व्या तारखेस तहकुबीच्या कागदावर उभयपक्षीं सह्या झाल्या.

ही तहकुबी फक्त तीन आठवड्यांपुरतीच होती; तथापि अखेरचा तह आता फारसा लांबणीवर पडणें शक्य नाहीं, हें सर्वांस कळून चुकलें होतें. फ्रेंच सैन्याच्या हातून यापुढें काहीं कामगिरी होण्यासारखी नव्हती, तथापि फ्रेंचांच्या मदतीस आलेलें ग्यारिबाल्डीचें सैन्य अद्यापीहि काहीं पराक्रम गाजवील अशी आशा फ्रेंचांस होती.

तहकुबीच्या तीन आठवड्याच्या मुदतींत फ्रेंच पार्लमेंटाची निवडणुक व्हावी व या प्रतिनिधींनीं पुढील राज्यसंस्थेचें धोरण ठरवून जर्मनीशीं तह करण्यास अधिकारी निवडावेत, असें ठरविण्यात आलें होतें. या निवडणुकीच्या वेळीं ग्याम्बेटा यानें एक नवेंच तत्व जाहीर केलें. इ. स. १८५१ सालापासून इ० स० १८७० पर्यंत जे कोणी सरकारी नौकर असतील अथवा सरकारी नौकरीसाठीं उमेदवारी करीत असतील, त्यास निवडणुकींत मत देण्याचा अधिकार नाहीं, असें त्यानें जाहीर केलें. फ्रेंचाच्या या अधिपतीकडून असा जाहीरनामा लागल्याबरोबर बिस्मार्क यांनीं जोराचा आक्षेप घेतला. केवळ आपल्याच पक्षाच्या लोकांनीं सर्व सभागृह भरून टाकावें, असा ग्याम्बेटा याचा डाव आहे, असें ते ह्मणाले. अशा अर्थाचा खलिता त्यांनीं फेव्हर याजकडे पाठविला व फेव्हर यांनीं त्यास समाधानकारक उत्तरहि दिलें. ग्याम्बेटा याचा जाहीरनामा रद्द करण्यात आला व ग्याम्बेटानेंहि आपल्या अधिकाराचा राजीनामा दिला. अशा रीतीनें पुढील शांततेचा मार्ग मोकळा झाला.

निवडणुकीचें काम पुरें होऊन शांततावादी लोकांचा फार मोठा भरणा फ्रेंच पार्लमेंटात झाला. यावरून फ्रेंच राष्ट्र तहास किती उत्सुक झालें होतें, हें दिसून येतें. मॉशर थियर्स याची अध्यक्षांच्या जागीं नेमणूक तारीख १७ फेब्रुआरी रोजीं झाली. नव्या सरकारचें कार्य तह करण्याचें असून याशिवाय पुढील राज्यधोरण निश्चित करणें, परकीय

राष्ट्रांत फ्रान्सची पत वाढविणें व उद्योगधंद्यांचें पुनर्जीवन करणें, हीं कार्यें नव्या सरकारास करावयाचीं आहेत; असें थियर्स यानीं आपल्या प्रास्ताविक भाषणांत सांगितलें.

तहाच्या अटी काय आहेत, हें जर्मन सरकारापासून समजावून घेण्याकरतां अध्यक्षाची स्वारी तारीख २१ फेब्रुआरी रोजीं व्हर्सेलीस येथें गेली. तेथें त्यानीं प्रथम बादशहा वुइल्यिम याची भेट घेतली. कठोर अंत करणाच्या वज्रबाहू प्रधानापेक्षां खुद्द बादशाहाकडून अधिक सवलती मिळतील, अशी थियर्स यास अपेक्षा होती; पण ही त्याची अपेक्षा निष्फळ ठरली. कारण बादशहानीं तहाच्या वाटाघाटीसंबंधीं अवाक्षरहि न काढतां बिस्मार्क यांजकडे बोट दाखविलें. त्याप्रमाणें थियर्स यानीं बिस्मार्क याची गांठ घेतली, तेव्हां बिस्मार्क यानीं पुढील अटी त्यास सांगितल्या. आलसे-लॉरेनप्रांत, बेलफर्ट व मेट्झ हे किल्ले व याशिवाय मोसल व म्यूर्थ नद्यांच्या खोऱ्यांतला बराचसा भाग फ्रान्सनीं द्यावा. युद्धाच्या खर्चाची भरपाई ह्मणून पावणेचार अब्ज रुपये द्यावेत व जर्मन सैन्याची मिरवणुक पारीसमधून नेऊं द्यावी. या अटी-संबंधीं उभयपक्षीं वाटाघाट झाल्यावर खंडणींत सुमारें पाऊण अब्ज रुपये कमी होऊन बेलफर्टचा किल्लाहि फ्रान्सकडे राहिला.

या वाटाघाटीच्या वेळीं थियर्स यानीं बिस्मार्क यास आणखी एक-वार भीति दाखविण्याचा यत्न केला होता. ते ह्मणाले, 'असल्या कडक अटींना तुह्मी चिकटून बसाल, तर युरोपांतील आमचीं स्नेही राष्ट्रें तुह्मा-विरुद्ध युद्ध पुकारतील.' पण थियर्स याचा हा डाव साधला नाहीं. बिस्मार्क ह्मणाले, 'तुमचे बादशहा नेपोलियन व तुमचे बरेचसे शिपायी आमच्या हातीं आहेत, हें ध्यानांत असूंद्या. तुह्मी बऱ्या बोलानें तहास राजी न झाला, तर हेच फ्रेंच शिपायी बादशाहाच्या तर्फे तुह्माविरुद्ध

रणांगणावर येतील, हें विसरू नका.' दुसऱ्याहि एका प्रसंगीं थियर्स यांनीं संतापानें कांहीं वाईट शब्द उच्चारले होते. हे शब्द उच्चारीपर्यंत तहाची वाटाघाट फ्रेंच भाषेंत चालली होती; पण यानंतर बिस्मार्क जर्मनभाषेंत बोलू लागले. थियर्स यास जर्मनभाषेचें ज्ञान मुळींच नव्हतें. तेव्हा पुढील बोलणें फ्रेंच भाषेंत व्हावें, असें त्यांनीं बिस्मार्क यास विनविलें. तेव्हा बिस्मार्क ह्मणाले, "तुमच्या भाषेचें चांगलेंसें ज्ञान मला नाहीं. यामुळें ती भाषा बोलताना कमीअधिक शब्द नकळत माझ्या तोंडून जातो, असें तुमच्या मघाच्या उद्गारावरून दिसतें. याकरतां जी भाषा मला उत्तम कळते, तिचाच उपयोग करावा, हें मला प्रशस्त दिसतें." एवढ्यावरून थियर्स उमजले व यानंतर विशेषशी वाटाघाट न होता, तहाच्या कागदावर त्यांनीं निमूटपणें सही केली.

तारीख १ मार्च रोजीं तीस हजार जर्मनसैन्याची मिरवणूक पारीस शहरांतून निघाली. बिस्मार्क या सैन्याबरोबर हजर होते. फ्रेंच लोक बिस्मार्क याचा भयंकर द्वेष करीत होते; तथापि कशाचीहि भीति न बाळगता जर्मनसैन्याबरोबर बिस्मार्क पारीस शहरांत शिरले. मिरवणूक पाहण्यास जमलेल्या फ्रेंच लोकांपैकीं एक गृहस्थ संतापून आपणाकडे रोखून पहात आहे, असें पाहून बिस्मार्क त्याजपाशीं गेले व चिरूट पेटविण्यासाठीं काड्याची पेटी त्यांनीं मागितली. त्याबरोबर या फ्रेंच देशभक्ताचा सर्व राग मावळून जाऊन त्यानें बिस्मार्क यास काड्याची पेटी दिली.

तारीख ३ मार्च रोजीं जर्मनसैन्यानें पारीस शहर सोडलें; त्या वेळीं पारीसच्या रहिवाशाकडून त्यास कोणत्याहि प्रकारचा उपद्रव झाला नाहीं.

अशा रीतीनें ही आपली मोहीम पूर्णपणें यशस्वी करून बिस्मार्क यांची स्वारी सारब्रूकन, मेन्स, आणि फ्रँकफर्ट या रस्त्यानें घरीं याव-

यास तारीख ६ मार्च रोजीं निघाली. वाटेंतील प्रत्येक मुक्कामावर जर्मन लोकांनीं मोठ्या उत्साहानें त्याचें थाटाचें स्वागत केलें, हें सांगा-वयास नकोच. तारीख ९ मार्च रोजीं भल्या पहांटेस ते बर्लिनच्या स्टेशनावर उतरले. त्याचें स्वागत करण्याकरता त्यांची पत्नी, त्यांची मुलगी मेरी व मुलगा हर्बर्ट ही मंडळी स्टेशनावर हजर होती. घर सोडून गेल्यास सात महिन्याचा अवधी लोटून गेला होता. या सात महिन्यात केवढ्या विलक्षण गोष्टी घडून आल्या होत्या! एवढ्यानें बिस्मार्क यांचें सर्व कार्य संपलें असें नाहीं. वास्तविक पाहतां खऱ्या कठिण कार्यास आतां कोठे आरंभ झाला असेंच ह्मटलें पाहिजे. दांडगी इच्छा-शक्ति आणि भगीरथप्रयत्न या गुणाची जोड बिस्मार्क यास नसती, तर पुढील कार्याचें ओझें त्यास खास झेंपलें नसतें. बादशाहीचा जन्म झाला खरा; तथापि तिला बाळसें आणून ती सुदृढ करण्याचे अत्यंत कठिण कार्य अद्यापि पुढेंच होतें.

---

प्रकरण पधरावें.

## जर्मनसाम्राज्याची बाल्यावस्था.

बर्लिन शहरीं परत आल्यानंतर फ्रान्स देशाशीं आपले व्यापारी संबंध पुन्हा प्रस्थापित करण्याची पहिली गोष्ट बिस्मार्क यानीं प्रथम हातीं घेतली. या विषयासंबधींचे आपले विचार तारीख १४ मार्च रोजीं लिहि-लेल्या खलित्यांत त्यानी व्यक्त केले आहेत —

" तहाच्या करारनाम्यात व्यापारी सवलती घालून त्याद्वारें आपला व्यापार एकाद्या राष्ट्रांत घुसविणें म्हणजे त्या राष्ट्राच्या स्वातंत्र्यावर व मुखत्यारीवर घाला घालणें होय, असें माझें मत आहे. चीन देशात इंग्रजांनीं आपला अफू-चा व्यापार अशाच रीतीनें घुसविला याकरता फ्रान्स देशाशीं जे आमचे व्यापारविषयक करारनामे युद्धापूर्वी झाले होते, तेच पुन्हा अस्तित्वात

आणण्याचा यत्न आम्ही करणार आहों, पण या गोष्टीला फ्रान्सची अनुमती मिळेल की नाही, याची मात्र मला शंका आहे. "

पण बिस्मार्क यांची ही शंका अस्थानीं होती. युद्धापूर्वी जे व्यापार-विषयक करारनामे उभयपक्षीं ठरले होते, तेच पुढें चालू असावेत, या गोष्टीस फ्रान्सनें आपली अनुमती दिली.

तारीख १६ मार्च रोजीं बर्लिनच्या म्युनिसिपल सभेनें बिस्मार्क यांस मानपत्र दिलें. गेलें अर्धशतक बिस्मार्क यांचें मुख्य कार्यक्षेत्र बर्लिन हेंच होतें. तारीख १७ मार्च रोजीं वृद्ध बादशाहाची स्वारी बर्लिन शहरीं दाखल झाली, त्या वेळीं त्याचें स्वागत करण्याकरता पॉटस्ड्याम स्टेशनवर बिस्मार्क हे हजर झाले होते आणि प्रजाजनाचा असंख्य समूह आपल्या वृद्ध राजाचें स्वागत करण्याकरता स्टेशनावर लोटला होता.

इकडे प्यारीसची स्थिति दिवसेंदिवस अधिक भयानक होत चालली. शहराचें रक्षण करण्याकरतां न्याशनलगार्ड पलटणीचीं हत्यारें तिजपाशीं राहूं द्यावीं, अशी अट तहनाम्यांत घालण्यात आली होती. ही अट बिस्मार्क यानीं कबूल केली; पण यामुळें फ्रान्सदेशाचें अखेरीस नुकसान होईल असेंहि त्यानीं जूल्स फेव्हर यास बजाविलें होतें. बिस्मार्क याचें हें भविष्य खरें ठरलें. या आणीबाणीच्या प्रसंगीं फ्रान्सच्या नवीन लोकसत्ताक सरकारास बिस्मार्क यांनीं आपणाकडून झाली तितकी मदत केली. प्यारीस शहरात बंडखोरानीं धुमाकूळ माजविला होता. या वेळीं सुमारें एक लक्ष कवाईत शिकलेले फ्रेंच शिपायी जर्मनीकडे कैदेंत होते. हे शिपायी लायर नदीपलीकडे रहावेत, अशी शर्त तहनाम्यांत होती; पण फ्रेंच लोकसत्ताक सरकारास मदत करण्याकरता ही शर्त बिस्मार्क यांनीं परत घेऊन ते शिपायी फ्रेंच सरकारच्या स्वाधीन केले. देशांतलीं बडें मोडण्याकरतां या शिपायाचा अर्थातच चांगला उपयोग झाला.

रीशूस्ख्याग अथवा बादशाही पार्लमेंट भरण्याच्या अगोदर बिस्मार्क यास प्रिन्स ही बहुमानाची पदवी तारीख २१ मार्च इ० स० १८७१ रोजीं अर्पण करून बादशहांनीं त्याच्या कामगिरीबद्दल आपला संतोष व्यक्त केला.

यानतर भरलेल्या रीशूस्ख्यागच्या सभेंत बादशहाचें प्रास्ताविक भाषण झालें. त्याचा समारोप त्यानीं पुढील शब्दानीं केला होता:—

"जर्मन साम्राज्याच्या तर्फे जे युद्ध आम्हीं केलें व जें अशा उज्वल रीतीनें आम्हीं शेवटास लावलें, त्याच्या समाप्तीनतर अशीच उज्वल शांतता नांदो, अशीं परमेश्वरापाशीं आम्हीं मागणी करतों. शातिसौख्यापासून जे लाभ घडावयाचे ते मिळण्याकरता होणाऱ्या अहमहमिकेंतहि जर्मन साम्राज्याला असाच विजय मिळो, अशी याचना मी परमेश्वराजवळ करतों."

नवीन भरलेल्या बादशाही पार्लमेंटांत प्रत्येक पक्षाचे पुढीलप्रमाणें सभासद होते. न्याशनल लिबरल (राष्ट्रीय उदारमतवादी) २०, इंपीरियल लिबरल्स (बादशाही उदारमतवादी) ३०, फ्री कान्सरव्हेटिव ३८, कान्सरव्हेटिव ५०, प्रोग्रेसिव ४४, आणि सोशल डेमोक्रयाट २. सोशल डेमोक्रयाट पक्षासबंधीं लोकात फारसा आदर नव्हता. कारण या लोकांनीं युद्धाच्या प्रसगीं सरकारास चागलीशी मदत केली नव्हती. इतकेंच नव्हे, तर कित्येक वेळां राष्ट्राच्या हितसबधास विरुद्ध असेंहि वर्तन केलें होतें. क्याथोलिक पक्षाचेंहि बरेंच मोठें सख्याबळ या पार्लमेंटात दिसून आलें. त्याची संख्या ५७ असून स्याव्हिग्नी व विंड्थार्स्ट हे त्याचे पुढारी होते. क्याथोलिक पक्ष हा पोपमहाराजास सर्वथा अनुकूल असावा, यात नवल नाहीं. यामुळें प्रसगीं राष्ट्राची हानी करूनहि पोपचें वर्चस्व वाढविण्याकडे या पक्षाचा कल होता. अर्थातच ही गोष्ट राजकीयदृष्ट्या कोणत्याहि राज्यास अपायकारक होण्यासारखी होती. बादशहास मानपत्र द्यावें, असा ठराव सभेपुढें जेव्हा चर्चेस निघाला, तेव्हां क्याथोलिक

पक्षानें, या ठरावास नाकबुली दिली. पोपमहाराजांचें ऐहिक बाबींतील महत्व राजकीय दृष्ट्या-युरोपांत बरेंच कमी झालें होतें. हें महत्व पुन्हा प्रस्थापित करण्यासाठीं जर्मन बादशहानें पोपमहाराजांस मदत करावी, असें या पक्षाचें ह्मणणें होतें. अशी मदत करण्यास बादशहा तयार असतील तर या मानपत्रास आपण संमति देऊं, अशा अर्थाचीं भाषणें या वेळीं या पक्षाकडून झालीं. पार्लमेंटात या पक्षाचें प्राबल्य असणें राष्ट्रास हितावह होणार नाहीं, असें भविष्य पुष्कळांनीं अगोदरच करून ठेवलें होतें आणि या पक्षाच्या पुढच्या वर्तनावरून हें भविष्य खरेंहि ठरलें.

अशा रीतीनें क्याथोलिक लोक जर्मनराष्ट्रापासून वेगळे होऊं पहात असतां पोल लोकहि प्रशियापासून विभक्त होण्यासाठीं गडबड करूं लागले. जर्मन साम्राज्यास नवीन जोडण्यांत आलेल्या आलसे-लॉरेन प्रांतांना बादशाही मुलूख या नात्यानें साम्राज्यांत जे हक्क मिळाले होते, ते हक्क आपणास मिळावेत, अशी मागणी पोल लोक करूं लागले. यासंबधीं झालेल्या वादविवादाचे वेळीं पोल लोकांना अशा प्रकारचे हक्क मागण्याचा अधिकारच नाहीं, असें बिस्मार्क यानीं आपलें ठासून मत दिलें.

रिशस्ट्यागच्या या पहिल्या बैठकींत युद्धाप्रीत्यर्थ झालेल्या खर्चासाठीं कर्ज काढण्याची परवानगी सरकारास देणें व आलसे-लॉरेनची भावी राज्यपद्धति निश्चित करणें, हे प्रश्नहि उपस्थित झाले.

फ्रेंच सरकाराकडून जी खंडणी यावयाची होती, त्यापैकीं एक कोट फ्रँक आपण तीन वर्षांच्या मुदतींत रोख देतों व बाकीच्या पैकीं ४/५ भाग फ्रेंच रोख्याच्या रूपानें देतों असें बोलणें फ्रेंच सरकारनें लावलें.

हें बोलणें जर्मनसरकारास कबूल असल्यास त्यांनीं आपलें वेठींचें सैन्य इ० स० १८७१ च्या १ ल्या जुलईला फ्रेंच मुलुखातून काढून न्यावें, असेंहि एक कलम या बोलण्यांत होतें. यासंबंधीं वाटाघाट करण्याकरता फ्रेंचाचे परराष्ट्रीय प्रधान जूल्स फेव्हर यास फ्रँकफर्ट येथें बोलाविलें. तारीख ६ मे रोजीं फेव्हर तेथें गेले व तारीख १० मे इ० स० १८७१ रोजीं पक्का तह होऊन त्यावर उभयपक्षाच्या सह्या झाल्या. फ्रेंच सरकारच्या अधिकार पारीस येथें पक्का होताच पांच अब्ज फ्रँकचा पहिला हप्ता फ्रेंच सरकारानें सोन्याच्या नाण्यात द्यावा. एक अब्ज इ० स० १८७१ च्या साळांत पुरा करावा, व अर्धा अब्ज इ० स० १८७२ च्या मेच्या १ ल्या तारखेस देऊन बाकी उरलेली रक्कम इ० स. १८७४ च्या २ मार्चला पुरी करावी, असा करार झाला. पहिला हप्ता मिळाल्यानंतर जी रक्कम शिल्लक राहील, ती पुरी होईपर्यंत तिजवर पांच टक्क्याचें व्याज फ्रेंच सरकारानें द्यावें. खंडणीचे पैसे जसजसे फिटत जातील, तसतसें आपलें वेठींचें सैन्य जर्मनसरकारानें काढून न्यावें, असे मुख्य करार या तहनाम्यांत ठरले होते.

फ्रँटफर्ट येथून बिस्मार्क परत आल्यानंतर अनेक प्रकारच्या भानगडींचे प्रश्न पार्लमेंटात उपस्थित झाले. युद्धाच्या वाटाघाटींत आलसेलॉरेन प्रांताचें झालेलें नुकसान त्याला भरून देणें. पारीस मधून हाकून दिलेल्या जर्मन रहिवाशाच्या नुकसानीची भरपायी करणें. मोहिमेवर गेलेल्या लँडव्हर पलटणीची व राखून ठेवलेल्या सैन्याची नुकसान भरपायी करणें आणि ज्याच्या युद्धचातुर्यामुळें ही सारी मोहीम इतकी यशस्वी झाली, त्या सेनापतिमंडळास शेलापागोटे देणें इत्यादि मुख्य प्रश्न या वेळीं चर्चेस निघाले. विशेषतः अखेरच्या मुद्यासंबंधीं वादविवाद झाला, तेव्हां बिस्मार्क ह्मणाले,

"वार्धक्यानें पीडलेला व ज्याचें सारे आयुष्य सुखासमाधानांत व शांततेंत गेलें असून ज्याच्या यशाची कीर्ति अगोदरच प्रस्थापित झाली आहे, असा एकादा राजा आपली तलवार म्यानांतून काढतो आणि मोहिमेवर जातो; शत्रु बलवान आहे, याची जाणीव त्याला आहे, युद्धांतील यशापयश अनिश्चित आहे, हें त्याला ठाऊक आहे, अशा स्थितींत विजय संपादन करून तो राजा परत येतो तेव्हां त्याच्यापुढें असा प्रश्न सहजच उपस्थित होतो कीं, ' या मोहिमेचें यश मी कोणास देऊं ? युद्धाच्या आपत्तींतून माझ्या प्रजाजनांचें रक्षण केल्याबद्दल मी कोणाचे आभार मानू ? कोणाच्यामुळें हा बिकट प्रसंग टाळला गेला ? कोणत्या रीतीनें मी हें यश संपादन केलें ?' असे प्रश्न त्या राजाच्या चित्तात उत्पन्न होणें, अपरिहार्य आहे, असें मी पुन्हां म्हणतों. अशा स्थितींत या प्रश्नांचें उत्तर म्हणून त्या राजाचें सैन्य त्याच्या नजरेपुढें प्रथम उभें रहावें, यांत नवल नाहीं. त्यानें सैन्याचे प्रथम आभार मानावेत व ज्या सेनापतींनीं त्या सैन्याचीं सूत्रें चालविलीं, त्यास या यशाचा मुख्य वाटा द्यावा, यात नवल नाहीं. अशा स्थितींत आपल्या सैनिकांस व सेनापतीस फुल नाही तरी फुलाची पाकळी तरी देण्याची त्या राजास इच्छा व्हावी, हेंहि अगदीं स्वाभाविक आहे. सद्गृहस्थहो, शौर्याच्या प्रत्येक कामाबद्दल इनाम द्यावयाचें म्हटलें, तर ती गोष्ट शक्य नाहीं. लढाईंत मर्दुमकी गाजविणें, ही गोष्ट परमेश्वराच्या कृपेनें प्रत्येक जर्मनशिपायाच्या आंगवळणीच पडून गेली आहे. प्रत्येक मर्दुमकी-साठीं बक्षिस द्यावयाचें म्हटलें, तर यांपैकीं तुम्हांस एकासहि वेगळता येणार नाहीं; पण नुसत्या मर्दुमकीनेंच युद्धांत यश मिळतें असें नाहीं. फ्रेंचाच्या आंगी मर्दुमकी नव्हती अथवा त्यांनीं धैर्य दाखविलें नाही, असें कोणासहि म्हणतां येणार नाहीं. फ्रेंच सैन्य पुऱ्या मर्दुमकीनें लढलें हे सर्वांस ठाऊक आहे. त्यांत जी कमतरता होती, ती सेनापतीच्या चातुर्याची. योग्य प्रकारची कर्तव्यदक्षता आणि दूरदृष्टि याचा अभाव सेनापतीच्या ठिकाणीं होता. त्याचप्रमाणें ज्या राजपुरुषानें या सगळ्या मोहिमेचा भार आपल्या शिरावर घेतला होता, त्याचा हट्टी स्वभावहि फ्रेंचाच्या नाशास कारणीभूत झाला. उलटपक्षीं आमचे सेनापती पूर्ण कर्तव्यदक्ष होते. आणि या मोहिमेंत अपयश आलें, तर प्रशि-याच्या राज्यास कायमचा अपाय होईल, ही पूर्ण जाणीव आमच्या महाराजास होती. आपल्या सेनापतीस कांहीं पारितोषक द्यावें, अशी आपल्या बादशहांची

मनापासून इच्छा आहे आपल्या वृद्ध बादशहानीं जें अचाट धैर्य दाखविलें आणि राष्ट्रासाठी जो अपूर्व स्वार्थत्याग केला; त्याबद्दल जर्मनीनें त्याचें उतराई होणें वाजवी आहे. याकरतां बादशहाची इच्छा कोणत्या मार्गानें तृप्त होईल, हें ठरविण्याची मी तुह्मास विनति करतों."

तारीख १३ जून रोजीं पारीस येथील अमेरिकन वकील वॉशबर्न यांस पत्र लिहून युद्धाच्या गडबडींत जर्मन वकिलातीचें व दरबारी दप्तराचें संरक्षण केल्याबद्दल बिस्मार्क यानीं त्यांचे आभार मानले. या पत्रांत बिस्मार्क ह्मणतात,

'चमत्कारिक अडचणीच्या प्रसगीं स्वतः अनेक प्रकारची झीज सोसून व आपला अमूल्य वेळ खर्ची घालून पारीसमधील जर्मन रहिवाशाच्या हितसबंधाचें रक्षण आपण केलें, याबद्दल बादशहाच्या हुकुमाप्रमाणें आपसाहेबांचे मी आभार मानतों. गेल्या बारा महिन्यात जर्मनी व अमेरिका याजमधील काम काजाच्या प्रसगीं आपण जी कळकळ व स्नेहबुद्धि दाखविली, तिजबद्दल मी आपले पुन्हा एकवार आभार मानतों."

मिस्टर वॉशबर्न यानीं तारीख १७ रोजीं जर्मनदप्तर कौंट वाल्डरसी याच्या स्वाधीन केलें. त्या वेळीं ते ह्मणाले, 'अकरा महिनेपर्यंत तुमच्या देशबांधवांच्या हितसंबधाचें संरक्षण मीं केलें व आता हें काम तुमच्या हातीं मी परत देत आहें. जर्मनबादशाहानीं माझ्या कार्याचा योग्य गौरव केला, याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. हें काम करण्यांत मी केवळ वेठ वारली नसून त्यापासून मला आनंदच होत होता, हें आपण लक्षात घ्यावें. साप्रतच्या सारख्या बिकट प्रसगातहि आपले राजकीय सबंध सुरळीतपणें चालले ही मोठी आनंदाची गोष्ट असून तिचें मला नित्य स्मरण राहील.'

तारीख १५ जून रोजीं बादशहाच्या हुकुमाप्रमाणें रीशस्थ्यागची बैठक बिस्मार्क यानीं बरखास्त केली. दुसऱ्या दिवशीं जर्मन बादशाहा—प्रशियाचे राजे याची सैन्यासह मोठ्या थाटाची मिरवणूक राजधानींतून

निघाली. बादशाहा पहिले वुइलियम आपले सेनापती व मुत्सद्दी यासह ब्रँडनबर्ग वेशींतून शहरात शिरले. त्या वेळीं सर्व प्रजाजनानीं त्याचें अत्यंत उत्साहपूर्वक स्वागत केलें. हा आनंदाचा दिवससुद्धा बिस्मार्क याच्या दृष्टीनें अगदीं सरळपणें पार पडला, असें नाहीं. कारण याच दिवशीं पारीस जवळील फ्रेंच सैन्य जर्मनछावणीच्या जवळ जवळ येत आहे, अशी बातमी बिस्मार्क यांस मिळाली. तेव्हा फ्रेंच सैन्य ताबड-तोब मागें न गेल्यास वेठीचें जर्मन सैन्य पारीस राजधानीवर एकदम चाल करून जाईल असें बिस्मार्क यानीं फेव्हर यास कळविलें. यानंतर फ्रेंच सैन्य आपल्या नेमून दिलेल्या हद्दींत परत गेलें. बिस्मार्क यांच्या कामगिरीचें पारितोषिक ह्मणून लॉएनबर्गची जहागीर बादशाहानीं त्यास दिली. यानंतर पुढें थोडयाच वर्षानीं जवळची दुसरी एक मिळकत बिस्मार्क यांनीं विकत घेऊन या जाहागिरीस जोडली व पुढें ही सर्व जहागीर फ्रेड्रिक श्रू या नांवानें त्याच्या घराण्याकडे चालली.

जर्मन पार्लमेंटातील क्याथोलिक पक्षाचें वर्तन खुद्द पोप यासहि पसंत पडलें नाहीं, अशी बातमी पोप यांजकडील जर्मनवकिलाकडून आली. जर्मनींतील क्याथोलिक पक्षाची मागणी अव्यवहार्य व काळवेळ न पाहता केलेली होती, असें पोप यांचें मत होतें. पोप याचें हें मत प्रसिद्ध झाल्याबरोबर क्याथोलिक पक्षांत मोठी खळबळ उडाली. पोपच्या योग्य अधिकाराचें अतिक्रमण कोणीहि करूं नये, असें फर्मान पोप यानीं काढलें.

अशा रीतीनें जर्मनीच्या या पक्षात मोठ्या तंट्यास सुरुवात झाली. हा सर्व तंटा तलवारीनें चालत नसून लेखणीनें चालत होता; तथापि एकंदर राष्ट्रीय संघटनेंत त्याचें महत्व कमी होतें, असें मात्र नाहीं. या प्रसंगीं बिस्मार्क यानीं केलेलें वर्तन त्यांच्या वज्रबाहू या पदवीस साजे-

सेच होते. क्याथोलिक पक्षासारख्या आततायी लोकाशी वागतांना त्याचें धोरण प्रथम फक्त आत्मसरक्षणापुरतेच होतें.

बॉनच्या विश्वविद्यालयांतील तत्वज्ञानाच्या शिक्षकांनीं पोप हे सर्वज्ञ आहेत, हें मत ग्रहण करावें, अशी मागणी कोलोन येथील मुख्य धर्माध्यक्षानी ( Archbishop ) सरकाराकडे केली. तेव्हां विश्वविद्यालयीन गुरूनीं विद्याधिकाऱ्याकडे या बाबतींत तकरार केली व विद्याधिकाऱ्यानें शिक्षकांच्या तर्फे आपला निकाल दिला. तारीख १८ मार्च रोजीं अर्मलंड येथील बिशप यांनीं ब्रान्सबर्ग येथील पाठशाळेंतील दोन शिक्षकांवर याच कारणामुळें बहिष्कार घातला व या वेळींहि विद्याधिकाऱ्यानें शिक्षकांच्या तर्फेच निकाल दिला. इतकेंच नव्हे तर 'आजपर्यंत चालत आलेल्या पद्धतीनें धर्मशिक्षण घेणें ज्या विद्यार्थ्यांस पसत नसेल, त्यांनीं वाटल्यास शाळा सोडून जावें' असाहि हुकूम विद्याधिकाऱ्यानें काढला. यानंतर जर्मनींतले सगळे बिशप फुल्डा येथें एकत्र जमून विद्याधिकाऱ्यांविरुद्ध बादशाहाकडे त्यानी अर्ज केला. 'प्रशियांतील क्याथोलिकपक्षाच्या लोकाचे वाजवी हक्क नष्ट झाले असून क्याथोलिक लोकांच्या मतांस जर्मनींत कोणी त्राता उरला नाहीं.' असेंहि या अर्जांत झटले होतें. यासंबधी पार्लमेंटात चर्चा होऊन जरूर पडल्यास नवा कायदाहि करण्यांत येईल, असें उत्तर बादशाहानीं या अर्जास दिलें. आमच्या हातीं सत्ता असेपर्यंत प्रत्येक प्रशियनाच्या हक्कांचें संरक्षण करू, असें आश्वासन बादशहानें क्याथोलिकपक्षास दिलें.

यानतर विश्राति घेण्यासाठीं बिस्मार्क व्हार्जिन येथें गेले व तेथें एक महिना राहून ते ग्यास्टीन नांवाच्या हवा खाण्याच्या ठिकाणीं गेले. या ठिकाणीं बादशाहाहि आले होते. याच ठिकाणीं आस्ट्रियाचे प्रधान कौंट ब्यूस्ट याची व बिस्मार्क यांची मुलाखत झाली. इ० स० १८६६

च्या युद्धानंतर आस्ट्रियाच्या प्रधानाशीं बिस्मार्क यांची ही पहिलीच मुलाखत होय. या भेटींत आस्ट्रिया व प्रशिया याजमधील अनेक तंट्याचा निकाल लागून मध्ययुरोपातील या दोन प्रबळ संस्थानाची मैत्री झाली. यानंतर साल्झबर्ग मुक्कामीं दोन्ही बादशहाची मुलाखत होऊन हें मित्रत्व आणखी दृढ झालें. ग्यास्टीन येथून बिस्मार्क बर्लिनला तारीख ६ आक्टोबरला परत आले व पुन्हा आपल्या कामावर रुजू झाले.

फ्रेंचाच्या मनात जर्मनीबद्दल कोणतेंहि किल्मिष राहू नये, अशी बिस्मार्क याची फार इच्छा होती व या उद्देशानें या दोन राष्ट्रामध्यें सलोखा उत्पन्न करण्याची खटपट त्यानीं केली; पण या त्याच्या उद्देशाला फ्रेंचाचें पाठबळ न मिळाल्यामुळें त्यांचा उद्देश सफल होण्याचीं चिन्हें दिसेनात. जर्मनावर सूड उगवावा या इच्छेचा पगडा फ्रेंच लोकाच्या चित्तावर दिवसेंदिवस अधिकच बसत गेला. अखेरीस वेठीच्या जर्मन सैन्यापैकीं दोन शिपायांचे खूनहि झाले. टानलेट व बर्टिन या दोन खुनी इसमास आपल्या ताब्यात मागून घ्यावें असा बिस्मार्क यांचा आरंभीं बेत होता; पण फ्रेंचांच्या न्यायीबुद्धीवर भरंवसा ठेवून त्यानीं आपला बेत फिरविला. पण अखेरीस न्यायमूर्तींनीं या दोघां 'सद्गृहस्थास' दोषमुक्त केलें व लोकानींहि त्याचा मोठा जयजयकार केला. ही हकीकत बिस्मार्क यास कळताच त्यानीं फ्रान्सातील जर्मन सैन्याचें ठाणें युद्धभूमी आहे, असा खलिता फ्रेंच सरकाराकडे पाठविला व फ्रेंच लोक अशाच रीतीनें पुढें वागतील, तर आपणास अधिक निकराचे उपाय योजावे लागतील, असेंहि त्यानीं फ्रेंच सरकारास कळविलें.

जर्मन साम्राज्याच्या या बाल्याच्या दिवसात ज्या काहीं गोष्टी घडून आल्या, त्यावरून हें साम्राज्य चागलें वाढीस लागेल, असा भरंवसा बिस्मार्क यास वाटला. निरनिराळ्या संस्थाचें एकीकरण चागल्या पाया-

वर व्हावयास सुरुवात झाली असून अखेरीस अखेरीस त्या सर्वांचा पूर्ण मिलाफ होऊन त्याचे प्रबळ साम्राज्य बनेल, अशीं चिन्हें या बाल्यावस्थेंतहि दिसू लागलीं होतीं. बव्हेरिया आणि सॅक्सनी यानीं आपल्या परराष्ट्रीय वकिलास परत बोलावून आपलें राजकारण जर्मनवकिलाच्या हातीं दिले. बेडन सस्थानाने आपले सैन्य प्रशियन सेनानींच्या हातीं दिलें. अशा रीतीनें भावी साम्राज्याची ही पहिली तयारी सुरू झाली.

शिक्षणविषयक बाबतींत त्या वेळीं जर्मनींत बरीच खळबळ उडाली होती. शिक्षणखात्याचे मुख्य प्रधान फॉं मुल्लर यानीं शाळातपासणीचा एक नवाच मसुदा डायटपुढें आणला होता. या बाबतींत बऱ्याच कडाक्याचा वादविवाद होऊन मुल्लर यास सभेचें मत प्रतिकुळ आहे, असें दिसून आलें; तेव्हां मुल्लर यानी आपल्या जागेचा राजीनामा दिला. तेव्हा बिस्मार्क आणि रून याच्या शिफारशीनें डॉ. फाक यांची नेमणूक विद्याधिकाऱ्याच्या जागीं झाली. जुना मसुदा यानींहि पुन्हा सभेपुढें आणला. या वेळींहि या मसुद्यावर पुन्हा रणें माजलीं व बरीच दंगल झाली; पण अखेरीस हा मसुदा पास झाला.

फ्रेंचाच्या अमदानींत स्ट्रासबर्ग येथील विश्वविद्यालय अगदींच मागासले होतें, यामुळें तेथें विद्यार्थीहि फारसे नसत. बिस्मार्क यानीं इ. स १८७२ च्या मे महिन्यात या विश्वविद्यालयाच्या रचनेंत सुधारणा करून त्यास पुन्हा नावारूपास येण्याच्या मार्गास लावलें. या बाबतींत लिहितांना फ्रेंच पत्रानीं बिस्मार्क यांजवर पुष्कळ तोंडसुख घेतलें व आपली नापसती व्यक्त केली; पण तीबरोबर त्यांची मत्सरबुद्धीहि व्यक्त झाली.

पोप गुरूंच्या दरबारीं जर्मन साम्राज्यातर्फे कार्डिनल प्रिन्स होहेनलो यांची नेमणूक वकील या नात्यानें झाली; पण पोपगुरूंनीं यांस आपल्या दरबारात येण्याची मनाई केली. ही गोष्ट अर्थातच पूर्वरिवा-

जास सोडून झाली होती. तेव्हा ही वकिलात मुळांतच रद्द करून टाकावी, अशी सूचना एका प्रतिनिधीनें सभेपुढें आणली. बिस्मार्क यानीं ही सूचना नापसंत केली व ह्मटलें, 'याबद्दल कोणीहि भीति बाळगावयास नको. देहानें अथवा मनानें आह्मी पोप महाराजाच्या ताब्यात जाणार नाहीं, अशी सर्वांनीं खात्री बाळगावी. आह्मी केव्हांहि क्यानोसाला जाणार नाही." हें बिस्मार्क याचें वाक्य चवथ्या हेनरी राजाला अनुलक्षून होतें. पोप सातवे ग्रेगरी याची क्षमा मागण्याकरता हेनरी राजा दीन वेष धारण करून अनवाणी क्यानोसाच्या किल्ल्यांत पोपच्या चरणीं मिलिंदमान होण्यासाठीं गेला होता. बिस्मार्क यांच्या या उद्गाराचें स्मारक ह्मणून हार्झबर्ग येथें एक स्तंभ उभारलेला आहे बिस्मार्क यास एक मानपत्रहि त्या वेळीं देण्यात आलें. या मानपत्रास उत्तर देताना बिस्मार्क ह्मणाले, "जर्मन साम्राज्याच्या जीवितास अपाय करण्याकरतां पोपने अथवा क्याथोलिक पंथानें काहीं यत्न केला, तर तो हाणून पाडण्याकरतां सर्व जर्मन एक होतील हें या प्रसंगावरून उघड होत आहे." यानंतर लवकरच बिस्मार्क व्हार्जिन येथें प्रकृतिस्वास्थ्या-साठीं पुन्हा गेले व सुमारें साडेतीन महिने तेथें राहिले. या वेळीं त्याचे जुने विद्यालयीन मित्र मोटले हे जुलई महिन्यात त्यास भेटावयास आले. या भेटीचें वर्णन मोटले यानीं आपल्या पुढील पत्रात दिलें आहे:—

"माझी गाडी दाराजवळ येतांच बिस्मार्क याची पत्नी व मुले मेरी आणि हर्बर्ट इतकी मडळी मला सामोरी आली या सर्वांनीं फारच प्रेमानें माझें स्वागत केलें. बिस्मार्कच्या बाह्यरूपांत फारसा बदल झालेला नव्हता, हें पाहून मला मोठें नवल वाटलें. शरीरानें ते थोडेसे लठ्ठ झाले आहेत व तोंडावर थोडासा राठ-पणा आलेला आहे, तथापि त्याच्या बुद्धीचें सामर्थ्य त्या चेहऱ्यावर पहिल्या-सारखेंच व्यक्त होतें. बिस्मार्क याच्या पत्नींतहि गेल्या चवदा वर्षांत ह्मणण्या-जोगा बदल नाहीं. त्याची मुलगी मेरी ही मोठी आनंदी आणि गोड स्वभा-

वाची आहे. यांच्या राहणींत आढ्यतेची छटासुद्धां नाहीं. मी तेथें पोंचलों तेव्हां घरातील मडळी जेवावयास बसली होती लांबच्या प्रवासामुळें माझे कपडे धुळीनें भरले होते; तथापि त्याबद्दल फारशी पर्वा न करता बिस्मार्क यांनीं मला एकदम जेवणाच्या जागीं नेलें. जेवणानतर बिस्मार्क व मी बऱ्याच लांब अतरावर रानांत भटकावयास गेलों. या वेळीं नुकत्याच घडून गेलेल्या अनेक गोष्टी त्यांनीं मला सागितल्या सामान्य माणसें सामान्य गोष्टी जशाप्रकारें बोलतात, तशाच प्रकारें बिस्मार्क हे राज्याच्या उलथापालथीच्या हकीकती मला सांगत होते. त्याच्या बोलण्याच्या ढबींत गर्व अथवा आढयता याचा मागमूसहि नव्हता. खरोखर या गृहस्थाचा स्वभाव इतका साधा आहे कीं, आपण एका मोठ्या ऐतिहासिक व्यक्तीशीं बोलत आहों, ही जाणीव आपणच आपल्या चित्तास वारंवार करून द्यावी लागते साम्राज्याचा जनक बिस्मार्क तो हाच, सर्व जगांतील पहिल्या प्रतीची ऐतिहासिक व्यक्ति ती हीच, असें वारंवार चित्ताला आठवून द्यावें लागतें बिस्मार्क याजपेक्षां कितीतरी कमी प्रतीचे लोक कशी आढयता आणतात, आपल्या स्नेह्यांसोबत्यांस कसें गारठवून टाकतात, याचा विचार केला, म्हणजे बिस्मार्क यांच्या वागणुकीचें मला अधिकच कौतुक वाटतें

"सध्याकाळच्या वेळीं आह्मी गप्पा मारीत बसत असू. बिस्मार्क चिलिम ओढतात, पण पूर्वीपेक्षां आतां ते फारच कमी तबाखू ओढतात. पूर्वीइतका कडक तबाखूहि ते आता ओढीत नाहींत. पूर्वी फार कडक चिरूट ते ओढीत असत आतां चिरुटाचा त्यांना वीट आला आहे, असें ते ह्मणतात. कॉनिग ग्राड ( सॅडोवा ) च्या प्रचड रणधुमाळीच्या कित्येक मौजेच्या कथा त्यांनीं मला सागितल्या. त्याचप्रमाणें निकोल्सबर्ग येथें तहाची वाटाघाट चालली होती, त्यासबधीहि कित्येक गोष्टी त्यांनीं मला सागितल्या बिस्मार्क यांस नाटकीपणाचा अगदीं कटाळा आहे राजकीय प्रश्नांची चर्चासुद्धां साध्या गोष्टी सागितल्यासारखी ते करतात. एकादा बॉसवेल यांच्या सन्निध नित्य असावा असें कित्येकदां तरी माझ्या मनांत येई. खरोखर यांच्या इतका नम्रवृत्तीचा दुसरा गृहस्थ माझ्या तरी पाहण्यात आला नाहीं बाह्मतः बांध्यानें ते मोठे खबीर दिसतात; तथापि त्यांची शरीरप्रकृति थोडी तरी खालावली आहे, असें मला वाटतें. सध्या त्यांचें आयुष्य एकाद्या खेडवळ गृहस्थाप्रमाणें जात आहे.

"असो. बिस्मार्कचें सर्व चरित्र सांगण्याचा येथें माझा उद्देश नाहीं आता मी आणखी बारीकसारीक पुष्कळ गोष्टी लिहिल्या असत्या, पण मी कांहीं न्यूयार्क हेरल्डचा बातमीदार नव्हे. परक्याचा मुलुख घ्यावा, अशी जर्मनीची मुळींच इच्छा नाहीं, असें ते ह्मणत असतात बाल्टिक किनाऱ्याचा प्रांत रशियानें आपणहून आह्मास दान दिला, तरी सुद्धां तो आह्मास नको, असेंहि एकवार ते ह्मणाले हॉलंडवर स्वारी करणें अथवा त्याचें स्वातंत्र्य नष्ट करणें हा शुद्ध वेडेपणा आहे, असें त्याचें ह्मणणें आहे. बेल्जम खाण्याची फ्रान्सची फार इच्छा होती. या त्यांच्या इच्छेला जर्मनीनें सम्मति दिली असती, तर दुसऱ्या वाटा-तील त्या अटी फ्रान्सनें कबूल केल्या असत्या."

आपल्या विवाहास पचवीस वर्षें पुरीं झाल्याचा उत्सव बिस्मार्क यानीं केला, त्याचें वर्णन करून मोटले पुढें लिहितात,

"व्हर्जिन येथें बिस्मार्क घराणे अगदीं साध्या रीतीनें राहतें येथें कसल्याच गोष्टीची वेळ ठरलेली नाहीं. सकाळीं मंडळी जमली ह्मणजे नऊ दहाच्या सुमारास चहापाणी होतें बिस्मार्क स्वत: अकरा वाजतां उठतात, कारण त्यांना पहांटे चार पांच वाजेपर्यंत झोंपच येत नाहीं. सकाळीं एकादा पेला कॉफी मात्र ते पितात. मग मंडळीशीं ते बोलत बसतात. इतक्यात त्याचा चिटणीस एक ढीगभर पत्रें वगैरे घेऊन येतो. ते सध्यां विश्रांति घेत आहेत, तरी रोज खंडीभर पत्रें त्यास येतातच. पत्रांचीं उत्तरें वगैरे कशीं लिहावयाचीं हें ते आपल्या चिटणिसास सांगतात खुणा वगैरे करण्याची बिस्मार्क यांची पेन्सील सुमारें एक फूटभर लांब आहे तीन वाजता जेवणाची वेळ ठरलेली आहे; पण मंडळी जमेपर्यंत चारांचा सुमार सहज होतो जेवणाचा बेत अगदीं साधा असतो.

बिस्मार्क यांचे दोन्ही मुलगे फार चपळ, हुशार आणि रीतीभातीनें चांगले आहेत बायकोवर आणि मुलांवर बिस्मार्क यांचें फारच प्रेम आहे. मुलेंहि आईबापावर फार प्रेम करतात. एकदरीनें या भेटीची आठवण मला जन्मभर राहील. मी येथून जाण्यास निघालों, तेव्हां मला फारच वाईट वाटलें ह्या माझ्या जुन्या दोस्ताची गांठ केव्हां पडेल, तें ईश्वर जाणे, असें माझ्या मनात आलें.

तारीख ३ सप्टेंबर रोजीं बिस्मार्क बर्लिनला परत आले. रशिया, जर्मनी आणि आस्ट्रिया या तीन राष्ट्रांच्या बादशहाची मुलाखत या वेळीं

बर्लिन येथें झाली. युरोपात शातता राखण्यासाठीं या तीन राष्ट्रांनीं खटपट करावी, असें या मुलाखतींत ठरलें. या मुलाखतीच्या वेळीं बिस्मार्क हजर होते.

जर्मन साम्राज्य निर्माण होण्यापूर्वी प्रशियाच्या प्रधानमडळाच्या अध्यक्षाचें काम बिस्मार्क यांजकडे होतें. त्यानतर साम्राज्याच्या मुख्य प्रधानाचें ( चान्सलर ) कामहि त्यांजकडे आलें. हीं दोन्ही कामें एकाच वेळीं चालविणें फार कठीण आहे, असें बिस्मार्क यास आढळून आलें. तेव्हां प्रशियाच्या प्रधानमडळाचें अध्यक्षत्व सोडून देण्याची परवानगी त्यानीं बादशाहाकडे मागितली. या विनंतीस रुकार देऊन बादशाहानीं त्याच्या जागीं फील्डमार्शल फॉ रून याची नेमणूक तारीख २१ दिसेंबर सन १८७२ रोजीं केली.

जर्मनीबद्दल फ्रान्सच्या मनात वितुष्ट राहूं नये, अशी बिस्मार्क यांची इच्छा होती, हें पूर्वी सांगितलेंच आहे. राणी आगस्टा हिचीहि अशीच इच्छा होती. तेव्हां या बाबतींत मोंशर ग्वीझो यांस पत्र लिहून तिनें त्याचा सल्ला विचारला. ही बातमी जर्मनीचे फ्रान्समधील वकील कौंट आर्निम यांस कळली. व ती त्याने पत्रद्वारें बिस्मार्क यास कळविली. तेव्हां बिस्मार्क यानीं आर्निम यास पुढील उत्तर पाठविलें.

"ग्वीझो यांस, राणीसाहेबानीं पत्र लिहिलें, ही आपणास लागलेली बातमी खरी असेल तर ही गोष्ट स्त्रीस्वभावास अनुरूप झाली, असेंच झटलें पाहिजे. तथापि फ्रेन्च लोकांचा आपणावर झालेला निष्कारण राग घालवीत बसण्याचें आह्मास कारण नाहीं. या दिशेनें केलेल्या सर्व खटपटी आजपर्यंत सर्व फुकट गेल्या आहेत. तेव्हा आपणासारख्यानीं आता नवी खटपट सुरू करणें, हें आपल्या राष्ट्राच्या इज्जतीस साजण्यासारखें नाहीं. हें युद्ध आह्मी उपस्थित केलेलें नव्हतें, तथापि फ्रान्सची इच्छा पुन्हा युद्ध करण्याची असेल, तर तसें करण्यास आमचीहि

पूर्ण तयारी आहे. फ्रान्स आह्माला भीत आहे, तोंपर्यंत त्याच्या द्वेषाची किमत आह्माला कांहींच वाटत नाहीं."

बिस्मार्क याचें महत्त्व कमी करण्याकरता अंत:स्थ रीतीनें कांहीं खटपटी सुरू झाल्या होत्या व ही गोष्ट बिस्मार्क याच्या लक्षातहि आली होती. या उपद्व्यापि लोकांत कौंट आर्निम हे मुख्य होते व यांनीं ज्या अंत:स्थ खटपटी केल्या त्याचा परिणाम किती शोचनीय झाला, हें पुढें दिसून येईलच.

युरोपात शांतता राखण्याकरता तीन बादशाहांच्या भेटीचा योग बिस्मार्क यांनीं घडवून आणला होता. त्यातच आता इटलीची आणखी भर पडली. जर्मनी आणि इटली या दोन देशाचे हितसबंध परस्परावलम्बी आहेत, ही गोष्ट त्या दोघाच्याहि लक्षांत येऊन चुकली होती. धर्मगुरु पोप याचें आदिपीठ इटलींत असल्यामुळें त्या देशातील हितसंबधांत आपलें वर्चस्व असावें, असें पोप यांस वाटे. उलटपक्षीं ऐहिक बाबींत पोपगुरूनें मन घालू नये अशी इच्छा राजे व्हिक्टर इम्यान्युएल यांची होती. यामुळें इटलीच्या राज्यकारभारात दुही माजल्यासारखें झालें होतें. फ्रान्सनें पोपगुरूचा पक्ष स्वीकारला होता. यामुळें पोप गुरु व व्हिक्टर इम्यान्युएल याच्यातील दुहीस राजकीय महत्व प्राप्त झालें होतें. जर्मनीनें इम्यान्युएल यांचा पक्ष स्वीकारला. जर्मन साम्राज्य निर्माण होण्यापूर्वी व्हिक्टर इम्यान्युअल वुइलियम राजाच्या भेटीस बर्लिन येथें गेले होते. त्या वेळीं सर्व प्रशियन प्रजाजनानीं त्याचें स्वागत मोठ्या उत्साहानें केलें. या भेटींत अनेक राजकीय प्रश्नाचा खल होऊन जर्मन व इटली यांचें सगनमत असणें उभयतांसहि हितावह आहे, असें निदर्शनास आलें. इ. स. १८७५ सालीं जर्मन बादशाहा हल्लींच्या राजाच्या भेटीला गेले. या वेळीं इटालियन प्रजाजनानीं जर्मन बादशहाचें स्वागत

अपूर्व थाटानें केलें. जर्मन साम्राज्यास नुकत्याच जोडलेल्या आलसे-लॉरेन प्रांतांची व्यवस्था लावण्याचें काम बिस्मार्क यांनीं या वेळीं हातीं घेतलें. यासंबंधीं बिस्मार्क यानीं एका प्रसगीं पुढील उद्गार काढले.——

"परकियावर अम्मल करण्याच्या बाबतींत फ्रेंच लोकांपेक्षा जर्मन लोक अधिक उदार व अधिक दयाशील आहेत, असें सामान्यपणें ह्मणण्यास हरकत नाहीं. फ्रेंच लोकाच्या संस्था आणि त्यांची पूर्वपरंपरा यांच्या दृष्टीनें जितकें स्वातंत्र्य प्रजाजनास मिळणें शक्य आहे, त्याहून आमच्या अमलाखालीं, तें अधिक प्रमाणानें मिळतें." आलसेलॉरेन प्रांतांचे प्रतिनिधी रीशस्थागमध्यें पाठविण्याची सवलतहि बिस्मार्क यांनीं त्या प्रांतास दिली होती. यामुळें त्या प्रांतातील लोकांस कांहीं अड-चणी आल्या, तर त्याची वाटाघाट उघडपणें होण्याचा मार्ग मोकळा होता. या प्रांतावरील जर्मनीचें स्वामित्व एकमुखी व जुलमी होतें हें खरें; तथापि त्यातहि बिस्मार्क यानीं फार नेमस्तपणा दाखविला, यात शंका नाहीं.

फ्रेंचाकडून युद्धाच्या खर्चासाठीं ह्मणून जो पैसा मिळाला होता, त्याचा उपयोग अनेक प्रकारें करण्यात आला. जर्मन संस्थानाच्या एकीकरणासाठीं ज्या सेनापतींनीं व मुत्सद्यांनीं कायावाचामनानें खट-पट केली होती, त्यांस मोबदला देण्यास सुमारें नव्वद लक्ष रुपये खर्च झाले. सुमारें नऊकोट रुपये स्पँडा येथील जुलियस टॉवरमध्यें युद्ध गंगाजळी ह्मणून ठेवले. आणि बाकीचा पैसा लोकाची नुकसान भर-पायी, किल्लेतटबंदी व युद्धोपयोगी रेलरस्ते याजप्रीत्यर्थ खर्च झाले. त्याचप्रमाणें यातील काहीं रक्कम जर्मन आरमाराची मुहूर्तमेढ रोंवण्या-कडेहि खर्च झाले. अशा रीतीनें या वेळीं जर्मनीवर जो सोन्याचा पाऊस पडला, त्यामुळें आजुबाजूच्या राष्ट्राच्या पोटदुखीसहि आरंभ झाला,

हेंहि येथें लक्षांत ठेवलें पाहिजे. जर्मन साम्राज्याचे वैभव आणि त्याचा अधिकार हीं एकसारखीं सपाट्यानें वाढीस लागलीं. अगदीं आरंभींच्या काळांतसुद्धा या वाढीस अडथळा झाला नाहीं. तथापि या शांततेच्या काळात सुद्धां ज्या महापुरुषानें जर्मन साम्राज्य जन्मास घातलें व ज्यानें त्याचें महत्व व वैभव वाढविलें, त्याचें महत्व कमी करण्याची खटपट याच वेळीं एकसारखी सुरू होती, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें.

---

## प्रकरण सोळावें.

## अंतस्थ भानगडी.

जर्मनीच्या या वज्रबाहू प्रधानाच्या आयुष्यांतील बऱ्याच महत्वाच्या झटापटीस या वेळीं प्रारंभ झाला होता. या तंट्यांत बिस्मार्क यांच्या कीर्तीस कोणत्याहि प्रकारचा उणेपणा आला नाहीं; तथापि काहीं काळ त्याजवर प्रतिपक्षाचे मोठ्या निकराचे हल्ले या वेळीं झाले. हा तटा जर्मनीचे मुख्य प्रधान आणि त्याचे एक पाताळयंत्री हस्तक कौंट हॅरी फॉं आर्निम याजमध्यें सुरू झाला. आर्निम यास प्रधानपदावर आरूढ होण्याची जबर महत्वाकांक्षा होती. या महत्वाकांक्षेस बर्लिनच्या दरबारी लोकांकडून पाठिंबा मिळेल, असा पूर्ण विश्वास आर्निम यास वाटत होता. आर्निम हे मोठे बुद्धिमान् मुत्सद्दी होते असें नाहीं, तथापि त्याची महत्वाकांक्षा मात्र जबर होती. प्रथम त्यास पोप गुरूच्या दरबारीं जर्मनी तर्फे वकील नेमण्यात आले होतें. या दरबारांतील त्यांची कारकीर्द विशेष नांवाजण्यासारखी झाली नाहीं. तथापि काहीं सरदार मंडळीचा वशिला त्यास असल्यामुळें त्याची नेमणूक प्यारीस येथील जर्मन वकील या नात्यानें झाली. नवीनच स्थापन झालेली फ्रेंच लोक-

सत्ताक राज्यपद्धति दृढमूळ होईल या दृष्टीनें आपण चाललें पाहिजे, अशी बिस्मार्क याची त्यांस सागी होती. कौंट आर्निम याच्या मनाचा ओढा प्रथमपासून बोनापार्ट घराण्याकडे विशेष होता. प्यारीस दरबारीं गेल्याबरोबर या दृष्टीने काहीं खटपटीस त्यांनीं सुरुवात केली. यामुळें बिस्मार्क याजकडून ज्या कांही सूचना त्यास जात, त्यांचा अव्हेर त्यांजकडून होऊं लागला. त्यांस लिहिलेल्या एका पत्रात बिस्मार्क ह्मणतात;

"बादशहांनीं जी राज्यधुरा माझ्या स्वाधीन केली आहे, ती नीट सांभाळण्याकरिता परराष्ट्रांतील आमच्या सर्व प्रतिनिधींनी माझे हुकूम अमलात आणले पाहिजेत अशी माझी आकांक्षा आहे. कोणी केवढाहि हुद्देदार असला, तरी आपली स्वतःचीं राजकीय मतें बाजूस ठेवून मुख्य दरबारांतून येणाऱ्या हुकुमाची योग्य तऱ्हेनें अम्मलबजावणी त्यानें केली पाहिजे या दृष्टीनें विचार करतां आपण ज्या धोरणानें तिकडील हकीकती इकडे सादर करतां, त्या धोरणात आपण बदल करणें अवश्य आहे"

मुख्य दरबाराशीं वागताना परराष्ट्रीय वकिलानीं कोणतें धोरण स्वीकारावें, याचा स्पष्ट खुलासा या पत्रात कोणासहि सापडण्यासारखा आहे. तथापि कौंट आर्निम यानीं या सूचनेकडे बिलकूल लक्ष न देतां आपला पूर्व क्रम तसाच चालू ठेवला; एवढेंच नव्हे, तर बादशहाचें मन वळविण्याकरता त्याना परभारें पत्रें लिहिण्यासहि आरंभ केला. त्याचप्रमाणें कित्येक वर्तमानपत्रें हाताशीं घेऊन त्यांतूनहि आपला बडेजाव वाढविण्यास त्यानीं सुरुवात केली. 'एक मोठा बुद्धिमान् आणि अत्यत अनुभवी व कसलेला अमलदार' हल्लींच्या राज्यपद्धतीस कंटाळून राजीनामा देण्याच्या विचारात आहे, अशा अर्थाचे लेख या पत्रातून येऊं लागले. त्याचप्रमाणें या पत्रांतून बिस्मार्क याजवरहि टीका होऊं लागल्या. बिस्मार्क यांजवर ऑर्निम यानीं केलेले अशा प्रकारचे हल्ले फुकट गेले; तथापि बादशहा आणि महाराणी याची मेहरनजर

त्याजवर असल्यामुळें ऑर्निम याची जागा मात्र कायम राहिली. या आपल्या जागेवर राहून त्यांनीं अशा प्रकारच्या पाताळयंत्रीपणास सुरुवात केली कीं, त्याजमुळें युरोपच्या शांततेस धोका येतो कीं काय अशीहि भीति काहीं काळ वाटू लागली.

फ्रान्समध्यें जें वेठीचें जर्मन सैन्य ठेवलें होतें, त्याचा खर्च फ्रान्सला सोसावा लागत होता. इ. स. १८७३ सालच्या आरंभीं खंडणीचा सर्व पैसा देऊन टाकण्याचें बोलणें मुख्य प्रधान थियर्स यानीं बिस्मार्ककडे सुरू केलें. 'तुम्हास वाटल्यास फ्रेंचांचें हें ह्मणणें कबूल करा अथवा करूं नका. परिस्थितीला योग्य दिसेल तसें करा.' अशी सूचना प्रिन्स बिस्मार्क यानीं ऑर्निम यास दिली. ही बाबत फ्रेंचाच्या खुशीवर सोंपविली असल्यामुळें यात तव्याचें काहींच कारण नव्हतें; तथापि कौंट आर्निम यानीं बिस्मार्क यांचें ह्मणणें थीयर्स यास न कळविता, तें मधल्यामध्यें दडपून ठेवलें. यामुळें फ्रेंच प्रजासत्ताकाचे अध्यक्ष व जर्मनीचे मुख्य प्रधान या उभयताचाहि गैरसमज होऊन एकाचें ह्मणणें दुसऱ्यास कळेना, अशी स्थिति प्राप्त झाली. तेव्हां बिस्मार्क यानीं हें प्रकरण पारिस वकिलातीच्या हातून काढून तें प्रत्यक्षच आपल्या हातीं घेतलें व फ्रेंच दरबाराशीं प्रत्यक्ष पत्रव्यवहार होऊन या प्रकरणाचा संतोषकारक निकाल लागला. ऑर्निम याच्या हातून हें प्रकरण बिस्मार्क यानीं आपल्या हातीं घेतलें, तेव्हा या बाबतींत आर्निम याची सल्ला त्यानीं मुळींच विचारली नव्हती. अशा रीतीनें या बाबींत ऑर्निम याचा प्रत्यक्ष पाणउतारा झाला असताहि, ते आपल्या जागेवर कायमच राहिले. हें प्रकरण अशा रीतीनें संपत आहे, तोंच फ्रान्स मधील बादशाहीपक्षाचा विजय होऊन थियर्स यास आपल्या जागेचा राजीनामा द्यावा लागला. फ्रान्समधील बादशाही पक्षाचें धुरि-

णत्व प्रसिद्ध सेनापति मार्शल म्याकमहान् याजकडे होतें. बिस्मार्क हे प्रजापक्षास अनुकूळ असल्यामुळें व त्या पक्षाचा जोर फ्रान्समध्यें कमी झाल्यामुळे बिस्मार्क याच्या राजनीतीच्या धोरणावर जर्मनींत कडक टीका होऊं लागली. बिस्मार्क याचे डाव चुकत आहेत व यामुळें जर्मनीवर लवकरच आपत्ति कोसळेल, असें त्याचे प्रतिपक्षी ह्मणूं लागले. फ्रान्स-मधील या गडबडींत आर्निम यांनीं बराच पुढाकार घेतला, अशी बिस्मार्क यांची खात्री होऊन चुकली होती. तेव्हा आर्निम यास पुन्हा पत्र लिहून अशाप्रकारच्या वर्तणुकीचा परिणाम चांगला होणार नाहीं, असें त्यानीं आर्निम यांस स्पष्टपणें कळविलें.

बिस्मार्क यांजकडून असें पत्र आल्यानंतर कौंट आर्निम यांनीं बिस्मार्क याशीं उघड दावा मांडला. कामाकडे ते अगदीं दुर्लक्ष करूं लागले. जर्मनीचा बोज फ्रान्स देशात कायम रहावा ह्मणून ज्या गोष्टी करणें अवश्य होतें, त्याहि त्यांनीं केल्या नाहींत. अशा प्रकारचा गृहस्थ जर्मनीचा प्रतिनिधि या नात्यानें फ्रान्समध्यें राहणें इष्ट नाहीं, ही गोष्ट बिस्मार्क यानीं बादशाहास अखेरीस पटविली. तेव्हा इ. स. १८७४ च्या मार्च महिन्यांत बादशहानीं आर्निम यांची बदली कॉन्स्टांटिनोपल येथें केली. यामुळें बिस्मार्कबद्दलचा त्याचा द्वेष अधिक प्रज्वलित होऊन बिस्मार्क यांजवर वर्तमानपत्रातून कडक टीका करण्यास त्यानीं सुरु-वात केली. याशिवाय एक स्वतंत्र चोपडें लिहून त्यांत बिस्मार्क यांची बरीचशी नालस्ती त्यानीं केली होती. अखेरीस बादशाहांनीं हे आरोप सिद्ध करण्याविषयीं आर्निम यास सांगितलें. तेंव्हा वर्तमानपत्रांतील लेखांशीं आपला काहीं संबंध नाहीं, असें आर्निम ह्मणाले; पण हे लेख त्याच्याच हातचे आहेत, असें बिस्मार्क यांनीं निःसंशय सिद्ध केलें. तेव्हां बादशाहानीं आर्निम यांस चाकरींतून कायमचे वजा केले. पुढें

पारीस येथील जर्मन वकिलातींतून काहीं महत्वाचे कागदपत्र नाहींसे झाले असल्याची बातमी समजली. हे कागद परत करण्याविषयीं बिस्मार्क यानीं आर्निम यांस हुकूम केला. तेव्हा त्यांपैकीं कांहीं परत करून बाकीचे त्यानीं आपल्यापाशीं तसेच दडपून ठेवले. अखेरीस इ. स. १८७४ च्या आक्टोबर महिन्यात बिस्मार्क यानीं स्टेटीन येथें त्यास पकडून अटकेंत ठेवलें. केवळ मत्सरामुळें मुख्य प्रधानांनीं आपणावर ही तोहमत आणली आहे, असें आर्निम ह्मणूं लागले. पुढें लवकरच कोर्टात उघडपणें या खटल्याची चवकशी झाली.

या खटल्याची चौकशी चालू असता बिस्मार्क व आर्निम यांजमधील सरकारी पत्रव्यवहार कोर्टात आला. बिस्मार्क यांचीं पत्रें कोर्टात वाचलीं तेव्हा फ्रान्स व जर्मनी या उभय देशात शांतता नांदावी अशीच बिस्मार्क यांची इच्छा होती, ही गोष्ट सर्वांच्या निदर्शनास आली. उलटपक्षीं आर्निम यांचा पाताळयंत्रीपणा उघडकीस येऊन ते लावालावी करणारे गृहस्थ आहेत, असेंहि सर्वांस दिसून आलें.

बिस्मार्क यांच्या एकंदर अमदानींत हे दिवस त्यास मोठे कठिण गेले. क्याथोलिक पक्ष तर त्यास अगदीं पाण्यात पहात होता. इ. स. १८७३ च्या मे महिन्यात क्याथोलिक पक्षासाठीं एक चार कलमी कायदा पास करण्यांत आला. धर्मपीठावरून उपदेश करताना क्याथोलिक धर्माधिकाऱ्यानीं राजकीय गोष्टींचा उल्लेख करू नये; धर्माधिकारी होण्यासाठीं जे उमेदवार पुढें येतील त्याना शुद्ध जर्मनपद्धतीचें शिक्षण मिळालेलें असून परकीय राष्ट्रांशीं त्यांचा कोणत्याहि प्रकारचा संबंध नसावा; दुय्यम प्रतीच्या धर्माधिकाऱ्याच्या जागावर कोणा इसमाची नेमणूक होईल तेव्हा बिशप व आर्च-बिशप या मुख्य अधिकाऱ्यांनीं त्याजबद्दल त्या त्या प्रांताच्या मुख्य मुलकी अधिकाऱ्याकडे बातमी द्यावी. धार्मिक

बाबींचे खटले चालविण्याकरिता बिस्मार्क यानीं नवीं कोर्टें स्थापन केलीं. यामुळें बिशप व आर्च-बिशप याच्या धार्मिक सत्तेस आणखीहि आळा बसला. तसेंच, इ. स. १८७४ सालीं सिव्हल मॅरेजचा कायदा पास झाल्यामुळे क्याथोलिक पक्षाचें महत्व अगदींच संपुष्टांत येऊं लागलें. यामुळें क्याथोलिक पक्ष अधिक भडकून मात्र गेला. बिस्मार्क हे ख्रिस्ताचे शत्रू आहेत, असें त्या पक्षांतील पुढारी ह्मणू लागले. या कायद्याविरुद्ध जो धर्माधिकारी वर्तन करील त्याचें वतन जप्त करण्याचा आणखी एक कायदा पास झाला. पोप नववे पायस यास ही गोष्ट समजली, तेव्हां 'जर्मन साम्राज्याचे दिवस भरत आले आहेत' असे उद्गार त्यांनीं काढले. इ. स. १८७८ सालीं आठवे लियो पोपच्या गादीवर आले, तेव्हा त्यांनीं वुइल्यिम बादशहास एक पत्र लिहून हा तंटा कायमचा मिट-विण्याची विनंति केली. अखेरीस अनेक प्रश्नांवर बरीच भवति न भवति होऊन व परस्परांकडून परस्परास सवलती मिळून या तंट्याचा निकाल लागला.

बिस्मार्क याच्या साऱ्या कार्यांत फील्डमार्शल रून यांचा त्यास चागला पाठिंबा असे. इ. स. १८७३ च्या अखेरीस रून यांनीं आपल्या युद्धमंत्र्याच्या जागेचा राजीनामा दिला. तेव्हां बिस्मार्क याचा मोठाच आधार गेला. या वेळीं बिस्मार्क यांस किती दुःख झालें, हें त्याच्या पुढील पत्रावरून दिसून येईल.

"ता. २० आक्टोबर १८७३.

प्रिय रून,

मी अद्यापि नोकरीवर आहें आणि ज्या धन्याची नोकरी मी करतों त्याला तर आपल्या जागेचा राजीनामाहि देतां येत नाहीं तेव्हा आतां हें गाडें पुढें ढकलणें आह्मास भाग आहे पोप, तुर्क आणि फ्रेंच या त्रयीनें उभ्या केलेल्या

पर्वतप्राय अडचणीस न जुमानता ज्या निश्चयानें हें गाडें आजपर्यंत मी ओढलें, त्याच निश्चयानें आमच्या देशबांधवांच्या अडथळ्यांस न जुमानता तें मी पुढें ढकलीन. शरीराला स्वास्थ्य असो अगर नसो, बादशहाचें निशाण खांद्यावर वागविणें मला भाग आहे. या कार्यांत माझा देहपात झाला तर सत्कार्यांत माझ्या शक्तीचा विनियोग झाला, हें कोणाही न्यायी मनुष्यास कबूल करावें लागेल. आपण आता नौकरी सोडली. आतां साऱ्या प्रधानमंडळांत अंत:करणाचा मित्र असा मला कोणीही राहिलेला नाहीं. गेलीं अठरा वर्षें आपण खांद्याशीं खांदा लावून लढलों, या गोष्टीची मला वारंवार आठवण होते. या गोष्टीबद्दल तुमच्याशीं पुष्कळसें बोलावें असें मनात येतें. या गेल्या वर्षांत आपल्या कार्यास जें यश आलें; तें खरोखर माझ्या बुद्धीच्या आवांक्याबाहेरचें होतें. केवळ परमेश्वराच्या कृपेवांचून अशा गोष्टी घडून आल्या नसत्या. राजकार्य यापुढें मला कंटाळवाणें वाटू लागेल; आणि दिवसेंदिवस हा उदासपणा वाढतच जाईल. कांहीं जुने मित्र कालवश झाले. आणि कांहीं शत्रु बनले, आणि नव्याची जोड होणें तर आतां शक्य दिसत नाहीं. परमेश्वराची इच्छा असेल तसें होईल. खलबतखान्यांतील पिवळ्या अस्तरणाची खुर्ची माझ्या दृष्टीनें आतां पुन्हा केव्हांही भरली जाणार नाहीं. तिच्यावर दुसरा कोणी बसला, तरी ती मला रिकामीच दिसते. या खुर्चीवर माझा एक जिवलग दोस्त बसत होता, एवढें स्मरणमात्र मला प्रत्येक वेळीं होत जाईल."

रून यानीं नोकरी सोडली तेव्हा प्रशियाच्या प्रधानमंडळाचें अध्यक्षपद त्यांजकडे होतें. तें आतां बिस्मार्ककडे आलें. बिस्मार्क यांचे शत्रू अद्यापीहि स्वस्थ बसलेले नव्हते. बिस्मार्क यांजविरुद्ध बावटळ उठविण्याची खटपट ते मधून मधून करीत होते; पण त्यांच्या या खटपटीमुळें बिस्मार्क यांची लोकप्रियता अधिकच वाढत गेली. इ. स. १८७२ सालीं त्यांच्या विवाहास पंचवीस वर्षें पुरीं झालीं ह्मणून लोकानीं महोत्सव केले. साम्राज्याच्या सर्व भागांतून अभिनंदनपर तारा त्यांस आल्या. त्याचप्रमाणें भेटीदाखल अनेक वस्तु अनेक संस्थांकडून व लोकांकडून आल्या.

ओल्डनबर्गचे रहिवाशी बिस्मार्क याच्या जन्मदिवशीं प्लव्हरपक्षाचीं एकशेंएक अडीं प्रतिवर्षी पाठवीत असत. बिस्मार्क यानीं इ. स. १७७२ सालीं प्लव्हरपक्षाच्या अंड्याच्या आकाराचा एक चांदीचा मोठा पेला ओल्डनबर्ग येथील रहिवाशांस नजर केला. त्यावर 'बर्लिन येथील प्लव्हरनें घातलेलें एक अंडें' असा मजकूर लिहिलेला होता.

इ. स. १८७४ सालीं बिस्मार्क संधिवाताच्या विकारानें बरेच आजारी होते. या प्रसंगींहि लक्षावधि लोकाकडून त्यास संदेश येत असत. खुद्द बादशहाचे वैद्य डॉ. लॉर हे त्यांची प्रकृति पाहण्यास येत असत. या दुखण्यामुळें बिस्मार्क यास तारीख ५ मार्चपासून तारीख २३ एप्रिलपर्यंत आंथरुणावर पडून रहावें लागलें. तथापि दुखण्यातसुद्धा लोकहिताच्या गोष्टींची चर्चा ते करीत असत. जर्मन पार्लमेंटात या वेळीं बऱ्याच फळ्या पडून जो तो आपापलें घोडेंच पुढें ढकलीत होता. यामुळें कोणतेंहि काम निष्कारण दिरंगाईवर पडत असे. जर्मनीचें खरें लष्करी बळ किती असावें या बाबतींत मोठा तंटा माजून राहिला होता. खडें जय्यत लष्कर किमानपक्ष चार लक्ष असावें, असें सरकारचें ह्मणणें होतें. सरकारच्या प्रतिपक्षीयास हें ह्मणणें कबूल होईना. आजूबाजूंच्या राष्ट्राची परिस्थिति पाहून तदनुरूप आपल्या खड्या लष्कराची संख्या प्रतिवर्षीं कमीअधिक करावी असें त्यांचें ह्मणणें होतें. तारीख २७ मार्च रोजीं बिस्मार्क यास भेटावयास कांहीं प्रतिनिधि त्याच्या घरीं गेले. तेव्हा बिस्मार्क ह्मणाले,

"जर्मन राष्ट्राला आपण एक वेळेस घोड्यावर बसविलें कीं पुढें त्याचें तेंच मार्ग काढील, असे शब्द इ. स. १८६७ सालीं मीं उच्चारले होते; पण माझे ते शब्द मला आता माघारे घ्यावे लागतील, असें वाटूं लागलें आहे. जर्मनीला घोड्यावर बसतां येत नाहीं, असें

सिद्ध करण्याची पार्लमेंटची इच्छा दिसते; पण मी असें कधींहि होऊं देणार नाहीं. निरनिराळ्या पक्षांनीं खासगी भाडणें करून साम्राज्याची उन्नति मागें टाकावी हें योग्य नाहीं. युरोपभर मिळविलेली कीर्ति अशा रीतीनें गमविण्याची माझी इच्छा नाहीं. हातात लेखणी धरण्याची शक्ति मला आली कीं, प्रथम मी राजीनामा देईन. लिबरल, प्रोग्रेसिव वगैरे ज्या पक्षाच्या मदतीवर मी अवलंबून होतों, तेहि आतां विरुद्ध जाऊं लागले आहेत. ही स्थिति राज्याला सर्वतोपरी अपायकारक आहे. कसेंहि करून या गोष्टीला आता आळा घातलाच पाहिजे. एक मला तरी राजीनामा द्यावा लागेल अथवा सध्याचें पार्लमेंट मोडून नवी निवडणूक करावी लागेल. ”

पण बिस्मार्क यांची ही भीति निराधार ठरली. बिस्मार्क राजीनामा देणार ही बातमी प्रसिद्ध होताच सर्व साम्राज्यभर मोठी खळबळ उडाली. लोकमताचें वजन अखेरीस प्रतिनिधींवर पडून खड्या लष्कराची मुदत सात वर्षांची असावी, हा सरकारी ठराव सर्वानुमतें पास झाला.

बिस्मार्क याच्या आजारीपणांतच त्याचा ५९ वा वाढदिवस आला. त्याच-या प्रसंगीं बादशाहा स्वतः बिस्मार्क यास भेटावयास आले होते. त्याच-प्रमाणें बव्हेरियाच्या राजाकडूनहि अभिनंदनपर तार आली होती. तारीख ३ मे रोजीं रशियाचे बादशहा झार व त्यांचे मुख्य प्रधान गॉर्श्योकॉफ बिस्मार्क यांच्या भेटीस आले.

बिस्मार्क थोडे हिंडूं फिरूं लागताच किसिंजेन गावीं त्यानीं जाऊन रहावें, अशी सल्ला त्यांच्या वैद्यानीं त्यांना दिली. व त्याप्रमाणें इ. स. १८७४ च्या जूनच्या ३ ऱ्या तारखेस ते आपल्या मुलामाणसासह त्या गावीं रहावयास गेले.

## प्रकरण सतरावें.

# किसिंजेन येथें.

बिस्मार्क यास विश्रांतीची आवश्यकता आता फार वाटूं लागली. तेव्हां तारीख ४ जुलई रोजीं बव्हेरियातील किसिंजेन गावीं ते आले. राजधानींत त्यास बरेच शत्रू उत्पन्न झालेले होते. पूर्वींचे त्याचे काहीं मित्र तटस्थ राहिले होते व काहीं त्याच्या विरुद्धपक्षास मिळाले होते. बिस्मार्क यास प्रधानपदावरून खालीं ओढल्यानंतर त्याची जागा कोणी बळकवावी, याची वाटाघाटसुद्धा ते करूं लागले होते. ज्या मंडळीपासून मदतीची अपेक्षा ते करीत होते तीच मंडळी आपणाविरुद्ध गेलेली पाहून बिस्मार्क यास अतिशय खेद झाला. बिस्मार्क याच्या शत्रूंनीं किसिंजेन येथेंहि त्याची पाठ सोडली नाहीं. तेथेंहि एक जिवावरचा प्रसंग त्याजवर गुदरला. तथापि त्यांतून ते सुखरूपपणें पार पडले. किसिंजेन येथें अपरसेल नावाच्या रस्त्यावर एक घर त्यानीं भाड्यानें घेतलें होतें. या घरातून नदीचा देखावा लांबवर दिसत होता. तसेंच आजूबाजूस हिरवींचार कुरणें व त्यापलीकडे उंच डोंगर असल्यामुळें ही जागा बिस्मार्क यास फार आवडली होती.

आपल्या ठरलेल्या जागीं बिस्मार्क रोज नियमित वेळीं स्नानास जात असत; पण त्याच्या दर्शनासाठीं उत्सुक झालेल्या लोकांची गर्दी इतकी होई कीं रस्त्यानें चालणेंसुद्धा त्यास मुष्किलीचें होई. घराबाहेर त्याचें पाऊल पडतें न पडतें तोंच शेंकडों लोकांचा गराडा त्याजभोंवतीं पडे. यामुळें कटाळून जाऊन स्नानास जाणें त्यानीं बंद केलें व घरासभोंवतालच्या बागेंतच ते सहल करूं लागले. बिस्मार्क यांच्या या परिपाठामुळें लोकांचा बराच उत्साहभंग झाला.

तारीख १३ जूनपर्यंत सर्व गोष्टी सुरळीत चालल्या होत्या. त्या दिवशीं दुपारीं एक वाजता उघड्या गाडींत बसून प्रिन्स साल नदीच्या पुलावरून पलीकडे जावयास निघाले. इतक्यात लोकाच्या गर्दींतून एक मोठा आवाज ऐकूं आला व धूरहि दिसू लागला. त्याच वेळीं एक फाटकेतुटके कपडे घातलेला तरुण हातातलें पिस्तुल टाकून देत आहे, व लोकाच्या गर्दींतून पळून जाऊं पहात आहे, असें दिसून आलें. इतक्यात गाडीवानानें आपल्या हातातील चाबकाचा फटकारा जोरानें त्याच्या पाठीवर ओढल्यामुळें तो तरूण तेथेंच थबकून उभा राहिला. इतक्यांत लेडरर नावाच्या एका नाटक्यानें त्याला पकडलें. लोकानीं त्याजसभोंवतीं गर्दी केली व त्याला मारण्यासाठीं पुष्कळानीं आपल्या काठ्या उचलल्या. तेव्हा प्रिन्स गाडींतून खालीं उतरले व लोकास दूर करून त्या तरुणास त्यानीं पोलिसच्या स्वाधीन केलें. गाडी चालू असता मध्येंच ती का उभी राहिली याचा उलगडा बराच वेळपर्यंत कोणास होईना. अखेरीस शेजारच्या एका खेड्यांतला एक क्याथोलिक धर्माधिकारी वाट आडवून उभा राहिला होता असें सिद्ध झालें. त्या संधीचा फायदा घेऊन कूलमन नांवाच्या एका तरुणानें प्रिन्स याजवर पिस्तुल झाडले. त्याच वेळीं लोकास सलाम करण्याकरता प्रिन्स यानीं हात वर केल्यामुळें पिस्तुलातली गोळी डोक्यात न शिरता ती हातात शिरली. प्रिन्स याची जखम फारशी खोल नव्हती. आपला डाव न साधल्यामुळें कूलमन अतिशय संतापला होता व आपल्या कोठडींत एकसारखी बडबड करीत होता.

घरीं येऊन हातास मलमपट्टी बाधल्यानंतर बिस्मार्क तुरुंगाच्या कोठडीकडे गेले व कूलमन यास त्यानीं काहीं प्रश्न केले. प्रिन्सच्या प्रश्नास हा तरुण फार उद्धटपणें उत्तरें देत होता. बिस्मार्कनीं त्यास

विचारलें, तू मला ओळखतोस काय ?' कूल्मन ह्मणाला, 'होय.' 'यापूर्वी तू मला पाहिलें होतेस काय ?' 'नाहीं.' 'मग तूं माझा जीव घेण्याचा यत्न का केलास ?' 'क्याथोलिक लोकाविरुद्ध तुह्मी कायदे पास केले ह्मणून. क्याथोलिक पक्षातर्फे तुह्मावर सूड उगवावा ह्मणून माझें कर्तव्य मीं केलें.'

वरील प्रकार घडल्यानंतर किसिंजेन गाव सोडण्याविषयीं कुटुंबांतील सर्व मंडळी बिस्मार्क यास फार आग्रह करूं लागली. पण या गावीं आल्यापासून बिस्मार्क याची प्रकृति चांगली सुधारूं लागल्यामुळें गाव सोडण्याचें त्यानीं नाकबूल केलें. आपल्या गावातून निघून जात नाहींत, हा मोठाच मान त्यानीं आपणास दिला, असें समजून गावच्या लोकानीं त्या दिवशीं एक मोठा मेळा काढला. ही मिरवणूक बिस्मार्क याच्या घरापाशीं आली तेव्हा बिस्मार्क यानीं पुढील संभाषण केलें.—

"ज्या गोष्टीचा निकाल अद्यापि कायद्यानें लागलेला नाही, तिचा उल्लेख प्रस्तुत प्रसंगीं करणें मला योग्य नाहीं तथापि मजवर जो हल्ला झाला, तो वैय्यक्तिक स्वरूपाचा नसून ज्या कार्यास मी स्वतःस वाहून घेतलें आहे, त्या कार्यावरच हा तडाका बसला, एवढें ह्मणावयास कांहीं हरकत दिसत नाही. सर्व जर्मन संस्थानाचें एकीकरण होऊन त्यांतील प्रजाजनांस शांतीचा व स्वातंत्र्याचा लाभ मिळावा, या एकाच कार्यास मी स्वतःला वाहून घेतलें आहे. या कार्यांत माझा अंत झाला असता तर त्यात कांहीं विशेष वाईट झालें असतें असें नाहीं. कारण याच कार्याच्या पूर्तीसाठी माझ्या हजारों देशबांधवास तीन वर्षांपूर्वी रणांगणावर आपल्या रक्ताची तिलांजली द्यावी लागली आहे. या प्रसंगीं माझा देहपात झाला असता तरीसुद्धां ज्या कार्यास मी सुरुवात केली आहे, ते थांबून राहिलें असतें असें नाही परमेश्वरानें कृपा केली ह्मणून मी या हल्लयातून सुखरूपपणें निभावलों. ज्या कार्यास मीं सुरवात केली आहे, तें कार्य संयुक्त जर्मनराष्ट्र दिवसेंदिवस अधिक उत्साहानें व अधिक पूर्णतेनें पार पाडील सात मला शंका नाहीं याकरिता संयुक्त जर्मनराष्ट्राच्या नावानें मी त्रिवार जयजय-

कार करतों व मजबरोबर तुह्मीहि तसाच जयघोष करावा अशी तुह्मास विनति करतों "

सर्व जर्मन संस्थानाचें एकीकरण होऊन त्याचें एक बलिष्ठ साम्राज्य बनावें हा विचार बिस्मार्क याच्या चित्तातून केव्हाहि गेलेला नव्हता. आजाराच्या वेदनानीं त्रास होत असता अथवा एकाद्या गळेकापूच्या हल्ल्यामुळें जखम होऊन मन उद्विग्न झालें असताहि जर्मन साम्राज्याचा विचार त्याच्या ठिकाणीं जागृत असे. आपल्या जीविताचें हेच अखेरचें साध्य होय, असें त्यास नित्य वाटत असे. शारीरिक वेदनानीं शरीर खंगत जात असताहि 'माझ्या देशाच्या सेवेंत मी देह झिजवून टाकीत आहें' असें ते ह्मणत.

त्याच्या हाताला झालेली जखम लवकरच भरून आली; तथापि मनगटातली कुसण मात्र पुष्कळ दिवस राहिली होती. व तीमुळें लिहि-ताना त्यास फार त्रास पडे. तारीख १२ आगष्ट रोजीं किसिंजेन येथून आपला मुक्काम हालवून बिस्मार्क सहकुटुंब व्हर्जिन येथें गेले.

वर्झबर्ग येथें कूलमन याचा खटला न्यायासनापुढें निघून त्यास चवदा वर्षे काळ्यापाण्याची शिक्षा झाली. पुढें तो कैदेंत असता इ. स. १८९२ साली वारला.

या वेळीं बिस्मार्क याच्या दोन्ही मुलाचा प्रवेश सरकारी नोकरींत झाला होता. वडील मुलगा कौंट हर्बर्ट हा म्यूनिच येथील जर्मन वकि-लातींत शिरला. व धाकटा वुइलियम यास स्का येथील न्यायकचेरींत नोकरी मिळाली.

यानंतर झालेल्या पार्लमेंटाच्या बैठकींत या खुनाच्या प्रयत्नाबद्दल बरीच भवतिनभवति झाली. या प्रयत्नास खुद्द बिस्मार्क हेच कारण आहेत, असें क्याथोलिकपक्षाच्या सभासदानें ह्मटलें. एक सभासद

ह्मणाला, "एका अर्धवट वेडयानें केलेल्या कृत्यामुळें पुष्कळ जर्मन सभासदास उगीच हींव भरलें आहे." यावर उत्तर देताना बिस्मार्क ह्मणाले,

'कूल्मनशी आमच्या प्रतिपक्षीयांचा कांहीं संबंध नाहीं, असें दाखविण्यास ते इतके उतावीळ कां झाले आहेत, यातील मतलब मला समजतो 'या प्रधानाला कांहीं अपघात झाला असता, तर किती बरें झालें असतें' असे विचार-सुद्धां या मंडळीच्या चित्तास कधीं शिवले नाहींत, याबद्दल माझी पूर्ण खात्री आहे. पण कूल्मनला तुह्मी कितीही झिडकारून दिलें तरी पुन्हा पुन्हा तुमच्या कमरेला तो विळखा घालतोच क्याथोलिक पक्षासाठीं आपण हें कृत्य केलें, असें तो ह्मणतो. क्याथोलिक पक्ष माझा आहे, असें तो निक्षून सांगतो. 'माझी कोणत्या प्रकारची माहिती तुला नसता, माझा खून करण्याची इच्छा तुला कां झाली?' असा प्रश्न तुरुंगात त्याला मी केला, तेव्हां त्यानें उत्तर दिलें 'क्याथोलिक धर्माविरुद्ध तुह्मी कायदे पास केले ह्मणून' 'अशानें तुमचें हित कसें साधेल?' असा प्रश्न मी त्याला विचारला, तेव्हा तो ह्मणाला, 'आमच्या पक्षाचें अहित आधींच तुह्मी इतकें करून ठेवलें आहे कीं, तुमचा खून झाला तर त्याहून अधिक कांहीं अहित होईल, असा संभवच नाहीं. तुह्मी माझ्या पक्षाचा अपमान केला आहे.' 'तुझा पक्ष कोणता?' असें विचारता तो ह्मणाला, 'पार्लमेंटातील सेंटर पक्ष' (हशा सेन्टर पक्षांतून शेम शेम असा ध्वनी) सभ्य गृहस्थ हो, (सेन्टरकडे वळून) तुह्मी कूल्मनला झुगारून देण्याची कितीहि खटपट केली, तरी तो पुन्हां तुह्माला चिकटतोच"

सेन्टर किंवा क्याथोलिक पक्षावर बिस्मार्क यांनीं एवढ्या निकराचा हल्ला केला, तेव्हा तो पक्ष बिस्मार्क याजविरुद्ध भडकून गेला यांत नवल नाहीं. त्या पक्षाच्या या रागांत भर पडण्यास आणखी एक कारण झालें. हर बेसेलर या नांवाचा बिस्मार्क याचा एक प्रतिस्पर्धी होता. खुनाच्या प्रयत्नाचा सारा बोजा बेसेलर यानेंहि क्याथोलिक पक्षावर लादून, अशा प्रयत्नामुळें बिस्मार्क याचा मान द्विगुणित झाला आहे, व त्यामुळें जर्मन साम्राज्याचा पायाहि अधिक दृढ झाला आहे, असें बेसेलर ह्मणाला.

बिस्मार्क यांच्या प्रतिपक्षीयाकडून असे शब्द निघाल्यामुळें क्याथोलिक पक्षास अधिकच राग आला.

या प्रसंगीं कराव्या लागलेल्या पार्लमेंटाच्या कामाच्या बोजामुळें बिस्मार्क याची प्रकृति पुन्हां बिघडली. कित्येक वेळा त्यांस बहुतेक सारी रात्र काम करावें लागे. या वेळासबंधीं ते स्वत. लिहितात,

"मध्यरात्रीची स्तब्धता मला अगदी भेसूर वाटते. माझ्या अंत:करणांतील सारे भयप्रद विचार या वेळीं खडबडून जागे होतात. असल्या विचाराच्या यातनेंतून सुटण्यासाठीं मी कांहींतरी लिहीत अथवा वाचीत बसतों. दुसऱ्या दिवशीं माझे प्रतिपक्षि कोणत्या मुद्यावर भाषण करतील, हें चित्तात आणून त्याचीं उत्तरें मी तयार करतों. तथापि दुसऱ्या दिवशीं त्याचा कांहींच उपयोग होत नाहीं, असें मला आढळून आलें आहे. व्यवहारी लोकांना समजेल अशा रीतीनें पार्लमेंटांत बोलावें लागतें. सूक्ष्म विद्वत्तेचा उपयोग त्या ठिकाणीं कांहीं होत नाहीं. यामुळें रात्रभर जागून खर्च केलेली शाई आणि कागद हीं मात्र फुकट जातात. पहांटे पक्षांचे शब्द ऐकू येईपर्यंत कित्येक वेळां मीं आंथरुणाला पाठ लावली नाहीं."

यानंतर पार्लमेंटची बैठक लवकरच बरखास्त झाली. ती बरखास्त होण्याच्या वेळीं बिस्मार्क याची कारकीर्द यशस्वी झाली, अशा अर्थाचा ठराव सभेपुढें आला, तेव्हा तो पास होऊं नये ह्मणून क्याथोलिक पक्षानें पुष्कळ अट्टहास केला; पण त्याचा कांहीं उपयोग न होता तो मोठ्या बहुमतानें पास झाला.

---

## प्रकरण अठरावें.

# देशसेवा.

राज्यशकटाची धुरा क्षणभर बाजूस ठेवून पार्लमेंटांतील चार मित्रमंडळीस सकाळीं बीर घेण्याकरता बिस्मार्क आपल्या घरीं बोलावीत

असत. सोशल डेमोक्रयाट पक्षाशिवाय बहुधा बाकीच्या सर्व पक्षीयास या उपहाराकरता ते आमंत्रण देत असत व बरींच मंडळी या वेळीं हजर राहून त्या वेळीं नानाप्रकारच्या राजकीय विषयावर तेथें गप्पागोष्टी चालत. एके वेळीं क्याथोलिक पक्षाचे पुढारी डॉ. वुइन्ड्थार्स्ट हे हजर होते. सकाळच्या प्रहरीं बीर पिणें चागलें कीं नाहीं, याच विषयावर वाद सुरू झाला. ही गोष्ट चागली नाहीं, अशा अर्थाचें एक भाषण पार्लमेंटांत त्यानीं नुकतेंच केलें होतें. या वेळीं बिस्मार्क यानीं त्यास उत्तर देऊन ह्मटलें की, 'या बाबतींत तुह्मी पराचा कावळा करीत आहा. स्नेह्याच्या नात्यानें चार मडळी जमून बीर घेता घेतां एकाद्या विषयावर चर्चा होऊ लागली, तर अशा वेळीं ती अधिक शांत डोक्यानें होते, असा माझा अनुभव आहे.' इतर सभासदानींहि बिस्मार्क याच्या या ह्मणण्यास मान डोलाविली. दुसऱ्या दिवशीं मडळी पुन्हा जमली, तेव्हा वुइन्डथार्स्ट यानीं हाच विषय पुन्हां काढून आपल्या मताचें समर्थन ते जोरानें करूं लागले. त्याचें भाषण सुरू आहे तोंच रोस्टाक येथील विद्यार्थ्यांकडून आलेली तार त्याच्या हातीं पडली. 'तुमचें आयुरारोग्य चिंतून एकेक मोठा ग्लास बीर आह्मी घेतों,' असा मजकूर त्या तारेंत होता. हा मजकूर बाकीच्या मंडळीस समजला, तेव्हां तेथें एकच हंशा पिकला. वुइन्डथार्स्ट यानींहि 'तुमच्या नावानें मीहि एक ग्लास घेतों' असें त्या विद्यार्थ्यांना उत्तर पाठविलें.

अशाच प्रकारच्या दुसऱ्या एका सभेच्या वेळीं बिस्मार्क याची पत्नी, त्याची बहिण व भाची इतकी मडळी हजर होती. त्या भोजनप्रसगीं एकीकडे पदार्थांच्या बऱ्यावाईटपणाबद्दल चर्चा चाले व लगेच तो विषय बदलून वसाहतींच्या धोरणाबद्दलहि वादविवाद होई. या वेळीं बोलताना बिस्मार्क ह्मणाले, "वसाहतींचें धोरण ठरविण्याचें काम मोठे सेनापति

अथवा मुत्सद्दी याचें नसून तें खरोखर व्यापारी लोकाच्या कारकुनांचें आहे. ”

अशा प्रकारच्या भोजनप्रसगाचा उपयोग राजकीय दृष्ट्या फारसा झाला नसला, तरी अशा प्रसंगामुळे पार्लमेंटांतील सभासदाची परस्परांविषयीं सहानुभूति वाढली यात मात्र शका नाहीं. सभास्थानात जी मत्सरबुद्धि दृष्टीस पडे, ती अशा प्रसंगामुळें कमी झाली व सर्व प्रकारच्या पक्षात हळू हळू सलोखा उत्पन्न झाला. कालेंकरून या नानाविध पक्षाचीं वैमनस्यें बहुतेक नाहींशी होऊन पार्लमेंट म्हणजे एका गमतीच्या वादविवादाचा आखाडा झाला; तथापि ही स्थिति फार काळ टिकली, असें मात्र म्हणवत नाहीं. इ. स. १८७५ च्या आरंभींच एका नव्या वादळास सुरुवात झाली. धर्मगुरू पोप यानीं ता. ५ फेब्रुआरी रोजीं जर्मनींतील सर्व बिशपास एक पत्र लिहिलें, ‘प्रशियात नुकतेच जे कायदे पास झाले आहेत, त्यामुळें धर्माच्या बाबींतील सर्व शिस्त लयास जाऊं पहात आहे. ज्या सनदानीं धर्माध्यक्षाचे अधिकार आजपर्यंत चालत आले, त्या सनदा फुकट होऊं पहात आहेत. आणि ज्या अर्थीं हे कायदे ईश्वरी संस्थेच्या विरुद्ध आहेत, त्याअर्थीं त्यांची अम्मलबजावणी होणें योग्य नाहीं, असा मजकूर त्या पत्रात होता. रोम येथून होणारी ही निष्कारण ढवळाढवळ बद करण्याकरता प्रशियन सरकारानेंहि तावडतोब उपाय योजना केली. ज्या वर्तमानपत्रकारानीं हें पत्र छापलें होतें, त्याचीं पत्रें जप्त करण्यात आलीं व सरकारनें त्याजवर खटले केले. लग्ननोंदणीचा कायदा दुसऱ्या दिवशीं पास झाला. या वेळीं झालेल्या वादविवादात बिस्मार्क ह्मणाले, “आह्मी पोपच्या हुकुमाप्रमाणें चालावें कीं आमच्या राजाच्या हुकुमाप्रमाणें चालावें हा एकच महत्वाचा मुद्दा या बाबींत आहे. परमेश्वराचें सहाय्य घेऊन राजा आणि पितृभूमि याच्या बऱ्यासाठीं आह्मी भाडत आहों.”

इ० स० १८७५ च्या उन्हाळ्यांत जर्मन वर्तमानपत्रात फ्रान्स-संबधीं बरेच लेख येऊं लागले. जर्मनीवर स्वारी करण्याचा फ्रान्सचा इरादा असून आपले नुकसान होऊ नये याकरतां शक्य ती अगाऊ तजवीज जर्मनीनें करणें अवश्य आहे, अशी ओरड या पत्रांनी चालविली. या पत्राशीं बिस्मार्क याचा केव्हां केव्हा संबध येत असे, ही गोष्ट पुष्कळांस ठाऊक होती. यामुळें फ्रान्सबरोबर पुन्हा एक वार युद्ध करण्याची बिस्मार्क याची इच्छा आहे, अशा बातम्या चोहोंकडे पसरू लागल्या. "युद्ध करण्याची प्रबळ इच्छा फ्रान्सला एकादे दिवशीं होईल व अशा प्रसंगीं आपलें पाऊल आधीच पुढें पडलें पाहिजे" असें मत फील्ड मार्शल कौंट मोल्टके यानीं स्पष्टपणें जाहीर केल्यामुळे युद्धाच्या बातमीस बरीच पुष्टी मिळाली. बिस्मार्क याच्या सर्व कार्यक्रमाचा विपर्यास करण्याचें काम रशियाचे मुख्य प्रधान प्रिन्स गॉर्टश कॉफ यानीं कसून चालविलें होतें. बर्लिन येथील रशियाचे वकील यांचें दरबारी लोकात चागलें वजन असे. त्याचप्रमाणें राणी आगस्ता हीसुद्धा रशियन वकिलाशीं मित्रत्वानें वागत असे. फ्रेंच वकील गॉन्टाड बायरन याचें मात्र बिस्मार्क यांजपाशीं सूत नव्हतें. बिस्मार्क याना हा प्रसंग मोठ्या अडचणींचा होता. जर्मनीचें युद्धमंडळ बिस्मार्क यांच्या विरुद्ध होतें. बिस्मार्क याचें शाततेचें धोरण या युद्धमंडळास पसत नव्हतें. दुसऱ्या पक्षीं रशियन प्रधान व फ्रेंच वकील ही मंडळीसुद्धां आतां त्यांच्या विरुद्ध झाली. या मडळीला राणीचें व पार्लमेंटातील सेन्टर पक्षाचें पाठबळ होतें.

मे महिन्यात बिस्मार्क व गॉर्टशकॉफ याची भेट झाली तेव्हा बिस्मार्क त्याला ह्मणाले, "आमच्या मित्राशीं आह्मी जितक्या दिल्दारपणें वागतों तितकेच आमच्या शत्रूंशीं आह्मीं कडकपणें वागतों, हें मी आपणास

मोकळ्या मनानें सांगतों." या सूचनेंतील गर्भितार्थ त्या रशियन मुत्सद्याच्या लक्षात आल्यावाचून राहिला नाही.

फिलाडेलफिया येथील एका सार्वजनिक संस्थेनें एक हातीं धरावयाची काठी बिस्मार्क यास नजर केली. इ. स. १७७६ सालीं फिलाडेलफिया येथें स्वातंत्र्याची इमारत ह्मणून जी इमारत बांधली गेली होती, तिच्या एका खांबातून ही काठी बनविली होती. तिचा स्वीकार करून बिस्मार्क यांनीं तारीख ४ जुलई इ. स. १८७५ रोजी एक आभारप्रदर्शकपत्र फिलाडेलफियाला पाठविलें. त्यात पुढील मजकूर होता.

"माझ्या वृद्धापकाळीं टेंकावयास उपयोगी पडावी ह्मणून एक काठी तुह्मी मोठ्या मेहेरबानीनें पाठविली. ९९ वर्षांपूर्वीं ज्या इमारतीच्या गोपुरांतून अमेरिकेचें स्वातंत्र्य पुकारलें गेलें, त्या इमारतीच्या खांबापासून ही काठी बनविली आहे, या ऐतिहासिक स्मारकाबद्दल मी तुमचा फार फार आभारी आहें. ही काठी मी फार जपून ठेवीन व ऐतिहासिक प्रसंगाची आठवण ह्मणून माझ्या वंशजांपाशीं ती रहावी याबद्दल मी योग्य काळजी घेईन."


पारीसमध्यें जर्मन वकील आर्निम यांनीं जो घोंटाळा उपस्थित केला होता, तशाप्रकारचा घोंटाळा उपस्थित करण्यास पुन्हा कोणास सवड सांपडूं नये अशासाठीं एक कायदा करण्याच्या उद्योगास बिस्मार्क लागले. कोणाहि मुत्सद्याच्या हाताखालील माणसें त्याच्याशीं एकजुटीनें वागत असल्याशिवाय राज्यकारभाराचा गाडा सुरळीत चालणें अशक्य आहे, असें ते ह्मणाले. सेनापतीच्या हाताखालील शिपाई हुकूम होण्याबरोबर ज्याप्रमाणें त्याची अम्मलबजावणी करण्यास सिद्ध असतात, त्याचप्रमाणें दुय्यम मुत्सद्यानींहि वरिष्ठांच्या हुकुमाची अम्मलबजावणी केली पाहिजे. कौंट आर्निम हे आतां नोकरींतून वजा झाले होते; तथापि

' प्रोनिहिलो ' नावाचें एक चोपडें प्रसिद्ध करून त्यांत बिस्मार्क याची बरीचशी नालस्ती केली होती. स्वतःच्या कृत्याचें समर्थन करणें व त्यांतच मुख्य प्रधानावर चिखल उडविणें असें आर्निम याचे दोन हेतू होते; तथापि यातील त्याचा एकहि हेतु सिद्धीस गेला नाहीं. या त्याच्या कृत्याबद्दल त्याजवर फिर्याद करण्यास बादशाहानीं मजुरी देऊं नये अशी खटपट पुष्कळांनीं करून पाहिली; पण बादशाहानीं अखेरीस फिर्यादीस रुकार दिलाच. या खटल्याचा निकाल आर्निम याच्या विरुद्ध होऊन त्यात त्यास पाच वर्षे काळ्यापाण्याची शिक्षा झाली.

बिस्मार्क याचा एक कट्टा शत्रू अशा रीतीनें नाहींसा झाला हें खरें; पण त्याजवरील वर्तमानपत्राचे हल्ले बंद होईनात. विशेषतः त्यानींच प्रथम सुरू केलेल्या क्रूझ झीटंग पत्रानें तर त्याजवर अतिशय कडक टीकेचा भडिमार सुरू केला. ज्या कन्सरवेटीव पक्षातर्फे बिस्मार्क यानीं मोठी कामगिरी बजावली होती, तो पक्ष आता त्याजवर उलटला. त्याचे पूर्वीचे पक्के मित्रहि कट्टे शत्रू झाले. अशाप्रकारें अनेक शत्रूंचा त्यांजविरुद्ध उद्योग चालू असताहि बिस्मार्क यानीं देशकल्याणाच्या उद्योगात खळ पडूं दिला नाहीं. जर्मनींतील सर्व रेल रस्ते सरकारच्या ताब्यात घेण्याचा उद्योग त्यानीं केला. यामुळें राष्ट्राचा व त्याचप्रमाणें सरकारचाहि पुष्कळ फायदा झाला. या बाबींतहि त्याच्या शत्रूंनीं त्याची पाठ पुरविली. अशाप्रकारें अनेक रेलरस्ते एकाच चालकाच्या ताब्यात आणणें अनिष्ट आहे, असें याचे शत्रू ह्मणूं लागले.

इ. स. १८७७ सालच्या उन्हाळ्यात आपलें काम सोडण्याची परवानगी त्यानीं बादशाहापाशीं मागितली. त्याचें काम त्यास आता बरेंच अवघड वाटूं लागलें होतें. कारण पार्लमेंटात त्यास पुष्कळ शत्रू होतेच. याशिवाय खुद्द प्रधानमंडळातहि काहीं मुत्सद्दी त्याच्या विरुद्ध होते. हे

वा दू ३६३/२
१८-७-१८



राजे पहिले वुइलियम. जर्मन साम्राज्याचे पहिले बादशहा.

मुत्सद्दीहि बिस्मार्क यांजविरुद्ध खटपटी करीत. आरमारी खात्याचे प्रधान जनरल फॉं स्टोश यानीं आपल्या खात्याकरितां कांहीं पैशाची मागणी केली. ही मागणी बिस्मार्क यांस पसंत नव्हती. बिस्मार्क यांच्या मनांतून आरमार बरेंच वाढवावयाचें होतें. तेव्हा त्यासाठीं सभेपुढें एक नवें बिल माडून त्यानीं बऱ्याच मोठ्या खर्चाची मंजुरी सभेकडून मिळविली. मुख्य प्रधानाचें हें कृत्य जनरल स्टोश यास पसंत पडलें नाहीं. यांत बिस्मार्क यांनीं आपला अपमान केला, असें त्यास वाटलें, तेव्हां आपली जागा सोडण्याची परवानगी जनरल स्टोश यानींहि बादशाहाकडे मागितली. बादशाहानीं परवानगी दिली नाहीं, तेव्हा ते आपल्या जागेवर तसेच कायम राहिले. प्रधानमंडळातील दुसऱ्या कांहीं लोकांचें व बिस्मार्क याचें सगनमत कराच्या बाबतींत होईना. अशा प्रकारच्या कारणांनीं मुख्य प्रधानाचें काम यापुढें सुरळीत चालविणें शक्य नाहीं असें बिस्मार्क यास वाटलें.

यानंतर बिस्मार्क याचा वाढदिवस लवकरच आला. तेव्हां युवराज व बेडनचे ग्रँड ड्युक यानाबरोबर घेऊन बादशहा त्यांस भेटावयास गेले. या प्रसगींहि या राजीनाम्याच्या बाबतींत तेथें थोडा खल झाला. यानंतर एका आठवड्यानें बिस्मार्क याच्या अर्जावर 'साफ नामंजुर' एवढाच शेरा लिहून तो बिस्मार्क याजकडे बादशाहानीं परत पाठविला व अशारीतीनें या राजीनाम्याची बोळवण झाली.

रशिया व तुर्कस्थान यांजमध्यें कांहीं कारणानें बेबनाव झाला होता व आतां हें प्रकरण विकोपास जाण्याच्या रंगास लागलें होतें. या दोन देशांत युद्ध झालें, तर युरोपांत नवे नवे घोटाळे बरेच उपस्थित होण्याचा संभव होता. अशा प्रकारें युरोपच्या राजकीय वातावरणात बरेच महत्वाचे फेरफार घडून येण्याचा संभव असतां अशाप्रसंगीं बिस्मार्क

याचा राजीनामा बादशहा कधींहि मंजूर करणार नाहींत, असें फ्रेंचास-सुद्धा वाटत होतें. बिस्मार्क याच्या राजीनाम्याला जर्मनराष्ट्रानेंहि पसंती दिली नसती. त्याचप्रमाणें बादशाहा व प्रिन्स बिस्मार्क याजमधील खाजगी संबंधहि आता अशा प्रकारचा झाला होता, कीं बादशाहानीं त्याचा राजीनामा मंजूर करणें शक्यच नव्हतें. जें साम्राज्य निर्माण करण्याचे कामीं बिस्मार्क याचा बिनमोल उपयोग झाला होता, त्या राष्ट्राच्या भावी कल्याणाकरता प्रधानपद बिस्मार्क याजकडेच राहूं देणें इष्ट होतें, अशीहि बादशाहाची खात्री झाली होती. याच वेळीं त्याचा मुलगा हर्बर्ट बिस्मार्क याची नेमणूक त्याच्या हाताखालीं झाली व यामुळें त्याजवरील कामाचा बोजा बराच हलका झाला. एकदर प्रधानमंडळा-तहि जुनीं माणसें जाऊन बिस्मार्क याच्या तर्फेचीं नवी माणसें तेथे आलीं.

विश्रांतीसाठीं बिस्मार्क फ्रेड्रिकश्रू येथें सुमारें दहा महिने राहिले होते. बिस्मार्क याचे हें वतन लायनबर्गच्या जहागिरीच्या हद्दीमध्यें आहे. श्लेश्वीग हॉलस्टीन प्रांताबरोबरच लायनबर्गची जहागीर पूर्वीं डेनमार्कच्या ताब्यांत होती. हे प्रांत जर्मनीस मिळाले, तेव्हा त्याबरोबर लायनबर्गची जहागी-रहि प्रशियाच्या ताब्यात आली. इ. स. १८७६ सालीं ती प्रशियाच्या राज्यास जोडली गेली. लायनबर्गचा कारभार बिस्मार्क याच्या हातीं होता, तेव्हा सुमारें सात आठ लाखांचा मुलुख प्रशियाच्या राजास त्यानीं देऊ केला. ही देणगी राजानें कबूल करून इ. स. १८७१ च्या मे महिन्यांत तो मुलुख प्रशियाच्या राज्यास जोडला; पण पुढें लव-करच तोच मुलुख बिस्मार्क याच्या श्रमाचें पारितोषिक ह्मणून राजा-कडून त्यास बक्षीस मिळाला. हें वतन सॅक्सन अरण्याच्या जवळ असून त्याचें वार्षिक उत्पन्न सुमारें पाऊण लाख रुपये आहे.

काहीं काळ या सॅक्सन अरण्यात घालविल्यानंतर बिस्मार्क किसिनजेन येथें गेले; तथापि तेथें त्यास फार दिवस राहता आलें नाहीं. कारण इकडे राजधानींत एक दोन विलक्षण प्रसंग घडून आले. त्यामुळें त्यास राजधानींत ताबडतोब येणें भाग पडलें. सुप्रसिद्ध अंटरडेन लिंडन रस्त्यावरून बादशाहाची स्वारी जात असता तारीख ११ मे सन १८७८ रोजीं होडेल नावाच्या एका इसमानें त्याजवर पिस्तुल झाडलें. हा मनुष्य आपणास सोशल डेमोक्र्याट पक्षाचा ह्मणवीत असे. या पक्षाचीं तत्वें भयंकर असून त्याच्या प्रतिकाराची तजवीज मुळींच केली नाहीं, तर पुढें मागें त्याच्याकडून घातकी वर्तन झाल्यावाचून राहणार नाहीं, असें भविष्य बिस्मार्क यानीं अगोदरच वर्तविलें होतें. पण त्यावेळीं पार्लमेंटानें त्याच्या ह्मणण्याकडे लक्ष दिलें नाहीं. अखेरीस वरील कृत्य घडून आल्यानंतर दोनच दिवसानीं एक नव्या कायद्याचा मसुदा बिस्मार्क यांनीं पार्लमेंटपुढें आणला. तथापि यावेळींहि या कायद्याच्या आवश्यकतेबद्दल सभासदाची खात्री न झाल्यामुळें हा मसुदा कायद्याच्या स्वरूपापर्यंत पोहोंचला नाही. पुढें तारीख २ जून रोजीं डॉक्टर नोबिलिंग नावाच्या इसमानें बादशाहावर पुन्हा पिस्तुल झाडलें. बादशाहा आपल्या मुलीसह गाडींतून जात असता पूर्वींच्याच ठिकाणीं त्याजवर नोबिलिंग यानें पिस्तुल झाडलें. या वेळीं बादशाहास बरीच जबर जखम झाली. इतकी कीं, राजप्रतिनिधि ह्मणून युवराजाची नेमणुक काहीं दिवस त्याच्या जागीं करावी लागली. बादशाहास जखम झाली आहे, ही बातमी कळताच बिस्मार्क स्वतः आजारी असतांहि तसेच उठून राजाच्या भेटीला गेले. बादशाहांच्या जखमेंतून या वेळींहि रक्तस्राव होत होता.

सोशल डेमोक्र्याट पक्षाविरुद्ध कोणताहि कायदा पसार होऊं द्यावयाचा नाहीं, असा निश्चय जणूं काय पार्लमेंटनें केला होता. तेव्हा

बिस्मार्क यांनीं ही बैठक प्रथम ताबडतोब बरखास्त केली व पुढें जी नवी निवडणूक झाली, तींत सरकारपक्षाचें मताधिक्य होऊन सोशल डेमोक्रयाट पक्षाविरुद्ध कडक कायदे ताबडतोब पास झाले.

अशाप्रकारें खुद्द जर्मन साम्राज्यांत फाटाफुट व असंतोष पसरला असताहि साम्राज्याची भरभराट कायम होती. युरोपभर जर्मनसाम्राज्याचें वजन व दरारा हीं वाढत जात होतीं. जर्मनीच्या नांवाला सर्वत्र मान मिळूं लागला होता व बर्लिन हें युरोपांतील मोठ्या महत्त्वाच्या चळवळींचें केंद्रस्थान होऊ लागलें होतें. रशिया आणि तुर्कस्थान याजमधील युद्ध इ. स. १८७८ सालीं संपल्यानंतर सर्व प्रमुख मुत्सद्यांची एक मोठी सभा युरोप व आशिया यामधील गुतागुंतीचे प्रश्न सोडविण्यासाठीं बर्लिनमध्यें भरली. रशियाच्या हांवरेपणास या सभेच्या द्वारें आळा घालावा, असा बिस्मार्क याचा हेतु होता. ते ह्मणाले, "अजीर्ण होईल, इतका प्रदेश रशियानें गिळंकृत केला आहे, तेव्हा या सभेनें त्याला कांहीं उतारा देणें भाग आहे. रशियापासून युरोपातील इतर राष्ट्रांना उपसर्ग न पोहोंचेल अशी तजवीज करणें भाग आहे."

बर्लिन कांग्रेसमध्ये आपण कोणतें धोरण ठेवणार, याचा खुलासा बिस्मार्क यानीं इ. स. १८७८ च्या जानेवारी महिन्यात जर्मनपार्लमेंटात केला होता.

निरनिराळ्या मतांच्या लोकात सख्य घडवून आणण्याच्या हेतूनें मध्यस्थी पत्करून जर्मन साम्राज्याचें बळ अशा रीतीनें खर्ची घालण्यांत शांतता राखण्याच्या कार्यास काहीं मदत होईल, असें मला वाटत नाहीं. हें कार्य शक्तीच्या जोरावर नव्हे, तर अधिक गोडीगुलाबीनेंच पार पडण्यासारखें आहे. कांहीं तरी सवदा झालाच पाहिजे, या इच्छेनें एकादा दलाल ज्या पद्धतीनें काम करतो, ती पद्धत अशा प्रसंगीं अधिक इष्ट आहे. गेली शभर वर्षें रशिया आपल्याशीं मैत्रीनें वागत आहे. आपल्या अडचणीच्या वेळींहि रशियानें आप-

शास पाठिंबा दिला. युरोपच्या कारभारात न्यायाधिशाचें काम आपण पत्करलें तर रशियाच्या स्नेहसंबधास बाध येण्याचा संभव आहे. पिढयान् पिढया चालत आलेल्या स्नेहसंबधाचा बळी अशी रीतीनें देण्यास आह्मी तयार नाहीं."

आस्ट्रियाशीं आपले स्नेहसंबंध कशाप्रकारचे आहेत ? या प्रश्नाला उत्तर देताना ते ह्मणाले,

"आस्ट्रियाशीं आमचे संबंध परस्पर सवलतीचे, परस्पर विश्वासाचे आणि पूर्णपणें खुल्या दिलाचे आहेत. कोणताहि प्रश्न उपस्थित झाला असता कौन्ट अन्ड्रेसी ( आस्ट्रियन प्रधान ) हे अगदीं मोकळेपणानें माझ्याशीं वाटाघाट करतात. त्याचा व माझा खाजगी स्नेहसंबध इतका पक्का आहे, हें सांगण्यास मला फार संतोष वाटतो. आस्ट्रियाच्या हितसंबधात कोणतेहि प्रश्न त्यानीं मला विचारले, तरी मी त्याना खरा जबाब देईन अशी त्याची पक्की खात्री आहे. त्याचा जसा मजवर विश्वास आहे, तसाच माझाहि त्यांच्यावर पूर्ण विश्वास आहे."

बिस्मार्क हे ह्यालिन्याड किंवा मेटरनिकप्रमाणें चाणक्यनीतीचे भक्त होते, असे ह्मणणारास वरील विधानात चोख उत्तर मिळतें. त्याचें राजनीतीचें धोरण कुटिलनीतीच्या तत्वांस अनुसरून नव्हतें, हें यावरून कोणासहि दिसून येण्यासारखें आहे. जर्मनीच्या या वज्रबाहु प्रधानानें जीं अनेक महत्कार्यें केलीं त्यातच आस्ट्रियाशीं त्यांनीं पक्का स्नेहसंबंध जोडला, हेंहि एक त्याचें प्रमुख व महत्वाचें कार्य होय. कारण यामुळेंच पुढे पुष्कळ वर्षेंपर्यंत युरोपची शांतता त्यांस कायम ठेवता आली.

बर्लिन येथें भरलेल्या कांग्रेसचें काम सुमारें एक महिन्याच्या अवधींत पुरें झालें. विचाराकरता तिजपुढें आलेल्या सर्व भानगडीसंबंधीं तेथें पूर्ण खल झाला. या बैठकींतहि बिस्मार्क यांनीं चांगल्या तडजोडी करून "प्रामाणिक दलाल" ही एक नवी पदवी संपादन केली; तथापि रशियन प्रधान प्रिन्स गॉर्टशाकाफ हे थोडेसे नाखुष झालेच.

रशियाच्या हितसबंधास कोणताहि धक्का पोहोंचणार नाहीं, अशी तजवीज बिस्मार्क यानीं केली होतीच; पण हें कार्य आपल्या हातून न होतां बिस्मार्क याच्या हातून झालें, एवढ्याबद्दलच त्यास वाईट वाटलें. काँग्रेसच्या एकदर कार्याचा समारोप करताना कौंट ॲन्ड्रेसी ह्मणाले,

"अनेक भानगडीच्या प्रश्नासबधी या बैठकींत आपणा सर्वांची एकवाक्यता झाली. ज्या धुरधर मुत्सद्याच्या नेतृत्वाखालीं हा सुपरिणाम घडून आला, त्याची आठवण या प्रसगीं करणें अत्यत इष्ट आहे. शाततेचा भग होऊं नये एतदर्थ त्यानें मनापासून खटपट केली आहे. जेव्हा जेव्हां मतभेद दिसून येईल, तेव्हा तेव्हा देवाण घेवाण करून त्यानें पक्षभेद मोडून टाकले युरोपातील अस्थिरता त्यानें आज अशा रीतीनें नाहींशी केली आहे. त्याच्या शहाणपणानें आणि अविरत परिश्रमानें आपलें कार्य इतक्या लवकर पार पडलें, हें आपण विसरता कामा नये याकरता प्रिन्स बिस्मार्क यांचे मनापासून आभार मानण्याची जी सूचना मी सभेपुढें माडीत आहे, तिला आपण एकमतानें अनुमोदन द्याल, अशी माझी खात्री आहे."

या बैठकीकरता युरोपातील सर्व प्रमुखपत्राचे बातमीदार बर्लिनला आले होते. त्यांनीं या बैठकीसंबंधीं मनोरंजक अशा बारिकसारिक हकीकतीसुद्धा खुलासेवार प्रसिद्ध केल्या होत्या. इंग्लडातून आलेले प्रतिनिधि लॉर्ड बिकन्सफील्ड याजबद्दल बिस्मार्क यानीं दाखविलेला पूर्ण आदरभाव, फ्रेंच वकील व्याडिंगटन यांशीं बिस्मार्क याचें सलोख्याचें वर्तन, प्रिन्स गॉर्टशकॉफ यानीं केलेलें मत्सरबुद्धीचें प्रदर्शन वगैरे गोष्टींच्या मनोरजक हकीकती वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाल्या होत्या.

रशियाचे हितसबध या बैठकींत सुरक्षित राखले गेले, ही गोष्ट खरी; तथापि 'माझ्या साऱ्या आयुष्यक्रमात इतका अंधकारमय दिवस दुसरा उगवला नव्हता असे उद्गार गॉर्टशकॉफ यानीं काढले. राजनीतींत साऱ्या युरोपात आपण श्रेष्ठ आहों, असा अभिमान त्यांस होता; पण

या बैठकींत बिस्मार्क याची बोलबाला सर्वत्र झाल्यामुळें त्याच्या या अभिमानास जबर धक्का बसला.

याच वर्षीं पोप नववे पायस हे ख्रिस्त लोकवासी होऊन तेरावे लिथो धर्मगुरूच्या सिंहासनावर आरूढ झाले. यानीं धर्माच्या बाबतींत आपलें धोरण सलोख्याचें व तडजोडीचें ठेवल्यामुळें धर्मखातें आणि सरकार याजमध्यें जें वितुष्ट जर्मनींत पडलें होतें, ते नष्ट होण्याच्या ओघास लागलें.

इ. स. १८७९ सालीं फडणिसीच्या व कराच्या बाबतींत बिस्मार्क यानीं बरीच सुधारणा केली. या बाबतींतहि पार्लमेंटांतील त्याच्या शत्रूनीं त्याच्या मार्गांत अडथळे आणण्याचा बराच यत्न केला. याच वर्षीं आस्ट्रियाशीं प्रथम एक व्यापारविषयक तह झाला, व त्याच्या मागोमाग आणखी एक नवा तह होऊन अडचणीच्या प्रसंगीं आस्ट्रिया व जर्मनी यानीं परस्परास सहाय्य करावें असें ठरलें. याच वर्षी फेब्रुआरीच्या २३ व्या तारखेस फील्ड मार्शल फा रून याचा मृत्यु ही विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट घडली. जर्मनसाम्राज्याच्या घटनेच्या बाबतींत रून याचा उपयोग प्रशियाला केवढा झाला होता, हें बिस्मार्क यास पक्कें ठाऊक होतें. यामुळें या प्रसंगीं बिस्मार्क यांस अतोनात दुःख झालें, हें निराळें सांगावयास नको. या वेळीं बिस्मार्क याची प्रकृति फारशी चांगली नव्हती; तथापि बादशहा आणि महाराणी यांच्या लग्नाच्या जुबिलीला ते हजर राहिले होते. इ. स. १८७४ सालीं खड्या लष्करासंबधाच्या प्रश्नाची भवतीनभवती होऊन सात वर्षांच्या मुदतीनें लष्करी संख्याबळ कायम करण्यांत आलें.

या कायद्याप्रमाणें जर्मनीचें शांततेच्या वेळचें लष्करी बळ २७००० नीं वाढलें. साम्राज्याच्या खानेसुमारीप्रमाणें पाहता इतकी वाढ होणें

योग्यच होतें. पार्लमेंटनें हा कायदा पास केला; पण क्याथोलिक पक्षापैकीं एकाहि सभासदानें त्याला अनुकूल मत दिलें नाहीं. जर्मनसाम्राज्याच्या सुरक्षितपणाबद्दल या पक्षाला किती कळकळ वाटत होती, हें यावरून सहज दिसून येईल.

इ. स. १८८१ सालीं क्राऊन प्रिन्स वुइलियम ( साप्रतचे बादशहा ) याचा विवाह श्लेस्वीग हॉलस्टीनच्या आगस्टा व्हिक्टोरिया नावाच्या राजकन्येबरोबर तारीख २७ फेब्रुआरी रोजीं झाला.

बिस्मार्क यानीं पुष्कळ वर्षांपूर्वीं आपल्या मोतदाराचा जीव वाचविला होता, ही गोष्ट वाचकाच्या स्मरणात असेलच. हा मोतदार पुढें अमेरिकेस गेला व तिकडेच मरण पावला. त्याच्या मृत्यूची हकीकत त्याच्या भावानें बिस्मार्क यास कळविली, तेव्हा बिस्मार्क यानीं एक स्वदस्तूरचें पत्र त्याला पाठवून त्यांत नवी जुनी कौटुंबिक हकीकत त्यानीं नमूद केली होती.

---

प्रकरण एकोणिसावें.

## बिस्मार्क यांचा गौरव.

फ्रान्स शिवाय करून बाकीच्या सर्व युरोपीय राष्ट्रांशीं जर्मनीचा संबंध पूर्ण मैत्रीचा होता. बिस्मार्क याचा राजकारणपद्धतींत लपंडाव अथवा पाताळयंत्रीपणा नसल्यामुळें कोणाहि राष्ट्रास त्याच्या धोरणाबद्दल शंका वाटत नव्हती. या गोष्टीनें युरोपची शांतता कायम राहण्यास बरीच मदत झाली, यात शंका नाहीं; तथापि येथपासून रशियाच्या असलेल्या जर्मनीच्या स्नेहसंबंधास हळहळू बदल होण्यास सुरुवात झाली. प्रिन्स गॉर्टशकॉफ याना मत्सरानें पछाडलें असल्यामुळें बिस्मार्क याशीं त्याचें वर्तन सलोख्याचें राहणें शक्य नव्हतें.

दुसरा आलेक्झांडर बादशहा सिंहासनावर होता, तोंपर्यंत गॉर्टशकॉफ यांस जर्मनीविरुद्ध कोणतेंहि कारस्थान उभारणें शक्य नव्हतें. आलेक्झांडर बादशाहाच्या मनात जर्मनीबद्दल पूर्ण आदर आणि प्रेम हीं होतीं. इ. स. १८८१ सालच्या मार्च महिन्याच्या १३ व्या तारखेस झार आलेक्झांडर हे एका आततायी गृहस्थाच्या हातून मारले गेले. प्रिन्स गॉर्टशकॉफ याच्या मार्गांतील अडचण अशा रीतीनें दूर झाल्याबरोबर जर्मनीविरुद्ध एक मोठी चावटळ रशियात उठली. रशियाच्या नेतृत्वाखालीं जगांतील सगळ्या स्लाव लोकाचें एक साम्राज्य बनलें पाहिजे, असें ह्मणणारा एक पक्ष रशियात होता. इ. स. १८७०–७१ च्या पराभवाचें वैषम्य फ्रान्सच्या मनात ताजें असल्यामुळें फ्रान्स व रशिया याजमध्यें तह व्हावा अशी ओरड त्या दोन्ही देशांत सुरू झाली. हा तह घडवून आणण्यात जर्मनी व आस्ट्रिया या दोघासहि शह लावतां यावा, असा स्लाव साम्राज्यपक्षाचा हेतु होता. नव्या रशियन बादशाहानें स्नेहभावाचें वचन चालू पद्धतीप्रमाणें जर्मनीला दिलें होतें. तथापि जनरल स्कोबेलेव्च्या नेतृत्वाखालीं टयूटन लोकाविरुद्ध एक बराच प्रबळ पक्ष रशियात निर्माण झाला. या पक्षाला फ्रान्स आणि पोलंड यांतील जर्मनीविरुद्ध लोकाचा पाठिंबाहि मिळाला. यावेळीं राजकीय क्षितिज बरेंच अंधकारमय होऊन जर्मनी नव्या वादळाच्या तडाक्यात सापडतो कीं काय अशी भीति उपस्थित झाली. रशियातील कांहीं वर्तमानपत्रांतून जर्मनीला रोज आव्हानें होऊं लागलीं. तथापि जर्मनीशीं वाकडें यावें अशी इच्छा झार यास नसल्यामुळें वर्तमानपत्रकाराचा हा क्षोभ नाहींसा करण्याची त्यानीं बरीच खटपट केली. रशियाचा पाठिंबा आपणास सदोदित असावा, अशी इच्छा बिस्मार्क यास होती. रशियानें जर्मनीशीं आपला स्नेहसबंध हा वेळपर्यंत कायम राखला होता.

ही गोष्ट खरी; तथापि या दोन देशांत तहाच्या स्वरूपाचा कोणताहि पक्का करार मदार झालेला नसल्यामुळें बिस्मार्क यांस रशियाच्या स्नेह-संबंधाची शाश्वती वाटत नव्हती. याकरता इ. स. १८८२ सालीं बिस्मार्क यानीं आस्ट्रिया व इटली या दोन देशाशीं तह करून सुप्रसिद्ध त्रिकुटसंधी ( Triple Allince ) अस्तित्वांत आणला. या तहाचा मुख्य हेतु काय होता, याची जाणीव बिस्मार्क, आस्ट्रियनमुत्सद्दी कालनोकी व इटालियन प्रधान सिनार क्रिस्पी यास पूर्णपणें होती. युरोपात शांतता राखणें हा या तहाचा मुख्य हेतु होता. फ्रान्स अथवा रशिया याजविरुद्ध कोणतीहि गडबड करावी असा बिस्मार्क यांचा मुळींच हेतु नव्हता.

पूर्वेच्या बाजूसहि थोडी फार गडबड सुरू झाली होती. इजिप्तचें राजकारण इ. स. १८८२ च्या जून महिन्यात विकोपास जाण्याच्या रंगात आलें. आरबी पाशाच्या हाताखालील इजिप्शियन सैन्यानें बंड केलें, तेव्हा इंग्लंडनें त्याजवर स्वारी करून आलेक्झांड्रा शहरावर तोफाचा भडिमार केला. नंतर हेलएलकेबर येथें मोठी लढाई होऊन तींत आरबी पाशाचा पूर्ण पराभव झाला. ह्या बंडाची वावटळ सुदान येथें पोहोंचून तेथल्या महादीनें जिहाद अथवा धर्मयुद्ध पुकारलें. इ. स. १८०५ सालीं महादीनें खार्टुम सर केलें. या ठाण्यावर ब्रिटिश जनरल गार्डन याच्या हाताखालीं इजिप्शियन सैन्याची शिबंदी होती. या छाप्यात जनरल गार्डन मारले गेले व बाकीची शिबंदी महादीच्या स्वाधीन झाली. यानंतर इंग्लडनें इजिप्तचा कारभार जबरीनें आपल्या हातीं घेतला. इजिप्तचा कारभार इंग्लडनें मनगटाच्या जोरावर आपल्या हातीं घ्यावा, अशी सल्ला बिस्मार्क यानीं आपणास दिली, असें ब्रिटिश प्रधान लॉर्ड ग्रेनव्हिल यानीं उघडपणें बोलून दाखविलें. यामुळें जर्म-

नींत बरीच खळबळ उडाली. तेव्हां ग्रेनव्हिल यास उत्तरादाखल बिस्मार्क यानीं जर्मन पार्लमेंटात एक भाषण केलें. त्यात ते ह्मणाले, "समुद्रावर प्रभुत्व गाजविणाऱ्या इंग्लंडनें माझी सल्ला घेतली, हें ह्मणणें हास्यास्पद आहे. इंग्लडनें जर्मनीच्या तंत्रानें आपलें राजकारण चालविलें, हें ह्मणणें कोणास तरी खरें वाटेल काय? जर्मन साम्राज्याचा मुख्य या नात्यानें कोणत्याहि तऱ्हेचें मत देण्याचे मीं नाकारिलें. यानंतर लॉर्ड ग्रेनव्हिल यानीं याच बाबीवर खाजगी रीतीनें मला पुन्हा प्रश्न केला, तेव्हा एक खाजगी मुत्सद्दी या नात्यानें मी त्यास असें स्पष्ट कळविलें की, इजिप्त घेण्याची वेळ अद्यापि आलेली नाहीं. इंग्लड व त्याचें आशियातील साम्राज्य याचें नाकें या दृष्टीनें इजिप्तचा उपयोग इंग्लंडास कितीहि असला, तरी तें घेण्याची वेळ आलेली नाहीं, असें कळविण्यास मी कमी केलें नाही. आता इंग्लंडनें इजिप्त घेतलेंच तर त्याच्या आड येण्याची जरूरी आह्मास लागणार नाहीं, असेंहि मीं म्हटलें होतें. हल-वायाच्या घरावर परस्पर तुळशी पत्र ठेवून इंग्लडला नीतिभ्रष्ट करण्याचा प्रयत्न मीं केला, हें ह्मणणें साफ खोटें आहे, ही गोष्ट सरदार लॉर्ड ग्रेनव्हिल यानीं पूर्ण लक्षात ठेवावी."

इंग्लडनें या प्रकरणात जर्मनीला एवढें महत्व दिलें, हें पाहून जर्मनराष्ट्राला अत्यानंद झाला, यात नवल नाहीं. त्याचप्रमाणें या बाबींत आपला पाण उतारा झाला, असें इंग्लंडला वाटून त्या वेळच्या लिबरल प्रधानमंडळाचा त्यास फार रागहि आला. बिस्मार्क यांनी ब्रिटिश प्रधानमंडळाचें हें वर्तन अगदीं उघडपणें चव्हाट्यावर माडल्यामुळें बिस्मार्क यांजवरहि इंग्लंड बरेंच रागावलें. इ. स. १८८४–८५ सालाच्या जमाखर्चाचा अगाऊ तक्ता जर्मन पार्लमेंटांत आला, तेव्हां त्यात तीन कामगारांचा पगार वाढविण्याकरता खर्चांत सालीना दोन

हजार रुपयाची वाढ करण्याची परवानगी जर्मन सरकारनें पार्लमेंटाकडे मागितली होती. त्याप्रमाणें दुसऱ्याहि एका ऑफीसच्या खर्चाची वाढ करण्याकरतां आणखीहि थोड्याशा रकमेची मागणी केली होती. एवढ्या क्षुल्लक बाबीवरहि जर्मन पार्लमेंटात मोठीं रणे माजलीं व यासंबंधीं बिस्मार्क यास दोनदा भाषण करावें लागले. जर्मन प्रतिनिधींच्या या कृपणपणाबद्दल साऱ्या युरोपभर फार प्रतिकूल टीका झाली. 'बिस्मार्क याचा या बाबतींत एका अर्थी पराजय झाला ह्मणून आम्हास फार संतोष वाटत असला, तरी फ्रेंच पार्लमेंटांत असला हास्यास्पद प्रकार घडला असता, तर फ्रेंच लोक खवळून गेले असते' असे उद्गार कित्येक फ्रेंच वर्तमानपत्रानींहि काढले. बर्लिन काँग्रेस मध्यें ठरल्याप्रमाणें बल्गेरिया हें संस्थान स्वतंत्र म्हणून निर्माण झालें होतें. ब्याटनबर्गचे प्रिन्स आलेक्झांडर यानीं इ. स. १८७९ सालीं बल्गेरियाची गादी स्वीकारली. आरंभीं आलेक्झांडर यानीं रशियाचा पक्ष स्वीकारल्याचें दाखविलें होतें; पण इ. स. १८८३ सालीं त्यानीं आपल्या प्रधानास ( हा प्रधान रशियन होता. ) घरीं बसावयास लावलें. यामुळें रशिया व बल्गेरिया याचा स्नेहसंबंध बऱ्याच अंशीं कमी झाला. नतर रशियाच्या चिथावणीवरून इ. स. १८८५ सालीं सर्व्हियानें बल्गेरियाशीं युद्ध पुकारलें; पण त्यांत सर्व्हियाचाच पुरा मोड झाला. रणांगणावर लढाईचा डाव अशा रीतीनें फसला, तरी अंतस्थ कारवाई करून आलेक्झांडर यास आपलें तक्त सोडण्यास रशियानें भाग पाडलें. ज्या तात्पुरत्या सरकाराची योजना बल्गेरियात झाली होती, त्याचा पाडाव झाला, तेव्हां अलेक्झांडर बल्गेरियात पुन्हां परत आला; तथापि रशियाच्या कारवाईमुळें बल्गेरियातील सामान्य लोकमत आपणाविरुद्ध फार प्रक्षुब्ध झालें आहे, असें पाहून इ. स. १८८६ सालच्या सप्टंबरच्या ७ व्या तारखेस बल्गेरियाला त्यानें कायमचा रामराम ठोकला.

बल्गेरियाच्या राजकारणांत आपण पडावयाचें नाहीं, असा बिस्मार्क यांचा प्रथमपासूनच निश्चय होता. कारण या बाबींत जर्मनीच्या हित-संबधास कोणताहि उपसर्ग पोहोंचत नव्हता. याशिवाय रशियाच्या पाठिंब्यामुळेंच आलेक्झांडर यास रशियाची गादी मिळाली होती. आले-क्झांडरनें कायमचा राजिनामा दिला, तेव्हां त्याच्या तर्फेच्या लोकाचा छळ होऊं नये यासाठीं मात्र बिस्मार्क यानीं फार खटपट केली व तींत त्यास यशहि आलें. या द्व्याबुद्धीच्या कामांतहि बिस्मार्क यांच्या आड येण्यास क्याथोलिक पक्षानें कमी केलें नाहीं. रशियानें केवळ जबरीचें वर्तन करून बेल्गेरियातील शांततेचा भग केला, त्याअर्थीं रशियाशीं युद्ध केलेंच पाहिजे, अशी ओरड या पक्षानें चालविली. उभयपक्षास अत्यंत अहितकर होणारें असें हें युद्ध आपणास मुळींच नको, असे बिस्मार्क यानीं स्पष्ट बोलून दाखविलें. आपल्या भाषणाच्या शेवटीं ते ह्मणाले, " युद्धसमाप्तीनंतर हें युद्ध आपण का केलें, याचेंहि स्मरण कोणास राहणार नाहीं. "

इ. स. १८८३ सालीं बिस्मार्क याची प्रकृति काविळीच्या आजा-रानें बरीच बिघडली होती. म्यूनिच येथील डॉ. श्वेनिगर याच्या उप-चारामुळे ते बरे झाले. यानतर याच डॉक्टरास ते कोणत्याहि प्रसंगीं बोलावीत असत. बर्लिनच्या विश्वविद्यालयात प्रोफेसर या नात्यानें डॉ. श्वेनिगर यांची नेमणूक झाली. एका बव्हेरियन डॉक्टराचा अशा रीतीनें सन्मान झालेला पाहून बर्लिन येथील अश्विनीकुमारांस फार वाईट वाटलें व बिस्मार्क याचा रागहि त्यास आला. डॉ. श्वेनिगर यास बरो-बर घेऊन हवा पालट करण्याकरता बिस्मार्क किसिनजेन येथें गेले, व थोडे दिवस तेथें राहून पुढें ग्यासटीनला गेले. याठिकाणीं त्यांची प्रकृति पुन्हा बरीच नादुरुस्त झाली.

डॉ. श्वेनिगर याच्या उपचारानें बिस्मार्क यांची प्रकृति बरीच सुधारली व इ. स. १८८४ च्या एप्रिलच्या १ ल्या तारखेस त्यांचा ६९ वा वाढदिवस बर्लिन येथें मोठ्या थाटानें साजरा झाला. याच सालीं बिस्मार्क याचे वडील चिरंजीव कौंट वुइलियम याची नेमणूक प्रिव्हिकौन्सिलर या नात्यानें झाली व दुसरे चिरंजीव कौंट हरबर्ट याची नेमणूक वकील या नात्यानें हालंडच्या दरबारीं झाली. तारीख १६ सपटंबर रोजीं स्किर्निव्हिस येथें जर्मनी, आस्ट्रिया, रशिया या तीन देशाच्या बादशाहाची मुलाखत झाली. या भेटीच्या वेळीं बिस्मार्कहि हजर होते. तारीख ११ सपटंबर रोजीं सिडानचा वार्षिक दिन होता. या दिवशीं बादशाहानीं एक लष्करी चांद बिस्मार्क यास नजर करून त्या सोबत त्यांस पुढील पत्र पाठविलें.

"गेल्या बावीस वर्षांत आपण जें कार्य केलें, त्याची आठवण या दिवशीं मला अवश्य होते. आजतागाइत मोठ्या आणीबाणीच्या अशा दोन युद्धप्रसंगात तुह्मी मला अप्रतिम सहाय्य केलें. शिपायी व सल्लामसलतगार अशा दोन प्रकारच्या नात्यांनीं तुमचें सहाय्य मला झालें आहे. आपल्याला आजपर्यंत न दिलेला असा हा चांद आज मी आपणास नजर करीत आहें. हा चांद विशेषत· लष्करी नोकरी करता जरी नजर केला जातो, तरी रणभूमीवरहि आपण इतकें धैर्य प्रगट केलें आहे व मागील दोन्ही युद्धांत माझ्या बरोबर रणभूमीवर बिकट प्रसंगींहि आपण इतक्या स्थैर्यानें वागलां आहां कीं, अशा प्रकारचा लष्करी सन्मान आपणास मिळणें अवश्य आहे. जी गोष्ट यापूर्वींच मी करावयास पाहिजे होती, ती मी आज करीत आहें. परमेश्वराच्या इच्छेनें पितृभूमीच्या कार्यार्थ आपली योजना माझ्या उजव्या हाताशीं झाली आहे व अशा रीतीनें आपला सन्मान करण्यात मला जितका संतोष वाटतो, तितकाच तो आपणासहि वाटेल, अशी मला आशा आहे."

प्रिन्स बिस्मार्क यांच्या वाढदिवसानिमित्त तारीख २८ मार्च पासूनच बर्लिन येथें प्रतिनिधी मंडळीनें येण्यास सुरुवात केली.

बिस्मार्क ज्या विश्वविद्यालयात शिकत होते, त्या गाटिंजेन विद्यालयानेंहि आपले प्रतिनिधि पाठवून एल. एल. डी. ची पदवी त्यांस अर्पण केली. सॅक्सनीच्या राजानें एक हिरेजडित चाद त्यास नजर केला. तारीख ३१ मार्च रोजीं एक मोठी मिरवणूक मोठ्या थाटाने राजवाड्यावरून गेली. राजवाड्याच्या खिडकींत बादशहा मिरवणूक पाहण्यास बसले होते. राजवाड्यावरून ही मिरवणूक पुढें वुइलहेल्मस्ट्रासीला गेली. इमारतीच्या मुख्य दरवाजात बिस्मार्क आपल्या मुलासह उभे होते. यावेळीं त्यानीं लष्करी पोशाक केला असून डोक्यालाहि लष्करी टोपी घातली होती. मिरवणूक दरवाजापाशीं येऊन पोंहोंचल्याबरोबर बिस्मार्क पुढें झाले व मिरवणुकीच्या वृद्ध पुढाऱ्याशीं हस्तांदोलन करून थोडा वेळ त्याच्याशीं त्यानीं भाषणहि केलें. नतर बादशहाच्या नांवानें त्रिवार जयघोष करून मिरवणूक पुढें चालू झाली. संध्याकाळीं सर्व शहरभर दीपोत्सव झाले.

दुसऱ्या दिवशीं ह्मणजे तारीख १ एप्रील रोजीं रशियाच्या प्रधान-मंडळाकडून अभिनदनपर सदेश घेऊन एक प्रतिनिधिमंडळ आलें. याच्या मागोमाग दुसऱ्या अनेक राजाकडून तारा आल्या. ११ वाजता आपल्या राजकीय परिवारासह बादशहा बिस्मार्क याच्या भेटीला आले.

ए. फॉं बर्नर नावाच्या चितार्‍यानें व्हर्सेलीस येथील साम्राज्यजन्म नांवाचे जें एक चित्र तयार केलें होतें, तें बादशहानीं प्रिन्स बिस्मार्क यांस नजर केलें. या प्रसगीं बादशहानीं एक लहानसे भाषण करून प्रिन्स बिस्मार्क याच्या अनेक प्रकारच्या कर्तबगारीचा उल्लेख केला. भाषण सपल्यावर कुर्निसात करण्याकरता बिस्मार्क गुडघे टेंकूं लागले, तेव्हां बादशहानीं वरचेवर त्यांचा हात धरून त्यास आलिंगन दिलें. या प्रसंगीं उभयतांच्याहि नेत्रातून अश्रू वहात होते. जर्मनीच्या या वज्रबाहू

प्रधानाचें अंतःकरण या प्रसंगीं इतकें वितळलें कीं, बादशहांचे आभार मानण्यापुरते शब्दसुद्धा त्याच्या मुखांतून बाहेर पडेनात. हा देखावा पाहून हजर असलेल्या सर्व मंडळीचीं अंतःकरणेंहि सद्गदित झालीं. नंतर युवराज व सध्याचे बादशहा वुइलियम यानीं बिस्मार्क याचें अभिनंदन केलें.

याप्रसंगीं बिस्मार्क यांजवर देणग्याचा इतका वर्षाव झाला कीं, त्यांचा नुसता नामनिर्देश करण्यासहि येथें पुरेसें स्थान नाहीं. तथापि यातील एक दोन देणग्या विशेष लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. विशेषतः जर्मनराष्ट्रातर्फे म्हणून जी देणगी आली, ती फार महत्वाची होती. नेपोलियनच्या काळीं झालेल्या युद्धांत बिस्मार्क कुटुंब फार खालावलें होतें व शॉन हॉसनची बहुतेक मिळकत त्यास विकावी लागली, हें वाचकांच्या स्मरणांत असेलच. या मिळकतीच्या मालकीहक्काचे कागदपत्र जर्मनराष्ट्राच्या वतीनें त्याटिबारच्या ड्यूकनीं या दिवशीं बिस्मार्क याच्या स्वाधीन केले. आपल्या घराण्याची पुरातन मालमिळकत आपल्या घराण्यांत परत यावी, अशी बिस्मार्क याची मनापासून इच्छा होती, ती या वेळीं अशारीतीनें पुरी झाली. अनेक देणग्यांपैकीं या देणगीनें बिस्मार्क यास जितका संतोष झाला, तितका तो दुसऱ्या कोणत्याहि देणगीनें झाला नाहीं.

ही मिळकत विकत घेण्याकरता लोकांनीं जो पैसा वर्गणीनें जमविला होता, त्यातील शिल्लक राहिलेली रक्कम त्यानीं बिस्मार्क याच्या स्वाधीन केली. बिस्मार्क यांनींहि वरिष्ठ प्रतीच्या विद्यार्थ्यांच्या मदतीसाठीं व शाळाखात्यांतील शिक्षकांच्या बायकामुलांच्या मदतीकडे या रकमेचा उपयोग केला.

तारीख ६ एप्रील रोजीं आपल्या या मिळकतीचा ताबा घेण्यासाठीं बिस्मार्क आपल्या या जन्मभूमीस गेले. इ. स. १७३४ सालीं त्याच्या पूर्वजानीं बांधलेला वाडा ह्मणण्यासारखा जुना झाला होता, असें नाहीं. याच वाड्यांत बिस्मार्क याचा जन्म झाला होता व याच वाड्यांत आता पुन्हा मालकीच्या हक्कानें ते येऊन राहिले. शॉनहॉसन येथें थोडे दिवस राहून बिस्मार्क व्हार्जिनला गेले व उन्हाळ्याचे दोन अडीच महिने त्यानीं तेथेंच काढले. साम्राज्यासंबंधींचे आपले बेत बिस्मार्क यांनीं बऱ्याच संतोषकारक रीतीनें पार पाडले होते. जर्मनसाम्राज्याला शांततेचे दिवस यावेत ही त्यांची इच्छा आता बऱ्याच अंशीं सिद्धीस गेली होती. धर्मखातें व सरकार यांमधील विकोपास गेलेलें भाडण हळूहळू नामशेष होऊं लागलें होतें. जर्मन सरकारासंबंधीं धर्मगुरू पोप यांनींहि सलोख्याची वृत्ति धारण केली होती. इ. स. १८८५ च्या दिसेंबरांत तारीख ३१ ला एक हिरेजडित चांद पोप यांनीं बिस्मार्क यास नजर केला.

आपणास शत्रू पुष्कळ असले व आपल्या कार्यांत अडथळे आणण्याचा प्रयत्न त्यांनीं कितीहि केला, तरी आपल्या कामगिरीचें महत्व एकंदर जर्मन राष्ट्राच्या मनात बरोबर उतरलें आहे, ही गोष्ट बिस्मार्क याच्या लक्षात आल्यावाचून राहिली नाहीं. राज्यकारभाराच्या पद्धतींत त्यानीं केलेल्या सुधारणाबद्दल आरंभीं लोकमत जरी प्रतिकूल होतें, तरी त्याचें महत्व हळूहळू लोकाच्या लक्षांत येऊं लागलें होतें.

---

## प्रकरण विसावें.

# नवे विजय.

तारीख १४ जानेवारी सन १८८६ रोजीं प्रशियन पार्लमेंटाची नवी बैठक भरली. या वेळीं वुइलियम बादशहानीं जें प्रास्ताविक भाषण

केलें, त्यात पोलंडसबंधीं उल्लेख होता. या प्रश्नाला या वेळीं फार महत्व प्राप्त झालें होतें. पूर्व प्रशियात जाऊन राहिलेल्या जर्मन लोकांची पिछे-हाट पोल लोकाच्या खटपटीनें हळूहळू होऊं लागली होती. आपल्या जर्मन प्रजाजनाचें अस्तित्व व त्याची वाढ हीं कायम राखण्याचें जर्मन सरकारचें काम आहे, असा उल्लेख या भाषणात होता. पूर्व प्रशियां-तील रशियन व आस्ट्रियन लोकांस हाकून लावावें, असा प्रशियन सरका-रचा बेत होता, पण जर्मन पार्लमेंटाची मंजुरी याला मिळेना. सस्था-निकाच्या प्रतिनिधी मडळानेंहि या बाबतींत हात घालण्याचें नाकारलें. ही बाब साम्राज्यविषयक नसून तिचा विचार एकट्या प्रशियानें वाटेल तसा करावा, असें या मंडळाचें ह्मणणें होतें.

तेव्हा प्रशियन पार्लमेंटात या बाबीसंबधीं एक नवा ठराव सरकार तर्फेच्या प्रतिनिधींनीं पुढें आणला. "बादशहाच्या भाषणात आपल्या पूर्वेकडील प्रांताबद्दल जो उल्लेख आला आहे, त्याबद्दल आपणास पूर्ण सतोष होत असून तेथील जर्मन प्रजाजनाचें रक्षण करणें हें आपलें काम आहे. या कार्याकरता व तेथें राहिलेल्या जर्मन शेतकऱ्याच्या मद-तीकरता व तेथें शाळा वगैरे स्थापण्याकरता सर्व खर्चाची मंजुरी सभेनें द्यावी" अशा अर्थाचा हा ठराव होता.

सरकारच्या प्रतिपक्षानें आणलेल्या सर्व आक्षेपाचें चोख खंडण बिस्मार्क यानीं या प्रसगीं केलें. बिस्मार्क याची मनोवृत्ति आरंभापासू-नच पोल लोकास फारशी अनुकूल नव्हती, हें वाचकाच्या लक्षात असेलच.

"प्रशियन राज्याच्या सरहद्दींत रहात असणाऱ्या वीस लक्ष पोल लोकाशीं शक्य तितक्या सुखासमाधानानें राहण्याची कामगिरी आमच्यावर येऊन पडली आहे. त्याच्या व आमच्या हितसबधांत विरोध असू नये, अशा रीतीनें बनेल तोंपर्यंत आपली तेथील राज्यव्यवस्था ठरविण्याचें आपलें काम आहे.

सांप्रतची परिस्थिति आपण उत्पन्न केली आहे, असें नाहीं. तिसऱ्या फ्रेड्रिक वुइलियम राजांनीं इ० स० १८१५ सालीं हे प्रांत आपल्या ताब्यात घेतले, त्या वेळीं त्याचा राज्यकारभार कोणत्या रीतीनें चालणार, हें त्यांनींच तत्त्वदृष्ट्या स्पष्टपणे सांगितलें होतें या तत्वानुरोधानें तेथील कारभार चालावा ही गोष्ट खरी, पण तेथील खुद्द रहिवाशांनींच आपल्या वर्तणुकीनें या तत्वाचा भंग केला असेल, तर राजानें त्या वेळीं दिलेल्या वचनातून आह्मीं आपोआपच मुक्त होतों पोल लोक कसेहि वागले, तरी आह्मीं आपलें वचन पाळू असें फ्रेड्रिक वुइलियम राजानें केव्हांहि ह्मटलें नव्हतें. पोल लोकाच्या वागणुकीनेंच हें वचन आता निरर्थक ठरले आहे."

चवथ्या फ्रेड्रिक वुइलियम राजाचें धोरण कसें निष्फळ झालें होतें, हें बिस्मार्क यानीं दाखविलें. पोल लोकाशीं सलोख्यानें वागावें असें चवथ्या फ्रेड्रिकचें धोरण होतें. पण इ. स. १८४६ व १८४८ या सालीं बड करून पोल लोकानीं या उपकाराची फेड केली. इतकें झालें; तथापि पोल लोकावर करडी अम्मलबजावणी झाली नाहीं. इ. स. १८३१ सालच्या बडानंतर पळून गेलेले काहीं बंडखोर पुन्हा परत आले, त्या वेळीं त्याचें कसें स्वागत झालें, हें मींच आपल्या डोळ्यानीं पाहिलें आहे, असें बिस्मार्क ह्मणाले. "आमच्या विजयी सैन्याचें स्वागतहि ज्या थाटानें झालें नाहीं, त्या थाटानें बंडखोर पोल लोकाचें स्वागत प्रत्येक जर्मन शहरात झालें. पोलिश बडखोरांबद्दल तुह्मा प्रशियन प्रतिनिधींच्या मनात इतकी उच्छृखळ सहानुकपा आहे कीं, ती पुढें आपलें कर्तव्यहि विसरून सरकारच्या धोरणास तुह्मी व्यर्थ अडथळा करीत आहा. सरकारविरुद्ध पक्ष इ. स. १८७० सालीं फ्रेंच वकिलातीशींहि खलबतें करीत होता, असा पुरावा सहजगत्या माझ्या हातीं पडला."

या भाषणानंतर पूर्वप्रशियांत होणाऱ्या सुधारणासाठीं लागणाऱ्या खर्चास प्रशियन पार्लमेंटानें मंजुरी दिली. तेथें काहीं नवीं वतनें खरेदी करावयाचीं होतीं व शाळा वगैरे स्थापून शिक्षणाचीहि व्यवस्था कराव-

याची होती. पूर्व प्रशियातून पोल लोकाचें समूळ उच्चाटन व्हावें, असा आपला मुळींच हेतु नसून फक्त जर्मन रहिवाशांचें संरक्षण व्हावें, इतकाच आपला हेतु असल्याचें बिस्मार्क यानीं स्पष्टपणें जाहिर केलें. अशा रीतीनें घरच्या तंट्यांचा निकाल लागतो न लागतो तोंच बाहेरील वातावरण बिघडण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. फ्रेंच प्रजासत्ताकानें जनरल बोलंगर यास युद्धविषयक प्रधान नेमलें होतें. युद्धखात्याचीं सूत्रें इ. स. १८८६ सालीं बोलंगर यांनी हातीं घेतलीं व तावडतोब युद्धाच्या पूर्वतयारीस सुरुवात केली. त्यानीं पास करून घेतलेल्या नव्या लष्करी कायद्याप्रमाणें प्रत्येक सुदृढ फ्रेंचाला तीन वर्षें लष्करी शिक्षण घेणें भाग झालें. या नव्या सैन्याच्या खर्चाकरतां सुमारें दोन अब्ज रुपयाची मंजुरी फ्रेंच सरकारनें त्यांस दिली.

जर्मन खड्या सैन्याची मुदत सात वर्षांची असावी, असें जर्मन पार्लमेंटानें ठरविल्याचें वाचकांच्या लक्षात असेलच. ही सात वर्षांची मुदत याच आणीबाणीच्या प्रसगीं संपली. जर्मनीवर सूड उगविण्यासाठीं फ्रान्स अगदीं आतूर होऊन बसल्याचीं चिन्हें दिसू लागलीं. अशा प्रकारचें युद्ध सुरू झालें असतें, तर कदाचित् त्याची आच लागून हा वणवा साऱ्या युरोपभर पेटला असता. फ्रान्सच्या सैन्यापेक्षां आपलें संख्याबळ अधिक असेल, तरच आपला निभाव लागण्यासारखा आहे, ही गोष्ट पक्की ठाऊक असताहि जर्मनप्रतिनिधींनीं सैन्याची वाढ करण्याचें नाकबूल केलें. प्रसंग पडला तर आह्मी आपली सारी चीजवस्त व आपले जीवहि सरकारच्या स्वाधीन करूं, असें प्रतिनिधी ह्मणू लागले. यावर बिस्मार्क यानीं उत्तर दिलें, "या तुमच्या शब्दाचा अर्थ माझ्या ध्यानीं येत नाहीं. शब्द ह्मणजे लढाऊ शिपाई नव्हत. अथवा लांबलांब वाक्याचीं पलटणेंहि बनत नाहींत. शत्रूनें आपला देश हस्त-

गात केल्यावर हीं तुमचीं भाषणें त्याच्यापुढें ठेवलीं, तर त्याला हंसू मात्र येईल. जर्मनीवर विजय मिळविण्याची थोडीशी आशा दिसली कीं, फ्रेंच लोक आपणावर हल्ला करावयास चुकावयाचे नाहींत. जयाची यत्किंचित्‌हि आशा त्याना वाटली कीं, ताबडतोब जर्मनीविरुद्ध ते युद्ध पुकारतील. "

अशा आणीबाणीच्या प्रसंगीं जर्मन प्रतिनिधींनीं सैन्याच्या वाढीस मंजुरी देऊं नये ही गोष्ट पुष्कळांस मोठी विलक्षण वाटे. पण फ्रान्सातील सोशल डेमोक्राट पक्षावर त्याचा पूर्ण विश्वास होता. देशात शातता रहावी, असें फ्रेंच लोकाचें मत आहे, असें जर्मन प्रतिनिधींस मनःपूर्वक वाटत होतें.

या भाडणाची तडजोड होऊन काहींच निकाल लागेना, तेव्हा ही बैठक अशीच बरखास्त झाली. प्रतिनिधींच्या या वागणुकीचा राग लोकासहि आला होता. यामुळें नव्या निवडणुकींत सरकार पक्षास बहुमत मिळून त्याची सरशी झाली. इ. स. १८८७ च्या मार्च महिन्यात सैन्याच्या वाढीस प्रचंड मताधिक्यानें मंजुरी मिळाली. ही गोष्ट घडून आल्याबरोबर ऱ्हाईनच्या दुसऱ्या तीरावरील युद्धाचा उत्साहहि ताबडतोब थडावला. अशा रीतीनें बिस्मार्क याच्या शांततारक्षक धोरणाचा या वेळीं विजय झाला.

अशा रीतीनें सैन्याची सख्या वाढविण्याच्या कामीं बिस्मार्क यांस यश आलें, तरी करांच्या वाढीच्या बाबतींत पार्लमेंटाची मंजुरी त्यांस मिळेना. कराच्या काहीं बाबींसंबधी प्रतिनिधींचें मत प्रतिकूळ होतें. या वेळीं केलेल्या भाषणात बिस्मार्क म्हणाले,

" जर्मन साम्राज्य चिरस्थायी होण्यास तीन गोष्टींची आवश्यकता आहे. आपलें लष्कर प्रथम जय्यत तयार असलें पाहिजे. खजिना सुव्यवस्थित असला

पाहिजे, व साम्राज्याच्या सर्व घटकात संतोष राहिला पाहिजे या सर्व घटकाच्या चित्तात संतोष नांदेल असें करणें ही सर्वांत अत्यंत महत्वाची बाब असल्यामुळें तिजकडे लक्ष पुरविणें हें आपलें आद्य कर्तव्य होय साम्राज्याचा एकोपा व दृढता हीं कायम राखण्याच्या कामीं पार्लमेंटाची मदतहि अत्यंत महत्वाची आहे, असें मला वाटतें. साम्राज्याचा सुरक्षितपणा तुमच्या हातीं आला आहे. तुम्ही त्याचे संरक्षक आहां तुमच्या शिरावरील ही विश्वासाची जबाबदारी ओळखून तुम्हीं वागत आहा काय ? ही जबाबदारी तुम्ही चांगलीशी ओळखली नाहीं, असें मला मोठ्या दु:खानें म्हणावें लागतें. तुमच्या दारापाशी येऊन साम्राज्याच्या खर्चाकरतां भीक मागण्याचा प्रसंग मुख्य प्रधानावर यावा, ही गोष्ट त्या प्रधानाला व त्याच्या राजालाहि अपमानकारक आहे साम्राज्याच्या खर्चाकरतां तुमच्या दारापाशीं आलेल्या प्रधानाच्या पदरात धोंडे टाकून तुम्ही त्याची थट्टा करीत आहा. ”

जर्मन पार्लमेंटानें ही मागणी अशा रीतीनें फेटाळून लावल्यानंतर लष्करी खर्चाकरता कर्ज काढण्याचें ठरलें. या वेळीं बिस्मार्क यांनीं तारीख ६ फेब्रुआरी सन १८८८ रोजीं जें भाषण केलें, तें जर्मन साम्राज्याच्या इतिहासांत चिरकाल नमूद होऊन राहील.

यूरोपच्या सध्याच्या परिस्थितींत राष्ट्र या नात्यानें जगणें आम्हांस फार खडतर झालें आहे आमच्या दोन्ही सरहद्दीस शत्रू पसरले आहेत. संख्येच्या दृष्टीने पाहता हे आमचे दोन्ही शत्रू आमच्याशी समबल आहेत, पण गुणाच्या दृष्टीनें आमच्याशी त्यास बरोबरी करवणार नाहीं आमच्या प्रचंड सैन्याचें आधिपत्य करण्यासाठी अम्मलदाराचा भरपूर भरणा आमच्यापाशीं आहे. इतर लष्करी बाबतींत आमच्या लष्करी पद्धतीची कितीहि हुबेहुब नक्कल आमच्या शत्रूनीं केली, तरी अम्मलदाराच्या बाबतींत आमची नक्कल करणें त्यास साधावयाचें नाही. जर्मनींत शिक्षणाचा जो विलक्षण प्रसार झाला आहे, तसा दुसरा कोठेंहि झालेला नाहीं. जर्मनीचा विशेष हाच आहे. शिक्षणाच्या प्रसारामुळेच वाटतील तितके अम्मलदार आपणास निर्माण करता येतील. जर्मनराष्ट्र युद्धासाठीं बाहेर पडलें म्हणजे साऱ्या राष्ट्राचें सामर्थ्य त्याच्या सैन्यात एकवटलेलें असतें. ज्या युद्धांत साऱ्या राष्ट्राच्या भावनांचा पाठींबा सैन्याला नसतो, तें युद्ध जरूर तितक्या उत्साहानें कधींहि चालविलें जात नाहीं. आम्हावर कोणी

हल्ला केला, तर आमचें सैन्य इतक्या बेफाम उत्साहानें लढतें, याचें कारण हेंच आहे. युद्धात आपणास जय मिळेल की नाहीं या भीतीनेंच आह्मी शातता राखण्याचा यत्न करतो, असें आमच्या शत्रूना वाटत असेल, तर ती त्याची मोठी चूक आहे. आमच्याशा सौजन्याचें वर्तन करून यत्किंचितहि प्रेम आमच्यावर कोणी केले, तर आम्ही तावडतोब विरघळतों. केवळ राजकीय दृष्ट्या हा आमचा दोष असेल, पण आम्ही विरघळतों, हें खरें; पण तरवारीच्या चमकीनें आह्मास कोणी भिववू पाहील, तर तसें मात्र कालत्रयींहि होणार नाहीं. आम्ही जर्मन लोक ईश्वरावांचून जगात दुसऱ्या कोणाचीहि भीति बाळगीत नाहीं."

हें भाषण समग्र देण्यास स्थलावकाश नाहीं, याबद्दल वाईट वाटतें. हें भाषण दोन तास एकसारखें सुरू होतें. सैन्याच्या बाबीची काळजी बिस्मार्क यास किती वाटत होती, हें यावरून सर्वांच्या निदर्शनास स्पष्ट आलें. भाषण चालू असतां थकवा आल्यामुळें बिस्मार्क यास केव्हां केव्हां बसावें लागे व केव्हां केव्हा पाणीहि प्यावें लागे. त्याच्या शरिराला दुर्बलता आली होती, तरी त्याचें मनाचें सामर्थ्य तरण्या बांडाप्रमाणें ताजेतवानें होतें; या गोष्टीची साक्ष प्रत्येक वाक्य पटवीत होतें. भाषण संपल्यानंतर बिस्मार्क याचा मसुदा वादविवादाशिवाय सर्व सभागृहाच्या एकमतानें पास झाला. भाषण सपल्यानतर बिस्मार्क घरीं जाण्यासाठीं बाहेर आले, त्या वेळीं दारापाशीं त्याची गाडी हजर नव्हती. तेव्हां ते तसेच पायीं घरीं जाण्यास निघाले, तेव्हां पार्लमेंटचे बरेचसे सभासद व दुसरे हजारो प्रेक्षक त्यांचा जयजयकार करीत घरापर्यंत त्यास पोंहोंचविण्यास गेले.

इ. स. १८८६ सालीं बल्गेरियाचा राजा अलेक्झांडर यानें आपल्या तक्ताचा राजीनामा दिला, ही हकीकत वाचकांस आठवत असेलच. बल्गेरियाच्या भाडणाचा परिणाम युरोपांत युद्ध पेटविण्यांत होतो कीं काय, अशी भीति त्यावेळीं उपस्थित झाली होती; पण जर्मनी आणि

आस्ट्रिया याच्या संगनमतानें ही आपत्ति टळली. ग्यास्टिन येथें क्यालनोस्की, बिस्मार्क व त्याचे चिरजीव हर्बर्ट यांचीं खलबतें होऊन बल्गेरीयाच्या भानगडींत दोन्ही राष्ट्रांनीं हात घालावयाचा नाहीं, असें ठरलें. ग्यास्टीन येथें असता आस्ट्रियाचे बादशहा बिस्मार्क याच्या भेटीस आले होते; व पुष्कळ वेळपर्यंत उभयताचें एकातीं भाषण झालें.

यावेळीं रशियाचा प्रख्यात मुत्सद्दी गेअर्स हा फ्रॅन्झेन्सबाद येथें होता. त्याची भेट घेऊन आस्ट्रिया व जर्मनी याच्या मनात रशियाबद्दल यत्किंचितहि वैषम्य नाहीं, अशी बिस्मार्क यांनीं त्याची खात्री केली.

यावेळीं जर्मनीत एक मोठी खेदकारक गोष्ट घडून आली. बव्हेरियाचा राजा दुसरा लुई हा काहीं काळ मतिभ्रष्ट झाला होता. त्यानें तारीख १३ जून रोजीं स्टार्नबर्गर येथील तळ्यात उडी घेऊन आत्महत्या केली. जर्मन साम्राज्याच्या संघटनेच्या बाबतींत लुई राजानें पुढाकार घेतला होता, ही गोष्ट वाचकास आठवत असेलच.

बर्लिन येथें परत आल्यानतर बल्गेरियाच्या भानगडी मिटविण्यासाठीं, बरेच दिवस बिस्मार्क यास मेहनत करावी लागली. रशियन मुत्सद्दी गेअर्स व प्रशियाचे युवराज हे आलेक्झांडरच्या पक्षाचे होते. याच्याशीं बिस्मार्क याचीं कित्येक वेळा खलबतें झालीं. अखेरीस पूर्वीं सागितल्याप्रमाणें या भानगडीचा निकाल लागला व तारीख १४ सपटेंबर रोजीं आपला मुलगा हर्बर्ट याच्या हातीं कांहीं काळ राष्ट्रसूत्रें देऊन बिस्मार्क व्हार्जिन येथें गेले. व्हार्जिन येथील कागदाची त्याची गिरणी आगीनें जळून गेली होती. ती बिस्मार्क यानीं आपल्या देखरेखीखालीं पुन्हां बांधली.

इ. स. १८८७ च्या आरंभीं वुइल्यिम बादशहाची प्रकृति बरीच बिघडल्यामुळें बिस्मार्क यास काळजी उत्पन्न झाली. तारीख २२

मार्च रोजीं बादशहाचा नव्वदावा वाढदिवस साजरा व्हावयाचा होता. या प्रसंगीं लोकानीं बादशहास फार त्रास देऊ नये, अशी जाहीर विनति बिस्मार्क यानीं लोकांस केली. दुर्दैवानें या वेळीं युवराजाची प्रकृतीहि काळजी करण्यासारखीच होती. त्याच्या घशांत एक दुर्धर रोग उद्भवू पहात होता. इंग्रजी राजदरबारचे सुप्रसिद्ध वैद्य सर मॉरेल म्याकेन्झी यांचें मत हा रोग सुसाध्य आहे, असें पडलें. तेव्हां व्हिक्टोरिया राणीच्या ज्युबिली करता युवराज इंग्लंडला गेले. इ. स. १८८७ चा उन्हाळा बिस्मार्क यानीं आपल्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणे किसिनजेन व फ्रेड्रिकश्रू येथें घालविला. फ्रेड्रिकश्रू येथें आस्ट्रियाचे प्रधान कौंट क्यालनोकी हे बरेच दिवस त्याचे पाहुणे होते. इटालीचे प्रधान सिनार क्रिस्पी यांसहि फेड्रिकश्रू यथ बिस्मार्क यांनीं बोलाविलें होतें.

नोवेंबर महिन्यांत रशियाचे झार बर्लिन येथें आले होते व बिस्मार्क याच्या बिनंतीवरून आपल्या खास भेटीचा मान त्यानीं त्यास दिला. या भेटींत झारची स्वारी बिस्मार्क याजबद्दल आरंभीं बरीच साशंक होतीशी दिसली; पण पुढें हळूहळू त्यानीं आपलें मन बरेंच मोकळें केलें. बिस्मार्क याजविरुद्ध मजकुरानीं भरलेलीं बरींच पत्रें झार यांस गेलीं होतीं. ही हकीकत झार यानीं बिस्मार्क यास सांगितली, तेव्हां त्यातील मजकूर अक्षरशः खोटा आहे, अशी बिस्मार्क यानीं बादशहाची खात्री करून दिली. आर्लियन्स कुटुंबापैकीं प्रिन्स फर्डिनंड याची नेमणूक बल्गेरियाच्या गादी करिता झाली होती; पण जर्मनी अथवा रशिया यापैकीं कोणाचेंहि पाठबळ त्यास नव्हतें. तेव्हा युरोपात युद्ध उपस्थित करण्याच्या हेतूनें ही खोट्या पत्राची योजना फर्डिनंडच्या तर्फे करण्यात आली होती, असें निःसशय सिद्ध झालें; पण या युक्तीचा परिणाम

मात्र अगदीं उलट झाला. आपणास अशा रीतीनें फसविल्याबद्दल झार यास फार राग आला व बिस्मार्क याजबद्दल त्याचें मन शुद्ध होऊन त्यांच्यावरचा विश्वासहि वाढला. पुढें थोड्याच महिन्यानीं आस्ट्रिया व जर्मनी यामध्यें तह झाला व त्यामुळें युरोपाची शांतता टिकण्यास बरीच मदत झाली.

---

प्रकरण एकविसावें.

## कांहीं महत्त्वाच्या बाबी.

जर्मन साम्राज्यावर एक मोठा दुःखदायक प्रसंग लवकरच यावयाचा होता. वुइलियम बादशहाची प्रकृति बरीच क्षीण झाली होती. त्यांत त्यास थोडासा थंडीचा विकार होऊन ती बरीच बिघडली व तारीख ७ मार्च रोजीं बिस्मार्क यास त्यांनीं आपल्या भेटीस बोलाविलें. युवराजाची प्रकृ-तीहि नादुरुस्त असल्यामुळें ते स्यानरेमो येथें जाऊन राहिले होते. तेव्हां राजपुत्र वुइलियम ( सांप्रतचे बादशहा ) यांची नेमणूक राजप्रतिनिधि या नात्यानें करावी, असें बादशहांनीं बिस्मार्क यास सांगितलें. याच वेळीं पार्लमेंट सभेच्या तहकुबीच्या खर्ड्यावर बादशहानीं सही केली. त्यांच्या सहीचा हाच अखेरचा सरकारी कागद होय. दुसऱ्या दिवशीं आपला नातु राजपुत्र वुइलियम यास जवळ बोलावून राजकीय व लष्करी बाबींच्या बऱ्याच गोष्टी बादशहानीं त्याला सांगितल्या. व त्याच दिवशीं बिस्मार्क याचीहि अखेरची भेट घेऊन बादशहानीं त्यांचे आभार मानले.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं साडे आठ वाजतां वुइलियम बादशहा हें नश्वर जग सोडून गेले. त्याच्या मृत्यूनें त्याची सारी प्रजा शोकसागरांत बुडून गेली. युरोपच्या इतिहासांत या बादशहाचें नांव चिरकाल राहील

यात संशय नाहीं. वुइल्यिम बादशहाचे चिरंजीव म्हणजे नवे बादशहा दुसरे फ्रेड्रिक याची प्रकृतीहि दु:साध्य स्थितींपर्यंत पोहोंचली असल्याची बातमी याच वेळीं आल्यामुळें जर्मन राष्ट्राच्या दु:खात आणखी भर पडली.

तारीख ९ मार्च रोजीं चान्सलरच्या तोंडून बादशहाचा मृत्यूची बातमी ऐकण्याकरता दुपारीं बारा वाजता पार्लमेंट सभेची बैठक झाली. बिस्मार्क सभागृहांत आल्याबरोबर सर्व सभागृह उठून उभें राहिलें. बिस्मार्क यांनीं बादशहाच्या मृत्यूची बातमी सागून फ्रेड्रिक बादशहा तक्तनशीन झाल्याचें त्यानीं जाहिर केलें. या वेळीं ते म्हणाले,

"तहकुबीच्या खलित्यावर बादशहांनी आपली आद्याक्षरें घातलीं तरी पुरे असे मी त्यास म्हटलें, तेव्हां ते मला म्हणाले, "माझ्या हातांत शक्ति आहे, तोंवर सर्व कामें मी रीतसर करीन" त्यांच्या अखेरच्या सहीचा हा खलिता आपणापुढें पडला आहे. बादशहाच्या हुकुमाप्रमाणें बैठक तहकूब व्हावी हें ठीक आहे, पण नवे बादशहा राजधानीला येऊन पोहोंचेपर्यंत ही बैठक चालू ठेवावी याबद्दल कोणी वाद करणार नाहीं, असें मला वाटतें. सध्या केवळ सरकारी नात्यानें मी आपणापुढें उभा आहें. अशा वेळीं माझ्या धन्याच्या मृत्युबद्दल मला काय वाटतें, याचा पाढा वाचीत बसणें योग्य होणार नाहीं. आणि वास्तविक पाहता, तसें वर्णन करण्याची जरूरीहि नाहीं. कारण माझ्या अत:करणाची जी स्थिति आहे, तीच प्रत्येक जर्मन प्रजाजनाच्या अत:करणाची आहे, तथापि एक गोष्ट मला विशेषें करून सांगावयाची आहे. विशेषें करून आपल्या परम पूज्य बादशहास दोन गोष्टीमुळें फार सतोष झाला होता. त्याच्या चिरंजिवाची म्हणजे आपल्या सांप्रतच्या बादशहांची प्रकृति बिघडली, याबद्दल सर्व युरोपातूनच नव्हे, तर जगाच्या सर्व भागातून सहानुकपेचे संदेश बादशहास आले. यावरून या राजघराण्याबद्दल सर्वत्र सहानुकपा वसत आहे, हें निदर्शनास आल्यानें बादशहांस फार सतोष झाला. बादशहानीं आपल्या दीर्घ कारकीर्दीत जर्मन साम्राज्याबद्दल सर्वत्र सहानुकपा उत्पन्न करून ठेवली, हीच त्याची जर्मनराष्ट्रास बहुमोलाची देणगी होय. दुसरी गोष्ट अशी की, तक्तनशीन होताना जे बेत त्यानीं मनांत योजिले होते, ते त्याच्या मृत्यूच्या आधीं पूर्णपणें पार पडले. त्याच्या कारकीर्दीत जर्मन सस्थानांची सहति होऊन त्यांचें एक

बलाढ्य साम्राज्य निर्माण झालें. ही सहति कशी पक्की आहे, हें दाखविणारें ताजें उदाहरण नुकतेंच घडून आलें. सैन्याच्या वाढीसाठीं व साम्राज्यसंरक्षणा-साठीं लागणाऱ्या खर्चाची मजुरी सर्व पक्षांनीं एकजुटीनें दिली, हें पाहून बाद-शहास अत्यंत संतोष वाटला. काल रोजीं त्याची व माझी अखेरची मुलाखत झाली त्यावेळीं त्यांनीं मला हेंच सांगितलें सद्गृहस्थ हो! आपल्या परमपूज्य परलोक-वासी बादशहांनीं मजबरोबर पाठविलेला हा संतोषाचा संदेश तुम्ही आपल्या हृदयांत सांठवून ठेवाल अशी माझी खात्री आहे कारण बादशहास एवढा संतोष देण्याच्या कामीं तुम्हा सर्वांचीच मदत झाली आहे सद्गृहस्थ हो, आप-ल्या बादशहाचें शौर्य, त्याचा राष्ट्राभिमान आणि त्याची कर्तव्यजागरूकता हे सद्गुण त्यांनीं आपल्या मागें ठेवले आहेत. आपल्या पहिल्या बादशहाची ही अखेरची देणगी म्हणून या सद्गुणांची जोपासना करावी अशी मागणी आपण ईश्वरापाशीं मागू या."

भाषणाच्या शेवटीं शेवटीं बिस्मार्क याचा कंठ इतका दाटून आला कीं, त्याचे अखेरचे शब्द स्पष्टपणें बाहेर पडेनात. अखेरीस त्यानीं कांहीं वेळपर्यंत दोन्ही हातानीं आपलें तोंड झांकून घेतलें. सर्व सभा अगदीं स्तब्ध झाली होती.

एका प्रसंगीं बिस्मार्क राजीनामा द्यावयास निघाले असतां "तुमची आमची ताटातूट कधींच होणार नाहीं" असें बादशाहा म्हणाले होते. बादशहाच्या मृत्यूपर्यंत त्याचे हे शब्द खरे झाले. विजयी वुइलियम बादशहाच्या मृत्यूनें जुना मनू संपून जर्मनीच्या नव्या मनूस सुरुवात झाली, असें प्रत्येकास वाटलें. बिस्मार्क हे प्रधानपदीं कायम राहणार हें पाहून प्रत्येक देशभक्तास फार आनंद झाला. नव्या मनूच्या उदय-काळीं जर्मनराष्ट्राचीं सूत्रें बिस्मार्क सारख्या धुरंधर मुत्सद्याच्या हातीं असणें सर्वांसच इष्ट वाटलें.

मध्यरात्रींच्या प्रशांत वेळीं पहिल्या वुइलियम बादशहाचें शव राज-वाड्यांतून स्मशानभूमींत नेण्यांत आलें. कडाक्याची थंडी असल्या-

मुळें बर्फ पडत असताहि हजारों नगरवासी त्यांच्या अखेरच्या दर्शनास आले होते. यानतर बरोबर नव्याण्णव दिवस राज्य करून बादशाहा दुसरे फ्रेड्रिक परलोकवासी झाले.

तारीख ११ मार्च रोजीं बिस्मार्क सर्व प्रधानमंडळासह लिपझिग येथें फ्रेड्रिक बादशहाच्या भेटीस गेले होते. नव्या बादशहानें अत्यंत प्रेमानें त्याचें स्वागत करून त्यांस आलिंगन दिलें. भावी राज्यधोरणा-बद्दल जी बाटाघाट झाली, तीवरून नवे बादशहा व बिस्मार्क यांचें धोरण अगदीं एक होतें, असें दिसून आलें. नव्या बादशहाच्या कार-कीर्दीत तरी बिस्मार्क यांचें उच्चाटण होईल, अशी आशा त्याच्या शत्रूंस वाटत होती; पण ती अशा रीतीनें निष्फळ झाली.

तारीख २५ मार्च रोजीं बिस्मार्क यांनीं आपल्या लष्करी पेशाचा पन्नासावा वाढदिवस साजरा केला. तारीख १ एप्रील रोजीं त्यांचा त्र्याहत्तरावा वाढदिवस साजरा झाला. त्यावेळीं युवराजानीं त्यास आयु-रारोग्य चिंतितांना पुढीलप्रमाणें भाषण केलें.

" खुदावत मेहरबान !

आपण गेल्या चाळीस वर्षांचा जो उल्लेख आतां केला, त्या सर्वांत चालू वर्षाइतकें महत्वाचें वर्ष दुसरें नव्हतें ज्या वुइलियम बादशहाची नौकरी इमानें इतबारें सत्तावीस वर्षें केली, तो बादशहा आपणासर्वांस सोडून गेला आहे त्याच्या जागीं नव्या बादशहाचें स्वागत सर्व राष्ट्रानें मोठया उत्सहानें केलें आहे. पितृभूमीला जें काहीं महत्व आज प्राप्त झालें आहे, तें प्राप्त करून देण्यांत आपल्या सांप्रतच्या बादशहानीं महत्वाची कामगिरी बजावली आहे. वुइलियम बादशाहाची नौकरी जितक्या नेकीनें आपण बजावली, तितक्याच नेकीनें व जर्मनशीलास अनुरूप अशारीतीनें आपण आम्हां सर्वांसह नव्या बादशहाची नौकरी बजवाल अशी माझी खात्री आहे. आपला जुन्या मोहोरक्या रणभूमीवर पतन पावला आहे. त्याच्या जागीं आलेला नवा सेनापति जखमी झाला असताहि छाती ठोकून पुढें दौड करीत निघाला आहे. त्याचा विजयध्वज

आपल्या हातीं असून सर्वांचे डोळे त्या ध्वजाकडे आता लागले आहेत जर्मन-साम्राज्याचा हा विजयध्वज परमेश्वर कृपेनें आपल्या खांद्यावर आणखी पुष्कळ काळ असाच फडकत राहावा, हीच आम्हा सर्वांची मनःपूर्वक इच्छा आहे. ”

राजकन्या विक्टोरिया हिचा विवाह बल्गेरियाचा माजी राजा आले-क्झांडर याशीं व्हावयाचें घाटत होतें. हा विवाह इ० स० १८८४ सालीं व्हावा असें ठरत होतें; पण या विवाहाला बादशहानीं मंजुरी दिली नाहीं; कारण राजकीयदृष्ट्या अशा प्रकारचा विवाह जर्मनीला प्रतिकूल झाला असता. वुइलियम बादशहा वारल्यानंतर अलेक्झांडरच्या पक्षास पुन्हा आशेचा अंकूर फुटला. या पक्षाला नवी महाराणी व इंग्रज दरबार याचाहि पाठींबा होता. हा विवाह होऊं नये अशी बिस्मार्क याची फार इच्छा होती. हा विवाह झाला असता एक तर रशियाशीं युद्ध उपस्थित होईल अथवा असें युद्ध टाळावयाचें असेल, तर जर्मनीची नाचक्की होईल, अशी बिस्मार्क यानीं नव्या बादशहाची खात्री करून दिली. तेव्हां बाद-शहांनीं तारीख १० एप्रिल रोजीं हा विवाह मोडल्याचें जाहिर केलें. बिस्मार्क याच्या शत्रूंस या संधीचा उपयोग केल्यावाचून राहवेना. बाद-शहाच्या कुटुंबाच्या खाजगी गोष्टींतहि ढवळाढवळ करूं पाहणारा हा उपट-सुंभ कोण? अशी पृच्छा ते करूं लागले. नवे बादशहा आता केवळ नामधारी बनले असून सर्व अंतर बाह्य सत्ता बिस्मार्क याच्या हातीं गेली आहे, असें ते म्हणू लागले. रशियाच्या मैत्रीचें निमित्त करून बिस्मार्क यानी महाराणीचा व इंग्लंडच्या राणीचाहि उद्धटपणें अपमान केला, असा आरोप ह्याच्या शत्रूनीं त्याच्यावर केला. तथापि एवढ्या वावटळींतहि बादशहाची पूर्ण मर्जी त्यांजवर कायम राहिली; ही गोष्ट लक्षांत ठेवण्या-सारखी आहे.

आपल्या परमपूज्य पित्यानें घालून दिलेल्या धड्याप्रमाणें नवे बादशहा आपल्या कर्तव्यास पूर्णपणें जागत असत. त्याचा रोग दिवसेंदिवस

बळावत जात होता. त्याची शक्ति क्षीण होतहोती; तथापि ते कधींहि कर्तव्य विन्मुख झाले नाहींत. पुट्क्यामर नावाच्या एका प्रधानानें या वेळीं राजीनामा दिला. हे प्रधान ह्मणजे बिस्मार्क यांचा उजवा हात असा सर्वांचा समज होता. यामुळें त्याच्या राजीनाम्यानें बिस्मार्क याच्या शत्रूस मोठा संतोष वाटून ही पाळी खुद्द बिस्मार्क याजवर आतां लवकरच येईल, अशी आशा त्यास उत्पन्न झाली. तारीख १५ जून रोजीं नवे शूर बादशहा फ्रेड्रिक यांचा शरीर भोग संपून त्यानीं परलोकीं प्रयाण केलें.

फ्रेड्रिक बादशहाच्या मृत्यूनंतर घडलेल्या एकदोन दु:खकारक गोष्टींचा उल्लेख येथें करणे अवश्य आहे.

बादशहा मरण पावल्यानंतर त्याच्या गळ्यावर शस्त्रक्रिया करतांना त्याचा रोग तीव्र स्वरूपाच्या घटसर्पाच्या जातीचा होता, असें आढळून आलें. डॉक्टर सर मॉरेल मेकेन्झी यांनीं निराळेंच निदान ठरविलें होतें. ही शस्त्रक्रिया झाल्यानंतर आपल्या कीर्तीस उणेपणा येऊ नये ह्मणून राजकीय कारणासाठीं आपण रोगाचें खरें स्वरूप लपविलें, असें तें ह्मणूं लागले.

याच सुमारास डयुश्‌रण्डसचॉ नावाच्या एका मासिकानें ' मृतबादशहाची रोजनिशी, या नावानें एक लेख प्रसिद्ध केला. बादशहा फ्रँको-जर्मन युद्धात सेनापति या नात्यानें काम करीत असता त्यानीं लिहिलेली रोजनिशी म्हणून काहीं उतारे या मासिकात प्रसिद्ध झाले होते. मृत बादशहाची व त्याजबरोबर बिस्मार्क याचीहि नालस्ती करावी, असा या लेखाचा उद्देश स्पष्ट दिसून येत होता. रोजनिशींतलें कांहीं उतारे देऊन साम्राज्य रचनेच्या बाबींत युवराज व बिस्मार्क यांनीं जर्मन संस्थानिकांच्या हक्कांची पायमल्ली करण्याचा बेत केला होता, असें सिद्ध कर-

ण्याचा यत्न केला होता. दक्षिण जर्मन संस्थानाबद्दल बिस्मार्क यांचें चागलें मत असल्याचा जेथें जेथें उल्लेख होता, असे सर्व भाग दडपून टाकण्यात आले होते.

ही रोजनिशी प्रसिद्ध झाल्यामुळें जर्मन संस्थानिकाच्या दृष्टीनें मृत बादशहांचे नाव बद्दू होण्याचा प्रसंग आला, तेव्हां या बाबीचा सर्व खुलासा हल्लींचे बादशहा दुसरे वुइलियम यांनीं बिस्मार्क यांस विचारला. ही सर्व रोजनिशी खोटी असली पाहिजे, असें बिस्मार्क यानीं बादशहास सागितलें. कदाचित ती खरी असली, तरी सर्व घडामोडींची हकीकत फ्रेड्रिक यास यथातथ्य समजणें शक्य नव्हतें. प्रत्यक्ष घडलेल्या गोष्टी म्हणून फेड्रिक यानीं काहीं गोष्टी नमुद केल्या होत्या, त्यांच्या तारखात मेळ नव्हता. या अंतरगत पुराव्यावरूनच या रोजनिशीला कांहीं महत्व नाहीं,असें सिद्ध होत असल्याचें बिस्मार्क यानीं बादशहास सागितलें.

या लेखकाचें नाव डॉ० गेफ्ट्केन असें असून फ्रेड्रिक बादशहाचा तो विद्यालयीन मित्र होता. केवळ मित्र या खाजगी नात्यानें युवराज फ्रेड्रिक यांनीं आपली रोजनिशी त्याला वाचावयास दिली होती. तींतील काहीं कांहीं उताऱ्यांचे भाग युवराजांच्या परवानगीशिवायच गेफ्टकेन् यानीं उतरून घेतले होते. गेफ्टकेन् याजवर कोर्टांत खटला उभा राहिला; पण अशा रीतीनें रोजनिशी प्रसिद्ध करण्यात आपण काहीं गुन्हा करीत आहों, ही जाणीव त्यास नव्हती, या मुद्यावर कोर्टानें त्यास दोषमुक्त केलें.

फ्रेड्रिक बादशहाचें नव्याण्णव दिवसाचें राज्य अशा प्रकारच्या दु:खकारक प्रसंगानें सपलें. या गोष्टीनें बिस्मार्क यास फार दु:ख झालें. विशेषत: प्रशियाच्या राजघराण्यावर अशा प्रकारचा शिंतोडा उडालेला पाहून त्यांस फार कष्ट झाले.

## प्रकरण बाविसावें.

# नवे बादशाहा.

दुसरे वुइलियम हे प्रशियाचे राजे व जर्मनबादशाहा या नात्यानें सिंहासनारूढ झाले. आपल्या पूज्य पित्याच्या धोरणानेंच आपला राज्यकारभार चालवूं, असें आश्वासन त्यांनीं चान्सेलरच्याद्वारें पार्लमेंटास दिलें. तारीख २५ जून रोजीं पार्लमेंटाची बैठक बादशाहांनीं बोलाविली. या प्रसंगीं पुष्कळ जर्मन सस्थानिक व राजपुत्र जातीनें हजर होते. यूरोपच्या शांततेचा भंग होऊं नये ह्मणून आपण नेहमीं दक्ष राहूं व परचक्रापासून जर्मनीचें रक्षण करण्याचा नित्य यत्न करूं, असें आरंभींच्या भाषणात त्यांनीं सागितलें. भाषणाच्या अखेरीस त्यांनीं आपला हात बिस्मार्क यांजपुढें केला; तेव्हां बिस्मार्क यांनीं त्याचें चुंबन घेतलें. राज्यकारभारात पूर्वीप्रमाणेंच भक्तिपूर्वक नव्या बादशाहांची आपण सेवा करूं, असें या कृतीने बिस्मार्क यानीं दर्शविलें. तारीख २७ जून रोजीं प्रशियाची राजसभा भरली. त्या वेळीं फेड्रिक दी ग्रेट यांचा कित्ता वळवून गादीची नोकरी आपण करूं, असें नव्या राजानें जाहीर केलें.

प्रसिद्ध धर्मसुधारक मार्टिन ल्यूथर याच्या जन्मतिथीच्या दिवशीं ह्मणजे तारीख १० नवंबर रोजीं जीसेनच्या विश्वविद्यालयानें बिस्मार्क यांस डॉक्टर ऑफ थिऑलोजी ही बहुमानाची पदवी दिली. या वेळींहि बिस्मार्क याचे शत्रू त्यांजवर मधून मधून हल्ले करीतच होते. राजोपाध्याय स्टोकर हा बिस्मार्क यांचा कट्टा शत्रु होता. त्याला इतर भिक्षुकाचें व पार्लमेंटांतील स्वतंत्रतावादी पक्षाचें पाठबळ होतें. तुमची ही वागणूक अगदीं गर्हणीय आहे, असें नव्या बादशाहानें उघडपणें या लोकांस सागून त्याच्या पक्षाच्या क्रूझ झिटंग नावाच्या

पत्रास दरबारात बंदी केली. या पक्षांत बिस्मार्क याचे कित्येक जुने स्नेहीहि होते. या जुन्या स्नेह्यांनींच बिस्मार्क यास फार त्रास दिला.

तारीख ३१ जुलई व १९ आक्टोबर रोजीं वुइलियम बादशहा बिस्मार्क याच्या भेटीसाठीं फ्रेड्रीकश्रू येथें गेले होते. त्यानंतर पिटर्स-बर्ग ( पेट्रोग्राड ), रोम, व्हियेन्ना वगैरे ठिकाणीं बादशहाची स्वारी फिरतीवर असता बिस्मार्क याचे चिरंजीव कौंट हर्बर्ट त्याजबरोबर होते. तारीख ३१ दिसेंबर १८८८ रोजीं बादशहानीं बिस्मार्क यास एक पत्र लिहिलें आहे, त्यावरून बिस्मार्क याजबद्दल त्याचें मत कसें होतें, हें दिसून येईल.

प्रिय प्रिन्स,

आपणांस बहुताशीं अनिष्ट असें हें वर्ष आज सपलें. नव्या वर्षी तुमच्या-सारखा राजभक्त माझ्या मदतीस अद्यापि आहे, एवढीच माझ्या समाधानाची जागा आहे. परमेश्वरानें तुह्मांस दीर्घायुरारोग्य देऊन सुखी करावें, एवढीच माझी मनःपूर्वक इच्छा आहे. आपल्या पितृभूमीच्या कल्याणासाठीं मजबरोबर परिश्रम करण्यास तुह्मी दीर्घकाळ रहावें, अशी मी परमेश्वराची प्रार्थना करतों.

नव्या बादशहाचा पूर्ण विश्वास आपणावर आहे, असें पाहून बिस्मार्क यास फार संतोष वाटला व लोकहिताचीं नवीं नवीं कार्यें हातीं घेण्यास त्यास हुरूप आला. तारीख २९ मार्च सन १८८९ रोजीं कामकरी वर्गाची वृद्धापकाळची तरतूद लावण्यासाठीं एक कायद्याचा मसुदा पार्लमेंट पुढें त्यानीं आणला. तारीख २४ मे रोजीं हें बील बहुमतानें पास झालें.

याच सालीं इटलीचा राजा व आस्ट्रिया आणि रशिया याचे बादश-हा बर्लिन शहरीं आले. या वेळीं रशियन बादशहाशीं बिस्मार्क याची एकांतीं मुलाखत झाली. तेव्हा झार ह्मणाले, “ प्रधानपद आपणा-कडे राहील, अशी आपली खात्री आहे का ? ” हा अचानक प्रश्न

ऐकून बिस्मार्क यास मोठें नवल वाटलें. त्यांनीं उत्तर दिलें, "होय सरकार ! मी जिवंत असेंपर्यंत प्रधानकीचें काम करीन;" पण दैवयोग असा चमत्कारिक कीं, हे शब्द उच्चारले गेल्यानंतर पाचच महिन्यांनीं बिस्मार्क हे आपल्या गांवीं सामान्य गृहस्थाच्या नात्यानें जाऊन राहिले.

कामकरीवर्गाचें कांहीं तरी हित साधून त्यांचें कायमचें हितरक्षण होईल, असें करण्याचा बादशहांचा मनोदय होता. तारीख २४ जानेवारी सन १८९० रोजीं प्रधानमंडळाची एक खाजगी बैठक बसली असतां बादशहानीं आपला हा मनोदय प्रधानमंडळास सांगितला.

सोशियालिस्ट पक्षास बिस्मार्क याचें मत आरंभापासूनच प्रतिकूल होतें. त्या पक्षाला उत्तेजन मिळण्यासारखें वर्तन बादशहा करीत आहेत, हें पाहून त्यास फार नवल वाटलें. कौंट डग्लास, डॉ. हिन्जपीटर वगैरे सारख्या लोकानीं तयार केलेल्या सरकारी हुकूमनाम्यावर बादशहांचें शिक्कामोर्तब पडल्यास, कामकरी वर्ग शेफारून जाऊन दिवसेंदिवस अधिकाधिक भयंकर स्वरूपाच्या मागण्या करील, असें बिस्मार्क यानीं बादशहास स्पष्टपणें सांगितलें. याशिवाय ही गोष्ट पूर्वींच्या बादशहाच्या धोरणास सोडून असून अशा वर्तणुकीनें बादशहाच्या उदार धोरणाचा विपर्यास होऊन भलतेच परिणाम होण्याचा संभव आहे, असेंहि ते म्हणाले.

या प्रधानमंडळीच्या बैठकीचें वर्णन बिस्मार्क यांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे.

अशा प्रकारचे कांहींतरी हुकूम काढावे, असा बादशहाचा पुष्कळ दिवसाचा मनोदय होता. हिंजपीटर, कौंट डग्लास वगैरे लोकानीं पुष्कळ वेळा बादशहाच्या मुलाखती घेऊन याविषयीं वाटाघाट केली होती. अशा रीतीनें नव्या निवडणुकींत निवडून येण्याचा आपला मार्ग ते मोकळा करीत होते. केवळ तरबदष्टया हे हुकूम मला अमान्य होते; पण खुद्द बादशहाचा अत्यंत

आग्रह आहे, असें पाहून त्यांत कांहीं थोडे फेरफार करून ते प्रसिद्ध करावे, असा अर्ज बादशहास मी केला. पूर्वीचा मसुदा फारच भयंकर स्वरूपाचा होता. त्यात फेरफार करून त्याचें उग्ररूप मीं बरेंच कमी केलें. सर्व कामकरी वर्गाचें एक मंडळ स्थापावें, असें मीं सुचविलें. यामुळें कामकरीवर्गाच्या असंतोषाची तीव्रता बरीच कमी होईल, असें मला वाटलें. पण मंडळाची बैठक भरल्यानंतर हा माझा उद्देश विफल झाला असल्याचें मला आढळून आलें. या सभेंत कामकरी वर्गाच्या मागण्याविरुद्ध भाषण करण्याचें धैर्य एकासहि झालें नाहीं व भावी भयाबद्दल एकानेंहि तोंडावाटे शब्दसुद्धां काढला नाहीं. इतर प्रधान या बादशाही हुकुमास अनुकूल मत देणार नाहींत, असा माझा समज होता. अखेरीस तोहि खोटा ठरला.

सर्व कामकरी वर्गाच्या हितसंबंधाचें रक्षण करण्याकरता सर्व संस्थानांतील कामकऱ्यांचें एक मध्यवर्ती मंडळ स्थापण्यात यावें, असा पहिला ठराव होता. कामाचे तास व पद्धति हीं निश्चित करण्यात यावींत व कामकरी वर्गाची शरीरप्रकृति, त्यांची नीतिमत्ता व त्यांच्या गरजा हीं लक्षांत घेऊन तदनुरूप कामाची पद्धति योजावी, असा दुसरा ठराव होता.

या वेळीं मुख्य प्रधानकीशिवाय बाकीच्या सर्व जागांचा राजीनामा द्यावा, असा बिस्मार्क याचा विचार होता, पण नवी निवडणूक लवकरच होणार असल्यामुळें आपल्या राजीनाम्यानें तींत घोटाळा होईल, असा विचार करून राजीनाम्याचा बेत त्यानीं तूर्त तहकूब केला.

जर्मनींतील सोशल डेमोक्रयाट पक्षाला आपण आपल्या कह्यात पूर्णपणें ठेवूं शकूं, अशी बादशहांना मोठी उमेद होती; पण तारीख ५ फेब्रुआरी रोजीं प्रसिद्ध झालेल्या बादशाही खलीत्यानें इष्ट परिणाम झाला नाहीं, असें त्यांना आढळून आलें. बादशाही खलित्यातील देणग्या म्हणजे आमच्या मागण्याचा एक अत्यल्प अंश मात्र आहे, अशी ओरड सोशल डेमोक्रयाट पक्षानें सुरू केली. पार्लमेंटांत आपल्या पक्षाच्या हातांत

सत्ता आणून आपल्या मागण्या तेथें मंजूर करून घेईपर्यंत आपला खरा विजय होणार नाहीं, असें हा पक्ष ह्मणू लागला. बादशहानीं दिलेल्या देणग्या हा विजयच नव्हे. खरा विजय आपल्या बळानें संपादन केला पाहिजे, अशा प्रकारची या पक्षाची ओरड ऐकून बादशाहांचा आत्मविश्वास थोडासा डळमळला.

या विषयासंबंधीं बिस्मार्क यांनीं पुढीलप्रमाणें आपलें मत प्रसिद्ध केलें.

"सोशियालिस्ट लोकाशीं भांडण्याचा ज्याला प्रसंग येईल, त्याला दोन मार्ग मोकळे असतात. त्याच्या सर्व मागण्या निमूटपणें कबूल करणें अथवा त्याच्याविरुद्ध सामना बांधणें. सत्तर वर्षांच्या वयानें मिळणारा कडू अनुभव बादशाहाना मिळाला नसल्यामुळें त्यांनीं त्यांच्याशीं तह करण्याचा घाट घातला माझी इच्छा युद्ध करण्याची होती, आणि हें युद्ध जितक्या लवकर सुरू होईल तितकें बरें, असेंहि मला वाटत होतें. प्रधानपदाचा मीं राजीनामा दिला, या गोष्टीच्या अनेक कारणापैकीं हेंहि एक कारण होतें."

सोशियालिस्ट लोकाचा घोटाळा इकडे अशा प्रकारें चालू असतां आणखीहि एक गोष्ट घडून बिस्मार्क ह्यास आपल्या हातचीं राज्यसूत्रें सोडणें जरुरीचें झालें. बर्लिन येथील प्रख्यात सावकार फॉं ब्लीक्रोडर बिस्मार्क यास भेटावयास आला. त्याजबरोबर वुइंड थार्स्ट नावाचा पार्लमेंटाचा एक प्रतिनिधी होता. सुमारें तासदीडतासपर्यंत या दोघांनीं बिस्मार्क यांची एकांतीं मुलाखत घेतली. या वेळीं नव्या पार्लमेंटांत सेन्टर अथवा क्याथोलिक पक्षानें कोणता मार्ग स्वीकारावा, याची वाटाघाट झाली. इ. स. १८७० सालानतर धार्मिक बाबतींत जे कायदे पास झाले होते, ते काढून टाकावे, अशी मागणी वुइंड थार्स्ट

यांनीं बिस्मार्क याजकडे केली. अशा प्रकारच्या मागणीस बिस्मार्क अनुकूल होतील, हें शक्यच नव्हतें.

वास्तविक पाहता या भेटींत राजकारणविषयक कोणत्याहि महत्वाच्या बाबीचा खल झाला नव्हता; तथापि बादशहाकडे या भेटीची जी हकीकत पोहोंचली, तिला बरेंच तिखटमीठ लागलें होतें. पूर्वीं आपल्याविरुद्ध असलेल्या क्याथोलिक पक्षास वश करून घेऊन बिस्मार्क बादशहांचें धोरण हाणून पाडण्याचा यत्न करीत आहेत, असा विपर्यस्त मजकूर बादशहाच्या कानावर गेला.

या गोष्टीमुळें बादशहांना अतिशयीत वाईट वाटलें, हें सांगणें नकोच. 'बिस्मार्क यास राजकारभाराच्या बाबतींत कोणाहि प्रतिनिधीची भेट घेणें असेल, तर तिची अगाऊ बातमी बिस्मार्क यानीं मला द्यावी' अशा अर्थाचा हुकूम त्यानीं बिस्मार्क यास पाठविला. "मीं माझ्या घरीं कोणाची भेट घ्यावी अथवा न घ्यावी, हें ठरविण्याचा माझा हक्क मी सोडूं इच्छित नाहीं." असें या हुकुमावर बिस्मार्क यांनीं उत्तर दिलें.

दुसरे दिवशीं सकाळीं दहा वाजतां बादशहांची स्वारी बिस्मार्क याच्या घरीं गेली. रात्रीच्या जागरणामुळें बिस्मार्क अद्यापि झोंपेंतच होते; पण बादशहांची स्वारी आली आहे हें ऐकून ते एकदम त्याच्या भेटीस गेले. वुइड थार्स्टच्या भेटींत कोणता विषय निघाला होता, असा प्रश्न बादशहानीं केला. बिस्मार्क ह्मणाले, "आमचें भाषण केवळ खाजगी आणि व्यक्तिविषयक होतें." "पुन्हा कोणाची भेट घेणें झाल्यास त्या गोष्टीची आगाऊ खबर दिलीच पाहिजे." असें बादशहानीं एकदोनदां बजावताच बिस्मार्क यांनीं उत्तर दिलें, "माझ्या भेटीस कोणीहि आला, तरी त्याला माझें दार सदोदित उघडें राहिलें पाहिजे. माझ्या दाराची किल्ली मी दुसऱ्या कोणाच्याहि स्वाधीन करूं इच्छित नाहीं." "मी

तुमचा बादशहा, तुम्हास हुकूम करीत असताहि तुह्मी तो ऐकणार नाहीं काय ?" "अशाप्रकारचा हुकूम माझ्यानें ऐकवत नाहीं. माझी वुइल्यिम बादशहास मी वचनबद्ध झालों असल्यामुळें इतके दिवस मीं काम केलें; पण बादशहाची आतां तशी मर्जी नसेल, तर प्रधान-पदाचा अधिकार सोडण्याची माझी तयारी आहे." बिस्मार्क व दुसरे वुइल्यिम बादशहा यांजमधील या दु:खकारक प्रसंगाची हकीकत उपलब्ध आहे, ती अशी:—

यापुढें वुइल्यिम बादशहाशीं आपलें पटावयाचें नाहीं व सर्व राज्यसूत्रें स्वत:च्या हातीं घेण्याचा निश्चय बादशहानीं केला आहे, असे बिस्मार्क यास कळून चुकलें. ह्याच दिवशीं बादशहा व बिस्मार्क याज-मध्यें पूर्वीच्या एका जुन्या बादशाही हुकुमासंबंधीं काहीं भाषण झालें. बादशहा, मुख्य प्रधान व इतर प्रधानमंडळ यांचा परस्परसंबंध कसा असावा, हें या कागदांत ठरविण्यांत आलें होतें. तारीख ८ सपटंबर सन १८५२ रोजीं राजे चवथे फ्रेड्रिक वुइल्यिम यानीं हा हुकुम दिला होता. प्रशियन प्रधानमंडळावर मुख्य प्रधानानें देखरेख ठेवावी. राज्य-कारभाराच्या बाबतींत एकादा नवा हुकुम एकाद्या प्रधानास काढणें असल्यास त्याबद्दल आगाऊ खबर त्यानें मुख्य प्रधानास द्यावी. अशा एकाद्या हुकुमावर राजमुद्रा होण्याची जरूरी असल्यास मुख्य प्रधानानें त्या बाबींतील सर्व कागद आपल्या मतासह राजापुढें ठेवावेत. एकाद्या खात्याच्या मुख्य अम्मलदारास राजाची प्रत्यक्ष भेट घेणें असल्यास त्यानें प्रथम मुख्यप्रधानास आगाऊ कळवावें, ह्मणजे मुख्य प्रधानास वाटल्यास त्याला त्या भेटीच्या वेळीं हजर राहतां येईल. अशा प्रकारचा हा हुकूम होता. यावरून मुख्य प्रधानाच्या हातीं प्रशियन राजानीं केवढी सत्ता दिली होती, हें दिसून येतें. या जुन्या हुकुमास

अनुरूप अशी बिस्मार्क याची वागणूक होती. गादीचे विशेष हक्क बळकवावेत अशा धोरणाचें वर्तन त्यांनीं कधीं केलें नाहीं; पण त्यांच्या वागणुकीनें तसा अर्थ करण्यास त्याच्या शत्रूंना मात्र फावलें. इ. स. १८८२ च्या जानेवारी महिन्याच्या ४ थ्या तारखेस पहिल्या वुइलियम बादशाहानीं राज्यकारभाराच्या बाबींत जो हुकूम काढला, तोहि वरील मतास पुष्टीकारक होता. तो हुकूम असा:—

नवीन राज्यरचनेमध्ये प्रशियाचे राजकारण व राज्यपद्धति यांचें नेतृत्व राजाकडे असण्याचा त्याचा हक्क नियन्त्रित झाला असला, तरी तो नष्ट झाला असें नाहीं. राजाच्या हुकुमावर प्रधानाच्या सहीची जोड असलीच पाहिजे. पण असें असलें तरी तो हुकूम राजाचाच असून त्याच्या मताप्रमाणेंच तो दिला गेला आहे, असें समजावेंच. त्या हुकुमाच्या द्वारें राजानें आपलें मत नव्या राजशासनपद्धतीला अनुरूप अशा रीतीनें व्यक्त केलें आहे, असें समजावें. या करतां तें मत जबाबदार प्रधानाचें आहे, असें न समजतां राजाचेंच आहे, असें समजलें पाहिजे. कारण तसें न होईल, तर राजाच्या हक्कासंबधीं लोकांत गैरसमज उत्पन्न होईल. प्रशियाच्या पूर्वपरंपरेच्या राजाच्या हक्कास अनुसरूनच राजशासनपद्धति आखली गेली आहे. राष्ट्र आणि राजा यांचे परस्पर संबंध कायम राखून त्याद्वारेंच ही वाढ झालेली आहे. हे परस्पर संबंध राजानें नेमलेल्या प्रधानांच्या हातीं सोंपविणें शक्य नाही. राजाच्या व्यक्तीशीं हे संबंध जोडले गेलेले आहेत. आणि पूर्वपरंपरेस अनुसरून ते कायम राखणें राजकीय दृष्ट्या प्रशियास आवश्यक आहे. याकरतां जो हक्क माझ्याकडे आहे व जो माझ्या वंशजाकडे पुढें चालावयाचा आहे, त्यासंबधीं प्रशियांत कोणीहि प्रश्न उपस्थित करू नये, असें या हुकुमाच्या द्वारें मी फर्मावितों. राजशासनाचें नेतृत्व माझ्याकडे व माझ्या वंशजाकडे पूर्वीप्रमाणेंच चाललें पाहिजे. या माझ्या कायदेशीर हक्काचें रक्षण करणें, त्यासंबधीं लोकांचा गैरसमज होऊं न देणें, हें माझ्या प्रधानाचें कर्तव्य आहे. माझ्याशीं एकनिष्ठ राहाण्याची शपथ ज्या ज्या कामगारानी घेतली असेल, ते सर्व याच तत्वास अनुसरून वागतील, असा मला भरवसा आहे.

राजाच्या हातांतील सत्ता आपल्या हातीं घेऊन बिस्मार्क मनमानेल तसा हुकूम करतात, असा जो आरोप त्याच्या पार्लमेंटीय प्रतिपक्षानीं त्यांजवर केला होता, त्याला राजाच्या या हुकुमानें चोख उत्तर मिळालें. इ. स. १८५२ सालचा हुकूम, पहिल्या वुइलियम बादशहाचा हुकूम आणि दुसऱ्या वुइलियम बादशहांच्या भेटीच्या वेळीं झालेलें संभाषण; यां प्रसंगांची परस्पर तुलना करून त्याचा एकत्र विचार केल्याशिवाय बिस्मार्क याच्या राजिनाम्याचें रहस्य लक्षांत येणार नाहीं.

इ. स. १८५२ सालच्या हुकुमासंबंधीची सर्व माहिती आपणांस लेखी कळवावी, असा हुकूम नव्या तरुण बादशहानें बिस्मार्क याना दिला. ही माहिती तारीख १७ मार्च रोजीं बादशहाच्या हातीं देण्याचा बिस्मार्क याचा विचार होता. तारीख १६ रोजीं झालेल्या भेटीचा विचार करता या भेटीसबंधीं मूग गिळून बसणें व एकदम राजीनामा न देणें हेंच इष्ट आहे, असें बिस्मार्क यांस वाटलें. तथापि बिस्मार्क यांच्या राजीनाम्याच्या अर्जाची बादशहा वाटच पहात होते. तारीख १७ मार्च रोजीं जनरल हँक याजबरोबर बिस्मार्क यास निरोप पाठवून त्याचा राजीनामा स्वीकारण्यास दुपारी दोन वाजतां राजवाड्यात आपण भेटूं असें बादशहानीं त्याना कळविलें. प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आपणास घर सोडता येत नाहीं, असें म्हणून राजीनाम्याचा अर्ज तयार करण्यास हँक यास त्यानीं सांगितलें. ते म्हणाले, “ माझ्या विवेकबुद्धीस अनुसरून सांप्रतचे राजकीय वातावरण पाहता बादशहा व पितृराष्ट्र यांची नौकरी इतक्या तांतडीनें सोडावी, हें मला इष्ट दिसत नाहीं. अशा रीतीनें मी राजीनामा दिल्यास लोकांत विनाकारण गैरसमज पसरेल. याशिवाय मला काढून टाकण्याचा हक्क बादशहास केव्हाहि आहेच. ”

गेल्या थोड्याशा दिवसाची हकीकत सर्व प्रधानमंडळाच्या कानावर घालून इ. स. १८५२ च्या हुकुमाच्या माहितीचा खलिताहि त्यांजपुढें

मांडावा म्हणून बिस्मार्क यांनीं प्रधानमंडळाची एक खास बैठक बोलावली. याप्रमाणें बैठक भरली असतां सर्वप्रधानांनीं या परिस्थितीबद्दल आपली चिंता व्यक्त केली. इ. स. १८५२ चा हुकूम अद्यापि कायदेशीर आहे, असें मत आरंभी सर्वांनीं दिलें; पण अखेरीस दोनच प्रधान या मतास चिकटून राहिले.

त्याच दिवशीं संध्याकाळीं फॉं बॉटिचर यांच्या घरीं प्रधानमंडळाची एक खाजगी बैठक झाली. या वेळीं बिस्मार्क हजर नव्हते. सांप्रतच्या परिस्थितींत आपलें धोरण काय ठेवावें, याचा विचार या प्रधानानीं या बैठकींत केला. ही बैठक भरणार असल्याबद्दल सर्वांनीं बादशहांना अगाऊ वर्दी दिली होती. "प्रिन्स बिस्मार्क यांजसंबंधीं माझा बेत पक्का झाला असल्यामुळें या बाबींत मला सल्ला देण्याचे परिश्रम कोणीहि घेऊं नयेत," अशी विनंति बादशहानीं सर्व प्रधानांस केली.

मध्यंतरीं आपला राजीनामा पाठविण्याबद्दल बिस्मार्क यासहि बादशहानीं सूचना केली. राजीनाम्याचा अर्ज पाठविण्याची आपली तयारी आहे; तथापि तो तयार करण्यास आपणास अधिक मुदत पाहिजे, असें ते म्हणाले. ज्याचें सर्व आयुष्य प्रशिया आणि जर्मन साम्राज्य याच्या सेवेंत खर्च झालें व पितृभूमीचें कल्याण ही एकच इच्छा ज्यानें तहाहयात मनांत बाळगिली, त्याला त्याचा राजकारणाशीं असलेला संबंध तडकाफडकी सोडता येऊं नये, यांत आश्चर्य नाहीं. आपणास राजीनामा देण्यास काय कारण घडलें, याची सविस्तर माहिती सर्व जनतेस कळणें अवश्य आहे, असें बिस्मार्क याना वाटत होतें.

तारीख १८ मार्च रोजीं बिस्मार्क यानीं आपला राजीनामा तयार केला. ऐतिहासिक दृष्ट्या अत्यंत महत्वाचा असा हा खलिता प्रसिद्ध झाला नाहीं; तथापि केवळ बादशहाच्या आग्रहामुळेंच राजीनामा देणें

आपणास भाग पडलें, असें मात्र बिस्मार्क स्पष्ट म्हणत असत. जर्मन साम्राज्याच्या इतिहासाचा अभ्यास करणारास अशाप्रकारचा कागद अत्यंत महत्वाचा होय, हें उघड होय. या दृष्टीनें विचार करतां हा कागद प्रसिद्ध झाला असता, तर इतिहासकारास त्याचा फार उपयोग झाला असता.

बिस्मार्क राजीनामा देणार असून त्याच्या जागीं जनरल फॉं क्याप्रिव्ही याची नेमणूकसुद्धा झाली, अशी गुणगुण लोकांत अगोदरच पसरली होती. पुष्कळास ही बातमी आरंभीं खरीसुद्धा वाटली नाहीं. कारण जर्मन प्रधानमंडळाच्या अनेक उलथापालथी झाल्या असताहि साम्राज्याचा झेंडा बिस्मार्क याच्या खांद्यावरच फडकत होता; पण आता तो त्याच्या खांद्यावरून निघून जाण्याची वेळ आली. त्याच्या जागीं ज्या मनुष्याची नेमणूक झाली, त्याचें नाव राजकारणाच्या बाबतींत कोणीं ऐकलें देखील नव्हतें. नव्या प्रधानाच्या कर्तबगारीबद्दल जर्मनींत द्विधा मत होतें. त्याच्या भावी कर्तृत्वाबद्दल बरीचशीं पत्रें मूग गिळून बसलीं होतीं. कौंट क्याप्रिव्ही हे उत्तम प्रतीचे सेनानी होते, याबद्दल कोणाासच संशय नव्हता. मेट्झ येथें त्यानीं आपली तलवार चांगली गाजविली होती. त्याचप्रमाणें हनोवरच्या सैन्याच्या अधिपतीच्या जागीं व आरमारी खात्याच्या मुख्याच्या जागींहि त्यानीं चांगलीं कामें केलीं होतीं. लष्करी दृष्ट्या पाहता त्यांनीं चांगलें नांव मिळविलें होतें यात शंका नाहीं. आपल्या अत्युत्तम सेनापतींपैकीं क्याप्रिव्ही हे एक आहेत, अशी खुद्द बादशहाचीहि खात्री होती, तथापि बिस्मार्क याची कामगिरी बजावण्याची पात्रता क्याप्रिव्ही यांच्या आगीं कितपत होती, हें अद्यापि सिद्ध व्हावयाचें होतें. सेनापतित्वापेक्षां कागदी घोडे नाचविण्यास शौर्याहून दुसऱ्या अनेक गुणाची अपेक्षा असते. या नव्या जागीं येऊन

क्याप्रिन्व्ही आपल्या पूर्वीच्या कीर्तींत भर पाडतात कीं, ती मलीन करतात, अशी शंका पुष्कळास येत होती. न्यूवीनर हेज्ब्लाट नावाच्या पत्रानें पुढील उल्लेख केला होता.

" मुख्य प्रधानाच्या जागीं क्याप्रिन्व्ही याची नेमणूक झाल्याचें ऐकून बर्लिन येथील जनतेस ज्याप्रमाणें आश्चर्य वाटलें, त्याचप्रमाणें इतर संस्थानाच्या प्रजाजनासहि फार आश्चर्य वाटलें असेल. साम्राज्याची धुरा खांद्यावर घेण्यास व प्रशियाचें राज्यधोरण सुरक्षित राखण्यास ज्या गुणाची आवश्यकता आहे, ते गुण क्याप्रिन्व्ही याच्या आर्गी आहेत, असें त्यांनीं या पूर्वी सिद्ध केलेलें नाहीं.

क्याप्रिन्व्ही याच्या नेमणुकीबद्दल लंडन येथील टाइम्सपत्रालाहि फार नवल वाटलें. जर्मनसाम्राज्याच्या नौकेचें सुकाणूं यापुढें खुद्द बादशहाच आपल्या हातीं ठेवणार, असा निष्कर्ष या नेमणुकीवरून टाइम्सनें काढला होता.

---

प्रकरण तेविसावें.

## प्रधानपदाचा त्याग.

तारीख २० मार्च रोजीं बिस्मार्क यानीं आपल्या राजीनाम्याचा अर्ज बादशहाच्या हुजुरास पाठविला. अर्ज गेल्यानंतर काहीं वेळानें बादशाहाकडून त्यांना पुढील उत्तर आलें.

प्रिय प्रिन्स

पुष्कळ वर्षेपर्यंत ज्या जागेवर आपण इतक्या यशस्वीपणें काम केलें, ती जागा सोडण्याचा आपला निश्चय झाला आहे, असें आपल्या अर्जावरून दिसून आल्यानें मला फार वाईट वाटतें. आमरण आपणांमधील संबंध कायम राहील, अशी मला आशा होती. आपण प्रधानपद सोडल्यामुळें किती घोटाळा होईल, याची पूर्ण जाणीव मला आहे; तथापि कोणत्या तरी रीतीनें मला स्वत:चें सांतवन करून घेणें भाग आहे. आपल्या शरीरस्वास्थ्यासाठीं यापुढें कामाची दगदग आपणावर पडूं देणें इष्ट नाहीं, असा विचार करून आपल्या राजीनाम्यास मी संमति देतों. तथापि आपली बुद्धिमत्ता, राजभक्ति आणि

राष्ट्रभक्ति याचा उपयोग मला व आपल्या पितृभूमीला नेहमीं होत जाईल अशी माझी खात्री आहे.

मी सिंहासनारूढ झालों, त्या वेळीं मला सल्ला देण्यास तुम्ही होता, ही परमेश्वराची फार मोठी कृपा होय, असें मी समजतों. प्रशिया आणि जर्मन साम्राज्य यांच्यासाठीं तुम्हीं तनुमनधनानें खटपट केली. त्याच प्रमाणें माझ्या घराण्याची व माझ्या पूर्वजाची जी सेवा तुम्ही केली, ती माझ्या व जर्मन राष्ट्राच्या मनातून केंव्हांहि जाणार नाहीं. तीबद्दल आम्ही आपले सदैव ऋणि राहूं. आपल्या शहाणपणानें आपण युरोपची शांतता कायम ठेविलीत व आपण आखून दिलेल्या याच मार्गानें पुढें पाऊल टाकण्याचा माझा निश्चय आहे. शांततारक्षणाबद्दल सारें युरोपहि आपणास धन्यवाद देईल. आपल्या अनेक गुणांस अनुरूप असें पारितोषिक देण्याचें सामर्थ्य माझ्या आंगीं नाहीं. माझ्या प्रजाजनांची व माझी स्वतःची कृतज्ञता मला तुम्हांस अर्पण करता येते, यांतच तुम्हाला संतोष मानला पाहिजे. माझ्या या कृतज्ञतेची अल्पशी खूण ह्मणून ड्यूक ऑफ लॉयनबर्ग ही पदवी मी आपणास अर्पण करतों. स्वतःचें पूर्ण आकाराचें एक चित्र मी आपणास लवकरच पाठवीन.

आपल्या वृद्धापकाळीं आपणास कोणताहि त्रास होऊं नये व आपणास दीर्घायुरारोग्य प्राप्त व्हावें, अशी मी परमेश्वराची प्रार्थना करतों.

बर्लिन २० मार्च १८९० विइलियम २ राजे.

बिस्मार्क यानीं लष्करी बाबींत जी देशसेवा केली होती, तिजबद्दल त्याच दिवशीं बादशहानीं दुसरें पत्र बिस्मार्क यांस लिहिलें.

माझ्या घराण्यासाठीं व पितृभूमीच्या कल्याणासाठीं तुम्ही ज्याप्रमाणें मनःपूर्वक झटला, त्याचप्रमाणें माझ्या लष्कराचीहि जी बिनमोल सेवा तुम्ही केली आहे, तिचा उल्लेख करणें मला अवश्य वाटतें. माझ्या परमपूज्य आजोबांच्या कारकीर्दींत अत्यंत बिकट प्रसंगीं लष्कराची नवी रचना करण्याच्या कामीं तुमचें पूर्ण पाठबळ होतें परमेश्वराच्या कृपेनें लष्कराची तयारी आपण अशी बेमालुम केली कीं, त्या सैन्यानें गेल्या युद्धात जयामागून जय मिळविले. गेल्या दोन महायुद्धात तुम्ही शिपायी या नात्यानेंहि आपलें कर्तव्य चोख बजाविलें. गेल्या कित्येक पिढयांपासून आमच्या राष्ट्रानें मिळविलेलें लष्करी बळ कायम राखण्यात आपण कधींहि कसूर केली नाहीं व प्रसंगीं जिवाचीहि पर्वा केली

नाहीं. आपल्या या धोरणामुळेंच शांततेचें सुख आमच्या राष्ट्रास लाभलें आहे. या गोष्टीचा उल्लेख करतांना केवळ स्वतःपुरतेंच मी बोलत नसून सर्व लष्कराच्या वतीनें हें मी आपणास सांगत आहें. याकरतां घोडदळाचे कर्नल जनरल व फील्ड मार्शल या पदव्या मी तुह्मास अर्पण करतों. या पदव्याचा उपभोग घेण्यास ईश्वरानें आपणास पुष्कळ आयुष्य द्यावें, अशी मी त्याची प्रार्थना करतों.

बर्लिन २० मार्च १८२० वुइलियम २ राजे.

बिस्मार्क याच्या राजीनाम्याची हकीकत प्रसिद्ध झाल्याबरोबर तरुण बादशहा बरोबर बिस्मार्क यांचें भांडण का झाले, याबद्दल नानातऱ्हेचे तर्क उपस्थित झाले. बर्लिन येथील रहिवाशासहि या गोष्टीचा उलगडा झाला नव्हता. या बातमीने ते अगदीं चकित होऊन गेले होते. खुद पार्लमेंटातहि बॉटिचर यानीं ही बातमी जेव्हा सांगितली, तेव्हा सारे प्रतिनिधी अगदीं स्तब्ध व चकित झाले.

यावेळीं सर्व जर्मन संस्थानिकांकडून बिस्मार्क याना सहानुकंपेचे संदेश आले. आस्ट्रियाचा बादशहा, बेलजमचा राजा व आस्ट्रियन आणि इटालियन प्रधान याचेकडूनहि संदेश आले.

वीमर संस्थानचे ग्रँड डयूक याजकडून वुइलियमबादशहास या बाबतींत पत्र आले, तेव्हा उत्तरादाखल पुढील तार बादशहानीं त्यास पाठविली.

आपल्या पत्राबद्दल मी फार आभारी आहें. मला अत्यंत दुःख होत असून पुष्कळ वेळ मी अगदीं उदासीन होऊन बसलों होतों. माझे आजोबा जणूं काय पुन्हा मृत झाले, असें वाटून माझें अंतःकरण अगदी जड होऊन गेलें; पण ईश्वराचीच तशी मर्जी असल्यामुळें काही झालें तरी, हें दुःख मला सहन केलें पाहिजे. राज्यनौकेचें सुकाणू आता माझ्या हातीं येऊन पडलें आहे. तिची पूर्वीचीच दिशा कायम असून तोच मार्ग पुढेंहि तिनें स्वीकारला पाहिजे

यावेळीं कौंट हर्बर्ट फॉं बिस्मार्क हे परराष्ट्रीय प्रधानाच्या जागीं काम करीत होते. त्यानींहि तारीख २१ मार्च रोजी आपल्या जागेचा राजीनामा दिला.

सर्व संस्थानांच्या प्रतिनिधि सभेचें अध्यक्षपद हा वेळपर्यंत बिस्मार्क याजकडेच होतें. या मंडळानेंहि बिस्मार्क यास सहानुभूतीचा संदेश पाठविला. बेडनचे ग्रँड ड्यूक व प्रिन्स ऑफ वेल्स हे जातीनें त्यांस भेटावयास गेले होते.

यावेळीं त्याचा उपमर्द करण्याची आलेली सोन्यासारखी संधि त्याच्या शत्रूंनीं वायां जाऊं दिली नाहीं. बिस्मार्क यांच्या 'पतना' बद्दल त्यास आनंदाच्या उकळ्या फुटल्या. पिटर्सबर्ग येथील 'नोव्यारेम्या' पत्राच्या बातमीदारानें त्याची मुलाखत घेतली, तेव्हा ते त्याजपाशीं म्हणाले,

"राज्यसूत्रांचा त्याग मीं केला, तेव्हा माझ्या काहीं 'सन्मित्राना' हायसें वाटलें. एकसारखा अठ्ठावीस वर्षें हीं सूत्रें माझ्या हातीं रहावीं, ही गोष्ट त्यास कशी सहन व्हावी बरें? अठ्ठावीस वर्षे? हा निव्वळ जुलूम झाला! असल्या उद्धट मनुष्याला त्यानीं कधींच झुगारून द्यावयाला पाहिजे होतें! राज्यसूत्रें आपल्या हातीं यावींत अशासाठीं पुष्कळ वर्षें त्यास फुकट वाट पहात बसावें लागलें. तेव्हा आपल्या गुणांचें चीज होत नाहीं, हें पाहून त्यास वाईट वाटलें, यांत नवल नाहीं. अठ्ठावीस वर्षांच्या लांब अवधींत अशा प्रकारें हताश झालेल्यांची सख्या पुष्कळच मोठी फुगली असली पाहिजे"

नवीन प्रधान क्याप्रिव्ही याशीं बिस्मार्क यानीं आपला संबंध स्नेहाचा व सभ्यतेचा ठेवला होता. ता. २१ मार्च रोजी क्याप्रिव्ही यांस त्यानीं आपल्या घरीं भोजनास बोलाविलें व ता. २७ मार्च रोजीं नवे चान्सलर, प्रधानमंडळांतील सर्व लोक व इतर सर्व सरकारी खात्याचे अधिपती यांस एक बडी मेजवानी देऊन त्या दिवशीं आपलीं सर्व सूत्रें जनरल क्याप्रिव्ही याच्या हवालीं त्यानीं केलीं.

बिस्मार्क आपली जागा सोडून मोकळे झाले, तरी त्याच्या शत्रूंनीं त्यांची पाठ अद्यापीहि सोडली नव्हती. क्याप्रिव्ही यांच्या मार्गांत नसत्या अडचणी उभ्या करण्याचा उद्योग बिस्मार्क करीत आहेत, असे लेख

कांहीं पत्रांतून येऊं लागले, तेव्हा त्यापैकीं एका पत्रद्वारें त्यानीं या म्हणण्याची असत्यता सिद्ध केली.

जर्मनसाम्राज्याचे चान्सेलर या नात्यानें ज्या सरकारी वाड्यात बिस्मार्क रहात होते, तो वाडा सोडणें त्यांस आतां अर्थातच प्राप्त झालें. तारीख २६ मार्च रोजीं बादशहाची रजा घेण्याकरता बिस्मार्क राजवाड्यांत गेले. गाडींत बसून ते निघाले; तेव्हा लोकांचे थवेच्या थवे त्याच्या दारापाशीं जमले होते. त्याची गाडी राजवाड्याकडे जात असता पुष्पगुच्छांचा वर्षाव त्यांजवर होत होता. शेवटीं शेवटीं लोकांची गर्दी इतकी झाली कीं, त्याच्या गाडीस रस्ताहि सापडेना. थोडावेळ बादशहाची मुलाखत होऊन ते महाराणीच्या व राजपुत्राच्या भेटीस गेले. या राजवाड्यातील भेटी आटोपल्यानंतर बिस्मार्क राजवाड्यातून बाहेर पडले. त्या वेळीं गावातील विद्वान मंडळी व विश्वविद्यालयातील विद्यार्थी वाड्याच्या दरवाजाबाहेर जमले होते. याबेळी गर्दी इतकी जमली होती कीं, त्याना आपली गाडी अगदीं मंद गतीनें चालविणें भाग पडलें. 'गाडीचे घोडे सोडा' अशी एकच ओरड लोकांनीं केली. सामान्य जनतेचें बिस्मार्क याजवरील हें प्रेम पाहून पुष्कळाच्या नेत्रात अश्रू उभे राहिले. अखेरीस त्या कोलाहलानें बुजून जाऊन घोडे उधळूं लागले. तेव्हां जवळच असलेल्या एका ग्रँडड्यूकच्या घरात बिस्मार्क शिरले. लोकाची गर्दी थोडी कमी झाल्यावर बिस्मार्क आपल्या चान्सेलरच्या वाड्यात आले. तेथेंहि लोकाची गर्दी पुन्हा जमली. बिस्मार्क गाडींतून उतरून वाड्यात गेले, तेव्हां 'आम्हास एकवार दर्शन द्या' अशी ओरड लोकानीं इतकी केली कीं, वाड्याच्या गच्चीवर येऊन उभें राहणें बिस्मार्क यांस भाग पडले.

त्याच दिवशीं बर्लिन शहर सोडावें, असा बिस्मार्क याचा बेत होता; पण भेटीला येणाऱ्या लोकाची गर्दी त्या दिवशीं इतकी झाली कीं, त्यास बर्लिन सोडणें अशक्य झालें.

तारीख २८ मार्च रोजीं पहिल्या वुइलियम बादशहाच्या थडग्याचें दर्शन घेण्यासाठीं ते चार्लटनबर्ग येथें गेले. ज्या बादशहाची नौकरी त्यांनीं इतक्या इमानानें व प्रेमानें बजावली होती, त्याच्या थडग्याचें दर्शन घेताना पूर्वकाळाची स्मृति होऊन त्याचे नेत्र अश्रूंनीं भरून यावेत यात नवल नाहीं. येथेंहि त्याच्या दर्शनाकरता प्रचड जनसमूह लोटला होता; तथापि त्या प्रसगाची गभीरता जाणून लोकहि अगदीं स्तब्ध होते. बादशहाच्या थडग्यावर बरोबर आणलेलीं तीन गुलाबपुष्पें अर्पण करून बिस्मार्क तेथून बाहेर निघाले. त्याच दिवशीं सुप्रसिद्ध युद्धविद्याविशारद कौंट मोल्टके यांचीहि त्यांनीं भेट घेतली.

तारीख २९ मार्चचा दिवस उजाडला. बर्लिन येथील बिस्मार्क यांच्या मुक्कामाचा हा अखेरचा दिवस होय. ज्या बर्लिनशहरीं राहून त्यानीं साम्राज्य निर्माण केलें, त्या शहराला या दिवशीं त्यांनीं राम राम ठोकला. बिस्मार्क ज्या रस्त्यानें जावयाचे होते, तो रस्ता माणसानीं नुसता फुलून गेला होता. प्रत्येक खिडकींत आणि सज्जांत माणसें उभीं होतीं. पुष्कळानीं काळ्या रगाचा सुतकी पोषाक केला होता. बहुतेकाच्या हातात पुष्पगुच्छ व माळा होत्या. सायकाळीं पाच वाजता आपलें राहतें घर सोडून स्टेशनाकडे जावयास बिस्मार्क निघाले. त्यावेळीं त्याचे वडील चिरंजीव त्याच्या बरोबर होते. गाडी चालू होतांच शेंकडों जाग्यावरून फुलांचा व हाराचा वर्षाव गाडीवर होऊं लागला. बर्लिन शहरात हा देखावा अगदीं अभूतपूर्व होता. गाडीजवळ जाऊन बिस्मार्क यांचें दर्शन घ्यावें म्हणून जो तो पुढें घुसूं लागल्यामुळें लोकात

चेंगराचेंगरी होऊ लागली. गर्दी मोडण्यासाठीं पोलिसानीं केलेली सारी खटपट व्यर्थ झाली. गाडीचे घोडे सोडण्यासाठींहि लोकांनीं यत्न केले.

स्टेशनावर गाडीच्या वेळेच्या कित्येक तास अगोदर लोकांचा तोबा उडून राहिला होता. मोठमोठ्या खानदानीं घराण्यातील स्त्रिया सुतकी पोषाक करून उभ्या राहिल्या व त्याच्याच शेजारीं गांवातील मजूर वर्गाच्या स्त्रियाहि होत्या. कित्येक सेनापती आपला भपकेबाज लष्करी पोषाक घालून हजर होते. मोठमोठे कायदेपंडित, अश्विनीकुमार, व्यापारी, विद्यार्थी व निव्वळ मजूरवर्गातील लोकहि स्टेशनाच्या धक्क्यावर उभे राहिले होते. चार वाजता गार्डपलटणीचे अम्मलदार आपल्या झेंड्यासह आले. स्टेशनच्या धक्क्यावर परराष्ट्रीय वकील एकत्र जमा झाले होते. इग्लंडतर्फे सर एडवर्ड म्यालेट, फ्रान्सचे हरबेट, आस्ट्रियाचे कौंट झेचेनी, रशियाचे कौंट शुव्यालो, व इटलीचे कौंट लॉने, इत्यादि सर्व वकीलमंडळी हजर होती. त्यांच्याच पलीकडे नवे चान्सेलर क्याप्रिव्ही आपल्या सर्व प्रधानमंडळासह आले होते. त्यांच्या पलीकडच्या बाजूस बर्लिन व पॉटस्ड्याम येथील स्टॉफची मंडळी उभी होती.

इतक्यात टाळ्याच्या कडकडाटाचा ध्वनि रस्त्यातून ऐकूं येऊं लागला व गार्डपलटणीच्या अमलदाराच्या लष्करी हुकुमाचे ध्वनीहि ऐकू येऊं लागले. पांच वाजून वीस मिनिटानीं प्रिन्स बिस्मार्क यांची स्वारी स्टेशनावर येऊन दाखल झाली. त्याबरोबर सर्वांनीं आपल्या टोप्या काढून हातात घेतल्या. या वेळचा देखावा शब्दानीं वर्णन करणें खरोखर अशक्य आहे. इतक्यात "पुन्हा आपली भेट होईपर्यंत, सलाम!" असे शब्द गर्दीतून कोणी उच्चारले. त्याबरोबर त्याच शब्दाचा उच्चार हजारों मुखातून एकदम होऊ लागला. राष्ट्रीय गीताचा ध्वनि सर्वत्र उमटूं लागला.

प्रिन्स बिस्मार्क याची मित्रमंडळी व त्याच्या आळखींचे इतर गृहस्थ अखेरच्या हस्तांदोलनासाठीं पुढें सरू लागले. आणखी पांच मिनिटें धक्क्यावर राहून बिस्मार्क आपल्या डब्यात शिरले; तेव्हा तेथें हजर असलेल्या लष्करी तुकडीनें आपल्या ब्याडच्या सुरांत सलामी दिली. अशा रीतीनें जर्मनसाम्राज्याच्या वज्रबाहू प्रधानानें आपल्या खांद्यावरील साम्राज्यधुरा अखेरची खालीं ठेवली.

प्रकरण चोविसावें.

## जर्मनराष्ट्रमत.

बिस्मार्क यानीं दिवाणगिरीचा राजीनामा दिला, त्या वेळीं जर्मन-साम्राज्याच्या अभिमान्याना व देशभक्ताना साम्राज्याच्या भवितव्यतेबद्दल बरीच शंका वाटली. साम्राज्याचे पुढील दिवस संकटाचे व अंधकारमय जातात कीं काय, अशी धास्ती त्यास वाटूं लागली. जर्मनसाम्राज्य निर्माण करण्यात ज्यानीं पुढाकार घेतला होता, त्यापैकीं काहीं माणसें मरून गेलीं होतीं व उरलेल्यानीं आपल्या हातातील कारभाराचीं सूत्रें सोडून दिलीं होतीं. याच वेळीं साम्राज्याच्या वाढीस अपायकारक अशा चळवळी करणारा एक पक्ष जर्मनींत बळावू पहात होता; तथापि या निराशाजनक स्थितींत आशेचा एक तंतू या देशाभिमान्यास दिसत होता. बिस्मार्क याचा राज्यकारभारात हात आता प्रत्यक्ष नसला, तरी फ्रेड्रिकश्रू येथें राहून ते अगदींच स्वस्थ बसतील, असें कोणासहि वाटलें नाहीं. साम्राज्याच्या सर्व प्रजाजनाच्या मनात राष्ट्रीयभावना उत्पन्न करून ती जोमदार करण्याचा उद्योग ते खास करतील, असें सर्वांस वाटत होतें.

खुद्द बिस्मार्क याच्यासंबंधीं पाहता त्या वेळीं काळच त्यांच्या विरुद्ध फिरला होता, असें दिसतें. त्याच्या मदतीनें जे लोक उच्चपदावर चढले

होते; तेच आतां त्याच्या विरुद्ध होऊन त्यांजवर हल्ला करूं लागले. जर्मनसाम्राज्याच्या वाढीस बिस्मार्क यानींच अपाय केला, असें कांहीं म्हणूं लागले. साम्राज्याचें काहीं झालें तरी स्वतःचा मानमरातब वाढला म्हणजे झालें, असा दुर्भिमान बिस्मार्क यास असल्यामुळें त्याला बळी पडून त्यानीं देशाचें अहित केलें, असें प्रतिपादन त्याचे शत्रू करूं लागले.

शत्रूंचे हल्ले अशाप्रकारें चालू होते, तरी सर्व जर्मनराष्ट्र अगदीं आंधळें बनलें होतें, असें नाहीं. साम्राज्याची नौकरी बिस्मार्क यांनीं कोणत्या भावनेनें केली, याची जाणीव सामान्य लोकास चागली होती. लोकाचे प्रतिनिधी त्यांस भेटण्याकरतां फ्रेड्रिकश्रू येथें वारंवार जात असत. हम्बर्गच्या लोकानीं बिस्मार्क याच्या वाढदिवसानिमित्त एक मोठा दिवट्याचा मेळा काढला होता व साम्राज्याच्या सर्व भागातून त्याना अभिनंदनपर संदेश आले होते.

या सुमारास नवीन प्रधानांनीं जें राजकीय धोरण स्वीकारलें होते, तें बिस्मार्क याच्या पसंतीस उतरलें नाहीं. या नवीन धोरणानें साम्राज्यास अपाय होईल, असें त्यास वाटले. इंग्लडकडून हेलिगोल्याडचें बेट व पूर्वआफ्रिकेंतील काहीं प्रदेश घेऊन त्याच्या मोबदल्यात जर्मनीने इग्लंडला विटू, युगांडा व झांजीबार हा प्रदेश दिला. अशारीतीनें इग्लंडशीं सख्य करण्याचा उपक्रम जर्मनीनें करावा, ही गोष्ट बिस्मार्क यांस पसंत नव्हती. त्या वेळीं इंग्लड व रशिया याचें असावें तसें सूत नव्हतें. यामुळे इंग्लंडची मैत्री सपादन करण्याचा यत्न म्हणजे रशियाशीं वैर सपादणें होय, असें त्यास वाटलें. प्रदेशाच्या या अदलाबदलीमुळें रशियातील लोकमतहि थोडेंसें प्रक्षुब्ध झाल्यावाचून राहिलें नाहीं. इग्लडच्या स्नेहसबंधापेक्षां रशियाचा स्नेह जर्मनीस अधिक हितावह होईल असें बिस्मार्क यांचें

प्रथमपासूनच ठाम मत होतें. त्याचें एकंदर राज्यधोरण याच मतास अनुसरून होतें.

निरनिराळ्या पक्षांतील तंटे मिटून त्याचा एकोपा व्हावा व सर्व पक्षांनीं साम्राज्य सरकारास राज्यकारभाराच्या कामीं मदत करावी, अशाप्रकारचें धोरण बिस्मार्क यानीं स्वीकारलें होतें; पण हे धोरण फारसें यशस्वी न होतां साम्राज्य सरकारच्या मार्गांतील अडचणी दिवसेंदिवस वाढतच जातात, असा कटु अनुभव बिस्मार्क यास आला. आपल्या प्रतिपक्षास खुश करण्यासाठीं त्याच्या मागणीप्रमाणें एखादी सवलत दिली, तर तेवढ्या सवलतीनें तो सतुष्ट न होता त्याची मागणी मारुतीच्या शेपटाप्रमाणें दिवसेंदिवस वाढतच जाते, असें बिस्मार्क यास दिसून आलें. या आपल्या मताचा पूर्ण खुलासा एका वर्तमानपत्रांत लेख लिहून त्यांनीं केला होता. त्याच प्रमाणें फ्रेड्रिकश्रू येथें जीं मानपत्रें अनेक प्रतिनिधिमंडळाकडून त्यांस मिळालीं, त्यास उत्तरें देतानाहि हींच मतें त्यानीं स्पष्टपणें प्रतिपादिलीं होतीं. क्याप्रिव्ही याचें राज्यधोरण या मतास सर्वथा प्रतिकूळ होतें. तेव्हां त्यानीं एक पुढील आशयाचें सरकारी पत्रक सर्व परराष्ट्रांतील जर्मनवकिलातीकडे पाठविलें.

" प्रिन्स बिस्मार्क यानी आपली कित्येक मते वर्तमानपत्रद्वारां प्रसिद्ध केली असल्याचें तुह्मा सर्वांच्या पाहण्यात आलें असेलच. प्रिन्स बिस्मार्क यानीं कधींहि न विसरण्याजोगी जर्मन साम्राज्याची सेवा केली आहे, ही गोष्ट जर्मन सरकारच्या मनातून केव्हाहि जाणार नाही प्रिन्स बिस्मार्क याचे लेख जोंपर्यंत खाजगी गोष्टीसच अनुलक्षून असतील तोंपर्यंत त्याजवर प्रतिकूळ टीका करण्याचें कारण साम्राज्य सरकारास नाहीं, पण साम्राज्य सरकारच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल प्रिन्स बिस्मार्क यानीं टीका केली, तर सरकारनें मौन धरणें योग्य होईल कीं काय हा महत्वाचा प्रश्न आहे. कारण साम्राज्य सरकारच्या अशा मौनानें परकीय राष्ट्रात गैरसमज उत्पन्न होण्याचा सभव आहे. बिस्मार्क यांच्या प्रसिद्ध झालेल्या मताची वास्तविक किंमत काय आहे,

हें लोकांच्या लक्षांत भविष्य काळीं येईल, अशी बादशहाची खात्री असल्यामुळें या बाबींत स्वस्थ राहण्याचा त्यांचा निश्चय आहे. तथापि गतकाळचे बिस्मार्क व सध्याचे बिस्मार्क यांच्यातील भेद सर्वांनीं लक्षात ठेवावा, अशी बादशहांची आज्ञा आहे. या सुप्रसिद्ध मुत्सद्याबद्दल जर्मन राष्ट्राच्या मनात केव्हाहि अनादर उत्पन्न होण्याजोगें वर्तन तुह्माकडून घडू नये, अशी बादशहाची इच्छा आहे, हेंहि तुह्मास कळविणें इष्ट आहे. बिस्मार्क याच्या मतांसबंधीं वर्तमानपत्रातून जे लेख येत आहेत, त्यांस जर्मनसरकार मुळींच किंमत देत नाहीं, हेंहि तुह्मास कळविण्यात येत आहे."

अशा रीतीनें बिस्मार्क व साम्राज्य सरकार यांच्यात लढा सुरू झाला. यामुळें लवकरच जर्मनींत दुफळी होऊन दोन्ही पक्ष एकमेकांवर तुटून पडूं लागले. या सुमारास बर्लिन येथून आलेल्या मानपत्रास उत्तर देताना बिस्मार्क यांनीं पुढील आशयाचें भाषण केलें:—

"मला बर्लिन शहर सोडावें लागलें, तें माझ्या अपराधामुळें नव्हे अथवा माझ्या शत्रूंच्या कारवाईमुळेंहि नव्हे. ज्या प्रधानमंडळासमवेत मी राज्यकारभार पहात होतों, त्यांच्यात व माझ्यात तीव्र मतभेद झाल्यामुळेंच मीं राजधानी सोडली. सर्व प्रधानमंडळात पूर्ण एकोपा असणें, हें प्रधानमंडळाच्या चिरस्थाइत्वास आवश्यक आहे. अशा प्रकारची एकी नसली, तर अशा प्रधानमंडळाच्या हातून राज्यकारभार सुरळीत चालणें शक्य नाहीं. इतर प्रधानांशीं माझें पटेना व त्यामुळें आमच्यांतील एकोप्यास उणीव येत आहे, असें मला दिसून आलें. अशा स्थितीत सर्व जबाबदारी स्वतःच्या एकट्याच्याच शिरावर घेणें मला शक्य नसल्यामुळें राज्यकारभार हातीं बाळगविणें मला इष्ट वाटलें नाहीं. आतां राज्यकारभाराची सर्व जबाबदारी माझ्या शिरावरून गेली असल्यामुळें माझीं जीं कांहीं मतें बनलीं असतील, तीं लोकांपुढें स्पष्ट मांडण्यास मला हरकत राहिली नाहीं. सांप्रत प्रिन्स मेटरनिक यांच्याच सारखी माझीहि स्थिति झाली आहे. मेटरनिक याच्याशीं मी स्वतःची तुलना करीत आहें, असें नाहीं किंवा त्याची नक्कल करण्याची माझी इच्छा आहे, असेंहि नाहीं, पण कांहीं बाबतींत माझी स्थिति त्याच्यासारखी झाली आहे, हें खरें स्वतःविषयीं बोलताना मेटरनिक एकदा ह्मणाले, मी आतां रंगभूमि सोडून प्रेक्षकांत

येऊन बसलों आहें.' माझेंहि तसेंच झालें आहे. माझी सध्यांची वागणूक अन्याय्य आहे, असें कांहाजण ह्मणतात, पण प्रेक्षकाचें तिकिट ज्यानें विकत घेतलें असेल त्याला खेळावर टीका करण्याचा अधिकार आहेच. आतां टीका करतांना सभ्यतेचा अतिक्रम त्यांनें करू नये ह्मणजे झालें. देशांतील लोकांच्या अथवा बाह्यदेशीयांच्या हिताकरता माझ्या मताचें दिग्दर्शन स्पष्टपणें करणें हें माझें कर्तव्य आहे, असें मी समजतों. ' एकाद्या जागीं ईश्वर ज्याची योजना करतो, तो अधिकार चालविण्यास लागणारें शहाणपण ईश्वरच त्याला देतो ' अशा अर्थाची एक जुनी ह्मण आहे. आतां हीच ह्मण उलटी करण्यास कांहीं लोक पहात आहेत. ते ह्मणतात, ' ज्याचा अधिकार जातो, त्याची बुद्धि ईश्वर काढून नेतो ' पण या सद्गृहस्थांस मी निक्षून सांगतों कीं, तीन महिन्यापूर्वीचा जो बिस्मार्क तोच आताहि कायम आहे. त्या जुन्या बिस्मार्कला जें बुद्धिसामर्थ्य त्यावेळीं होतें, तेंच आजहि शिल्लक आहे. माझ्या सर्व स्नेह्यां-सोबत्यांनीं मला सोडलें, तरी मी कर्तव्यविन्मुख होणार नाहीं. आपणाहून अधिक उच्चदर्जाच्या माणसांविषयीं काहीं बोलण्याचा प्रसंग आला, तर आपलें मत विनदिक्कतपणें सांगणें हें माझ्यासारख्या स्थितींतील मनुष्याचें कर्तव्यच आहे. किंबहुना इतर सामान्य मनुष्याशीं बोलताना त्यानें इतका स्पष्टपणा न दाखविला तरी चालेल; पण राजाशीं आणि बादशहाशीं वागतांना तर त्यानें स्पष्टपणा दाखविलाच पाहिजे. राजाच्या हिताची चिंता वाहणारा प्रधान आपल्या मालकाच्या चेहऱ्यावरील क्रोधाच्या छटेकडे लक्ष देत नाहीं. आपणास जें कांहीं बुद्धिःपुरस्कर युक्त वाटतें, तेंच आपल्या राजाला तो सांगतो. आपलें ह्मणणें राजाला न पटलें, तर तें परत घेण्याची अथवा आपली नोकरी सोडण्याची मुभा त्याला असते आता मी नौकरींतून रजा झालो आहें, हें खरें, तथापि स्वतंचीं मतें लोकांपुढें मांडण्याचा जो हक्क प्रत्येक प्रजाजनांना आहे, तो मलाहि अद्यापि आहेच. वाचा गेल्याप्रमाणें मुका होऊन बसणें मला शक्य नाहीं. सर्वत्र शांतता नांदावी ह्मणून क्याप्रिव्ही याची जी योजना आहे, तिला पाठबळ देण्यावाचून मी अधिक कांहींच केलेलें नाहीं. माझें स्वतःचेंहि धोरण असेंच होतें, व तें कायम राखण्याकरतांच मी पूर्वी झगडलों. आतां तरी मी जें कांहीं बोलतों, तें शांततेच्या व गादीच्या रक्षणा-साठींच बोलतों. माझ्या आयुष्याचीं चाळीसवर्षें ज्या धंद्यांत गलीं, त्याचा विसर क्षणार्धांत पडावा, हें शक्य नाहीं. नाहीं तर मी बटाट्याच्या आणि

ओटाच्या पिकाची पहाणी करीत राहिलेल्या आयुष्याचे दिवस सुखानें काढले असते. माझे पूर्ववृत्त मी पूर्णपणें विसरून जावें व सामान्य खेडवळाच्या राहणीनें मी आतां रहावें, अशी अपेक्षा करणें अयोग्य आहे. आतां मी जसा आहें, तसाच माझा होईल तो उपयोग करून घ्या.

सरकारतर्फे जें जाहिरपत्रक प्रसिद्ध केल्याचें वर सांगितलें आहे, तें प्रसिद्ध झाल्यानंतर या भांडणास आणखी एक उकळी फुटून बिस्मार्क याजवर त्याच्या प्रतिपक्षियाकडून नवे हल्ले सुरू झाले. वादविवादाच्या भरात सभ्यतेचा अतिक्रमहि कित्येक वेळा होऊं लागला; तेव्हा पुष्कळास या तथ्याचा अगदीं वीट येऊन गेला. अमेरिकेला स्वातंत्र्य देणारे व अमेरिकन संस्थानांचे पहिले अध्यक्ष जॉर्ज वाशिंग्टन यांनीं आपलें अध्यक्षपद सोडलें, त्या वेळीं अमेरिकन लोकांनीं जो त्याचा अभूतपूर्व सन्मान केला, त्याची आठवण देऊन एका अमेरिकन पत्रानें बिस्मार्क याशीं वाशिंग्टन याची तुलना केली होती. वाशिंग्टन याजविरुद्ध एक अक्षरसुद्धा उच्चारण्याची छाति अमेरिकेंत त्या वेळीं कोणास झाली नसतां. उलटपक्षीं जर्मन ऐक्यासाठीं जिवापाड मेहनत करून ज्यानें अनेक आघात सोशिले, त्याजविरुद्ध वाटेल त्या खर्डेघाशाला बरळत सुटण्याची पूर्ण मुभा जर्मनींत मिळाली होती, हें पाहून या अमेरिकन पत्रानें मोठें आश्चर्य प्रदर्शित केलें होतें. इंग्लंडच्या राज्यसत्तेवर वज्राघात करणारा ऑलिव्हर क्रॉमवेल मृत झाल्यानंतर राजसत्ता पुन्हा प्रस्थापित झाली, त्या वेळीं क्रॉमवेलच्या प्रेताची जी दुर्दशा करण्यांत आली, तिच्याशीं बिस्मार्क याच्या स्थितीचीहि कोणी तुलना केली. प्रसिद्ध धर्मसुधारक मार्टिन ल्यूथर याच्या काळानंतर प्रिन्स बिस्मार्क याशिवाय दुसरा एकहि अद्वितीय पुरुष जर्मनींत जन्मास आला नाहीं, असें नोव्हीरेम्या या प्रसिद्ध रशियन पत्रानें लिहिलें होतें. ल्यूथरची धर्मसुधारणा जशी चिरस्थायी रूपाची झाली,

तसें बिस्मार्क याचें कर्तृत्व चिरस्थायी होईल कीं नाहीं, हें कालांतरानें समजणार आहेच; पण पदभ्रष्ट बिस्मार्क याच्या शब्दास आज जें वजन आहे, तें युरोपांतील दुसऱ्या कोणत्याहि देशातील मुत्सद्यास नाहीं, हें मात्र निःसंशय आहे, असें आपलें मत नोवीरेम्या पत्रानें प्रसिद्ध केलें होतें. प्यारीस येथील म्याटिन पत्रानेंहि हा उतारा घेऊन स्वतः त्यास पुष्टी दिली होती. फ्रेंच पत्रांतहि बिस्मार्क याची स्तुति येत आहे; हें पाहून जर्मनींतील त्याच्या शत्रूस फार वाईट वाटलें.

नव्या जर्मनसरकारानें ज्या राज्यधोरणास आरंभ केला होता, तें धोरण सपाट्यानें पुढें चाललें होतें. इ. स. १८९१ च्या जून महिन्यात बादशहानीं इंग्लंडास भेट दिली. या भेटीच्या थोडे दिवस अगोदर हेलिगोलँडचा सौदा होऊन गेला होता. हेलिगोलँडसारख्या खडकाळ तुकड्याच्या मोबदल्यात आपणास सुपीक प्रदेश मिळाला, हें पाहून ब्रिटिश जनतेस मोठा संतोष झाला होता. यामुळें बादशहाचा तेथे मोठा आदर सत्कार झाला. याच वेळीं फ्रेंच आरमारानें रशियाच्या क्रोन्स्टाड बंदरीं जाऊन रशियन आरमारास भेट दिली. फ्रान्स व रशिया यांजमध्यें दरंगी सधी होण्याचे घाटत आहे, अशी जी लोकवार्ता नुकतीच पसरली होती, तिला या भेटीनें चांगलीच पुष्टि मिळाली. अशा रीतीनें इंग्लंड व जर्मनी एका बाजूस आणि फ्रान्स व रशिया एका बाजूस अशा दोन फळ्या युरोपांत निर्माण होऊं पहात होत्या. इंग्लंड व रशिया यांचें वितुष्ट पिढिजाद असल्यामुळें इंग्लंडशीं मैत्री ह्मणजे रशियाशीं शत्रुत्व हें उघड दिसण्यासारखें होतें. इंग्लंडशीं मैत्री संपादन करण्याचें जें धोरण दुसऱ्या वुइल्यिम बादशहानें स्वीकारलें होतें, तें प्रिन्स बिस्मार्क यास पसंत पडलें नाहीं. कांहीं झालें तरी रशियाशीं वितुष्ट येऊं द्यावयाचें नाहीं, असें बिस्मार्क यांचें धोरण

असल्यामुळें बादशहांची राजनीति बिस्मार्क यास पसंत पडली नाहीं, यांत नवल नाहीं.

इ. स. १८९२ च्या जून महिन्याच्या २१ च्या तारखेस बिस्मार्क याचे चिरंजीव कौंट हर्बर्ट यांचा विवाह झाला. त्या वेळीं या समारंभाकरतां बिस्मार्क व्हिएन्ना येथें गेले. वाटेंत बार्लिन येथें थोडा वेळ त्याचा मुक्काम झाला, पण तेवढ्याच वेळांत हजारों लोकानीं त्यांचा सत्कार केला. त्याचप्रमाणें ड्रेसडेन शहरींहि त्याचें अपूर्व स्वागत झालें. बिस्मार्क याच्या मुत्सद्देगिरीनें जर्मन संस्थानाच्या आधिराज्यास आपण मुकलों ही गोष्ट आस्ट्रियन लोकहि ह्या वेळीं पूर्णपणें विसरले होते. किंबहुना जर्मनी व आस्ट्रिया यांची मैत्री जोडण्यास बिस्मार्क हेच कारणीभूत झाले, हें लक्षांत घेऊन आस्ट्रियन लोकानींहि त्याचा मोठा सन्मान केला.

अशा रीतीनें जर्मन जनता बिस्मार्क याचा सन्मान करीत असतां जर्मन सरकार त्यांचा पाणउतारा करण्याच्या कामात गुंतलें होतें. व्हिएन्ना येथें होणाऱ्या लग्नसमारंभास वकिलातींतील लोकानीं हजर राहू नये अशी तजवीज क्याप्रिव्ही यांनीं केली. त्याचप्रमाणें आस्ट्रियाच्या खुद्द बादशहाचे कान फुकून बिस्मार्क याची व बादशहाची भेट होऊं नये अशीहि तजवीज क्याप्रिव्ही यानीं केली. जर्मन सरकारनें आपणाशीं असा उभा दावा चालविला आहे, हें पाहून बिस्मार्क यांस अर्थातच फार वाईट वाटलें; तथापि सरकारच्या दृष्टीने जो इष्ट परिणाम व्हावा म्हणून क्याप्रिव्ही यानी ही खटपट चालविली होती, ती फुकट गेली, असेंच म्हटलें पाहिजे. जर्मन जनतेवर बसलेलें बिस्मार्क यांचें वजन कमी करावें यासाठीं क्याप्रिव्ही यानीं ही खटपट केली होती; पण बिस्मार्क सारख्या सुप्रसिद्ध देशभक्ताच्या घरगुती बाबींतहि सरकार ढवळाढवळ करीत आहे, हें पाहून सरकाराबद्दल लोकांच्या

मनांत अधिकच तिरस्कार उत्पन्न झाला. बिस्मार्क व्हिएन्नाहून परत आले, तेव्हा वाटेंतील म्युनीच, किसिनजेन आणि जेना या गावीं त्याचा आदरसत्कार इतक्या थाटाचा झाला कीं, एकाद्या मोठ्या युद्धांत यशस्वी होऊन राजधानीला परत येणाऱ्या बादशहाचें अथवा सेनापतीचेंहि असें स्वागत झालें नसेल. बिस्मार्क हे पदभ्रष्ट झालेले प्रधान आहेत, ही गोष्ट लोकाच्या आठवणीतून जणूंकाय निघून गेली असून ते साम्राज्यसंस्थापक होते, एवढीच जाणीव लोकास राहिली होतीसें दिसलें. म्युनीच शहरीं प्रत्येक प्रजाजन दुसऱ्याशीं या कामीं जणूं काय स्पर्धाच करीत होता, असें दिसलें. मशालींचे मेळे, संभाषणें, प्रतिनिधी मंडळें इत्यादिकांची अगदीं गर्दी उडून गेली होती. अशाच एका प्रसगीं बिस्मार्क यानीं पुढील उद्गार काढले होत'—

"राजभक्तीचा उद्भव लोकात व्हावा म्हणून पूर्वी मी फार खटपट केली. त्या वेळीं सरकाराकडून मजवर स्तुतीचा वर्षाव होत होता व लोक मला धोंडमार करीत होते. आज हें सर्व पारडें फिरलें आहे. आज लोक माझा सन्मान करीत असून सरकार मला दूर दूर लोटू पहात आहे. दैवाची विचित्र गति म्हणतात ती हीच"

म्युनीचहून निघून बिस्मार्क किसिनजेन येथें गेले. या ठिकाणीं पूर्वीप्रमाणेंच जलचिकित्सेकरता कांहीं दिवस राहण्याचा त्यांचा बेत होता. या ठिकाणच्या एका वर्तमानपत्रात त्याजविषयीं पुढील उल्लेख होता.

"सरकारनें कांहीं केलें तरी बिस्मार्क यांची लोकप्रियता पूर्वीसारखीच अद्यापीहि कायम आहे. किंबहुना बिस्मार्क इतका लोकप्रिय मनुष्य साऱ्या जगभरहि दुसरा नाही. अशा प्रकारचें थाटाचें स्वागत दुसऱ्या कोणासहि आजपर्यंत प्राप्त झालें नाहीं. हल्लींचें सरकार व बिस्मार्क यांजमध्यें जी तेढ उत्पन्न झाली आहे, ती आतां नाहीशी व्हावी व बादशहांची कृपा त्यांजवर पूर्वीप्रमाणें असावी एवढीच लोकांची इच्छा आहे.

वरटेंबर्ग येथें सातआठशें स्त्रीपुरुषांचा मेळा त्यांच्या स्वागतार्थ जमला होता. या सभेला उद्देशून बिस्मार्क म्हणाले, "जर्मनींत राष्ट्रीय

भावना उत्पन्न व्हावी ह्मणून जर्मन स्त्रियानीं बहुमोल कामगिरी केली आहे. स्त्रिया ह्या राष्ट्राचें अंतःकरण असून पुरुष ही त्याची बुद्धि होय. जर्मन स्त्रियाचा उत्साह त्यांच्या मुलाबाळात उतरतो. कडाक्याच्या बुद्धिवादानें आह्मा पुरुषाचीं मतें जशीं बदलत असतात, तशीं स्त्रियाचीं अंतःकरणें बुद्धिवादानें हेलकावे खात नाहींत. बुद्धीपेक्षा अंतःकरण हें अधिक दृढस्वभाव आहे. यामुळें जर्मन स्त्रियानीं माझा पाठीराखेपणा अद्यापि सोडला नाहीं व यापुढेंहि त्याचा पाठिंबा मला मिळेल, अशी माझी खात्री आहे. ”

तारीख ३० जुलई रोजीं जेना येथून आग्रहाचें बोलावणें आल्यामुळें बिस्मार्क त्या गावीं गेले. ते गावीं पोहोंचले त्यावेळीं मुसळधार पाऊस पडत असून विजाचा कडकडाट व भयंकर वादळ हींहि सुरू होतीं; तथापि त्याच्या स्वागतास हजारों लोक जमा झाले होते. या शहरच्या विश्वविद्यालयानें त्यास मानपत्र दिलें, तेव्हा उत्तरादाखल बिस्मार्क यांनीं पुढील भाषण केलें:—

“ इ. स १८६६ च्या वेळची स्थिति लक्षात घेतली असतां आपल्यातील मतभेद तरवारीच्या मध्यस्थीनें नाहींसे करावे लागले, हें सर्वांस आठवत असेलच पण तसें करण्यावांचून त्यावेळीं गत्यतरच नव्हतें. त्याचप्रमाणें फ्रान्सबरोबर झालेलें युद्धहि अत्यंत आवश्यक होतें. फ्रान्सचा पराभव केल्यावांचून युरोपखंडाच्या मध्यभागीं जर्मन साम्राज्य आपणास कधींहि निर्माण करता आलें नसतें अनेक विस्कळित व दुर्बळ संस्थानें मात्र येथें आपणास दिसलीं असतीं. आपण फ्रेंचाचा पराभव केला, ह्मणूनच जर्मन साम्राज्याची उभारणी बळकट पायावर आपणास करता आली. याकरता फ्रान्सवरील मोहीम करणें आपणास अपरिहार्य होतें. या बाबींत माझ्या चातुर्याची अथवा दूरदृष्टीची तारीफ करण्याचें कारण आपणांस नाहीं. या साऱ्या घटनेचें भविष्य मला अगोदरच कळून चुकलें होतें व त्याच दृष्टीनें तिची तरतूदहि मीं अगाऊ लावून ठेविली होती, असें ह्मणणें उद्दामपणाचें होईल. अशा

रीतीनें इतिहास बनविणें आपणास शक्य नाहीं, तथापि इतिहासांतून पुष्कळ गोष्टी आपणास शिकतां येण्यासारख्या असतात स्वतःच्या इतिहासाचा अभ्यास करून व त्यांतील पूर्वपरपरा लक्षांत घेऊन तिला अनुरूप अशाप्रकारचें राज्य-धोरण राखावयाचें हें कार्य मुत्सद्याला करतां येण्यासारखें आहे. मी जें कांहीं कार्य केलें आहे, तें इतकेंच. आतां मुत्सद्याच्या ठिकाणीं दुसरेहि कांहीं गुण आवश्यक आहेत उदाहरणार्थ त्याच्या मनावर पूर्वग्रहांचें दडपण असतां उपयोगी नाही त्याच्या आंगी विनीतपणा असला पाहिजे. त्याच प्रमाणे केवळ आपलीं मतें म्हणून त्या मतास चिकटून न बसता वेळ पडेल त्या वेळी त्याचा त्याग करण्याची त्याची तयारी असली पाहिजे. घमेंडखोरपणाचें वारेंसुद्धां त्यानें स्वतःस लागू देऊ नये. अलौकिक बुद्धिमत्ता त्याच्या आंगीं नसली, तरी एक वेळ चालेल, पण हे गुण मात्र त्याला अवश्य असलेच पाहिजेत, कारण याचा गुणानीं दूरदृष्टि प्राप्त होते व दूरदृष्टीमुळें भावी गोष्टींच्या बऱ्याचशा दोऱ्या त्याच्या हातात राहतात. मी घमेंडखोर आहें, असा आरोप पुष्कळांनीं मजवर केला आहे, तसेंच माझ्या आंगी नसलेले गुणहि मजपाशीं असल्याचा डौल मी मिरवितों, असेंहि कांही लोक म्हणतात, पण याबद्दल माझ्याविषयीं तुम्ही मनात शंकासुद्धां आणू नका, तथापि एक गुण मात्र माझ्या आंगीं निःसंशय आहे, हें मी स्पष्टपणें सांगतो तो गुण म्हणजे आत्मपरीक्षण. माझी मातृभूमि व माझा धनी यांच्या बऱ्याकरता मला काय काय केले पाहिजे, हा विचार करण्यात माझ्या आयुष्यांतील प्रत्येक क्षणाचा मीं उपयोग केला आहे अशा रीतीनें विचार करून जो मार्ग मी ठरवी तोच सदोदित अमलात येत असे असे नाहीं कित्येक वेळा माझ्या धोरणात मला बदलहि करावा लागे; राज्य-धोरण केवळ तर्कशास्त्रपद्धतीस अनुसरून आखणें बरोबर नाही. तर्कशास्त्राला संमत म्हणूनच कांहीं गोष्टी करणें, हें राज्यास कित्येक वेळां अपायकारकही होते आपणा भोंवतालच्या परिस्थिति पाहून तशा स्थितींत अत्यंत कमी भयावह असा मार्ग स्वीकारण हे मुत्सद्याचें काम आहे. प्रसंगीं कांही पेंच पडला तर शक्य तितक्या त्वरेनें त्यावर तोड काढणें, हे मुत्सद्याचें कार्य आहें. या कार्यांत मला नेहमींच यश आलें असे नाही, पण कांहीं अपयशाचे प्रसंग मला आले असले, तरी पुष्कळ वेळा मी यश मिळविले आहे. केवळ माझें सुदैव म्हणूनच माझी नीति यशस्वी झाली, असें कांहीं लोक म्हणतात, ही गोष्ट अगदीं खरी आहे जर्मन साम्राज्याला नशीबवान् प्रधान नित्य मिळत जावेत, हीच

माझीहि इच्छा आहे. अशा प्रकारचें दैव प्रत्येकाच्या वाट्याला येतें, असें नाहीं प्रशियाच्या संस्थानाची धुरा माझ्या पूर्वी ज्याच्या खांद्यावर होती, ते सारे प्रधान इतके नशिबवान् नव्हते. त्यापैकीं कोणी जेनाला आला असता, तर मजसारखें त्याचें स्वागत झालें नसतें, असें मला वाटतें आता माझ्या मागून येणाऱ्या प्रधानांचें दैव तरी चांगलें असो, अशी माझी इच्छा आहे. यापुढें मुत्सद्देगिरीशीं मला काही कर्तव्य नाहीं, तरी या नंतरचा एकादा प्रधान येथें आला, तर आजच्या सारखाच उत्साहानें व आनंदानें तुम्ही त्याचें स्वागत करावें अशी माझी इच्छा आहे. माझ्या देशबांधवांनीं मजवर इतकें प्रेम करावें यापेक्षा अधिक आनंदाची व अधिक उत्साहवर्धक अशी दुसरी गोष्ट माझ्या नशिबी कोणती असणार ?"

दुसऱ्या दिवशीं मुख्य बाजाराच्या जागीं सार्वजनिक स्वागताचा एक मोठा समारंभ झाला. या वेळीं गावाच्या मेयरनें ( गांवपाटील ) गांवातर्फे त्याचें स्वागत केलें. त्या वेळीं उत्तरादाखल बिस्मार्क म्हणाले,

"आपला सर्व कार्यभाग अद्यापि पुरा झालेला नाहीं. सर्व राष्ट्राच्या एकीकरणाचें प्रतिबिंब ज्यांत पडेल असें पार्लमेंट ज्या दिवशीं आपण निर्माण करू, त्याच दिवशीं आपलें काम पुरें होईल. कित्येक पक्ष जेथें नित्य तंटे करीत असतात असलें पार्लमेंट शक्तिमान् असू शकत नाहीं. राष्ट्र म्हणून या जगांत आपणास जगावयाचे असेल तर आपलें राज्य धोरण राष्ट्रीय स्वरूपाचें असलें पाहिजे आणि या करता राष्ट्रीय एकीचें प्रतिबिंब त्या राष्ट्राच्या पार्लमेंटात पडणें अवश्य आहे. कोणत्याहि एका पक्षानें सत्ता बळकवावी व आम्हावर मन मानेल तसा अम्मल चालवावा, हे युक्त नाहीं. परमेश्वरास स्मरून आपलें कर्तव्य बजावण्याची शपथ मी घेतली आहे आणि एकाद्या प्रसगीं बादशहाचे कारभारी अयोग्य मार्गानें राज्यकारभार हाकीत आहेत, असें पन्नास वर्षांच्या अनुभवावरून मला वाटलें, तर तसें स्पष्ट बोलण्यास मी कमी करीत नाहीं. माझ्या स्पष्टोक्तीचा विपरीत अर्थ लोकास भासविला जात असतो. बादशहा विरुद्ध लोकास चिथवावें असा माझा उद्देश आहे, असें भासविलें जातें, पण आपल्या राज्यानुशासनाप्रमाणें राज्यकारभाराची सर्व जबाबदारी राजावर नसून ती प्रधानमंडळावर आहे हें सर्वांनीं लक्षात ठेवावे. आपल्या राज्य-

पद्धतीला रेखीव आणि कायदेशीर स्वरूप आलें नव्हतें, तेव्हा सुद्धा राज्यकारभाराची सर्व जबाबदारी प्रधानमंडळावर आहे, ही गोष्ट आपण जाणून होतों. हा धडा जन्मापासूनच सर्व जर्मन लोकांस अवगत झालेला आहे. राजाच्या प्रधानाचें धोरण आम्हास चुकीचें वाटत असलें व त्यांच्या शहाणपणाबद्दल आमची खात्री नसली, तरी बादशाहा आणि गादी यांजबद्दल पूर्णभक्ति आमच्या मनांत असणें शक्य आहे. प्रधानमंडळाचें धोरण चुकीचें आहे, असें मला वाटतें आणि तसें स्पष्ट बोलण्यास मी कमी करणार नाहीं."

या भाषणानें लोकाच्या मनावर इष्ट परिणाम झाला. बिस्मार्क यांजविरुद्ध असलेल्या लोकानींहि यावर कांहीं आक्षेप काढला नाहीं.

जेना येथून निघून प्रिन्स बिस्मार्क हॉल व म्याक्‌डेनूबर्ग या गावीं जाऊन तेथून पुढें शॉनहॉसनला गेले. या ठिकाणीं सुमारें एक आठवडा त्यानीं पूर्ण विश्रांति घेतली. शॉनहॉसनहून निघून ते व्हार्जिनला गेले. त्या वेळीं नव्या कापणीचा हंगाम असल्यामुळें हे उत्सवाचे दिवस होते, पण याच वेळीं हंबर्ग येथें महामारीच्या उपद्रवाची साथ आली, अशी बातमी मिळाल्यामुळें बिस्मार्क हंबर्गला गेले.

या वेळीं सैन्याची आणखी वाढ करण्याकरिता कायद्याचा एक नवा मसुदा साम्राज्य सरकारनें पार्लमेंटपुढें आणला. फ्रांसनें याच वेळीं दरवर्षी तेहतीस हजार शिपायाची वाढ करण्याचा ठराव केला असल्यामुळें जर्मनीलाहि आपलें सैन्यबळ वाढविणें आवश्यक होतें. हा कायद्याचा मसुदा क्याप्रिव्ही यानीं अशा चमत्कारिक पद्धतीनें मांडला कीं, त्यामुळें पार्लमेंटांत दुफळ्या आणि त्रिफळ्या होऊन त्याच्यात मारामारीस सुरुवात झाली. याच वेळीं रशिया आणि जर्मनी यामध्यें व्यापारी युद्ध सुरू झालें. यामुळें रशियातील जर्मनीच्या व्यापारास बराच धक्का बसला व जर्मनीबद्दल रशियन लोकाचीं मनेंहि थोडीं कलुषित झालीं.

इ. स. १८९३ सालीं श्लेश्वीग, हॉलस्टीन, हॅंबर्ग, लुबेक, ओल्डनबर्ग, मेकलेनबर्ग, लिप* इत्यादि ठिकाणाहून प्रतिनिधीमंडळें बिस्मार्क

यास भेटावयास आली. या वेळीं एका मंडळापुढें बोलतांना बिस्मार्क म्हणाले, "अद्यापि राष्ट्रीय एकीची भावना असावी तशी आमच्यात नाहीं. यामुळें भावी साम्राज्यसत्ता मूठभर लोकाच्या हातीं एकवटेल कीं काय याची मला भीति वाटते. असल्या गोष्टींचें बीजारोपण थोड्याशा वर्षांपूर्वी झालें असून सांप्रत त्याचें रोप जोमात असल्याचीं चिन्हें मला दिसतात."

पोललोकाच्या संबधीं सरकारचें जें धरसोडीचे धोरण होतें, तेंहि बिस्मार्क यास पसंत नव्हतें. यामुळें स्वत:चा फायदा न होतां, रशियाला मात्र चिथविल्यासारखें होतें, असें तें म्हणत. "आपल्या साम्राज्याच्या हद्दींत पोल लोकांशिवाय दुसऱ्या कोणाचीहि इतकी भराभराट झाली नाहीं. गेल्या शभर वर्षांत जो पाठिंबा पोल लोकांस मिळाला नव्हता, तो त्यांस आतां मिळत आहे. हा पाठिंबा फार दिवस टिकून राहील, असें मला वाटत नाहीं." असे उद्गार या प्रश्नासंबंधीं त्यांनीं काढले होते.

---

## प्रकरण पचविसावें.

# बादशहांशीं समेट.

इ. स. १८९३ चा उन्हाळा बिस्मार्क यानीं किसिनजेन येथेंच घालविला; पण या वेळीं त्याची प्रकृति फुप्फुसाच्या विकारानें अतिशय बिघडली होती. या दुखण्यातून ते उठतील कीं नाहीं, याबद्दल सुद्धां त्याच्या वैद्यास शंका होती. या वेळीं वुइल्यिम बादशहा आस्ट्रियन सैन्याची कवाइत पाहण्याकरता हंगारींत गेले होते. बिस्मार्क यांच्या आजाराची बातमी त्यास लागताच एक सहानुकंपेचा संदेश बिस्मार्क यास पाठवून दक्षिण जर्मनींतील एक राजवाडा हवाफेर करण्याकरता त्यांस देऊं केला, पण बिस्मार्क हे तेथें रहावयास गेले नाहींत. घरीं

राहूनच आपली प्रकृति सुधारेल असें त्यास वाटत होतें. या दोन्ही तारा प्रसिद्ध झाल्या; तेव्हा सर्व जर्मन प्रजाजनास मोठा संतोष झाला. बादशहा आणि बिस्मार्क याजमधील वितुष्ट नाहींसें होऊन त्यांचा पुन्हा समेट व्हावा, अशी सर्वांचीच इच्छा होती. बादशहानीं आपल्या पदरचे राजवैद्य डॉ. श्वेनिंगर यांस बिस्मार्क याची प्रकृति पाहण्यास पाठविलें व त्याच्या प्रकृतीबद्दल आपणास वारंवार खबर देण्याविषयीं त्यानीं त्यांस हुकूम केला. या आजारांतून बिस्मार्क थोडे बरे होतात न होतात तोंच इ. स. १८९४ च्या जानेवारी महिन्यांत त्यांस इंफ्लु-एन्झाच्या तापानें गाठलें; तेव्हा बादशहांनी कौंट मोल्टके यांस त्याच्या समाचारासाठीं पाठविलें. मोल्टके यांजबरोबर एक प्रेमदर्शक पत्रहि त्यानीं पाठविलें होतें. बादशहाच्या या कृपेनें बिस्मार्क यांस मोठा आनंद झाला व बादशहाचे आभार मानण्याकरतां स्वत· भेटीस येण्याची परवानगी बिस्मार्क यांनीं बादशहाजवळ मागितली.

अशा रीतीनें दुसरे वुइलियम बादशाहा व प्रिन्स बिस्मार्क यांची प्रत्यक्ष भेट तारीख २६ जानेवारी रोजीं झाली. बर्लिनच्या स्टेशनावर बादशहाचे बंधु प्रिन्स हेनरी बादशाहातर्फे बिस्मार्क यांस घेण्यासाठीं आले होते. बिस्मार्क व प्रिन्स हेनरी हे स्टेशनावरून राजवाड्याकडे जेव्हा गेले, तेव्हा रस्त्याच्या दोन्ही तर्फांनीं हजारो शहरवासी बिस्मार्क याच्या स्वागतार्थ उभे होते. बाहशहानीं बिस्मार्क याचे अगत्यपूर्वक स्वागत करून उपाहारासाठीं त्यास आपल्या खोलींत नेलें. या प्रसंगीं खुद्द बाद-शाहा, महाराणी व बिस्मार्क या तिघांनींच एकत्र उपाहार केला. दुपारीं साक्सेनीचे राजे व प्रधान मंडळातील लोक त्यास भेटावयास आले होते. संध्याकाळीं बिस्मार्क बादशहांच्या मातोश्रीच्या भेटीस गेले, त्यावेळींहि रस्त्यांतून हजारों लोकानीं आनंदाच्या आरोळ्यांनीं त्यांचें स्वागत

केलें. रात्रीं राजवाड्यात मेजवानीचा मोठा समारंभ झाला. या वेळीं बादशहानीं क्युरेसियस पलटणीच्या कर्नलचा हुद्दा बिस्मार्क यास अर्पण केला. बिस्मार्क स्टेशनावर परत जावयास निघाले, तेव्हां खुद्द बादशहा त्यास पोहोचविण्यासाठीं बरोबर गेले होते. बादशहा व बिस्मार्क याची जोडी शेजारीं शेजारीं बसलेली पाहून लोकाच्या आनंदास पारावार उरला नाहीं. तारीख १९ फेब्रुआरी रोजीं बिस्मार्क यास परत भेट देण्याकरतां बादशहा फ्रेड्रिकश्रू येथें गेले. पूर्वींचें सर्व वितुष्ट नाहींसें झालें आहे, असें आपल्या वर्तणुकीनें बादशहानीं सर्वांच्या नजरेस आणलें. आपल्या स्वतःच्या हुजुरातीच्या स्वाराचे नवे पोषाख बादशहांनीं बिस्मार्क यास दाखविले व नवीन तयार होत असलेल्या काहीं लढाऊ जहाजाचीं चित्रेंहि त्यानीं बिस्मार्क याना दाखविलीं. अशा रीतीनें जर्मनींतील या दोन प्रमुख पुरुषाचें वितुष्ट संपून ऐक्य झालें.

या वर्षीचा बिस्मार्क याचा वाढदिवस नेहमींपेक्षाहि अधिक थाटानें साजरा झाला. लुसेनडार्फ येथून पहिलें प्रतिनिधिमंडळ बिस्मार्क याच्या भेटीस आलें. यानंतर प्यालाटिनेट, हेसे व ब्रेडन येथून स्त्रियांच्या तर्फे एक लक्ष सह्यांचें मानपत्र बिस्मार्क यांस आलें. यादिवशीं बिस्मार्क यास सुमारें अकरा हजार अभिनंदनपर तारा आल्या. बादशहाकडून एक उंची तरवार भेटीदाखल त्याजकडे आली. बादशहाची ही अमूल्य देणगी आपल्या घराण्यात वंशानुवंश राहील, असें बिस्मार्क यानीं बादशहांस कळविलें. यानंतर पार्लमेंटातील पक्षातर्फे व वर्तमानपत्रकारातर्फे प्रतिनिधीमंडळें त्याच्या भेटीला आलीं.

जुलई महिन्यात फ्रेड्रिकश्रू येथून निघून बिस्मार्क सहकुटुंब व्हार्जिन येथें आले. येथेंहि पुष्कळ लोक त्याच्या अभिनंदनासाठीं येत होते. या वेळींहि पोल लोकाच्या प्रश्नासंबंधीं जर्मनींत बरीच भवती

न भवती चालू होती. पोझेन येथील जर्मन लोकांतर्फे आलेल्या प्रतिनिधीस उत्तर देताना या प्रश्नासबधीं बिस्मार्क यानीं आपलें मत पुन्हां एकदा प्रगट केलें.—

" ऱ्हाईन प्रदेशासबधी आह्मांस जितकी पूज्यबुद्धि आहे, तितकीच वार्थ आणि विश्चुला या नद्यांच्या काठच्या प्रदेशासबधींहि आहे. आह्माला ऱ्हाईनचा काठ जसा आमचा वाटतो, तसाच या दोन नद्याचा काठहि आह्मास आमचा वाटतो. हल्लीच्या स्थितींत पोल लोकांबरोबर सुखासमाधनानें दिवस काढणें अशक्य आहे, असें आम्हास स्पष्ट दिसत आहे. पूर्व प्रशियात म्याझोलियन, ल्युथियानियन व जर्मन ही सारीं कुलें सुखानें नादत आहेत. तेथें या निरनिराळ्या वशात कोणत्याहि तऱ्हेचें वितुष्ट नाहीं; पण पोल लोकासबधीं मात्र असें म्हणतां येत नाहीं. उत्तर सायलेशियांत आह्माहून निराळ्या वशाचे लोक रहात असताहि व त्यांच्या आमच्या धर्मपथात भेद असताहि कित्येक शतकें आह्मी व ते तेथें समाधानानें एकत्र नादत आहों. मग पोल लोकात व आमच्यात मात्र अशी तेढ कां असावी ? पोल लोकातील सरदार घराणी व त्यांचे धर्मगुरू यांनींच ही तेढ उपस्थित केली आहे, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें."

पोल लोकास संतुष्ट करण्यांत आपलें धोरण यशस्वी होणें अशक्य आहे, ही गोष्ट लवकरच बादशहाच्याहि लक्षात येऊन चुकली. या प्रशियन राज्यधोरणाची थट्टा पोल लोक करतील, असें भविष्य बिस्मार्क यांनीं अगोदरच वर्तविलें होतें व तें अखेरीस खरेंहि ठरलें. सपटेंबर महिन्यात पूर्व प्रशियांत सैन्याची मोठी कवाईत झाली, त्या प्रसंगीं बादशहानीं थॉर्न मुक्कामीं एक भाषण केलें. त्यात ते ह्मणाले,

" आपण प्रशियातील प्रजाजन आहोंत हें पूर्णपणें ओळखून त्याला अनुरूप अशी वागणूक पोलिश प्रजाजनानीं केली नाहीं, तर जर्मन प्रजाजनाप्रमाणें माझी सहानुभूति व मेहेरनजर याचा लाभ त्यास होणार नाहीं, हे त्यानीं पक्कें लक्षात टेवावें. मला प्रसंग पडल्यास कठोरपणानेंहि वागतां येतें, ही गोष्ट त्यानीं ध्यानांतून जाऊ देऊ नये."

बादशहाच्या धोरणात अशाप्रकारें बदल झालेला पाहून बिस्मार्क यास फार आनंद झाला व दुसऱ्या दिवशींच्या एका भाषणांत त्यानीं तो व्यक्तहि केला.

अशा रीतीनें बादशहाच्या धोरणात बदल झाल्यामुळें मुख्य प्रधान क्याप्रिव्ही व प्रधानमंडळाचे अध्यक्ष कौंट युलेनबर्ग यास आपापल्या जाग्याचे राजीनामे द्यावे लागले. क्याप्रिव्ही याच्या जागीं आलसे-लॉरेन प्रांताचे कारभारी प्रिन्स होहेन लो यांची नेमणूक झाली. होहेन लो व बिस्मार्क याचा बऱ्याच वर्षांचा चांगला स्नेह होता. यामुळें बिस्मार्क यास त्याच्या धोरणासबंधीं पूर्ण विश्वास होता. साम्राज्याचीं सूत्रें होहेन लो याच्या हातीं सुरक्षित राहतील, अशी बिस्मार्क याची खात्री होती.

बिस्मार्क यांच्या पत्नीची प्रकृति या वेळीं बरीच अधिक बिघडली. इ. स. १८९३ सालीं इन्फ्लुएन्झाच्या तापानें जोहानाबाईची प्रकृति बरीच बिघडली होती व त्या वेळेपासून त्यास फार अशक्तता आली होती. इ. स. १८९४ च्या नवबर महिन्यात त्यास उदराचा विकार झाला. या दुखण्यांतून त्या उठत नाहींत, हें सर्वांस कळून चुकलेंच होतें. तारीख २७ नवबर रोजीं त्यांची प्रकृति पाहण्यासाठीं पहांटेसच बिस्मार्क त्याच्या खोलींत गेले, तों आपली पत्नी या नश्वर जगास सोडून गेली आहे, असें त्यास दिसलें. इतकीं वर्षें जिच्या सगतीत सुखानें घालविलीं, ती आपली प्रिय पत्नी गतप्राण झालेली पाहून बिस्मार्क यांस परमावधीचें दुःख झालें. त्याचा विवाह होऊन आपल्या पत्नीला घेऊन शॉनहॉसनगावीं आल्यापासून तिचा व त्यांचा विरह एक दिवस सुद्धा झाला नव्हता. आरंभींच्या कष्टाच्या व धामधुमीच्या दिवसात जोहानाबाई हें एक त्याच्या सांतवनाचे मोठें स्थळ होतें. इतक्या वर्षांचा अकृत्रिम व प्रेमळ रज्जु तुटलेला पाहून आता मात्र आपण जगात एकटे पडलों, असें बिस्मार्क यास वाटलें.

तारीख २९ नोवेंबर रोजीं जोहानाबाईचें और्ध्वदेहिक व्हार्जिन येथें झाले. या प्रसंगीं खुद्द बादशहाकडून, इतर जर्मन राजाकडून व लक्षावधी प्रजाजनाकडून सहानुभूतीचे संदेश बिस्मार्क यास आले.

---

## प्रकरण सत्त्विसावें.

# बिस्मार्क यांचा ऐशींवा वाढदिवस.

मनुष्याच्या आगीं लोकोत्तर गुण आणि अंत:करणाचा चांगुलपणा हीं असलीं म्हणजे लोकांना त्याची पारख केव्हाना केव्हा होते. बिस्मार्क याचा ऐशींवा वाढदिवस उगवला, तेव्हां जर्मन जनतेच्या अंत:करणांत जणूं काय नवें भरतें आलें. साऱ्या जर्मनींत राष्ट्रीय भावनाचा उदय व्हावा ह्मणून बिस्मार्क यानीं जन्मभर जी खटपट केली होती, ती आतां फळास येऊन जर्मन जनतेच्या अत:करणांत दबून राहिलेल्या भावनांचा प्रवाह जोरानें वाहूं लागला. आह्मी अमुक प्रांताचे अथवा अमुक पक्षाचे अशाप्रकारचा क्षुद्र अभिमान जर्मन जनतेच्या मनातून निघून जाऊन आह्मी जर्मन आहोंत, अशी राष्ट्रीय भावना तिच्या मनात उत्पन्न व्हावी, हेंच बिस्मार्क याच्या साऱ्या उलाढालीचें रहस्य होय. या वेळीं ही खटपट फलद्रूप झाली असल्याचें त्यांच्या निदर्शनास आलें. हा महोत्सवाचा दिवस उगवण्यापूर्वींच कित्येक महिने त्याची तयारी आगाऊ सुरू होती. आपल्या वज्रबाहू प्रधानाचा सन्मान योग्य रीतीनें कसा करता येईल, हें ठरविण्याकरता लहानसहान खेड्यापाड्यांनीं सुद्धां कमेट्या नेमल्या होत्या. विद्यार्थीवर्गात सर्वांहून अधिक उत्साह दिसत होता, यांत नवल नाहीं. विश्वविद्यालयात बिस्मार्क शिकत होते, तेव्हा सुद्धां विद्यार्थिमंडळाचे ते आवडते झाले होते. पक्षाभिमानाच्या आणि चुर-

शीच्या तडाख्यातून विद्यार्थिवर्ग मोकळा असल्यामुळें बिस्मार्कबद्दलचें त्याचे प्रेम अबाधित राहिलें. विद्यार्थिदशेंत असता बिस्मार्क यानीं सर्वांहून अधिक द्वंद्वें केलीं व द्वाडपणा करून सर्वांहून अधिक शिक्षा भोगली, एवढीच त्यांची कर्तबगारी विद्यार्थ्यांच्या लक्षांत राहिलेली होती. यामुळें बिस्मार्क हे आपलेच एक सहाध्यायी आहेत, असें त्यास वाटे.

लोकात उत्सवाची तयारी अशा प्रकारें चालू असता दुधांत मिठाचा खडा पडावा, त्याप्रमाणें बर्लिन येथें या प्रसंगासंबंधीं एक दुःखदायक गोष्ट घडून आली. बर्लिनचें महत्व वाढण्यास बिस्मार्क यांचे श्रमच कारणीभूत झाले होते. प्रशियाच्या राजधानीचें रूपातर साम्राज्याच्या राजधानींत त्यांनींच केलें होतें; तेव्हा त्यांचा विशेष जयजयकार राजधानीनें करावा, हें उचित होतें; पण अशा प्रकारचा ठराव शहरच्या अधिकारी वर्गापुढें आला, तेव्हां मताधिक्यानें तो नापास झाला. त्याचप्रमाणें पार्लमेंटातर्फे मिळणाऱ्या मानपत्राचीहि वाट लागली. बिस्मार्क अधिकारारूढ असता क्याथोलिक, सोशल, पोल आणि हॅनोवेरियन इतके पक्ष त्यांच्या विरुद्ध होते, हें वाचकाच्या लक्षात असेलच. या पक्षांशीं समेट करण्याचा यत्न बिस्मार्क यांनी कधींच केला नाहीं. इतकेंच नव्हे, तर संधि सापडेल तेथें त्यांजवर लगुडप्रहार करण्यास त्यांनीं कमी केलें नाहीं. यामुळें ते अधिकारच्युत झाले, तेव्हांहि या पक्षाशीं त्याचें वैमनस्य कायमच होतें. यामुळें पार्लमेंटांत व शहरच्या अधिकारीवर्गात बहुमत त्याच्या विरुद्ध गेलें. पार्लमेंटाची ही वर्तणूक खुद्द बादशहास मुळींच पसंत पडली नाहीं. बिस्मार्क यांस पाठविलेल्या तारेंत ते म्हणतात:—

"पार्लमेंटानें नुकताच जो ठराव पास केला, तो जर्मनराजांस व लोकांस मुळींच मान्य नसून त्याबद्दल मला अतिशय संताप आला आहे, असें मी मेहेरबानास कळवितों."

या संदेशाला बिस्मार्क यानीं पुढील उत्तर दिलें.

" खुदावत बादशहानीं कृपा करून मला जो संदेश पाठविला, त्याबद्दल मी अंतःकरणपूर्वक आभार मानतों. माझ्या राज्यकारभारांतील शत्रूनीं जी वर्तणूक केली, तिजपासून होणारें दुःख सरकारच्या या कृपेनें नाहींसें होऊन मला अत्यंत संतोष झाला आहे "

तारीख २६ मार्च रोजीं सैन्याच्या वतीनें बिस्मार्क यांचें अभिनंदन करण्याकरता बादशहांची स्वारी फ्रेड्रिकश्रू येथें गेली. जर्मन सैन्यांत कोणत्याहि प्रकारचा उणेपणा असूं नये म्हणून बिस्मार्क यांनीं पार्लमेंटांत तंटेभांडणें करून सैन्याचे हितसंबंध सुरक्षित राखले होते. सैन्यातील शिपायाची तैनात वाढवावी ह्मणून कित्येक वर्षें पार्लमेंटात त्याची खटपट सुरू होती. सैन्याच्या बाबीसंबंधानें पार्लमेंटात बोलतांना त्यानीं पुढील उद्गार काढले होते.

" सैन्यातील कामगारानीं केवळ आपलें कर्तव्य बजावलें ह्मणजे झालें, असें नाहीं. नेमून दिलेल्या कामापेक्षाहि त्यांनीं अधिक मेहनत केली पाहिजे. असें झालें, तरच आपल्या सैन्याची धडगत आहे, अशी माझी खात्री झाली आहे. अशारीतीनें त्यानीं आपलें काम न केलें, तर परीक्षेच्या वेळीं आपले सैन्य योग्य कसास उतरणार नाहीं, अशी माझी खात्री आहे. उत्तम रीतीनें शिकलेलें व मुरलेलें सैन्यच प्रशियाची उज्वल कीर्ति कायम राखू शकेल."

हॉल्स्टीन येथील वृद्ध सैनिकांच्या सोसायटीतर्फे व्याख्यान देतांना ते ह्मणाले,

" मी स्वतः तुमच्यापैकींच एक शिपाई गडी असल्यामुळें तुह्माकडून झालेला सत्कार मला विशेष प्रिय आहे. तुम्ही शिपाईगडीसुद्धा जर्मन संस्थांसंबंधीं काळजी बाळगता हें पाहून मला फार संतोष होतो. तुह्मीं प्रशियन सैन्यांत अथवा जर्मन सैन्यात म्हणा नोकरी केली असून एकदर लष्कराबद्दल तुह्मांस संतोष व अभिमान वाटतो आणि केवळ वृद्ध शिपायांच्या तीन सभा एवढ्या एका भागांत आहेत, हें पाहून जर्मन राष्ट्राची शांतता व त्याचें स्वातंत्र्य हीं कायम राखण्याचें काम आमचें सैन्य चोख बजावीत आहे, अशी सर्व जर्मन जनतेची

खात्री पटल्याचें उघड दिसून येतें. वृद्ध शिपायांचे क्लब, सोसायट्या अथवा इतर संस्था जर्मनीभर निर्माण होत आहेत व बाल्टिक समुद्रापासून कान्स्टन्स सरोवरापर्यंत अशा प्रकारच्या संस्था भरभराटींत आहेत, यावरून जर्मन लोकात लष्करी बाण्याची आवड वाढत आहे, हेंहि उघड दिसून येतें. आपल्या सोबत्याच्या खांद्याशीं खांदा लावून व हातांत बंदूक घेऊन लष्करांत नौकरी करणें हें किती आनंददायक व उत्साहवर्धक काम आहे, याचा अनुभव मला स्वत:लाहि आहे. लष्कराच्या कडक शिस्तीमुळें मनुष्याच्या खासगी स्वातंत्र्याला अशत: बंधन उत्पन्न होतें, हें खरें; पण त्यामुळें स्वत:च्या सुरक्षिततेबद्दल त्याला खात्री उत्पन्न होते, हेंहि लक्षात ठेवलें पाहिजे. जागर पलटणींत मी प्रथम शिरलों, तेव्हा प्रसंगी माझें रक्षण करण्यास कितीतरी शिपायांगडी तयार आहेत, असा भरवसा मनापासून मला वाटू लागला. हुकूम आला कीं अम्मलबजावणी करावी, इतकेंच आपलें काम. कांहीं हुकूम नसला, तर स्वरक्षणार्थ हातपाय हालविण्याची देखील जरूर नाहीं. आपणावर कसलीच जबाबदारी नाहीं, अशी खात्री असणें, हें किती सुखाचें आहे, हें कोणास सांगावयास नकोच. माझ्या मुलकी कामांतील आयुष्यात व विशेषत: दिवाणगिरीच्या वेळीं अशा सुखाचा लाभ मला केव्हाच झाला नाहीं. काहीं झालें तरी त्याची जबाबदारी आपणावर नसून आपल्या वरिष्ठांनीं ती आपणाकडे घेतली आहे, अशी खात्री असली, ह्मणजे मनुष्याच्या स्वास्थ्याचा भंग केव्हांहि होत नाहीं. कोणती गोष्ट कोणत्या प्रकारें करावी, हें ठरविण्याचें काम ज्यांच्यावर असतें, त्याच्या मागें काळजीहि असते. आणि ज्या प्रधानाला कोणत्याहि गोष्टीचा स्वत:च उपक्रम करावा लागतो, त्याला जयापजयाची, स्वत:च्या अब्रूची आणि लोकमताची काळजी वहावी लागते. स्वत:च्या अब्रूबद्दल तर त्याला इतकी काळजी वाटत असते, कीं, त्याच्या धन्याचा हुकूम असला, तरी तेवढ्यामुळे त्याचें मन शांत रहात नाहीं. आपल्या हातानें व्हावें तितकें कार्य झालें आहे कीं नाहीं व त्या कार्याच्या सिद्धीकरतां लागणारीं आपलीं उपकरणें योग्य प्रकारचीं आहेत कीं नाहींत, असे विचार त्याच्या चित्तात सदोदित अस्वस्थता उत्पन्न करीत असतात. स्वत:च्या अब्रूबद्दल जितकी अधिक चाड त्याला असते, तितकें त्याचें काम अधिकाधिक कठिण होत जातें. अधिकारावर असतां मला अनेक लढाया कराव्या लागल्या. त्यांत शत्रू उत्पन्न होणें अपरिहार्य होतें आतां तो अधिकार सोडून मला चार वर्षें झालीं, तरी सुद्धा माझे शत्रू मला क्षमा करीत नाहींत.

"साम्राज्याचा मुख्य प्रधान या नात्यानें जें माझें कर्तव्य होतें, त्यांत मी चुकलों ह्मणून मला कोणी दोष देत नसून माझ्या शत्रूचा मुख्य दोष माझ्या स्वतःच्या वागणुकीवर मात्र आहे, हें पाहून मला फार संतोष होतो. माझ्या वागणुकीतील अनेक दोष दाखविण्यास ते सदा सज्ज असतात हा त्याचा आरोप मी खुषीनें कबुल करतों, पण यामुळें अधिकारी या नात्यानें मी कांहीं अपराध केलेले नाहींत, अशी कबुली ते आपोआपच देतात. शत्रूच्या अशा हल्ल्यानीं माझें मन कधींहि अस्वस्थ होत नाहीं; पण माझा एकादा मित्र कमी झाला, तर मात्र मला फार दुःख होतें. उघड शत्रू मला इजा करू शकत नाहींत. फ्रेंचानी आपणावर गोळीबार केला, तर त्यांत काही नवल नाही अशा प्रसंगीं आपणास जखम झाली, तर आपली काळजी घेण्यास आपलीं इस्पितळें तयार आहेतच, पण तीच गोळी पाठीमागून येणें, हें फार धोक्याचें असतें. राज्यकारभारांत असलेहि अनेक प्रसंग मजवर आले आहेत.

"मी सांप्रत अत्यंत दुःखी कष्टी असून नौकरीच्या वेडीसाठीं माझें अंतःकरण जळत आहे, असा माझ्या शत्रूचा माझ्यावर आरोप आहे. मानवी मनाची रचना जाणण्याचें सामर्थ्य या लोकांत नाहीं, असें मात्र यावरून दिसतें. अधिकारासाठीं मीं धडपडावें, असें त्यांत आतां काय उरलें आहे ? माझ्या इच्छेविरुद्ध दहा वर्षें मला अधिकारावर रहावें लागलें. केवळ कर्तव्यनिष्ठा म्हणूनच हीं अखेरचीं दहा वर्षें मी अधिकारावर राहिलों. कित्येक वर्षांचा अनुभव व घरीं आणि बाहेर संपादन केलेला कित्येक मुत्सद्याचा स्नेहसंबंध हीं खात्रीपूर्वक आणि विश्वासानें ज्याच्या हातीं सोंपविता येतील, असा कोणीहि मनुष्य मला आढळेना. तेव्हां केवळ स्वतःच्या अब्रूसाठीं अत्यंत नाखुषीनेंहि अधिकारावर राहणें मला भाग होतें. आपलें कर्तव्य बजावल्यानंतर दुसऱ्या कोणत्याहि कारणासाठीं या दगदगींत मी पडणार नाहीं मोठ्या पदव्यांची हाव मला उरलेली नाहीं. अथवा चांद आणि बिल्ले यांचाहि हव्यास मला नाहीं. कारण त्यांचे ढीग माझ्या घरीं आधींच पडले आहेत. आपल्या हातीं सत्ता रहावी, अशी खटपट मीं कधींच केली नाहीं. मी आहें, असाच राहण्यांत मला पूर्ण संतोष आहे. हुकूम करण्यापेक्षा हुकूम मानण्यातच अधिक स्वास्थ्य असतें. पुन्हा अधिकारारूढ होण्याची माझी इच्छा आहे, असा आरोप कोणी मजवर करतात, तेव्हा मला विलक्षण संताप येतो. 'तुमची अशी चमत्कारिक वृत्ति का ?' असा प्रश्न कोणी विचारला, तेव्हा ह्यॉमलेट म्हणाला, 'कारण मी गादीचा

वारस आहें ह्मणून. मला हांव बाळगण्यासारखें कांहीं उरलेलें नाहीं, याचेंच मला वाईट वाटतें ' या ह्यॅमलेटच्या उत्तराची मला वारंवार आठवण होते.

"आतां कसला अधिकार मिळविण्याची म्यां खटपट करावी? त्यासाठीं माझें मन धडपडावें असें त्यात काय आहे? सध्या ज्या स्थितींत मी आहें, तींत बदल करणें मला शक्य नाहीं आणि तशी माझी इच्छाहि नाहीं. आता यापुढें अधिक हाव बाळगणें ह्मणजे पूर्वीच्या उच्चतर मनोमय राज्यांतून भ्रष्ट होणें होय मी हाव बाळगणें ही गोष्ट अगदीं हास्यास्पद आहे. आता माझें वय ऐंशी वर्षांचें झालें आतां यापुढें माझ्या हातून काय होणार, असें लोकांस वाटतें ' पण सद्गृहस्थहो, जाऊद्या. शिपायी गडी या नात्यानें आपण आज एक-मेकांस भेटलों आहों. अशा वेळीं राज्यकारभाराच्या या गोष्टीची उठाठेव कशाला? शिपायीगडी या नात्यानें आपली कर्तव्याची दिशा अगदी लहानशा रेषेंत निश्चित झालेली आहे. तें कर्तव्य ह्मणजे आपणा सर्वांचा सर्व श्रेष्ठ सेनापति जो बादशहा त्याच्या नांवानें त्रिवार जयघोष करणें हेंच."

राज्यकारभारातील भानगडीपासून लष्कर अलिप्त असतें ही गोष्ट पुरातनकालापासून सर्वांस ठाऊक आहेच. वरून हुकूम आला कीं त्याची अम्मलबजावणी करणे एवढेंच लष्कराचें काम. हें असें कां? इत्यादि प्रश्नाचीं उत्तरें देण्याचें काम राजाचें व त्याच्या हाताखालील नौकरांचें आहे.

लष्कराची तयारी जय्यत रहावी म्हणून बिस्मार्क फार जपत असत, या गोष्टीची जाणीव सर्व सैन्याला असल्यामुळें लष्कराचे प्रेमहि बिस्मार्क याजवर होतें. अगदीं लहान दर्जाच्या शिपायापासून तों थेट मुख्य सेनापतीपर्यंत सर्व लोक त्यांस चहात होते.

अगदीं पहाटेपासूनच फ्रेड्रिकश्रूला जाणाऱ्या रस्त्यावर व आजूबा-जूच्या मैदानात लोकाचे थवेच्या थवे जमले होते. ज्या मैदानावर लष्करी कवाईत होणार होती, तेथें लोकांची गर्दी जमूं नये ह्मणून पोलिसाचें घोडदळ तेथें पहारा करीत होते. याच ठिकाणीं वर्तमान-

पत्रांचे बातमीदार, चित्रलेखक व फोटोग्राफर यांचाहि अगणित थवा जमला होता. बादशहाची स्वारी घोड्यावर विराजमान होऊन मैदानाकडे चालू लागतांच त्याच्या पाठोपाठ सैन्यहि तेथें येऊन दाखल झालें. नेमलेल्या जागीं लष्करी तुकड्या उभ्या राहिल्या. मध्यभागीं बादशहा व त्याच्या खास तैनातींतील अम्मलदार उभे राहिले. थोड्या वेळानें बिस्मार्क यांची स्वारी उघड्या गाडींत बसून मैदानाकडे आली. बादशहानीं घोडा पिटाळून पुढें जाऊन त्यांचें स्वागत केलें व मोठ्या प्रेमानें त्यांच्याशीं हस्तांदोलन केलें. तरुण युवराजानें बिस्मार्क यांस लष्करी थाटाचा सलाम केला; तेव्हां बिस्मार्क यांनीं राजपुत्राला हातीं धरून आपल्या शेजारीं गाडींत बसविलें. अशा रीतीनें गतकाळची उज्वल प्रभा व भविष्यत्‌काळची दिव्य आशा हीं शेजारीं शेजारीं बसलेलीं पाहून लोकांस गहिंवर आला. बादशहा अद्यापि घोड्यावरच होते. त्यांनीं बोलावयास आरंभ केल्याबरोबर बिस्मार्क गाडींतच उठून उभे राहिले.

"आपली पितृभूमि, आपल्या जन्मदिवसाच्या उत्सवाची तयारी करण्यास गुंतली आहे. जर्मन लष्कर आज आपलें अभिनंदन करीत आहे. आपल्या खांद्याशीं खांदा भिडवून लढणाऱ्या आपल्या सोबत्याचें व अम्मलदाराचें अभिनंदन तें करीत आहे. या अम्मलदाराच्या कर्तव्यदक्षतेमुळें आणि हिंमतीमुळें आमच्या लष्कराला मोठी बहादुरी करणें शक्य झालें आणि त्यामुळेंच या पितृभूमीला सुखाचे दिवस प्राप्त झाले.

"आज या ठिकाणीं जो सैन्याचा लहानसा भाग जमविला आहे, तो सर्व सैन्याच्या वतीनें आपलें अभिनंदन करीत आहे. विशेषतः ज्या लष्करी भागाचा मुख्य अधिकार आपणाकडे आहे, तें लष्कर येथें जमलें आहे. तुकडीच्या मध्यभागीं दिसत असलेला विजयध्वज प्रशिया आणि ब्रॅंडनबर्ग यांच्या उज्वल कीर्तीचें स्मारक आहे. ब्रॅंडनबर्गच्या पहिल्या इलेक्टरनें ( राजानें ) मार्स-ला-तूरच्या रणभूमीवर रक्ताच्या तर्पणानें हा ध्वज पवित्र केला आहे.

"अशाप्रकारच्या या लष्कराच्या साक्षीनें माझी देणगी मी आपसाहेबांस अर्पण करतों. आपणासारख्यांस तरवारी वांचून अधिक चांगली देणगी ती

कोणती द्यावी ? तरवार हें आह्मा जर्मनांचें मोठें सन्माननीय हत्यार आहे. जें हत्यार घडविण्यात माझ्या परलोकवासी पितामहास तुह्मी मदत केली, ज्याला तुह्मी धार दिली आणि ज्याचा तुह्मी उपयोग केला, त्या हत्याराचें स्मारक व निशाणी ह्मणून ही तरवार मी आपणास देत आहें. ज्या प्रचंड हत्याराची उभारणी आपण केली, त्याला रक्त आणि लोह याचा चुना घातला होता. ही इमारत अगदीं अभंग झाली आहे. जरूर पडेल, तेव्हा राजांनीं व महाराजांनीं याचा उपयोग केला, तर पितृभूमींत सर्वत्र एकोपा राहील. आपल्या घराण्याचें व आलसेलॉरेन प्रांताचें मोर्तब या तलवारीवर कोरलें आहे पंचवीस वर्षांपूर्वी घडलेल्या इतिहासाचें स्मरण ही तलवार आपणास नित्य देत राहील.

"गडे हो, खुदावत प्रिन्स फॉ बिस्मार्क, लायनबर्गचे ड्यूक, यांच्या नावानें त्रिवार जयजयकार करा."

प्रिन्स बिस्मार्क यांनीं या भाषणाला अगदीं थोडक्यात उत्तर दिलें.

"आभारांनीं भरलेलें माझें अंतःकरण सरकारचरणीं मी अर्पण करतों. माझें सरकारशीं जें लष्करी नातें आहे, त्या दृष्टीनें याहून अधिक भाषण करणें मला वाजवी नाहीं. सरकार स्वारींचे मी पुन्हा एकवार आभार मानतों."

यानंतर बादशहांनीं ही मानाची तरवार प्रिन्स बिस्मार्क याजपुढें केली, तेव्हा ती घेण्याकरता ते बादशहाच्या घोड्याजवळ पायानें चालत गेले. नंतर सैन्याची कवाईत होऊन घोडदळ, तोफखाना, पायदळ वगैरेंची पाहणी होऊन मैदानावरील समारंभ आटोपला. दुपारीं बिस्मार्क यास बादशहांनीं मेजवानी दिली, तेव्हां युवराज व बिस्मार्क एकाच गाडींतून गेले व बादशहा मागून घोड्यावरून आले. त्या प्रसंगींहि बादशहांनीं भाषण केलें.

"आमच्या साम्राज्याच्या पंचविसाव्या वर्षीं आपला ऐंशिवा वाढ दिवस येत आहे. सैन्याच्या वतीनें नुकतेंच आपलें अभिनंदन मीं केलें आहे. प्रख्यात मुत्सद्दी या नात्यानें नव्हे, तर एक लष्करी अम्मलदार या नात्यानें मी अभिनंदन करतों. तुह्मास जें कांहीं करणें असेल, ते मनुष्यासाठीं नव्हे, तर ईश्वराप्रीत्यर्थ करा, अशी एक म्हण आहे. या म्हणीची आठवण या प्रसंगीं मला होते. परमेश्वरावर पूर्ण भरवसा ठेवून आपण महत्कार्य पार पाडलें आणि या कार्यांत

मदत करण्यास आमच्या लष्करानेंहि कधीं माघार घेतली नाहीं. पर्वतप्राय अडचणी सुद्धां बाजूस सारून आपण यश संपादन केलें. मनुष्याची किंमत त्याच्या कृत्यावरून ठरते. या कसोटीसहि आपण पूर्णपणें उतरला आहा. आपल्या शत्रूनीं आपणावर कितीहि हल्ले केले, तरी त्यांस एवढेंच उत्तर पुरें आहे. आल्पस् पर्वताच्या हिममय शिखरापासून तों समुद्रवलयांकित प्रांतापर्यंत सर्व जर्मनांच्या तोंडून आज एकच ध्वनि उमटत आहे. प्रिन्स फां बिस्मार्क ड्यूक ऑफ लायनबर्ग, यांचा जयजयकार, हाच तो ध्वनि होय. आपला त्रिवार जयजयकार असो"

या भाषणावर बिस्मार्क यांनीं पुढील उत्तर दिलें.

सरकारांनीं प्रशियन अम्मलदारांचे जे गुण आता वर्णिले, त्याजबद्दल दहा वर्षांपूर्वी जें मी बोललों, तेंच आजहि बोलावयास हरकत नाहीं. ' माझ्यांत जें कांहीं चांगलें ह्मणून तुह्मास दिसतें अथवा माझ्याकडून जें कांहीं कार्य घडलें असेल, तें प्रशियन अम्मलदारांच्या शिस्तीचेंच फळ होय. मी प्रशियन अम्मलदार नसतों, तर इतक्या सरळ मार्गानें मीं चालत गेलों असतों कीं नाहीं, याची शकाच आहे ' गादीची भक्तीनें सेवा करावयाची हें शिक्षण या अम्मलदारींत मला मिळालें.

"नोकरींतून कमी होईपर्यंत याच मतांचा पुरस्कार मी केला. अशा प्रकारची राजभक्ति सर्वांच्या अंतःकरणांत बाणण्यातच जर्मनीचा तरणोपाय आहे, अशी माझी खात्री झाली आहे. ज्या देशांत राजभक्ति नाहीं, त्यांची काय दशा होते, हें पहावयाचें असेल, तर फार लांब जावयास नको. फ्रान्सचें उदाहरण आपल्या डोळ्यांसमोर आहेच. फ्रान्सचें राजघराणें आता उलथून पडले आहे आता कोणत्या मध्यवर्ती बिभूतिभोंवती फ्रान्सनें एकवटावें ? या प्रश्नाचें उत्तर आज देता येत नाहीं. आपलें साम्राज्य एकाच गादीच्या अमलात नाहीं. त्यांत पुष्कळ राजघराणीं आहेत, पण वंशपरंपरेच्या धाग्याने व रक्ताच्या पवित्र बंधनानें हीं सर्व घराणी एकरूप पावलीं आहेत

"या गोष्टीचें पुन्हां उच्चारण करण्याची आज जरूरी नाहीं. आह्मा जर्मनांची राजभक्ति किती दृढमूल आहे, हें सर्व इतिहासज्ञास अवगत आहेच. याच राजभक्तीच्या नांवाने महाराज बादशहाचें हितचिंतन आपण सारे करूं या."

हा समारंभ आटोपल्यानंतर बादशहा लवकरच फ्रेड्रिकश्रू येथून निघून गेले. जाता जातां बिस्मार्क याचा हुजऱ्या व त्याचा गाडीवाला यांसहि बादशहांनीं पदकें दिलीं. बिस्मार्क यांची म्हातारपणीं बरदास्त ठेवणाऱ्या या दोन गरीब माणसांनाहि बादशहा विसरले नाहींत.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं बादशहांचे बंधु प्रिन्स हेनरी आपल्या मुलासह फ्रेड्रिकश्रू येथें आले व त्यांच्या मागोमाग बेडनचे ग्रँडड्यूक व मुख्य प्रधान प्रिन्स होहेनलो, हेहि येऊन दाखल झाले. प्रशियन प्रधानमंडळाच्या वतीने मुख्य प्रधानांनी एक अभिनंदन पर मानपत्र बिस्मार्क यांस दिलें.

या मानपत्रांत पुढील मजकूर होता.

"परमेश्वराच्या कृपेनें आपणास तारीख १ एप्रील रोजीं ८१ वें वर्ष सुरू होतें. कधीं काळीं प्राप्त होणारा अशा प्रकारचा महोत्सवाचा दिवस आपल्या कुटुंबाबरोबर साजरा करण्यास पितृभूमींतील सर्व जनता तयारी करीत आहे. प्रशिया व जर्मन साम्राज्य यांचें महत्व व यश हीं वाढविण्याकरतां जे प्रयत्न कित्येक वर्षें आपण अव्याहतपणें व भक्तीनें केले व जे प्रयत्न यशस्वीहि झाले, त्याबद्दल सगळी पितृभूमि आपली ऋणी असून आपला तिला केव्हांहि विसर पडणार नाहीं. आपल्या परमपूज्य बादशहांनीं आपलें अभिनंदन केलें, त्याचप्रमाणें आज प्रशियन प्रधानमंडळहि आपलें अभिनंदन करीत आहे. आपल्या अधिकाराच्या मुदतींत पितृभूमीचा राज्यकारभार शहाणपणानें व निश्चयानें आपण चालविला याबद्दल आह्मी आपले फार ऋणी आहों. पितृभूमीच्या उद्धारार्थ परमेश्वरानें आपणास पुष्कळ आयुरारोग्य व मानसिक बल द्यावें, अशी परमेश्वराजवळ आमची प्रार्थना आहे."

बिस्मार्क यास मानपत्र देण्याचा ठराव जर्मन पार्लमेंटांत सतरा मतांच्या आधिक्यानें नापास झाल्याचें पूर्वीं सांगितलेंच आहे. हा ठराव नापास होण्याचें मुख्य कारण लोकमत विरुद्ध होतें हें नसून पक्षाभि-

मानच याच्या मुळाशीं होता, हें स्पष्टपणें निदर्शित करण्याकरता जर्मन पार्लमेंटातील ११० व प्रशियन पार्लमेंटांतील २४८ सभासद तारीख २५ मार्च रोजीं फ्रेड्रिकश्रू येथें आले. पार्लमेंटाच्या सभासदांवर बिस्मार्क सुलतानी अम्मल गाजवीत, असा त्याच्या शत्रूंचा आक्षेप होता व अद्यापीहि आहे; तथापि 'प्रत्येक सभासदास पूर्ण मतस्वातंत्र्य असलें पाहिजे. व या मताचा उपभोग घेण्याची संधि त्यास मिळेल, अशी व्यवस्था सरकारनें केली पाहिजे' असें आपलें मत बिस्मार्क यानीं इ. स. १८६७ सालीं स्पष्ट बोलून दाखविलें होतें.

जो पक्ष प्रबळ होईल, त्याच्या हातांत राज्यसूत्रें असावीं, ही पद्धत बिस्मार्क यास पसंत नव्हती. कारण अशा पद्धतीनें राज्यधोरणांत वारं-वार बदल होण्याचा संभव उत्पन्न होतो व अशा बदलणाऱ्या धोरणानें व्यक्तीला अथवा राज्याला फायदा होण्याचा मुळींच संभव नसतो, असें त्याचें मत होतें.

जर्मन जनतेच्या प्रतिनिधिमंडळास बिस्मार्क यानीं दिलेलें उत्तर विशेष लक्षात ठेवण्यासारखें आहे.

"सद्गृहस्थ हो, तुह्मी जो आज माझा सन्मान केला, त्याबद्दल मी तुमचा फार आभारी आहें. माझ्या कामाच्या अथवा गुणाच्या मानानें पाहतां इतका सन्मान मला मिळणें योग्य नाही. या तुमच्या सन्मानाच्या ओझ्यानें दडपून जाऊन मी खरोखर गोंधळून गेलों असतों; पण हा सन्मान मला स्वतःला मिळत नसून जें कार्य मी केलें, व जें वाढीस लावण्यास मीं खटपट केली, त्या कार्याचा हा सन्मान आहे, हें मला माहीत असल्यामुळे मी इतक्या शांत चित्तानें तुह्मा समोर बोलत आहें. साम्राज्याची सुव्यवस्था लागावी म्हणून गेलीं दहा वर्षें जी खटपट चालली होती, तिला बऱ्याच अंशीं संतोषकारक फळ आलें. हें फळ सर्वांशीं परिपूर्ण आहे, असें नाहीं, तथापि परिस्थितीच्या मानानें तें चांगलें आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हें फळ प्राप्त करून घेण्याच्या कार्यांत मजबरोबर दुसरेहि अनेक सहकारी कार्य करीत होते.

विशेषतः माझे परलोकवासी धनी पहिले वुइलियम बादशहा या सर्व कार्यांचे मोठे पुढारी होते त्यांची आणि त्यांच्या सैन्याची मदत मला नसती, तर माझ्यानें काय झालें असतें ? माझ्यापूर्वीहि अनेकांनीं खटपट केली होती; पण ज्याप्रमाणें ती सारी फुकट गेली, त्याचप्रमाणें माझ्या खटपटीचीहि वाट लागली असती आपल्या पाठीमागें राजबळ असणें हें आपल्या कार्यास अत्यंत आवश्यक आहे, ही गोष्ट पूर्वींचे मुत्सद्दी विसरून गेले होते. राजबळांत किती जिवटपणा आणि सामर्थ्य याचा वास असतो, याची जाणीव त्यास नव्हती. त्यांची सर्व खटपट सद्धेतूनें प्रेरित होती, यात शंका नाहीं, पण तिच्यातला मुख्य जिवटपणा त्यांनीं बाजूस ठेवला, ही त्यांची चूक होय.

आमच्या राजघराण्याचे पाय आमच्या भूमींत अद्यापि पक्के रुतलेले आहेत, ही परमेश्वराची मोठी कृपा होय. फ्रँकफर्ट येथें वकील या नात्यानें मी काम करीत होतों, तेव्हा जर्मनराष्ट्राची राजकीय परिस्थिति मोठ्या घोटाळ्याची होती. अशा स्थितींत राष्ट्राची इच्छा काय आहे, हें जाणून घेऊन ती पुरी करण्यास प्रशियन राजाच्या हुकमतीखालीं असलेल्या बलवान् लष्कराचा उपयोग करून घेण्याचा यत्न मीं केला. त्या यत्नाला जें काहीं फळ आले, त्याचें श्रेय एकाद्या विशिष्ट प्रधानाला देण्यापेक्षां तें त्या वृद्ध बादशहाला व त्याच्या मित्रांना देणें अधिक योग्य आहे. जर्मनींतील राजानीं परस्परांशी जे तह केले, त्याजवर त्याचे शिक्कामोर्तब नसतें, तर त्या तहाचा काय उपयोग झाला असता ? इ. स. १८६६ व १८७० सालीं वुइलियम राजानी आपलें सैन्य डेरेदाखल केलें नसतें, तर काय झालें असतें; असें असतांहि इतिहास लिहितांना राजकीय पुरुषांची उपेक्षा, आपण खुशाल करीत असतों. त्याची उपेक्षा करावी असा आपला हेतु नसतो हें खरं, पण आपल्या हातून ती होते, हेंहि खोटें नाहीं साक्सन आणि बव्हेरियन लोकांबरोबर आमची पुष्कळ वेळा कटकट झाली, पण साम्राज्यावर संकट येत आहे, असें पाहतांच हीं दोन्ही संस्थानें मोठ्या उत्साहानें आमच्या मदतीस धांवून आलीं. पार्लमेंटातील पक्षाभिमान याहून अधिक चिरस्थायीरूपाचा असतो. एकादा मुख्य प्रधान आपणास नापसंत असला, म्हणून गादीबद्दलची भक्ति नष्ट करणें योग्य आहे काय ? बव्हेरियन आणि साक्सन हे एक वेळ आमचे शत्रू होते. तोफच्या गोळ्यांनीं आह्मी एकमेकाचे जीव घेतले आहेत, पण असें असताहि त्याची राष्ट्रीयभावना जागृत होण्याबरोबर मित्र म्हणून त्यानीं आह्मास मिठी मारली.

"यावरून पार्लमेंटातील पक्षापेक्षां हे आमचे संस्थानिक, त्यांचीं पार्लमेंटें व त्यांचे प्रजाजन हीं अधिक बरीं आहेत, असं स्पष्ट म्हणण्यास मला दिक्कत वाटत नाहीं. आमच्या पार्लमेंटांतील पक्ष स्वतःचें महत्व वाढविण्यांत दंग झाले आहेत. स्वतःचें मत, स्वतःचा मत्सर आणि स्वतःचें महत्व-यांची किंमत राष्ट्रहितापेक्षा त्याना अधिक योग्यतेची वाटते आमच्या राजघराण्याची गोष्ट याहून वेगळी आहे. राष्ट्रहित कसें साधेल, याची चिंता तीं प्रथम करतात. त्यानीं आपसांत मारामाऱ्या केल्या, तरी साम्राज्याकडे कोणी वाकडा डोळा केल्याबरोबर तीं सर्व एक होतात. आमचीं राजघराणीं अशा रीतीनें वागत असता, आमचे पार्लमेंटातील पक्ष मात्र याजविरुद्ध वर्तन करीत असतात. या राजघराण्यांकडे पाहून तरी त्यांनीं शहाणें व्हावें. पक्षाभिमानानें साम्राज्याच्या अंतरव्यवस्थेंत कितीहि घोटाळे उत्पन्न झाले, तरी आमच्या राजघराण्याची ही मनःप्रवृत्ति कायम असेपर्यंत या घोटाळ्यांचा कोणताहि वाईट परिणाम तीं होऊं देणार नाहीत, असें म्हणण्यास मला शंका वाटत नाहीं.

"नार्वे आणि स्वीडन हीं राष्ट्रें विभक्त असतांहि एकाच राजाच्या अमलांत आहेत. अशी गोष्ट जर्मनींत घडणें शक्य नाहीं. आह्मी प्रशियन, बव्हेरियन, साक्सन वगैरे सर्व एकच जर्मन आहों. सर्व साम्राज्य आह्मा जर्मनांचें आहे, या जाणिवेची छाया प्रतिनिधिसभेंत स्पष्ट उमटली पाहिजे व साम्राज्य-हिताच्या दृष्टीनेंच कोणत्याहि गोष्टीचा विचार आह्मी केला पाहिजे.

"हा मुद्दा विसरून चालावयाचें नाहीं. आपल्या परराष्ट्रीय प्रधानानें धोरण कसें राखावें व साम्राज्यांतील भागिदार संस्थानांशीं कशा प्रकारची वर्तणूक ठेवावी, हें आपण ठरविलें पाहिजे. असें झालें, तरच राष्ट्रीय भावना सर्वत्र उद्दीपित होईल परराष्ट्रीय प्रधानानें कोणतें धोरण सांभाळावें व तें धोरण आपल्या मर्जीस अनुसरून आहे की नाहीं, हे पाहणें आपल्या हातीं आहे, अशी जर्मन जनतेची खात्री पटून तिचा देशाभिमान जागृत झाला, तरच राष्ट्रीयभावना तेथें उत्पन्न होईल.

राज्यकारभाराचा खर्चवेंच किती करावा व कामगारांच्या पगारांत कशी छाटाछाट करावी, इत्यादि गोष्टींचा विचार करीत असतांच या महत्वाच्या बाबीकडे लक्ष पुरविणें अशक्य नाहीं. निरनिराळ्या संस्थानांच्या प्रातिनिधिक सभा साम्राज्याच्या राजकीय धोरणासंबंधीं टीका करतात, असें माझ्या कानीं

आलें, तर मला खरोखर फार आनंद होईल. केवळ प्रशियालाच अनुलक्षून हें मी बोलत आहें, असें नाहीं, तर साक्सनी, बव्हेरिया वगैरे सान्याच संस्थानास हें माझे सांगणें आहे. सर्व संस्थानांतील प्रातिनिधिक सभा अशारीतीनें वागू लागल्या, तर साम्राज्याच्या चिरस्थाइत्वाची कळकळ त्यास आहे, व साम्राज्याच्या बऱ्यावाईटावर आपलें बरें वाईट असल्याची जाणीव त्यांस आहे, असें सिद्ध होईल.

अशा प्रकारची जितकी कळकळ लोकात उत्पन्न व्हावयास पाहिजे होती, तितकी अजून झाली नाहीं. याचेंहि कारण हेंच कीं, आमच्या राज्यकारभारांत अनेक खोटीं द्वैतें शिरलीं आहेत. जर्मन आणि प्रशियन, जर्मन आणि बव्हेरियन, जर्मन आणि साक्सन अशा प्रकारच्या द्वैतांस वास्तविक थारा नसतां तीं उत्पन्न झालीं आहेत. जर्मनी आणि जर्मन संस्थानें यांचे हितसंबध वेगळे करूं म्हटले, तरी ते होणार नाहींत. त्यासंबधीं वेगवेगळा विचार करणेंहि शक्य नाहीं. साक्सन प्रतिनिधींनीं आपल्या पार्लमेंटात साक्सनीचा हितसंबंध पहावा, हें ठीक आहे, पण बव्हेरियाच्या, साक्सनीच्या अथवा प्रशियाच्य प्रधानानें साम्राज्याशीं आपला संबध काय आहे, हे केव्हांहि विसरता उपयोगी नाहीं

अशा रीतीनें हे हितसंबध एकरूप असताहि हल्लींच्या विशिष्ट सत्ताधाऱ्यांच्या अनुशासन पद्धतीमुळें त्यात खोटें द्वैत उत्पन्न झालें आहे. ज्या साम्राज्यसरकाराला लहान लहान संस्थानिक सरकाराचा पाया नाहीं, तें साम्राज्यसरकार हवेंत अधातरीं लोंबत आहे, असें म्हटलें पाहिजे असल्या फुसक्या सरकाराच्या हातून कोणतीहि कामगिरी होणें शक्य नाहीं. असें सरकार कसेबसे कांहीं दिवस काढील; पण त्याच्या कोणत्याहि कृत्याला पाया असणार नाहीं. या करता ( विसावा. ) सद्गृहस्थहो, मला बोलण्याची शक्ति असती, तर आणखीहि अनेक गोष्टी तुम्हांस सांगितल्या असत्या मी वृद्ध आणि गलित गात्र झालों आहे. तुम्ही इतका वेळ माझें भाषण ऐकून घेतलें व माझा मोठा सन्मान केला, याबद्दल मी तुमचा फार ऋणी आहें. पार्लमेंटांत तुमच्या शेजारीं बसून काम करण्याची शक्ति मला नाहीं, याबद्दल मला फार वाईट वाटतें. राज्यकारभारांत पडलें म्हणजे टक्केटोणपे खाण्याचे प्रसग अवश्य येणारच. ते सोसण्याची शक्ति मला आतां नाहीं. आतां स्वस्थ बसून दिवस काढावेत,

असें वयोमानामुळें मला अर्थातच वाटूं लागलें आहे. माझ्या आयुष्याचे हे अखेरचे दिवस याच घरी घालवावेत अशी माझी इच्छा आहे, पण माझें शरीर दुबळें असलें, तरी माझे मन तुम्हाबरोबर आहे. वास्तविक तुम्हाबद्दल असावी त्याहून अधिक काळजी मला वाटते. तुमच्याबद्दल काळजी करण्याचें हें माझें वय नाहीं, तरी ती माझ्यानें दूर सारवत नाहीं. ज्या गोष्टींच्या सान्निध्यात वयाचीं इतकीं वर्षें मीं काढलीं, त्याचा पाश माझ्यानें एकदम तोडवत नाहीं. मी वृद्ध झालों, तरी या गोष्टी अद्यापि आपला पाश मागें घेत नाहींत. आता माझें अखेरचें एकच सांगणें तुम्हास आहे, तें हेंच की, काहीं झाले, तरी साम्राज्याभिमान सोडूं नका. प्रशियन पार्लमेंटांत प्रशियन बाबींचा विचार करीत असताहि साम्राज्याचे हितसबंध दृष्टीआड करूं नका. आपण साम्राज्याची प्रजा आहों व आपला राजा हा साम्राज्याचा बादशाहा आहे, हें कोठेंहि विसरू नका. प्रशियाच्या हितसबंधाबरोबर सर्व साम्राज्याच्या हितसंबंधाची जबाबदारी आपल्या बादशहावर आहे, हें लक्षांत ठेवून त्याच्या साम्राज्यधोरणात त्याला मदत करा हाच विचार पक्का लक्षात ठेवून आपल्या पूज्य बादशहाच्या नावानें त्रिवार जयघोष आपण सर्व करू या."

बिस्मार्क याचें हें राजभक्तीनें भरलेलें भाषण अत्यंत परिणामकारक असें झालें. बादशहाच्या नावानें जयघोष झाल्यानंतर जमलेल्या मंडळीनें बिस्मार्क याच्या नावानेंहि त्रिवार जयघोष केला; तेव्हा त्यांचे आभार मानताना बिस्मार्क ह्मणाले,

"सद्गृहस्थहो, तुम्हा सर्वांचा मी फार आभारी आहे, हें मी तुम्हास त्रिवार सागतों तुम्हा सर्वांच्या पक्तीचा लाभ मला या जागीं घेतां आला असता, तर मला फार आनद झाला असता. हें लहानसें घर विकत घेतलें, तेव्हा माझे अखेरचे दिवस येथें जातील, असें मला मुळींच वाटलें नव्हतें, आणि आता या वयात नवें घर बांधणें मला शक्य नाहीं. लहानशा झोंपड्यात माझा निर्वाह होण्यासारखा आहे, या विचारानें माझें सातवन होत नाहीं, कारण त्यांत माझ्या चारशें बांधवास बसण्यापुरती जागा नाहीं, याचें मला मोठें दु ख वाटतें."

बिस्मार्क यास त्यांच्या उतार वयात सुद्धां जर्मन साम्राज्याची काळजी फार वाटत होती. सर्व प्रजाजनात साम्राज्याची कल्पना दृढमूळ होणें,

हेंच साम्राज्याच्या चिरस्थाइत्वास आवश्यक आहे, असें त्याचें मत होतें. जर्मन साम्राज्याच्या भपकेबाज वर्णनानीं लोकांस ते खुष करून टाकतील, असें पुष्कळास वाटत होतें; पण बिस्मार्क यांनीं प्रत्येक प्रसगीं साम्राज्याच्या मार्गांतील धोक्याचीं स्थळें मात्र लोकास दाखवून दिलीं. राष्ट्राची मोकळेपणानें वाढ व्हावयास त्याचें पार्लमेंट कशाप्रकारें असावें व त्याच्या मार्गांत अडचणी कोणत्या उत्पन्न होतात, हें त्यानीं लोकास सांगितलें. भविष्यत्काळच्या मोठेपणाचीं वर्णनें करून वर्तमानकाळांतील अडचणी लोकांच्या नजरे आड करावयाच्या, असें त्यानीं केलें नाहीं. वर्तमानकाळातील अडचणी प्रथम दूर केल्या, म्हणजे भविष्यत्काळ आपोआप ठीक होतो, असें त्यांचें मत होतें.

---

प्रकरण सत्ताविसावें.

## तारीख १ एप्रील सन १८९५.

तारीख १ एप्रीलचा दिवस उगवला. बिस्मार्क हे आतां अधिकारावर नव्हते अथवा त्यांच्या हातीं कसली सत्ताहि नव्हती. असें असताहि सर्व जर्मनराष्ट्रानें त्याजवरील प्रेमाचे प्रदर्शन इतक्या थाटानें केलें, त्याअर्थीं त्यांच्या गुणानींच राष्ट्रास ते पूज्य होऊन बसले होते, हें उघड आहे. जर्मनसाम्राज्याचा धनी एकच आहे, असें वुइल्यिम बादशहानीं एक वेळ बोलून दाखविलें होतें; पण जर्मनराष्ट्रानें त्याचें हें म्हणणें खोटें केलें. बादशहाचा उपमर्द करावा, असा जर्मनराष्ट्राचा हेतु नव्हता. आपल्या बादशहाबद्दलहि त्याची पूज्यबुद्धि होती; पण ज्यानें आपलें सारें आयुष्य साम्राज्याच्या सेवेंत घालविलें व खरा देशाभिमान म्हणजे काय याचा धडा लोकांस ज्यानें शिकविला, त्याचा सन्मान करणें, हें आपलें कर्तव्य होय, असें जर्मनराष्ट्रास वाटलें.

मनुष्यप्राणी कितीहि मोठ्या पदवीस चढला असला, तरी निर्भेळ सुख त्याच्या वाट्यास कधींच येत नाहीं. मधून मधून त्याच्या आयुष्यात दुःखाचें मिश्रण असावयाचेंच. सारें राष्ट्र एकदिलानें आपला सन्मान करण्यास तयार झालें आहे, असें पाहून बिस्मार्क यास अत्यंत आनंद होणें साहजिक होतें, पण या प्रसंगीं जिच्याबरोबर आपण आयुष्यातील अनेक सुखदुःखाचे प्रसंग पाहिले, ती आपली पत्नी या आनंदांत वाटेकरी होण्यास जिवंत नाहीं, या गोष्टीची आठवण होऊन त्यास फार दुःख झालें. राजकार्यानिमित्त त्याचा एकादा वाढदिवस बाहेरगावींच झाला, तर त्या दिवशीं त्याच्या पत्नीकडून त्यास एकादें उत्साहजनक व प्रेमळ पत्र तरी यावयाचेंच; पण ज्या दिवशीं सारें जर्मनराष्ट्र त्यांचा सन्मान करण्यास तयार झालें होते, अशा या विशिष्ट वाढदिवसाच्या उत्सवप्रसगीं आपली पत्नी आपणाबरोबर नसावी, याचें त्यास दुःख वाटणें अगदीं साहजिक होतें.

वाढदिवसाच्या आदल्या दिवशीं जर्मनविश्वविद्यालयातील विद्यार्थ्यांनीं भरलेली एक गाडी हँबर्गकडे जात असता फ्रेड्रिकश्रूच्या स्टेशनावरून गेली. बिस्मार्क याचें घर रेल्वेच्या सडकेला लागूनच असल्यामुळें तेथें गाडी येतांच सर्व विद्यार्थ्यांनीं प्रचंड जयघोष केला. फ्रेड्रिकश्रू हें एक लहानसें खेडें आहे. या ठिकाणीं शाळा नाहीं अथवा चर्चहि नाहीं. वस्ती शेंपन्नास लोकांची; पण याच लहानशा खेड्याला तारीख १ एप्रील रोजीं वस्तीच्या मानानें तरी लहानशा शहराचें रूप आलें होतें. आदल्याच रात्रीं गुप्तपोलिसाची एक तुकडी बर्लिनहून आली होती. कारण बिस्मार्क यास कांहीं धमकीचीं पत्रें आलीं होतीं. तेथें जमलेल्या मंडळीस या पत्राबद्दल माहिती नसल्यामुळें बिस्मार्क यांजबद्दल कोणासहि काळजी वाटत नव्हती.

विद्यार्थ्यांची गाडी स्टेशनावर उभी राहिली. सर्व विद्यार्थी बिस्मार्क यांच्या घराबाहेर जमा झाले; पण बिस्मार्क यांनीं कोणास केव्हा भेटावें, हें ठरविण्याचें काम त्याचे वैद्य डॉ. श्वेनिंगर यानीं आपल्या हातीं घेतलें असल्यामुळें या विद्यार्थीमंडळीस बराच वेळ तिष्ठावें लागलें. दिवस बराच येईपर्यंत बिस्मार्क यानीं कोणासहि भेटूं नये, असा सक्त हुकूम या डॉक्तरसाहेबानीं काढला होता. हजारों तारा, पत्रें, व अनंत प्रकारच्या भेटीच्या वस्तु याची नुसती गर्दी उडून राहिली होती. जर्मनींतील सुप्रसिद्ध चित्रकार लेनब्याक यानें पुष्पशृंगाराचें काम आपणाकडे घेतलें होतें. हजारों ठिकाणाहून आलेल्या परड्या व गुछ याची मांडणी घरासमोरील आंगणात त्यानें मोठ्या चतुराईनें केली होती. पण विद्यार्थीसमूह आत घुसताच या दिवसाची आठवण म्हणून त्यातील फुलें उचलण्यास त्यानीं सुरुवात केली. तेव्हां दहापाच मिनिटांच्या आतच तें सारें आंगण रिकामें झालें. सैन्यातर्फे बिस्मार्क यांचें अभिनंदन यापूर्वी नुकतेंच होऊन गेलें होतें. त्याचप्रमाणें पार्लमेंटांतील एका पक्षातर्फेहि त्यांचें अभिनंदन झालें होतें, पण आजचें हें अभिनंदन साऱ्या जर्मनराष्ट्राकडून झालें. या अभिनंदनात पक्षाभिमान नव्हता. तेथें जमलेला सारा विद्यार्थीसमूह पक्षाभिमानापासून अद्यापि अलिप्त होता. संस्कृति व राष्ट्राभिमान यांचीच जोत त्याच्या तरुण अंतःकरणात खेळत होती. बिस्मार्क यानीं विस्कळित जर्मनसंस्थानास सुसघटित साम्राज्याचें स्वरूप दिलें, एवढीच जाणीव या वेळीं त्याच्या अंतःकरणात होती. विद्यार्थीसमूह सुमारें पांच हजार असून त्याच्या प्रमुखस्थानीं प्रत्येक जर्मनविद्यालयाचा मुख्य अधिकारी हजर होता. बर्लिन विद्यालयातर्फे पुढील आशयाचें मानपत्र त्यास अर्पण करण्यात आलें.

"जर्मन राष्ट्राला अत्यंत आनंददायक असा दिवस आज उगवला आहे. जर्मनराष्ट्राच्या ऐक्याचा जनक व राष्ट्रीय भावनांचा मूर्तिमंत पुतळा, या भाव-

नानीं प्रेरित झालेलें जर्मनराष्ट्र आपणाभोंवतीं आज गोळा झालें आहे. मनुष्याचीं सार्वजनिक कर्तव्यें काय आहेत व तीं त्यानें कशा रीतीनें पार पाडावींत याचा धडा जर्मन राष्ट्रास आपण शिकविला. जर्मन विश्वविद्यालयातील आह्मी गुरु आपल्या ऐंशिव्या वाढदिवसानिमित्त आपलें अभिनंदन करतों. आपलें शारीरिक व मानसिक स्वास्थ्य परमेश्वर आणखी पुष्कळ वर्षें कायम राखील, अशी आह्मांस आशा आहे."

"आजच्या दिवशीं मोठ्या आनंदानें आपले आभार मानण्यास आह्मास आणखीहि एक विशेष कारण आहे. आपण आह्मास आणखी एक नवा घटक ( स्ट्रास्बर्ग युनिव्हर्सिटी ) मिळवून दिला आहे. आपल्या व्यक्तिविशिष्टत्वाची छाप साऱ्या जर्मनराष्ट्राच्या विचारपरंपरेवर इतकी पक्की करून टाकली आहे कीं, ती कधींहि नाहींशी व्हावयाची नाहीं. ही छाप नाहींशी करण्याचें सामर्थ्य कोणाहि मुत्सद्यात नाहीं. जर्मनभाषाकोविद या नात्यानेंहि आपण इतकें कार्य केलें आहे कीं, आमच्या राष्ट्राच्या वाङ्मयात आपणास सन्मानाचें स्थान देणें योग्य आहे. आपल्या प्रचंड कर्तबगारीचें उदाहरण पाहून लोकांसहि नवा दम उत्पन्न होईल. आपलें कर्तव्य करीत असतां जो दूरदर्शीपणा आपण प्रकट केला, त्यामुळें राष्ट्रीय हितसंबंधाबद्दलचा नवा दृष्टिकोण आह्मास प्राप्त झाला आहे. कितीहि अडचणी आल्या, तरी सबळ आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांचें निमूलन करता येतं, हें प्रत्यक्ष उदाहरणानें आपण सिद्ध केलें आहे. स्वत:च्या आत्मविश्वासाच्या बळावर अनेक भयंकर अडचणींतून जर्मनराष्ट्रास आपण सोडविलें आहे.

"जर्मनींतील विश्वविद्यालयांत जर्मनराष्ट्राच्या ऐक्याचा प्रादुर्भाव पुष्कळ वर्षांपूर्वींच झालेला होता. आतां ज्या अर्थी या भावनेला आपण मूर्तरूप दिलें आहे, त्या अर्थीं तिचें विशुद्धरूप कायम राखणें हें साऱ्या विश्वविद्यालयाचें कर्तव्य आहे. अनेक प्रकारच्या मतांनीं आणि मतांतरांनीं विश्वविद्यालयांतील तरुणांचीं चित्तें राष्ट्रैक्य भावनेपासून भ्रष्ट होऊं न देणें हें सर्व विश्वविद्यालयाचें आद्य कर्तव्य आहे. आपल्या सुप्रसिद्ध मुत्सद्याचा सन्मान करण्यासाठीं सर्व राष्ट्र एका उत्साहानें आज एकवटलें आहे. या महोत्सवाचें उदाहरण जनतेच्या डोळ्यांपुढें नित्य राहून बादशहा व साम्राज्य यांची भक्ति तिच्या चित्तांत वाढत्या प्रमाणावर व्हावी, असें मागणें आह्मी परमेश्वरापाशीं मागतों. ही आमची इच्छा परमेश्वर पूर्ण करो.

या मानपत्राला बिस्मार्क यांनीं पुढील उत्तर दिलें.

"माझ्या आयुष्याचा व्यय मीं कोणत्या रीतीनें केला, याचा हिशोब देण्याकरतां आजचा दिवस परमेश्वरानें मला दिला आहे. अशा प्रसंगीं जर्मन विश्वविद्यालयांतील तुह्मी प्रमुख माणसें जातीनिशीं येथें हजर राहून माझा सन्मान करीत आहां, यामुळें आनंदातिशयानें माझें अंतःकरण गहिंवरून गेलें आहे. हा माझा स्वतःचा मान आहे, असें मी समजत नाहीं, तर जें कार्य पुढें चालावें अशासाठीं मी खटपट केली, तें कार्य तुह्मास रुचलें असें यावरून सिद्ध होतें. हें कार्य मीं पार पाडलें असें नव्हे. याच्या पूर्तीसाठीं पुष्कळांनीं परिश्रम केले आणि सुदैवानें ते फलद्रूप झाले. माझ्या नावाभोंवतीं सारा जर्मनी आज एकवटला आहे, हें पाहून मला अत्यंत आनंद होतो, पण त्याबरोबरच माझ्या चित्ताला कांहीं कालरताहि येते केवळ माझ्या नावालाच हें महत्व आहे, असें नाहीं. माझ्या नावाचें केवळ निमित्त करून आपल्या राष्ट्रीय भावनेच्या झेंड्याभोंवतीं जर्मनी एकवटला आहे, असें मला वाटतें. राष्ट्रासाठीं धडपड करण्याच्या मानांत मला पुष्कळ भागीदार आहेत. जर्मन अधिकारीवर्ग व सारें जर्मन राष्ट्र इतक्यांचा भाग या कार्यांत आहे, हें मीं पूर्वी नुकतेंच सांगितलें आहे. सान्या राष्ट्राच्या शक्तीचा पाठिंबा आह्मास होता, म्हणूनच तीन युद्धांतून आह्मी निभावून गेलों. जर्मन राष्ट्राच्या सहतीसाठीं हीं युद्धें करणें आवश्यक होतें डेन्मार्कच्या मोहिमेनें आमच्या राष्ट्रकार्याचा ओनामा केला. गेलीं हजार वर्षें निरनिराळीं जर्मन कुळें पुढारीपणासाठीं आपसांत भांडत होतीं. या भांडणाचा अखेरचा निकाल आस्ट्रियन युद्धानें लावला. फ्रान्सच्या मदतीशिवाय आस्ट्रियन युद्धांत आह्मी यशस्वी झालों, तेव्हांच फ्रेंच युद्धाचें बीज पेरलें गेलें. त्याला फळ येणें अपरिहार्यच होतें. फ्रान्सबरोबर लौकरच युद्ध करावें लागणार, याबद्दल मला तर केव्हांहि शंका नव्हती.

हें युद्ध संपल्यानंतर पांच चार वर्षांच्या अवधींत आणखीहि मोठें एकादें युद्ध होईल, असें पुष्कळ चांगल्या लोकांचें मत होतें, पण अशा परिस्थितींतहि आह्मांस शांतता ठेवतां आली. मला अभिमान वाटण्यासारखी एकादी गोष्ट असेल, तर ती हीच. सांप्रतहि युद्धांचीं चिन्हें कोठें दिसत नाहींत. माझ्या राष्ट्रबंधूंनीं जो माझा सन्मान केला, त्यावर वास्तविकपणें माझ्या परलोकवासी धन्याची व त्याच्या प्रधानमंडळाची सत्ता आहे. तो मान खऱ्या दृष्टीनें मज-

कडे न येतां, त्याच्याकडे जाणें योग्य आहे. ईश्वरानें कृपाळू होऊन आमच्या परमपूज्य बादशहांच्या तरवारीस यश दिलें, पण तेवढयानें हुरळून जाऊन दिग्विजयाच्या मागें न लागतां त्या यशाचा उपभोग जर्मनीच्या सहती पुरताच त्यांनीं केला. स्वभावतःच आह्मीं जर्मनलोक शांतताप्रिय आहों, तथापि जरूर पडल्यास तरवार उगारण्यासहि आमची तयारी नसते, असें नाहीं. शक्य तोंपर्यंत शांतता राखावी व जरूर पडल्यास तरवारहि उगारावी, अशी दोन प्रकारची तयारी आमची नित्य असते. युद्धाचा प्रसंग आला, तर आह्मी युद्ध करतों; पण त्यामुळें आह्मास सुख होतें, असें मात्र नाही

"आमच्या साम्राज्यांत सांप्रत पूर्ण एकी नाहीं, हें उघड दिसण्या जोगें आहे. अशा प्रकारची एकी करण्याचा यत्न कोणी केला, तर ताबडतोब त्याला शत्रू उत्पन्न होतात, पण एका अर्थीं, हेंहि चांगलेंच आहे. कारण त्यामुळे शत्रू कोण आणि मित्र कोण याची ओळख ताबडतोब होते. मला शत्रू उत्पन्न झाले नसते, तर मित्राचा लाभहि मला झाला नसता. दुटप्पीपणाची वागणूक नित्य करीत राहणें कोणासहि शक्य नाहीं चढाओढ, हेंच साऱ्या जीवनाचें रहस्य आहे. किंबहुना तिजवरच जीवित अवलंबून आहे. ही चढाओढ साऱ्या सृष्ट पदार्थांत आढळून येते. जीवनाची चढाओढ उद्भिज सृष्टींतहि आहे, हें मला स्वानुभवानें ठाऊक आहे. क्षुद्र कीटकांत आणि पशुपक्ष्यांत ही चढाओढ आहे आणि त्याच प्रमाणें मनुष्यांतहि ती आहे. पहावें तिकडे सृष्टींत रणसंग्राम आढळून येतो. ही चळवळ बंद झाली की, जीवितहि संपलेंच. आपलें अस्तित्व कायम रहावें, अशी आपली इच्छा असेल तर, त्यांत होणाऱ्या तत्यास आपले मन आपण तयार केलें पाहिजे माझे प्रतिस्पर्धी म्हणजे खरे ह्मटलें असता साम्राज्याचेच प्रतिस्पर्धी होत. साम्राज्यशत्रु असें विशेषण त्यांना मीं दिलें, तर त्यांना फार राग येतो. केवळ उपपत्तीच्या दृष्टीनें पाहता, त्यांना साम्राज्य नको असें नाहीं, पण त्याना त्यांच्याच कल्पनेप्रमाणें साम्राज्य हवें आहे. अशा साम्राज्याचे घटक होण्याची त्यांची इच्छा आहे. विशेषतः अशा साम्राज्याचें पुढारिपण त्यास हवें आहे. जर्मन साम्राज्य आज जसें आहे, तसें तें त्यांना नको. याकरिता त्याच्या मोडतोडीचा यत्न ते करतात, पण त्याचा प्रयत्न यशस्वी होणें म्हणजे इतक्या श्रमानें तयार केलेल्या साम्राज्याचा विनाश होणे होय. कारण एका साम्राज्याच्या जागीं चुटकीसरसें दुसरें साम्राज्य निर्माण

करतां येणें शक्य नाहीं या करता त्यांना मी साम्राज्याचे शत्रू म्हणतों. साम्राज्यरक्षणाकरता सतत पचवीस वर्षें या पक्षाशीं मला तोंड द्यावें लागलें. साम्राज्य त्यास मुळींच नको, असें म्हणणें चुकीचें आहे, हें मीं पूर्वींच कबूल केलें आहे, पण साप्रतच्या साम्राज्यावर त्याचे प्रेम नाहीं, हेंहि खोटें नाहीं. ज्या साम्राज्यात आपणाला उच्चस्थान मिळेल, असें साम्राज्य क्याथोलिक पक्षाला हवें आहे. या बाबतींत तडजोडीचीं भाषणें विशप केटेलर याजबरोबर इ स. १८७० सालीं मला करावीं लागलीं. सोशियालिस्ट पक्षाचा आणखी एक निराळाच पथ आहे. त्याच्यांतील बोलक्या व धामधूम माजविणाऱ्या पुढाऱ्यांस ज्यात उच्चस्थान मिळेल, असें साम्राज्य हवें. विश्चुला नदीचें खोरें व ज्यानझिग व पोझेन प्रांत यांची प्राप्ती पोल लोकास ज्याच्या द्वारें होईल, असें साम्राज्य त्या लोकांस पाहिजे. एकदरीनें सर्व पक्षास कोणत्या ना कोणत्याप्रकारचें साम्राज्य पाहिजे यात शंका नाहीं. याकरता केवळ उपपत्तीच्या दृष्टीने ते साम्राज्यशत्रू नव्हत; पण त्याना सध्यांचे साम्राज्य नको. यामुळें सध्याच्या साम्राज्याचे ते शत्रू बनले आहेत. माझ्या पुष्कळ वर्षांच्या अनुभवानें हें माझें आतां निश्चित मत बनलें आहे. मला अनेक शत्रू उत्पन्न झाले, पण त्यामुळेंच माझे खरे मित्रहि मला लाभले, ही त्यातल्यात्यांत समाधानाची गोष्ट होय. याशिवाय ‘ आपण विजयी झालों ’ असें माझ्या शत्रूंस अद्यापीहि वाटत नाहीं, हें सामाधान तरी मला काय कमी आहे ? अधिकार सोडून मला पांच वर्षें झाली, तरी अद्यापीहि माझ्या शत्रूचे हल्ले थांबलेले नाहींत. पूर्वी इतक्याच निकरानें अद्यापीहि ते मजवर हल्ले करतात. गेल्या तीस वर्षांच्या युद्धात आपण विजयी झालों, असें त्यास वाटल असतें, तर त्यांचे हल्ले थाबले असते कारण शत्रू चीत झाल्यावरहि त्याला ठेचण्याइतका नामर्द आणि अनुदार कोणीहि नाहीं. वास्तविक मी तर आतां शून्यवत् झालों आहें. असें असताहि त्यांचा मजवरील राग कमी होत नाहीं. यावरून आपल्या जयाची जाणीव त्यास झालेली नाहीं, हे पाहून मला संतोष वाटतो

“ सोशियालिस्ट पक्षापैकीं एकाद्या पुढाऱ्याच्या गळ्यांत अध्यक्षपदाची माळ पार्लमेंटानें घातली असती, तर फार बरें झालें असतें. कारण त्यामुळें त्यांचें धोरण तरी काय आहे, हें लोकांपुढें स्पष्ट मांडणें त्यांस भाग झालें असतें. आपलें धोरण स्पष्टपणें लोकांपुढें ते मांडीत नाहींत, यावरून तें अखेरीस यशस्वी होईल कीं नाहीं, याबद्दल त्यांची त्यांसच शंका वाटत असावी. आपले

हेतु लोकांना कळतील कीं काय, अशी भीति त्यांस सदोदीत वाटते. कारण हे हेतु उघड झाले, तर मग त्यांस कोणीहि मदत करणार नाहीं.

या आपसांतील यादवीबद्दल आपणांस फारसें वाईट वाटू देऊं नका. त्यांत जयापजयाचें पारडें अनेक वेळां एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाकडे जात असतें. आज जे आपल्या साम्राज्याचे घटक बनले आहेत, त्या आपल्या मित्राशीं सुद्धां पूर्व काळीं अधिक भयंकर युद्धें आह्मांस करावीं लागलीं आहेत. आपल्या पार्लमेंटांतील कलागतींचा शेवट परस्परांचा अपमान करण्यात मात्र होतो. आपलें मत साधारपणें सिद्ध करून प्रतिपक्षावर आपली छाप बसविली पाहिजे, असें कोणासहि वाटत नाहीं. येन केन प्रकारेण प्रतिपक्षाची फजिती केली, म्हणजे आपलें काम संपलें, असें सांप्रतच्या सभासदांस वाटतें. आमच्या पार्लमेंटाची सांप्रतची स्थिति अशा प्रकारची आहे. अशा स्थितींत पार्लमेंटात थोडी फार गडबड झाली, तरी तीबद्दल भीति बाळगण्याचें कारण नाहीं. कारण तिचे कांहीं चिरस्थायी परिणाम व्हावेत, असें महत्वच त्या गडबडींत नसतें. गेल्या दोनतीनशें वर्षांपूर्वी घडलेल्या कित्येक गोष्टींचे प्रतिध्वनी आपल्या कानांत आजहि घुमत आहेत. शहरांच्या कारभाराबद्दल, सरदार घराणीं आणि व्यापारीसंघ याजमधील भांडण अद्यापीहि कायम आहे. पूर्वी शेतकऱ्यांनीहि सरकाराबरोबर लढाया केल्या आहेत. धर्मसुधारणेचा उदय झाल्यानंतर निरनिराळ्या पंथांतील धार्मिक तंटे सुरू झाले. यानंतर तीस वर्षांचें युद्ध व सप्तवार्षिक युद्ध अशीं दोन महायुद्धें आपणास करावीं लागलीं. आपणांत फूट पडण्यास इतकीं सबळ कारणें असताहि प्रसंग पडल्याबरोबर आपण सर्व एकजुटीनें शत्रूशीं लढलों आहों. ही आपली एकजूट भविष्यत् कालींहि परमेश्वर कायम ठेवील, अशी माझी खात्री आहे. एकमेकांशीं तंटे करीत बसण्याची संवय साऱ्याच जर्मनींत आहे. कधीं कधीं हे तंटे नुसत्या तोंडानेंच चालतात आणि कधीं कधीं दंडादंडीचे प्रसंगहि घडतात. आपला हा मूळस्वभाव जर आपण एकदम टाकून दिला, तर आपली प्रगतीहि खुटेल आमचे सर्व पक्षभेद एकदम नाहींसे झाले व अध्यक्ष म्हणेल, त्याला नुसती मान हालविण्याचें व्रत आह्मी पत्करलें, तर प्रगति तरी कशी होणार? याशिवाय आह्मा जर्मनांना ही गोष्ट साधणें अशक्यच आहे.

या पृथ्वीतलावरील राज्यकर्ते कितीहि शहाणे झाले, तरी विश्वाचा शास्ता त्याच्याहून अधिक शहाणा आहे तो जी शासनपद्धति ठरवील, ती आपण

सर्वांनीं मान्य केलीच पाहिजे ' परमेश्वरा, तुझ्या मर्जीप्रमाणें होवो ' असें आपल्या अंत:करणास शिकविण्याचा यत्न मी नित्य करीत असतों. त्याची इच्छा काय आहे, हें जाणून घेण्याची धडपड मी करतों; पण तींत नेहमींच मला यश येतें, असें नाहीं त्याचप्रमाणें सरकारचे हेतु काय आहेत, हें जाणण्याची धडपड आपण करीत असतों. कित्येक वेळा सरकारच्या मनांत कोणताहि हेतु नसला, तरी एकाद्या हेतूचा आरोप त्याजवर करून तो तेथें आहे, अशी आपण आपली खोटीच समजूत करून घेतों. आपले प्रतिपक्षी जितके वाईट आहेत, असें आपणास वाटत असतें, तितके ते खरोखर वाईट नसतात, हा नियम ध्यानात ठेवा.

" सद्गृहस्थहो, तुमच्या प्रेमाबद्दल तुमचे मी पुन्हा एकवार आभार मानतों आपली उन्नति होत जाणार आहे, असा दृढ विश्वास मजप्रमाणें तुह्मीहि चित्तात बाळगा. तीस चाळीस वर्षांच्या उमेदवारीची तडफ ऐंशी वर्षांच्या झाताऱ्यात राहिली नसेल व यामुळें मी कदाचित् थडावलों असेन, तरी पण एका जर्मनाचाहि नाश परमेश्वर होऊं देणार नाहीं, मग साम्राज्याचा तर नाहींच नाहीं, असें मला निश्चयानें वाटतें. तुमच्यापैकीं जे कोणी परमेश्वरभक्त असतील ते या कार्यांत परमेश्वराची मदत मिळविण्याचा यत्न करतील अशी मला आशा आहे.

जर्मनींतील विश्वविद्यालयाच्या मानपत्रास वरील उत्तर देऊन झाल्या-नतर तुर्कस्थानच्या सुलतानाच्या वतीनें टयूफिक पाशा यांनीं बिस्मार्क याचें फ्रेंचभाषेंत अभिनंदन केलें. बिस्मार्क यानींहि त्याच भाषेंत सुल-तानाचे आभार मानले. याच वेळीं, पुष्कळ जर्मन संस्थानिकाकडून व वर्टेंबर्गच्या राजाकडून अभिनदनपर तारा आल्या होत्या. मेकलेन-बर्गच्या ग्रँडड्यूककडून, खदस्तूरचें पत्र घेऊन जासूद आले होते.

यानतर मेजवानीचा मोठा समारभ झाला. जागोजाग तंबू उभारून त्यात सर्वांची भोजनाची व्यवस्था केली होती.

भोजनानंतर त्याचा सहकुटुब दर्शनाचा समारंभ झाला. बिस्मार्क आपल्या मुलामाणसासह दरवाजांत येऊन उभे राहिले. त्याच्यां आजू-

बाजूस पाठशाळांतले विद्यार्थी व शिक्षकगण उभा राहिला. चोहोंकडून टाळ्यांचा व आनंददर्शक आरोळ्यांचा प्रचंड ध्वनि उमटूं लागला. इतका आनंदाचा व उत्साहाचा प्रसंग बिस्मार्क यांच्याहि पाहण्यांत नव्हता. या वेळीं या विद्यार्थिगणाच्या उत्साहाचें जें प्रदर्शन झालें, त्याचें वर्णन लेखणीनें करणें शक्य नाहीं.

अशा रीतीनें आनंदाच्या उकळीचा पहिला भर ओसरल्यानंतर विद्यार्थ्यांच्या वतीनें बिस्मार्क यांचें अभिनंदन करण्याकरता एक तरुण विद्यार्थी पुढें आला.

"आजच्या दिवशीं सर्व जर्मनराष्ट्राचें अंतःकरण आनंदानें व उत्साहानें भरून वहात आहे. अशा प्रसंगीं आपलें अंतःकरणपूर्वक अभिनंदन करणें हें आह्मा विद्यार्थ्यांचें पवित्र व राष्ट्रीय कर्तव्य आहे. ज्यानें आमचें हें संघटित व बलाढ्य साम्राज्य निर्माण करून मोठ्या छातीनें त्याला प्रगतीच्या मार्गास लाविलें, त्याजबद्दल आमच्या मनांत जी कृतज्ञता व जो आदर वसत आहे, त्याचें खरें माप या प्रसंगीं उच्चारलेल्या शब्दांनीं होण्याजोगें नाहीं. सर्व जर्मन विश्वविद्यालयातर्फे आठवण म्हणून एक लहानशी देणगी आपणास अर्पण करण्याचा मान आह्मास मिळाला, हें आमचें मोठें भाग्य होय. आमची कधींहि न भंग पावणारी कृतज्ञता आणि आपणाबद्दलची आमची भक्ति हीं या द्वारें आह्मी आपणास अर्पण करीत आहों.

आपल्या ऐंशीव्या वाढदिवशीं सर्व जर्मनविद्यार्थीवर्ग अत्यंत अंतःकरणपूर्वक आपलें अभिनंदन करीत आहे. आपसांतील सर्व तटे मोडून टाकून आमची पितृभूमि ज्यानें मुक्त केली, त्याच्या जन्मदिवसाचा उत्सव कृतज्ञ अंतःकरणानें आह्मी आज साजरा करीत आहों. परस्परांशीं भांडणाऱ्या व त्यामुळें दुर्बळ बनलेल्या जर्मन संस्थानांचें एकीकरण करून त्यांचें बलाढ्य साम्राज्य आपण निर्माण केलें आहे तोफांच्या प्रचंड कडकडाटांत आमच्या वाडवडिलांनीं आपले विजयध्वज उभारले आणि ही बहुमोल देणगी आतां अनायासें आह्मास प्राप्त झाली आहे, तथापि ज्या दिशेनें जाऊन आपण हें महत्कार्य शेवटास नेलें, त्याच दिशेनें आह्मी सारे जर्मन विद्यार्थी नित्य जाऊं व आपणाप्रमाणेंच आह्मी

स्वार्थत्यागास नित्य तयार राहूं, अशी आज आह्मी शपथ वाहतों. परमेश्वरानें दीर्घ काळपर्यंत आपणास आयुरारोग्य द्यावें, अशी आमची त्यास प्रार्थना आहे.

"गडे हो, प्रिन्स बिस्मार्क यांच्या नांवें आपण सारे त्रिवार जयघोष करूं या."

या भाषणाला बिस्मार्क यानीं पुढील उत्तर दिलें.

" सद्गृहस्थहो, माझ्या गतायुष्यांत जी काहीं कामगिरी मीं बजावली, ती तुमच्या गुरूंच्या व विश्वविद्यालयीन पंडिताच्या मनास आली, हें नुकतेंच तुह्मास दिसून आलें आहे. आता तुह्मी भावी पिढीचे आधारस्तंभ माझें अभिनंदन करींत आहां, यावरून भविष्यत् कालाबद्दलहि सदाशा बाळगण्यास मला हरकत दिसत नाहीं. माझें आतां वय होऊन गेलें आहे. आतां कोणी माझें अभिनंदन केलें अथवा न केलें, तरी त्याचें फारसें महत्व मला नाहीं. भविष्यत् कालाबद्दल जें वचन तुह्मी दिलें आहे, त्याचीच किंमत माझ्या दृष्टीनें अभिनंदनापेक्षा अधिक आहे. आज येथें हजर राहून ज्या मतास तुह्मी पुष्टी दिली, तीं मतें प्रत्यक्ष आचरण्याची सवड तुह्मापैकीं पुष्कळांस भविष्यत् काळीं प्राप्त होईल. मी आतां बोलून चालून गतकाळाचा आहें. आतां माझे स्वस्थ बसण्याचे दिवस असून तुमचे कर्तृत्वाचे दिवस यावयाचे आहेत. या पुढील अर्धशतकांत तुमचें प्रत्यक्ष कर्तृत्व दिसणार आहे तुमच्या या वचनामुळें मला फार संतोष वाटला. आपल्या तारुण्यांत ज्या मतांचा पुरस्कार तुह्मी इतक्या उत्साहानें करतां तीं मतें पुढील आयुष्यांत तुह्मी सर्वस्वी टाकून द्याल, असें मला वाटत नाहीं. जर्मनलोकांचा असा स्वभावच नाहीं. आणखी चाळीस पन्नास वर्षांनीं तुमच्या आजच्या मतांत मुळींच बदल होणार नाहीं, असें नाहीं, पण तुमच्या ताज्यातवान्या मनोभूमिकेंत पहिल्या वुइलियम बादशहाच्या दीर्घ कारकीर्दीत जें बीज पेरलें गेलें आहे, तें पुढें फळास आल्यावाचून राहणार नाहीं राज्यकारभाराच्या पद्धतींत मध्यंतरीं कितीहि फेरबदल झाला असला, तरी मुख्य तत्वाचा विसर तुह्मास कधींहि पडणार नाहीं. तुह्मी त्या वेळीं वृद्ध झालां असला, तरी आपण सारे जर्मन आहों, ही राष्ट्रीय भावना तुह्मास सोडून जाणार नाहीं. आपल्या चित्तांतील राष्ट्रीय भावना आपण होऊन कोणी हुसकावून लावीत नाहीं, अथवा आपण देशांतर केलें, तरीहि त्या आपणास सोडून जात नाहींत. अमेरिका, केप, अथवा आस्ट्रेलिया यांत लक्षावधी जर्मनांची वस्ती आहे. आपला पितृदेश पुष्कळ

वर्षेपर्यंत त्यांनीं सोडलेला आहे; तथापि स्वदेशरक्षणार्थ तरवार उचलण्याचा प्रसंग आला असतां, जो उत्साह त्यांच्या आंगी पूर्वी होता, तोच आजहि आहे, अशाबद्दल मजपाशीं भरपूर पुरावा आहे.

आपल्या राष्ट्राच्या उद्धारासाठीं आपणास घनघोर युद्धें करावीं लागलीं. हॉलस्टीन विषयक युद्धानें या महारणयज्ञाची प्रस्तावना केली. आस्ट्रिया बरोबर झालेलें युद्ध आपणास आवश्यक असेंच होतें, कारण आम्हा दोघां मधील तंट्याचा निकाल तरवारीशिवाय लावील अशी कोणतीहि न्यायसभा अस्तित्वातच नव्हती. इ. स. १८७० ची युरोपची परिस्थिति ज्याला चांगली कळली असेल, त्याला फ्रँको जर्मन युद्धाच्या अनिवार्यपणाबद्दल खात्री पटली असेलच. ज्या दिवशीं सॅडोवाचा मोठा जय आम्ही मिळविला, त्याच दिवशीं फ्रॅंको जर्मन युद्धाचें बीज पेरलें गेलें. फ्रँको जर्मन युद्ध आटोपल्यानतर पांच चार वर्षांच्या अवधींतच पुन्हा दुसरें युद्ध होईल, असें सर्वांस वाटत होतें. त्यांच्या या मतांत फारशी चूक होती, असें नाहीं; पण बने तोंपर्यंत रक्तपात टाळण्याचा माझा निश्चय होता. आम्ही जर्मनांनीं युद्ध का करावें, याला कारण नव्हतें आमच्या गरजा भागलेल्या होत्या. केवळ विजय मिळविण्यासाठीं ज्या प्रांताची जरूर आपल्यास नाहीं ते प्रांत खालसा करण्यासाठीं लढाई करणें, हें सदसद्विवेक बुद्धीस अनुसरून नाहीं, असें मला वाटतें. या बाबीत नेपोलियननें कोणत्याहि तत्वांचा निर्बंधच पाळला नव्हता. पण अशी गोष्ट करणें, आह्मा जर्मनांच्या न्यायबुद्धीस रुचत नाहीं.

या करतां मी नेहमीं शांततेचें धोरण स्वीकारलें. आमच्या घराची झालेली पडझड दुरुस्त करून आवश्यक तितकी त्याची वाढ केल्यानतर दुसऱ्याचीं घरें घेण्याचा उद्योग मीं केला नाहीं. या कामीं कित्येक वेळा थोडें बहुत नुकसानहि मीं सोसलें आहे क्यारोलीन, अथवा स्यामोआ हीं बेटें वसाहतीच्या दृष्टीनें कमी महत्वाचीं आहेत, असें नाहीं, तथापि त्याकरता कराव्या लागणाऱ्या युद्धाच्या मानानें त्यांचें महत्व मला वाटत नाहीं. लष्करी महत्व वाढविण्याकरता अथवा सत्तावर्धनाकरतां युद्धांत पडण्याची गरज आपणांस नाहीं. आह्मा जर्मनाच्या स्वभावरचनेंत एक विशेष आहे. तो हा कीं, आपली स्वतःची किंमत आह्मांस कळते व तीतच आह्मी संतुष्ट असतों. लोकांनी आपणांस मान दिला, तरच आपला मान वाढतो, असें आह्मांस वाटत नाहीं. याकरता इभ्रत

सत्ता अथवा परकीयाची कृपा असल्या खुळाच्या मागें आह्मी लागत नाहीं. जें कांहीं आह्मापाशीं आहे, तें आमचे आह्मास पुरेसें आहे, या मूळ कल्पनेस पुढें ठेवून तिच्या अनुरोधानें मी आपलें वर्तन ठेवलें. कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, हें ठरविण्यापेक्षां कोणत्या गोष्टी करण्याचें टाळलें पाहिजे, हे ठरविणें मुत्सद्याला सोपें जातें. अंतःकरणाचा प्रामाणिकपणा व शौर्याबरोबर सहज येणारी उदात्त चित्तवृत्ति याभुळें पुष्कळशा गोष्टी करण्याचें आपणास टाळावें लागतें, पण कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत, हें ठरविणें ही बाब वेगळी. अशा गोष्टींची अगाऊ तरतूद करून ठेवणें कोणासहि शक्य नाही. एकाद्या समुद्राचा ठाव आपणास ठाऊक नसला व त्याचा नकाशाहि आपणापाशीं नसला, तर त्यातून चालणाऱ्या नौकेला ज्याप्रमाणें प्रत्येक क्षणी सावधगिरी बाळगावी लागते, त्याचप्रमाणें मुत्सद्यालाहि राज्य-नौकेच्या सुकाणूवर असतां फार काळजी बाळगावी लागते. पुढें हवामान कसें होईल, पोटांत कोठें जलौघ आहेत कीं काय वगैरे गोष्टींचें भविष्य ततोतंत वर्तविणें कोणासहि शक्य नाहीं मुत्सद्देगिरींत आणखीहि एक मोठी अडचण आहे मुत्सद्याला पुष्कळवेळा दुसऱ्यांच्या तंत्रानें चालावें लागतें. दुसरा एकादा मनुष्य अमुक प्रकारें वागेल, अशा भरवशावर तो आपले व्यूह रचीत असतो; पण जरूरीच्या वेळीं तो परका मनुष्य ठरल्याप्रमाणें वागत नाहीं. अशा प्रसंगीं त्या मुत्सद्याचे. पहिले सारे बेत ढासळून पडतात अशी स्थिति असल्यामुळें मुत्सद्याला पूर्ण स्वातंत्र्य केव्हाहि नसतें. ज्याच्या मदतीची त्याला खात्री असते, असे त्याचे मित्र आयत्या वेळी फिरले, तर प्रसगीं त्याच्या फजितीस पारावार उरत नाहीं. या करता मुत्सद्याला आपली दिशा निश्चयानें ठरविणें अत्यंत कठिण आहे अशा स्थितीत एकाद्या मुत्सद्याची कारकीर्द यशस्वी झाली, तर ती परमेश्वराची मोठी कृपाच समजली पाहिजे. त्याच्या कार्यांत कोठें बारीक सारीक चुका राहिलेल्या असल्या, तर त्याजबद्दल त्यावर तुटून पडू नये. जी कांहीं घटना झाली आहे, ती त्या मुत्सद्यानें केली आहे, असें न समजता ती परमेश्वरानें केली आहे असे समजून, असेल तसा तिचा स्वीकार केला पाहिजे. काळाचा ओघ मनुष्याला उत्पन्न करतां येत नाही अथवा तो फिरवितांहि येत नाहीं. ओघाबरोबर तरंगत जाणें त्याला भाग असतें. अशा स्थितींत अधिक उण्या चातुर्यानें आणि अनुभवानें आपली नौका त्याला चालवावी लागते. प्रसगीं त्याची नौका एकाद्या खडकावर आपटते, एखाद्या प्रसगीं ती भलत्याच किनाऱ्याला घुसते अथवा एकाद्या प्रसंगीं इच्छित बंदरात ती सुरक्षित पोहोंचते.

आपण आज बहुमतानें जो निकाल दिला आहे, त्यावरून आपली नौका आपल्या इच्छित बंदरात पोहोंचली आहे, असें आपणास वाटत असल्याचें दिसतें. या बाबींत सर्वांचेंच एकमत झालें आहे, असें माझ्यानें म्हणवत नाहीं; तथापि बहुमत तसें असेल, तर मिळालेल्या वाट्यानें आपण संतुष्ट राहू या. सर्वांचें एकमत व्हावें, अशी खटपट चालू ठेवण्यास माझी हरकत नाहीं; तथापि त्यामुळें आपल्या तृप्तवृत्तीचा भंग होऊं नये. जें साम्राज्य आज आपणास मिळालें आहे, तें घेऊन त्याचें कौतुक व लालनपालन करणें, हेंच आपलें कर्तव्य आहे. प्रत्येक व्यक्तीला पसंत पडेल, असें साम्राज्य निर्माण करण्याच्या खटपटीस लागून तटे भांडणें वाढविण्यापेक्षा तें आहे, असेंच घेऊन त्याचें संवर्धन आपण करू या. जें कांहीं मिळालें आहे, तें आपल्या हातून पुन्हा जाऊं नये, या करतां त्याच्या रक्षणाची खटपट काळजीपूर्वक आपण प्रथम करू या. नाहीं तर, हातीं आहे, त्याची योग्यता न जाणल्यामुळें तें आपल्या हातचें जाईल प्राचीन काळीं जर्मनीचें बलाढ्य साम्राज्य होतें, पण तें एकवेळ गमावल्यानंतर दुसरें निर्माण होईपर्यंत मध्यंतरीं पांच सहा शतकांचा काळ लोटला. भूमीच्या पोटांतील रचना ज्याप्रमाणें मुंगीच्या पावलानें चालत असते व भूमीवर पर्वत व पठार उत्पन्न होण्यास ज्याप्रमाणें कित्येक सहस्रकें लोटत असतात, त्याच प्रमाणें राज्यघटना होण्यासहि दीर्घ काळ जावा लागतो. तरुण सद्गृहस्थहो, परस्परांवर टीका करीत बसण्याचें खूळ आम्हा जर्मन लोकांत फार आहे या खुळापासून तुम्ही अलिप्त राहावें अशी विनंति मी तुम्हाला करतों सारें युरोप आपल्या विरुद्ध असतांहि जी कांहीं कमाई परमेश्वराच्या कृपेनें आपणास करतां आली, तिचें शिरसा ग्रहण करा हें कार्य अगदीं विघ्नावांचून तडीस गेलें, असें नाहीं फ्रेंच युद्ध संपण्यापूर्वी युरोपांतील सारीं राष्ट्रें आपणाविरुद्ध एकवटलीं असतीं, तर आपणास जें आज मिळालें आहे, तेंहि मिळालें नसतें युरोपातील राष्ट्रें अशा रीतीनें एकवट्ट नयेत असें करणें, हें कार्य माझ्या शिरावर होतें. असें करणें हें माझें पहिलें कर्तव्य होतें. आपल्या सर्व्याच इच्छा तृप्त न होणें, हें अगदीं स्वाभाविक आहे. जें कांहीं आपणास मिळालें आहे, त्याहून अधिकाची प्राप्ती व्हावी, ही तुमची इच्छा रास्त आहे; पण या अधिकाची प्राप्ती तुह्मांस मजकडून झाली नसली, तर त्याबद्दल मजवर इतकी करडी नजर करू नका, इतकेंच तुह्मास माझें सांगणें आहे जें अधिक तुह्मास हवें आहे, तें मिळविण्याची खटपट करण्याचा पूर्ण

अधिकार तुह्मांस आहे, तथापि अशी खटपटहि काळवेळ पाहून करावी लागते या कामीं घाई उपयोगी पडत नाहीं. याकरतां काहीं झालें, तरी आपणास जें काहीं मिळालें आहे, त्याचें रक्षण आपण प्रथम करू या. जर्मन संस्थानें एक होऊन त्यांचें मोठें साम्राज्य बनावें, याकरता जो महायज्ञ झाला, त्यांत जर्मन-राजघराण्यांनीं मोठाल्या आहुत्या दिल्या आहेत. यांत प्रशियाच्या राजाचाहि फार मोठा भाग आहे. साम्राज्य निर्माण व्हावें याकरतां प्रशियाच्या राजालाहि आपल्या स्वातंत्र्यास अंशतः मुकावें लागलें; पण साम्राज्याकरता हा स्वार्थ-त्याग माझ्या वृद्ध धन्यानें केला. याकरता त्या यज्ञांत ज्यांनीं ज्यांनीं आहुत्या दिल्या, त्या सर्वांनीं आपणास उपकारबद्ध करून ठेवलें आहे त्याजबद्दल कृत-ज्ञताबुद्धि बाळगणें हें आपलें कर्तव्य आहे. जर्मनराजघराण्यांनीं गेलीं हजार वर्षें जी स्वतन्त्रता भोगली, ती सोडण्याचें त्यांस किती जड गेलें असेल, याचा तुह्मीच विचार करा त्याचप्रमाणें ज्या जर्मनपंडितांनीं जर्मनराष्ट्राच्या मनांत एकीची ज्योत कित्येक शतकें जिवत ठेवून व योग्य वेळीं तिला अधिक पेटवण घालून ती प्रकाशमान् केली, त्यांचेहि आपणावर फार उपकार झाले आहेत. एकाच गोष्टीबद्दल मला तुह्मास पुन्हः पुन्हा बजावून सांगावेंसें वाटतें. हें जुनें खोड आहे, यामुळें याला पुढे पाऊल टाकण्याचें धैर्य होत नाही, असाहि पाहिजे तर मला दोष द्या, पण नव्या वस्तूला हात घालण्यापूर्वी जुनीचे जतन चांगलें करा. आपल्या साम्राज्याकडे पाहून बोटें मोडणाराची भीति बाळण्याचें कारण आपणास नाहीं. आपसांतील तट्यांबद्दलहि आपणास फारशी भीति नको. जर्मनींतील तटे पुरातन काळापासून असेच चालत आले आहेत पार्ल-मेंटांत आज दिसून येणारे पक्ष हे त्या प्राचीन भेदांतूनच उद्भवलेले आहेत. शेतकरी आणि जमीनदार, कुळें आणि सावकार, व्यापारी संघ व सरदार घराणीं व निरनिराळे धार्मिक पक्ष हीं सारीं जुनींच खोडें आहेत. जर्मनीच्या भूमीचाच जणू काय हा गुण आहे. हजारों प्रकारचे वृक्ष ज्याप्रमाणें आमच्या भूमींत उगवतात, अथवा कोठें पर्वत आणि कोठें तळीं हा फरक जसा आमच्या भूमींत आहे, त्याचप्रमाणें जणू काय हे पक्षभेदहि तींतूनच निर्माण झाले आहेत याचीं मुळें जमिनींत खोल गेलेलीं असल्यामुळें तीं चुटकी सरशीं उपटून टाकणें शक्य नाहीं आपल्या प्रतिपक्षासंबधीं उदारबुद्धि आपण राखली पाहिजे प्रसगीं त्याच्याशीं दोन हात झाले, तरी तो राग आपण मनात ठेवू नये. जेथें जीवित म्हणून आहे, तेथें युद्ध आहे, हा नियम अखिल सृष्टींत

आढळून येतो. आपल्यांतील सारीं भांडणें आज नाहींशीं झालीं, तर चिनी लोकाप्रमाणें आपणहि कुजून जाऊं. जेथें अहमहमिका नाहीं, तेथें तटे नाहींत आणि तेथें चैतन्यहि नाहीं आतां अशा रीतीनें आपण आपसांत तंडत असलों तरी, जेथें आपल्या मनोवृत्ति एकरूप होतील, असें एकादें सामान्य ध्येय अथवा साध्य आपणासर्वांसमोर असलें पाहिजे. आपणासर्वांचा एकादा मध्य-वर्ती बिंदु असला पाहिजे. हा मध्यवर्ति बिंदु आपलें सध्यांचें साम्राज्य हाच होय. भविष्यत् काळचें कल्पनेचें साम्राज्य हा आपला मध्यवर्ति बिंदु होऊं शकणार नाहीं. आपल्या साम्राज्याचें प्रतिनिधित्व ज्या अर्थीं बादशहाकडे आहे, त्या अर्थीं बादशहांच्या नांवानें व साम्राज्याच्या नावानें आपण सारे जयघोष करूं या. तुह्मापैकीं ज्या कोणाच्या नजरेस इ. स. १९५० साल पडेल, त्यालाहि बादशहाच्या आणि साम्राज्याच्या नावानें असाच जयघोष करण्याची सुसंधि प्राप्त व्हावी, असा आशिर्वाद मी परमेश्वरापाशीं मागतों. ”

बिस्मार्क यांचें भाषण चालू असतां सारा विद्यार्थीगण चित्रासारखा तटस्थ होऊन राहिला होता. भाषण संपतांच त्याच्या आनंदास एकदम वाचा फुटली. देशाभिमानदर्शक गाण्यांच्या ललकाऱ्या चोहोंकडून ऐकूं येऊं लागल्या. या नंतर प्रिन्स बिस्मार्क हे आपल्या दोन मुलास व डॉ. श्वेनिंगर यास बरोबर घेऊन विद्यार्थीसमुहांत शिरले. ओळखीच्या मंडळींची थोडी बहुत विचारपूस करावी, असा त्याचा मनोदय होता; पण त्याजभोंवतीं विद्यार्थ्यांचा एवढा मोठा घोळका जमला कीं, आणखी पुढें जाण्यास त्यांस वाटच मिळेना. तेव्हा ते तेथूनच आपल्या जागीं परत आले. यानंतर सगळे विद्यार्थी एकामागून एक असे रांगेनें लष्करी थाटानें त्याच्या समोरून गेले.

या प्रसंगीं ह्यूगो हेरोल्ड नांवाचा एक बातमीदार हजर होता. बिस्मार्क पार्लमेंटांत भाषण करीत, तेव्हा हा बातमीदार नेहमीं हजर असे. विद्यार्थ्यांस उपदेश करीत असता बिस्मार्क याचें तें आवेशयुक्त भाषण ऐकून हा बातमीदार म्हणाला, “ बिस्मार्क अद्यापि वृद्ध झालेले नाहींत.

पूर्वीच्या मनूंतले बिस्मार्क अजून तसेच आहेत. पार्लमेंटात भाषण करीत असता जी त्याची मुद्रा असे, तशीच ती आजहि आहे." बिस्मार्क याच्या आवाजाची खुबी अशी होती कीं, श्रोत्याचीं मनें आपणाकडे ते तावडतोब आकर्षण करून घेत. वक्ता ह्मणविण्यास जे नाटकी गुण लागतात, ते बिस्मार्क यांजपाशीं नव्हते. "मी मोठा वक्ता नाहीं; पण माझ्या भाषणातला गुण इतकाच कीं, तें अगदीं स्पष्ट आणि साधें असतें." असें बिस्मार्क म्हणत असत. ह्यूगो हेरोल्ड म्हणतो "बिस्मार्क यांचा प्रत्येक शब्द आणि त्याच्या मुद्रेवरील प्रत्येक भाव हीं तात्कालिक स्फूर्तीनें उत्पन्न झालेलीं असतात. यामुळें तीं अगदीं स्वाभाविक असतात. त्याच्या निर्भय अंत:करणाचें पूर्ण प्रतिबिंब त्याच्या भाषणांत उमटलेलें असतें." बेअरटेलर नांवाचा दुसरा एक गृहस्थ म्हणतो, "गॉर्टशेकॉफ, बिकन्सफील्ड, ॲन्ड्रेसी, वार्डिंग्टन, महमदअल्लीपाशा, मॉनसेन, ग्रँट वगैरे अनेक गृहस्थांच्या भेटी मीं घेतल्या व त्यांचीं भाषणेंहि ऐकलीं; पण श्रोत्यांच्या मनांत कौतुक उत्पन्न करणें, ही कला फक्त बिस्मार्क यासच साध्य झाली आहे."

तारीख २७ एप्रील रोजीं विद्यार्थ्यांच्या आखाड्यामार्फत एक प्रतिनिधिमंडळ बिस्मार्क याचें अभिनंदन करण्याकरता आलें. बिस्मार्क याचा विद्यार्थी दशेंतला एक पुतळा करून तो त्यानीं बरोबर आणला होता. पुढें हा पुतळा रुडेल्सबर्ग गावीं उभा करण्यात आला.

या प्रतिनिधींच्या मानपत्रास उत्तर देतांना बिस्मार्क ह्मणाले,

"सद्गृहस्थहो, तुमचे मी अंत:करणपूर्वक उपकार मानतों. ज्या जागीं हा पुतळा उभारण्याचें तुह्मी योजिलें आहे, ती जागा माझ्या चांगली लक्षात राहिली आहे. इ. स. १८३२ सालीं रुडेल्सबर्ग येथें मी गेलों होतों, त्या वेळीं त्या जाग्यावरून दिसणाऱ्या सृष्टिसौंदर्याचा देखावा अद्यापीहि माझ्या स्मरणात

आहे. तेथील सृष्टिसौंदर्य पुष्कळ कवींचा आवडता विषय होऊन बसला आहे. अशा प्रकारच्या सुप्रसिद्ध स्थळाशीं माझें नाव जोडलें जात आहे, याचा मला फार आनंद होतो. आपल्या जुन्या विद्यालयीन मित्रांस भेटण्यासाठीं तुह्मी येथवर आला, यावरून विश्वविद्यालयात काढलेल्या काळाचें स्मरण तुह्मास आनंददायक होतें, असें स्पष्ट दिसतें. मलाहि त्या दिवसाची आठवण झाली, म्हणजे आनंदाचें भरतें येतें. ' वक्रकालगतीचा अनुभव घेत असता गतकालच्या आनंदाच्या दिवसांचें स्मरण होणें, हें अत्यंत कष्टप्रद आहे. ' असें प्रख्यात कवि डांटे याचें म्हणणें आहे. कवित्व या नात्यानें या म्हणण्यांत काहीं तात्पर्य असेल; त्यांत कवीचें बुद्धिलाघवहि दिसत असेल, पण माझ्या मतें हें ह्मणणें बरोबर नाहीं. किमानपक्ष माझ्या स्वतःसंबधीं तरी, हें म्हणणें खोटें आहे. माझ्या आयुष्यात जर कोणता अत्यंत सुखाचा काळ गेला असेल, तर तो विद्यार्थीदशेंतला काळ होय. कारण त्या वेळीं फिर्यादीअर्यादी अथवा इतर घरगुती बाबी याचा कोणत्याहि प्रकारचा कांच मनाला नसतो. आपण अजारी पडलों, म्हणजे आपल्या चांगल्या प्रकृतीच्या वेळच्या स्मरणानेंहि आपणास आनंद होत असतो. सुख आणि दुःख या निश्चित वस्तू नाहींत अथवा त्या प्रत्येकीं स्वतन्त्रहि नाहींत. त्या सापेक्ष आणि परस्परावलंबी असतात.

" आज मी स्वतःला दुःखीच समजतों मी सरकारी अधिकारावर नाहीं, म्हणून मला दुःख होतें असें नव्हे, तर शरीरदौर्बल्यामुळें माझ्या आंगी कर्तृत्वहीनता आली आहे, याचें मला दुःख होतें. अशा प्रसंगीं गतकाळच्या दिवसांच्या स्मरणामुळेंच मला मनःशांतीचा लाभ मिळतो. रात्रीं झोप येईनाशी झाली, तर तळमळणाऱ्या चित्ताला या पूर्वस्मरणानें मी आनंद प्राप्त करून देतों. याकरता मी आधीं सांगितलेलें डांटेचें वचन मला खरें वाटत नाहीं. उलट गतकाळचें स्मरण होतें, तेव्हां मला आनंदच होतो. याचा अर्थ माझ्या अधिकाराच्या दिवसाचें स्मरण, असें मात्र समजू नये. कारण त्या वेळचें स्मरण खरोखरच मोठेंसें सुखदायक नाहीं. त्या काळचें स्मरण म्हणजे दगदगीचें, काळजीचें व त्रासाचें स्मरण होय. उद्यांचा दिवस कसा जाईल अथवा परवा काय भानगडी उपस्थित होतील, याची चिंता जिवाला जाळीत असतां, हें अधिकारपद सुखाचें आहे, असें कसें म्हणतां येईल ? या त्रासाबद्दल अगर दगदगीबद्दल काहीं विशेष प्रतिफळ मिळतें असेंहि नाहीं माझी महत्त्वाकांक्षा

जबर होती अथवा मी सत्तेचा भुकेला होतों, असा आरोप जे मजवर करतात, ते खोटें बोलत असून माझी निंदा ते करीत आहेत, असें मी स्पष्ट म्हणतों. कोणतेंहि काम हातीं घेतलें, तर अत्यंत उत्साहानें तें मी पार पाडीत असें, हें मात्र खरें. मी कोणाचा हुकूम मानीत नसें अथवा कोणाचा वरपगडा मीं चालू दिला नाहीं, हें जसें खरें आहे, तसेंच मी कोणावर वरपगडा चालविला नाहीं, हेंहि खरें आहे. थोडक्यांत इतकेंच सांगावयाचें कीं, प्रत्येकाला मतस्वातंत्र्य पाहिजे, असें माझें मत आहे. पण असें होतें तरी माझ्या वृद्ध धन्याची आज्ञा मी शिरसामान्य करीत असें.

" गत काळच्या सुखाच्या दिवसांचें स्मरण मजप्रमाणें तुम्हांसहि वाटत असेल अशी माझी खात्री आहे म्हणजे संसाराचीं कामें करीत असतां तुम्ही दु:खी असतां, असें म्हणण्याचा माझा आशय नाहीं. तथापि संसाराच्या काळजींत पूर्ण शांतीचा लाभ आपणांस मिळत नाहीं, याबद्दल आपणा सर्वांची एकवाक्यता असेल, असें मला वाटतें. तारुण्याच्या भरात दगदगीची किंमत आपणांस वाटत नाहीं संसारातील कांटे आपणांस तितक्या जोरानें टोंचत नाहींत; पण मनाचा हा जोम पुढे उरत नाहीं त्यावेळीं लहानशा अडचणींनीं आपला जीव घाबरा होतो. अशा प्रसंगीं गत काळच्या सुखदायक प्रसंगांचें स्मरण, हाच आपणास मोठा आसरा असतो. याकरतां माझ्या गतदिवसांचें स्मरण मला तुह्मी करून दिलें, म्हणून तुमचे उपकार मानणें रास्त आहे माझें जें स्मारक करण्याचें तुह्मीं योजिलें आहे, त्यामुळें मजबद्दल तुह्मांस वाटणारी सहानुकंपा व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांच्या आखाड्याचे प्रतिनिधी या नात्यानें तुह्मी आज येथें आलां आहां, पण माझ्या चारित्र्यपटावर जे काहीं काळे डाग पडलेले आहेत, ते या आखाड्यामुळेंच होत, हें कबूल करणें मला भाग आहे. या आखाड्यांच्या नादीं लागल्यामुळें माझ्या हातून नीट अभ्यास झाला नाहीं आणि मी कर्जबाजारी झालों. त्या काळीं आह्मास हल्लींच्या इतका पैसा लागत नव्हता. हल्लींच्या विद्यार्थ्यांना आमच्यापेक्षा दुप्पट रकमहि अपुरीच होते. असल्या प्रकारच्या चैनीनें तुह्मी अधोमार्गास जाल की काय, याची मला भीति वाटते. गार्टीजेनच्या विश्वविद्यालयात मी होतों, त्या वेळीं मोठमोठ्या श्रीमंतांच्या मुलांची राहणीसुद्धा तुमच्या हल्लींच्या मानानें अगदी गरीबीची होती, असें म्हटलें पाहिजे. तुमचा हल्लींचा कपडालत्ता

आणि तुमच्या खोलींतील शृंगार हीं आमच्या स्वप्नात देखील आभास कधीं दिसलीं नाहींत. अशा स्थितींत सुद्धा मला त्या वेळीं जें कर्ज झालें; त्यानें पुढें कित्येक वर्षें माझी पाठ पुरविली. माझें तारुण्य मला पुन्हां परत मिळालें आणि मी तुमच्यात येऊन राहिलों, अशी कल्पना केली, तर तुमच्या सध्यांच्या राहणीनें होणारें कर्ज माझ्या साऱ्या जन्मात तरी फिटेल कीं नाहीं, याची मला शंकाच वाटते.

तुम्हा विद्यार्थ्यांवर माझें प्रेम आहे, पण तुमचा नुसता स्तुतिपाठ गावा अशी माझी इच्छा नाहीं, म्हणून मी इतकें बोललों. आखाड्यांच्या संस्थेमुळें विद्यार्थिमंडळांत परस्पर दृढ बंधनें उत्पन्न होतात, ही गोष्ट खरी आहे. बाकीचीं बंधनें कालांतरानें शिथिल होतात, पण हीं बंधनें दृढ राहतात, असा माझा समज आहे.

हें भाषण संपल्यानंतर पुतळ्याच्या नमुन्याचें निरीक्षण बिस्मार्क यानीं केलें. आपलें साम्य त्यांत चांगलें साधलें असल्याबद्दल संतोष प्रदर्शित करून ते म्हणाले, "यात मला एकच दोष दिसतो. तो हा कीं, यात माझा वरचा ओंठ थोडा अधिक लांब दाखविला असून तो जरा अधिक पुढेंहि आला आहे. वास्तविक माझा खालचा ओंठ वरच्यापेक्षा जरासा अधिक पुढें आहे. वरचा ओंठ पुढें असणें. हें महत्वाकांक्षेचें लक्षण असून खालचा ओंठ पुढें असणें हें दिर्घोद्योगाचें लक्षण आहे. खालचें जाभाड अधिक पुढें आलेलें असलें, तर तें हठवादीपणाचें लक्षण समजावें. माझें जाभाड असें पुढें नाहीं. यांत मूर्तिकाराचा दोष दिसत नाहीं; पण ज्या चित्रावरून ही मूर्ति बनविली आहे, त्याचीच ही चूक आहे. त्याच्या चित्रावरून माझ्या ठिकाणीं जेवढा मवाळपणा दिसतो, तितका मी मवाळ नाहीं. माझी दाढीहि यात दाखविली आहे त्याहून अधिक लांब होती. त्या दिवसात न्हावी-दादाना माझ्याकडून फारशी प्राप्ती झाली नाहीं. यांत दाखविलेला

मखमलीचा कोट बर्लिन येथें आल्यानंतर मीं घातला. रेशमी मखमलीचा नव्हे हो! परमेश्वरानें अशी बुद्धि मला केव्हाच दिली नाहीं. "

त्याच एप्रिल महिन्यात विश्वविद्यालयाच्या आणखी काहीं जुन्या विद्यार्थ्यांमार्फत आणखी एक प्रतिनिधिमंडळ मानपत्र घेऊन आलें. त्याला उत्तर देतांना बिस्मार्क म्हणाले,

सद्गृहस्थहो, विश्वविद्यालय सोडल्यानंतर आपापल्या घरोघर तुम्ही जाऊन राहिलां. तेथें शांतिसुखाचा पूर्ण लाभ तुह्मास मिळत होता, असें असताहि तीं शांतिस्थळें सोडून केवळ माझें अभिनंदन करण्याकरितां येथवर तुम्ही आला, यावरून माझें कार्य तुमच्या मनास आलें, असें मी समजतो. या कार्यासाठीं तुम्हांहि काहीं कमी खटपट केली असेल असें नाहीं, पण तुमच्यापेक्षां मजवर परमेश्वराची कृपा अधिक म्हणून माझ्या हातून तें यशस्वी झालें. तुमचा व माझा हेतु एकच होता. त्यात फरक असेल, तर तो साधनांचा आणि मार्गांचाच होय. जर्मन संस्थानाचें एक साम्राज्य व्हावें, असा तुमचाहि हेतु होता, पण तुमच्या विचारात लोकमताला मान नव्हता. तुह्मास निव्वळ बादशाही साम्राज्य पाहिजे होतें त्यावेळच्या आपणा विद्यार्थ्यांस सुशिक्षित जर्मन जनतेचें पाठबळ होतें. त्या वेळीं कांही अत्याचार घडले असतांहि जनतेनें आपणांस झिडकारलें नाहीं. त्यावेळच्या सरकारनें आपला छळ केला असतांहि लोकांचा पाठिंबा कमी झाला नाहीं. आपल्या मार्गांतील भयंकर अडचणी दूर करण्याकरतां आपणापाशीं काहीं अमोघ शस्त्रें असतील, असा पुष्कळांचा गैरसमज झाला होता. त्यानंतर फ्रँकफोर्ट येथें भरलेल्या पार्लमेंटांत या मताचा प्रतिध्वनि उमटल्याचें आपल्या स्मरणात असेलच? आपले सगळे हेतु कदाचित् एकदम साध्य न झाले, तरी फारच थोड्या अवकाशांत ते साध्य होतील, असा भ्रम पुष्कळ सुशिक्षित विद्यार्थ्यांस होता मोठालीं भाषणें करून आणि त्याद्वारें लोकांची सहानुभूति मिळवून आपले हेतु आपण तावडतोब सिद्ध करू, असें त्यांस वाटत होतें, पण विचार आणि आचार अथवा कल्पनासृष्टि आणि प्रत्यक्ष सृष्टि यात महदंतर आहे, हें लक्षात ठेवलें पाहिजे. कल्पनासृष्टींतील परस्परविरोधी विचार परस्परांशीं भांडणें न करतां सुखानें राहूं शकतात, पण त्यांचें रूप प्रत्यक्षत्वास येऊं लागलें म्हणजे त्यांत युद्धें उपस्थित

होतात. त्याप्रसंगीं गादी बरोबर उत्पन्न झालेल्या सामर्थ्यांशीं व प्रत्यक्ष तरवारीशीं गांठ पडत असते. यामुळे विचाराची वासलात लावणें जितकें सोपे असतें, तितकें या गोष्टींची वासलात लावणें सोपें नसतें. विश्वविद्यालयांत माझा प्रथम प्रवेश झाला, तेंव्हां कांहीं विद्यार्थीमंडळाबद्दल लोकांत बराच गैरसमज होता. माझ्या ठिकाणींहि असाच गैरसमज होता. जर्मन संस्थानाची एकी व्हावी, हें मत मला अगोदरच मान्य होतें, तथापि या विद्यार्थीमंडळाचे मार्ग मला मान्य नव्हते. असो या साऱ्या जुन्या गोष्टी फारशा महत्वाच्या आहेत, असें नाहीं. बर्लिन येथील शाळा व त्यानंतर ग्रेफायर्सची पाठशाळा मीं सोडली, त्या वेळीं जर्मन एकीबद्दलचे विचार माझ्या मनांत फार तीव्र झालेले होते. किंबहुना जर्मनींत लोकसत्ताक साम्राज्य असावें, असेंहि मला वाटत होतें. जो मनुष्य लोकाच्या इच्छेस अनुसरून राज्यकारभार करीत नाहीं, त्याची आज्ञा लोकानीं तरी शिरसामान्य कां करावी ? असे विचार त्यावेळीं माझ्या मनांत घोळत असत.

"सरकारी अधिकारी व मुत्सद्दी या नात्यानें या गोष्टींचा विचार करण्यास मीं सुरुवात केली. आपला अंतिम हेतु सिद्धीस नेण्याकरता काय उपाय योजावेत, याचे विचार माझ्या मनांत घोळू लागले. फ्रँकफर्ट येथें प्रशियाचा प्रतिनिधि या नात्यानें मी काम करीत होतों, त्यावेळीं एक महत्वाची गोष्ट माझ्या लक्षांत आली. ती ही कीं, आपल्या या हेतूच्या सिद्धींत प्रशियन लष्कराचें पाठबळ आपणास न मिळालें, तर आपला हेतु सिद्धीस जाणार नाहीं. प्रशियन लष्कर हें एक अमोघ शस्त्र होतें, पण स्वाभाविकपणेंच तें राजाच्या हातीं होतें. याकरतां आपल्या बाजूला राजाचें मन वळविण्याचा उद्योग मीं सुरू केला. कारण राजाच्या मदतीवर लष्करी मदत अवलंबून होती कार्य मोठें असेल, तर हलक्यासलक्या क्षुद्र साधनानीं तें सिद्धीस जाणार नाहीं. त्याच्या पूर्तीला अव्वल दर्जीचीं साधनें हातीं असल्याशिवाय कार्यारंभ केल्यानें तो करणाराची फसगत मात्र होते. अतिशय सावधपणानें व हळूहळू पावलें टाकून अखेरची मजल मीं गांठली. या कामीं माझ्या वृद्ध धन्याची अनुमति मीं मिळविली आपल्या वृद्ध बादशहाचा करारीपणा, मनाचा मोकळेपणा, त्यांचा निर्धार इत्यादि गुण जर त्यांच्या आंगीं नसते, तर त्यांची अनुमति मिळवूनहि आपण जें कार्य आज साध्य केलें आहे, तें साध्य झालें नसतें. धनी

चांगला नसता, तर केवढयाहि कर्तबगार प्रधानाची कामगिरी फुकट गेली असती. आपलें कार्य सर्वांगांनी परिपूर्ण झालें आहे आणि त्यात आतां कोण- त्याहि तऱ्हेची उणीव राहिली नाहीं, असें मी म्हणत नाहीं; पण तें सर्वांग पूर्ण होण्याची आशा आपणास बाळगता येईल, इतक्या स्थितीला तरी आज आपण प्राप्त झालों आहों. माझ्या आयुष्याच्या सध्यासमयीं सहानुकंपेचा जो वर्षाव मजवर होत आहे, त्यावरून माझ्या या म्हणण्याची सत्यता सिद्ध होते. लोक माझी स्तुति करतात, ती एका व्यक्तीची स्तुति आहे, असें नव्हे, तर ज्या कार्याला मीं हातभार लावला, त्या कार्यासंबधीं आपली कळकळ सामान्य जनता अशा रीतीनें व्यक्त करीत आहे, असें समजलें पाहिजे. आपल्या हेतूची पूर्ण सिद्धि आज झाली नसली, तरी जी कांहीं अर्धामुर्धी सिद्धि आपण मिळविली आहे, ती जर्मन राष्ट्राच्या मनास आली, असें निश्च- यानें म्हणण्यास हरकत नाहीं. सद्गृहस्थहो, आपल्या वृद्धापकाळीं आपण सारे एकत्र जमण्याचा योग आला, याचा मला फार आनंद होतो. निरनिराळ्या व नागमोडीच्या मार्गानें आपण वाट चालत असलों, तरी आज आपण सर्व एकाच ठिकाणीं येऊन पोहोंचलों आहों. आता हेंच ठिकाण अधिक चिरस्थायी व अधिक सुखदायक कसें होईल, याचा विचार करून त्याप्रमाणें सर्वांनीं एकम- तानें चालण्यास झटलें पाहिजे."

या भाषणावर एका पत्रानें पुढीलप्रमाणें टीका केली आहे:—

"विद्यार्थी फॉं बिस्मार्क यांच्या ठिकाणीं विद्यार्थ्यांच्या आखाडयाबद्दल जो गैरसमज पूर्वीं होता, तो नाहींसा झाला आहे. विद्यार्थ्यांचे आखाडे तक्तावरच कुऱ्हाड घालूं पहात होते, या जुन्या आक्षेपाचें निर्मूलन त्यानीं आज केलें. हे आक्षेप फोल होते, असें आज ठरलें असलें, तरी त्या काळीं केवळ तीन रंगांची फीत लावली म्हणून कित्येक विद्यार्थ्यांस कारागृहाच्या कोठडींत कुजत पडावें लागलें होतें. कित्येक उत्साही तरुणाचा उत्साह कोमेजून गेला होता. सरका- च्या जुलमी हुकुमांनीं कित्येकांचीं बुद्धिबीजें जागच्या जागींच करपून गेलीं होतीं.

ऑटो फॉं बिस्मार्क हे विद्यार्थी यापैकीं नव्हते. जर्मन संस्थानांच्या एकी- करणाचा विचार लहानपणापासूनच आपल्या मनांत घोळत होता, असें ते म्हणतात, पण प्रशियन पार्लमेंटांत त्याचीं जीं कांहीं भाषणें झालीं, त्यात या

एकीकरणाचा अथवा साम्राज्यविचारांचा मागमूसहि कोठें दिसला नाहीं. पोलीस अमलाखालीं वाढलेल्या व त्यामुळें बनलेल्या संकुचित वृत्तीचा अधार मात्र त्या भाषणात पुष्कळ दिसतो 'पार्लमेंटाच्या हाताखालीं प्रधानमंडळानें काम करणें हें प्रधानमंडळाच्या हीनतेचें लक्षण आहे' असें इ. स. १८४९ सालीं ते म्हणाले होते दक्षिण जर्मनींतल्या गबाळ संस्थानांशीं ऐक्य करून घेणें म्हणजे प्रशियानें स्वतः नामशेष होणें होय, असेंहि उद्गार हेर फॉ बिस्मार्क यानीं काढले होते. यानंतर विद्यार्थ्यांच्या एका आखाड्यांत त्यांचा प्रवेश झाला, तेव्हा त्याचे विचार बदलले, असें दिसतें. प्रशियन प्रतिनिधी या नात्यानें फ्रँकफर्ट येथें प्रतिनिधि मंडळांत त्यांची नेमणूक झाली, तेव्हां पोलिशी अमलाचें स्वारस्य त्यांच्या लक्षात आलें. तेव्हा त्या राज्यपद्धतीचा पाठीराखेपणा सोडून तिच्यातील दोषाचें आविष्करण ते करूं लागले यापुढें जुने बिस्मार्क व नवे बिस्मार्क यात कोणतेंहि साम्य उरलें नाहीं. यावेळीं त्याचे पाय जरी पूर्वींच्याच भूमींत रुतलेले होते, तरी त्यांचें डोकें जर्मन एकीकरणाच्या व साम्राज्याच्या मेघापर्यंत पोहोंचलें होतें, यात मात्र शंका नाहीं.

इतकी टीका करून हें पत्र चवथ्या फ्रेड्रिक वुइलियमच्या काळाकडे वळलें. पार्लमेंटानें बादशाही मुकूट देऊं केला असता चवथ्या फ्रेड्रिक वुइलियमनें तो कसा नाकारला, याचा उल्लेख करून हे पत्र पुढें म्हणतें:—

" पहिल्या वुइलियम बादशहानींहि केवळ स्वखुशीनें बादशाही मुकुट धारण केला नाहीं. युवराजाची प्रसिद्ध झालेली रोजनिशी या गोष्टीची साक्ष देत आहे. अशा प्रकारें साम्राज्य निर्माण होऊं नये, असें पुष्कळ चांगल्या लोकाचें मत होतें, पण फ्रँको जर्मनयुद्ध पुकारल्यानंतर साऱ्या जर्मन राष्ट्राची एकरूपता उघड झाली व 'सेडान' च्या दिवशीं ती अधिक जोरदार तऱ्हेनें निदर्शनास आली. यामुळें बादशहांना आपली इच्छा बाजूस ठेवावी लागली. 'सारें जर्मनराष्ट्र हीच आह्मा जर्मनांची भूमि आहे' या गाण्याचे सूर फ्रान्सच्या रणभूमीवर जोरानें उमटूं लागले व या सुरांत प्रशियन लष्करी अधिकाऱ्यांनींहि आपला सूर मिळविला. जर्मनींतील विद्यार्थ्यांचे आखाडे अस्तित्वांत आले नसते, तर इ. स. १८७० चे अद्वितीय विजयहि अस्तित्वांत आले नसते.

आखाड्याच्या मोहोरक्यांनीं ज्या प्रचंड उत्साहाचें बीजारोपण जर्मन विद्यार्थी-वर्गांत करून ठेवलें होतें, तींच बीजें ऐन वेळीं फलद्रूप झालीं. ”

बिस्मार्क हे अस्थिर बुद्धीचे असून त्याच्या मतांत वारवार बदल होतो, अशा प्रकारचा आरोप त्यांच्या शत्रूंनीं त्याजवर पुष्कळ वेळां केला होता; पण परिस्थिति बदलत गेली, म्हणजे डोळे झांकून आपल्या पूर्वीच्या मतास हट्टानें चिकटून बसणारा मनुष्य दूरदर्शी आहे, असें म्हणता येईल काय? फ्रान्सचे बोरबोन राजे जुनें न विसरण्याबद्दल व नवें न शिकण्याबद्दल प्रसिद्ध होते. अनेक वर्षांचा काळ लोटला, अनेक स्थित्यंतरें घडून आलीं, तरी या बोरबोन राजाप्रमाणें पहिल्या इतकाच कोरा राहणारा मनुष्य शहाणा आहे, असें म्हणता येणार नाहीं. अशा प्रकारच्या आरोपावर बिस्मार्क यानीं एकवार पुढील उत्तर दिलें होतें,

“ माझें सारें जीवित ही एक लांबलचक विद्यार्थीदशा आहे, असें मी समजतों. देहांत जीव असेपर्यंत शिकण्याची माझी क्रिया संपणार नाहीं. आजहि मी शिकत आहें व पुढेंहि असाच शिकत राहीन. आज प्राप्त झालेल्या नवीन शिक्षणाच्या दृष्टीनें आपल्या पूर्वचरित्रांतील दोष ज्याला दिसत नसतील, त्यानें ते दोष पाहण्यास आजपासूनच आरंभ करावा, अशी माझी सूचना आहे. आतां आपलें वय झालें म्हणून पूर्वचरितांतील दोषमय भागाचें स्मरण करणें व त्यात झालेल्या चुकांचें मनन करणें या गोष्टी अनावश्यक आहेत, असें कोणी समजू नये. आपल्या मनोभूमिकेची उत्तम ओळख करून घेणें, हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे. या कर्तव्याला कालाची अथवा वयाची मर्यादा नाहीं. ”

विश्वविद्यालयांत गेलेल्या सुखमय काळाची आठवण बिस्मार्क यास वृद्धपणींहि होत असे. त्या वेळच्या काहीं विशेष हकीकतीचें स्मरण करून आपल्या मित्राशीं ते गप्पागोष्टी करीत असत. एडिसन् यांचा फोनोग्राफ प्रथमच अस्तित्वांत आला, त्या वेळीं तसलें एक यंत्र एका गृहस्थानें फ्रेड्रिकश्रू येथें आणून त्यास दाखविलें व फोनोग्राफच्या बांगडीवर भाषण घेण्यासाठीं बिस्मार्क याना बोलण्याची विनंति केली.

तेव्हां त्याचा प्रिय अमेरिकन मित्र जॉन मोटले, याची आठवण त्यास होऊन त्याची एक आवडती चीज ते गाऊं लागले. याशिवाय विश्वविद्यालयात त्या वेळीं प्रसिद्ध असलेलीं आणखीहि एकदोन गाणीं त्यानीं म्हटलीं.

त्याच्या ऐशींव्या वाढदिवसानिमित्त आनंदप्रदर्शक जे अनेक प्रकार साऱ्या जर्मनीभर झाले, त्यात हँबर्ग येथील रहिवाश्यानीं दिवट्याची एक मिरवणूक काढली. हँबर्गच्या मानपत्रास उत्तर देताना बिस्मार्क म्हणाले,

“ माझ्या जन्मदिवशीं दिवट्याची मिरणूक काढणें हा हॅबर्गच्या रहिवाश्याचा एक वार्षिक कार्यक्रम आहे. सर्व जर्मनीभर राष्ट्रीय भावना उत्पन्न व्हावी, म्हणून मी खटपट करीत होतों, त्यावेळीं हेंसा प्रातातील लोकाची मदत मला कितपत मिळेल, याबद्दल मला शका वाटत होती; पण ही शका अस्थानी होती, असें कालातरानें माझ्या नजरेस आलें. कित्येक शतकें या प्रांतातील रहिवाश्यानीं जर्मनीची कीर्ति समुद्रावर व जमिनीवर अबाधित राखिली आहे. माझ्या प्रयत्नास तुमचें पाठबळ मला खास मिळेल, अशी मला आशा वाटत होती व ती माझी आशा तुह्मी विफल केली नाहीं. ज्या प्रसगी आपण सर्वांनीं एकदिलानें वागावें, त्या प्रसंगींहि आपण परस्परांशीं भांडलों आहों. त्या वेळींहि आपले परस्पराविषयींचे गैरसमज दूर झाले नाहींत; पण जर्मन साम्राज्यांत हँबर्गनें ज्या दिवशीं स्वत चा अतर्भाव करून घेतला, त्या दिवसापासूनच प्रत्येक गोष्टीचा विचार त्यांनीं राष्ट्रीय दृष्टयाच केला आहे. हॅबर्गचे लोक धाडशी आहेत, असा प्राचीन काळापासून त्याचा लौकिक आहे. आता त्याच्या धाडसाचा व उत्साहाचा पाठिंबा सर्व साम्राज्याला मिळाला आहे, याबद्दल मला फार आनद होतो तुमची हीच भावना अशीच कायम राहून वाढीस लागेल, अशी मला आशा आहे. व्यापाराच्या बाबतीत हँबर्गला साऱ्या जर्मनींत आद्यपद पूर्वींपासूनच प्राप्त झालें आहे. पृथ्वीच्या कोनाकोपऱ्यातल्या एकाद्या किनाऱ्यावरच्या गांवींहि हॅबर्गचें नाव ऐकूं येतें शिपायीगडी या नात्यानें हँबर्गचे लोक फारसे प्रसिद्ध नाहींत. फौजेंत मोठी महत्वाची भर त्यानीं टाकलेली नाहीं, पण जर्मनीचें यश पृथ्वीच्या दुसऱ्या टोकापर्यंत त्यांनीं पोहोंचविलें

आहे, हें खोटें नाहीं. आतां जर्मनीचें सारें सामर्थ्य हँबर्गच्या पाठीशीं सदैव उभें असल्यामुळें त्याच्या मार्गांत यापुढें कोणतीहि अड्चण न येतां त्याचें यश दिवसेंदिवस अधिक उज्वल होईल, असा मला भरवसा आहे. हँबर्ग, ब्रेमेन वगैरे शहरातील लोकांचें पृथ्वीच्या सर्व भागांतील लोकांशीं दळणवळण असून त्याशीं त्यांनीं मित्रत्वाचें नातें जोडलें आहे तुमची लोकसंख्या विशेष महत्वाची नसताहि बाहेर देशीं तुह्मास विलक्षण महत्व प्राप्त झालें आहे. व्यापारानिमित्त पृथ्वीच्या कोणत्याहि भागांत जाण्यास तुह्मी कचरत नाहीं. तेथें जाऊन तथल्या रहिवाश्यांशीं जो मित्रभाव तुह्मी जोडतां, त्याचा फायदा साऱ्या जर्मनराष्ट्रास मिळतो. सरकारी अम्मलदार प्रतिनिधींना जो मित्रभाव जोडता येत नाहीं व राखतांहि येत नाही, तो तुह्मी जोडता व राखता. हें अत्यत महत्वाचे देशकार्य तुह्मी आजपर्यंत चोख रीतीनें केलें आहे दक्षिण अमेरिकेंत रहावयास गेलेले हँबर्गचे व ब्रेमेनचे रहिवाशी उद्या परत आले, तर साम्राज्यास मोठा अपशकून झाला, असें मी समजेन, पण आमच्या साम्राज्याचे परदेशचे वकील सगळे आजच नाहीसे झाले, तरी त्याबद्दल मला फारशी भिति वाटणार नाहीं.

“ अटलांटिक महासागर ओलांडून परतीरावर जाऊन राहिलेले आमचे हँबर्गचे व्यापारी हे आमच्या सरकारी प्रतिनिधीपेक्षां अधिक विश्वासार्ह व अधिक चतुर असतात, असें मला वाटते. त्यांची कर्तबगारी केवळ सामान्य प्रतीच्या लोकांतच दिसून येतें असें नाहीं, तर उच्च वर्गीयातहि जर्मनीचें नांव ते राखतात, असा माझा समज झाला आहे आफ्रिकेंत गेलेल्या आपल्या इतर बंधूबद्दलहि माझें असेंच मत आहे त्या ठिकाणीं आपलें व्यापारी राज्य ते निर्माण करतील असा मला भरवसा आहे आज तेथली परिस्थिति काय आहे अथवा तेथें काय घडामोडी होत आहेत, यावरून मी टीका करीत नाहीं, पण ईस्ट इंडिजमध्यें इंग्रज व्यापाऱ्यांनीं स्वतःस जें अत्युच्च महत्व प्राप्त करून घेतलें आहे, तेंच महत्व आपले व्यापारी आफ्रिकेंत स्वतःस प्राप्त करून घेतील, असें मला मनःपूर्वक वाटतें आपणासमोर लहान लहान खणाचें मेज मांडून एकाद्या लहानशा कचेरीच्या खोलींत स्वतःस कोंडून घेणाऱ्या सरकारनियुक्त प्रतिनिधीपेक्षा लोकांत वावरणाऱ्या व्यापाऱ्याला आपल्या बांधवांच्या गरजांची अधिक चांगली जाणीव असते. यावरून तुह्मा हँबर्गच्या रहिवाशांचें महत्व

किती आहे, हें तुमच्या आज लक्षांत आलें असेलच. हँबर्ग शहरावर जडलेलें माझें प्रेम व त्याबद्दल मला वाटत असलेला आदर हीं अस्थानी नाहींत, हें सांगवयास नकोच. सुमारें दीड वर्षांपूर्वीं किसिनजेन येथें जें भयंकर दुःखणें मला आलें, त्यानें माझी शक्ति फार खचून गेली आहे. यामुळें तुमच्या शहरीं बरेच दिवसांत माझें येणें झालें नाहीं. तथापि तुमच्या हँबर्ग शहराचें सदोदित कल्याण व्हावें, अशी मी परमेश्वराची प्रार्थना करतों. भविष्यत् काळीं तुमच्या शहराला फार मोठें महत्व प्राप्त होईल, असा माझा दृढ विश्वास आहे."

हें भाषण संपल्यानंतर दिवट्यांची मिरवणूक निघून हँबर्ग येथील उत्सव आटोपला. हबँर्गचा उत्सव या राष्ट्रीय महोत्सवांतील अखेरचा उत्सव होय.

---

## प्रकरण अठ्ठाविसावें.

# बिस्मार्क यांचा वानप्रस्थाश्रम.

जर्मनसाम्राज्यांतील सॅक्सनीच्या भागांत मोठमोठीं अरण्यें आहेत. शॉर्लेमेटच्या काळापासून तों नेपोलियनच्या काळापर्यंत जर्मनीच्या राष्ट्रीय इतिहासांत या अरण्यानीं पुष्कळ वेळा मोठ्या महत्वाच्या कामगिऱ्या बजावल्या आहेत. यामुळें या अरण्याच्या दर्शनाबरोबर प्रत्येक जर्मनाच्या अंतःकरणांत आदर व प्रेम हीं उत्पन्न होतात, यांत नवल नाहीं. या भागांतील रहिवाशाबद्दल सर्व जर्मनाच्या मनांत एक प्रकारचें विलक्षण कुतूहल निर्माण झालेलें असतें. याच अरण्यमय प्रदेशाच्या एका सुंदर भागांत बिस्मार्क यानीं वानप्रस्थाश्रमाचे दिवस घालवावेत, यांत नवल नाहीं. जर्मन लोकांच्या दृष्टीनें बिस्मार्क यांची ही कृति अगदीं योग्य अशीच होती. बिस्मार्क हे फ्रेड्रिकश्र गांवीं रहावयास गेल्यापासून त्या गांवाला जर्मनाच्या दृष्टीनें एक प्रकारें पावित्र्य प्राप्त झालें. फ्रेड्रिकश्रू हें गांव राष्ट्रीय भावनेची जन्मभूमि आहे, असें ते समजतात.

या गावीं बिस्मार्क रहावयास आले, तेव्हां आपला सर्व मोठेपणा त्यानीं मागें ठेवला. प्रख्यात रणपंडित कौंट मोल्टके हेहि युद्धसमाप्ती-नंतर अशाच रीतीनें अगदीं साध्या राहणीनें रहात असत. आपण अत्यंत महत्वाचें राष्ट्रीय कार्य केलें आहे, ही भावनासुद्धा मोल्टके यांच्या चित्तातून गेली होती. आपली योग्यता एकाद्या सामान्य खेडवळ गृहस्थाहून अधिक नाहीं, असेंच त्यास वाटे. अशीच वृत्ति बिस्मार्क यांचीहि होती. आपल्या राहत्या घराला एकादें भुवन किंवा क्यासल असलें भपकेबाज नांवसुद्धा त्यांनीं दिलें नाहीं. एकाद्या खेडेगावच्या शेतकऱ्यांनीं त्याना मानपत्र दिलें, तर मोल्टके यांजप्रमाणेंच तेहि 'बिस्मार्क-शेतकरी' एवढीच सही करीत. सही करतांना 'प्रिन्स' या पदवीचा उपयोग त्यानी केव्हांहि केला नाहीं. त्याचप्रमाणें ड्यूक ऑफ लायनबर्ग ही पदवीहि त्यानीं टाकून दिली होती. युरोपातील बहुतेक प्रत्येक राजानें त्यांना चांद आणि पदकें दिलीं होतीं; तथापि यापैकीं एकहि त्यांनीं आपल्या छातीवर केव्हा लटकाविलें नाहीं. अशा रीतीनें स्वत च्या मोठेपणाची जाहिरात देणें, या गोष्टीचा त्यास अत्यंत तिरस्कार होता. 'सध्याच्या पिढींत बिस्मार्क इतका चतुर मुत्सद्दी आणि ऐतिहासिक पुरुष दुसरा एकहि नाहीं' असे उद्गार सुप्रसिद्ध अमेरिकन इतिहासकार मोटले यानीं काढले होते; तथापि बिस्मार्क याची राहणी एकाद्या गरीब शेतकऱ्याला शोभेल इतकी साधी होती. फ्रेड्रिकश्रूला गांव तरी म्हणता येईल कीं नाहीं, याची शंकाच आहे. हें सुमारें पंचवीस घराचें खेडें असून लोकवस्ती सुमारें ७५।८० आहे. हीं सर्वं बिस्मार्क याचीं कुळेंच आहेत. या खेड्यात शाळा नाहीं अथवा चर्चहि नाहीं. येथून अगदीं जवळची शाळा आगगाडीनें सुमारें पंचवीस मिनिटाच्या रस्त्यावर आहे.

फ्रेड्रिकश्रू येथें कायमची वस्ती करावी असा बिस्मार्क यांचा आरंभीं हेतु नव्हता. उन्हाळ्याच्या सुट्टीच्या दिवसात कधींमधीं येथें यावें इतकाच त्यांचा हेतु होता. यामुळें तेथील घराची डागडुजीसुद्धा त्यानीं विशेषशी केली नाहीं, पण आजुबाजूच्या सृष्टिसौंदर्याच्या मोहानें त्यांनीं तेथें कायमची वस्ती केली. या ठिकाणीं त्याना मोठा उपद्रव म्हणजे आगगाडीचा. त्याचें घर रेल्वे सडकेच्या अगदीं जवळ असल्यामुळें प्रत्येक जाणाऱ्या येणाऱ्या गाडीमुळें तें पायापासून हादरतें. खुद्द त्याची निजावयाची खोली सडकेपासून सुमारें पंचवीस कदमाच्या अंतरावर होती. याशिवाय गाडीचे ड्रायव्हर बिस्मार्क यास सलामी देण्याकरतां कीं काय कोण जाणें, त्यांच्या घरासमोर मोठ्यानें शिटी फुंकीत. पुढें या गोष्टीबद्दल बिस्मार्क यांनीं तक्रार केल्यानतर ही चाल बंद पडली.

बिस्मार्क यांच्या गैरहजेरींत कोणासहि या घरांत जाण्याची सक्त मनाई करण्यांत आली होती. कारण एका वेळीं एका अनोळखी पाहुण्यानें पहिल्या वुइलियम बादशहाचें बिस्मार्क यांस स्वदस्तूरचें आलेलें पत्र चोरलें. बिस्मार्क याची बसावयाची खोली तळमजल्यावरच असून तिच्याच शेजारीं एक बाजूची खोली व दुसऱ्या बाजूला त्याचें खाजगी पुस्तकालय व वाचनालय होतें. या ठिकाणीं मोल्टके यांचें एक मोठें चित्र लावून ठेवलेलें होतें. त्यांच्या वाचनालयात वर्तमानपत्रांचे ढीग पर्वतप्राय पडत असत.

त्यांच्या खाजगी वाचनाल्यांत पुस्तकसंग्रह फारसा मोठा नव्हता व यातील बहुतेक पुस्तकें अर्थशास्त्रविषयक होतीं. प्रत्यहीं वर्तमानपत्रें, पुस्तकें, पत्रें, तारा हीं हजारोंनीं येत असल्यामुळें टपालखात्यानें एक्सप्रेसगाडी सुद्धां त्याच्या गावीं उभी करण्याची सोय केली होती. त्यांच्या चित्रसंग्रहाल्यांत पहिले वुइलियम बादशहा, दुसरे फ्रेड्रिक व दुसरे

वुइलियम याच्या तसबिरा असून फ्रेड्रिक दी ग्रेटचेंहि एक चित्र आहे. याशिवाय त्यांच्या संग्रहालयात दुसरीं कोणतींहि चित्रें नाहींत. त्याच प्रमाणें कांहीं महत्वाच्या प्रसंगांच्या आठवणी म्हणून सुद्धां त्यानीं कसल्याहि वस्तूचा संग्रह केलेला नाहीं. तेथें जाणाऱ्या प्रेक्षकाना अत्यंत महत्वाच्या प्रसंगाची आठवण करून देणारी एकच वस्तु आहे. ती वस्तु म्हणजे इ. स. १८७१ सालच्या तहावर व्हर्सेलिस येथें ज्या टेबलावर सह्या झाल्या, ते टेबल होय.

प्रेक्षक त्यांच्या निजावयाच्या खोलींत गेला, तर समोरच एक मोठा आरसा लावलेला त्याच्या नजरेस पडतो. दाढी करण्याकरतां याचा उपयोग ते करीत असत. अजारी असता एक वेळ त्यांची दाढी इतकी वाढली होती कीं, ते बर्लिन येथें गेले, तेव्हा त्यास कोणी ओळखलेंहि नाहीं. या खेरीज याखोलींत लहानसा पलंग, एक गादीची बैठी खुर्ची, एक आरामखुर्ची व दुसऱ्या दोन साध्या लाकडी खुर्च्या, इतकेंच सामान आहे. ह्या आरामखुर्चीवर बिस्मार्क याचा टायरास नावाचा एक कुत्रा नित्य बसलेला असे व रेबेका नावाची त्यांची कुत्री गादीच्या बैठ्या खुर्चीवर बसलेली असे. हीं दोन्हीं कुत्रीं बिस्मार्क याच्या खोलींतच निजत असत. टायरासच्या चेहऱ्यांत विशेषसें सौंदर्य नसल्यामुळें तो बिस्मार्क यास फारसा आवडत नसे.

हा कुत्रा पहिल्या वुइलियम बादशहानीं बिस्मार्क यांस दिला होता. बादशहासंबंधीं बिस्मार्क याच्या ठिकाणीं अत्यंत पूज्यबुद्धि असल्यामुळेंच त्यांनीं त्याला जवळ बाळगले होतें. त्याच प्रमाणें त्याच्या निजावयाच्या खोलींत कांहीं तालमीचींहि आयुधें असत सकाळीं उठल्याबरोबर थोडासा व्यायाम करण्याचा त्यांचा नित्य परिपाठ होता.

बिस्मार्क याच्या निजावयाच्या खोलींत लावलेल्या चित्रात राजकीय महत्वाचीं चित्रें मुळींच नाहींत. प्रिन्सेस बिस्मार्क, कौंट वुइलियम बिस्मार्क

व डॉ. श्वेनिंगर, इतकीं चित्रें येथें असून शिवाय एकदोन शिकारीचे देखावे आहेत. उशाशीं एक प्रार्थनेचें पुस्तक व डॉ. मॉर्टिनल्यूथर यांच्या विचारांचें एक पुस्तक बिस्मार्क ठेवीत असत. त्याच प्रमाणें पलंगाशेजारीं एका लहानशा मेजावर गटे कवीचे ग्रंथ ते ठेवीत असत.

तेथें जाणाऱ्या प्रेक्षकाच्या दृष्टीनें घरातील इतर खोल्या फारशा महत्वाच्या नाहींत हें उघड आहे. हल्लींच्या दुसऱ्या वुइलियम बादशहाचें प्रचंड चित्र भोजनगृहात लावण्यासाठीं त्यांनीं तयार करविलें होतें; पण तें घरात कोणत्याच दारातून न शिरण्याइतकें मोठें झाल्यामुळें बिस्मार्क याच्या शॉनहॉसन येथील संग्रहालयात त्याची नेमणूक झाली होती. या भोजनगृहात पहिल्या वुइलियम बादशहाचीं कित्येक चित्रें लावलेलीं असून कुंटुबातील कांहीं मंडळीचींहि चित्रे आहेत. चित्रकला, वाङ्मय वगैरे ललितकलाचे आपण भोक्ते व पोषक आहों, असा बाणा बिस्मार्क यांनीं केव्हाहि मिरविला नाहीं. सरकारी कामाच्या ओझ्याखालीं असल्या गोष्टींकडे लक्ष पुरविणें आपणास शक्य नाहीं, असें तें स्वतःच म्हणत असत. आपल्या ग्रंथावर कोणी अभिप्राय मागितला, तर बिस्मार्क याजकडून तो मिळेलच असा भरंवसा नसे. कोणत्याहि नवीन ग्रंथाची विशेषशी स्तुति अथवा निंदा ते कधींच करीत नसत. आत्मस्तुतीचा त्यांस अत्यंत कंटाळा असल्यामुळें स्तुतिपाठकांस त्यांनीं आपल्याजवळ कधींहि थारा दिला नाहीं. प्रेक्षक थोरल्या दिवणखान्यांत प्रथमच गेला, तर एक मोठें कोच त्याच्या नजरेस पडतें. त्या कोचाच्या मागच्या बाजूस बिस्मार्क आपली आरामखुर्ची ठेवीत असत. जेवणानंतर एकदोन तास त्या खुर्चीवर पडून वर्तमानपत्रातील महत्वाचे भाग अथवा दुसरे महत्वाचे कागदपत्र ते पहात बसत. या मुख्य दिवाणखान्याला जोडून दुसरा एक लहानसा दिवाणखाना आहे. भेटीदाखल

आलेल्या वस्तूंचा सग्रह येथें केलेला आहे. या ठिकाणीं खुद्द बिस्मार्क यांच्या व जर्मनींतील दुसऱ्या प्रसिद्ध पुरुषांच्या फोटोंचा फार मोठा संग्रह आहे.

सकाळचे नऊ आणि दहा यांच्या दरम्यान बिस्मार्क बहुधा निजून उठत. प्रातर्विधि आटोपल्यानंतर अल्पसा उपाहार करून रोजचा पत्रव्यवहार ते पहात. त्यांच्या पोषाकाच्या तऱ्हेंत फ्याशनचा गंधहि नसे. कडक इस्त्री केलेले शर्ट त्यांनीं कधींहिं वापरले नाहींत. त्यांच्या पोशाकाची तऱ्हा सामान्य शेतकऱ्याच्या पोषाकासारखीच होती, असें म्हटलें तरी चालेल. खाद्यपेयाच्या बाबतींत डॉ. श्वेनिंगर याच्या हुकुमाप्रमाणे ते वर्तन ठेवीत.

डॉ. श्वेनिंगर बव्हेरियन असून आपल्या धंद्यात मोठे निष्णात होते. इ. स. १८७३-७४ सालीं म्यूनिच येथें महामारीची मोठी सांथ आली, त्यावेळीं हे प्रथम प्रसिद्धीस आले व पुढें थोड्याच अवधींत जर्मनींतील प्रख्यात वैद्यात त्यांची गणना होऊ लागली. बिस्मार्क याचे चिरंजीव संधिवातानें अजारी पडले, त्या वेळीं बिस्मार्क कुटुंबाशीं याचा प्रथम परिचय झाला. केव्हाहि बरें वाटेनासें झालें, तर बिस्मार्क या डाक्तरचे औषध घेत असत; पण पथ्याच्या बाबतींत मात्र चुकवाचुकव करीत. पुढें एके प्रसंगीं त्यांची प्रकृति अतिशय बिघडली. शक्ति समूळ नाहींशी झाली. पचन क्रिया होईनाशी झाली. हालचाल केल्याशिवाय अथवा एक शब्दहि बोलल्याशिवाय तासांचे तास ते पडून राहूं लागले. त्यांच्या नेहमींच्या वैद्यांनीं जवळ जवळ आशा सोडली. या दुखण्यांतून जे दिवस निभावतील ते खरे, असें त्यांनीं बिस्मार्क यांच्या पत्नीस स्पष्टपणें कळविलें.

बिस्मार्क यांची इतकी स्थिति झाली, तेव्हां डॉ. श्वेनिंगर यांस त्यांनीं बोलाविलें. आपल्या सांगण्याबरहुकुम बिस्मार्क वागण्याचें कबूल

करतील, तरच आपण औषध देऊं, असें श्वेनिंगर यानीं त्यास कळविलें. पथ्यपाळण्याच्या बाबतींत बिस्मार्क याची वागणूक बरीचशी धरसोडीची होती. श्वेनिगर यास या बाबतींत बिस्मार्क यांनीं वचन दिलें व इतर वैद्यांचीं औषधें सोडून दिलीं. श्वेनिगर याच्या चिकित्सा पद्धतींत मुख्य भिस्त औषधावर नसून रोग्याच्या अहार विहारावर होती. सहा आठवडे पर्यंत बिस्मार्क यांस खारवलेले हारिन मासे खाण्याची मात्र परवानगी या वैद्यानीं त्यांस दिली होती. या अवधींत बिस्मार्क याचीं प्रकृति इतकी सुधारली कीं, फ्रेड्रिक्श्रू येथें जाण्याचा प्रवास त्यास फारसा त्रासदायक झाला नाहीं. येथें आल्यानंतर गव्हाची रोटी, लोणी आणि बटाटे इतके पदार्थ खाण्याची परवानगी श्वेनिंगर यानीं दिली. बिस्मार्क याच्या भोजनांत मीठ अधिक असल्यामुळें त्यास आतिशय शोप पडे; तेव्हां जेवणानंतर एका तासानें झऱ्याच्या काठीं जाऊन एक पेला ताजें पाणी पिण्याची परवानगी त्यास मिळाली. बिस्मार्क याच्या घरापासून हा झरा सुमारें पांच मिनिटाच्या रस्त्यावर होता. एवढे जाण्यायेण्याचे श्रमहि बिस्मार्क यास आरंभीं बरेच जाणवले; पण आहारविहाराच्या बाबतींत श्वेनिंगर याचे हुकुम बिस्मार्क अक्षरक्ष' पाळीत असल्यामुळें त्याची गेलेली शक्ति लवकरच परत येऊ लागली. चित्ताची उदासीनता नाहींशी झाली. चेहऱ्यावरील खिन्नता जाऊन ते पूर्वीप्रमाणें आनंदी दिसू लागले. पुढें थोड्याच दिवसानीं आजुबाजूच्या रानातुन स्वत.च्या पायानें हिंडण्याची बरीच शक्ति त्यास आली त्याचें वय बरेंच झालें असतांहि श्वेनिंगर याच्या चिकित्सेनें घोड्यावर बसून तीन चार तासांचा फेरफटका ते रोज करूं लागले. या नतर श्वेनिंगर याचा बिस्मार्क कुटुंबाशीं झालेला परिचय अधिकाधिक वाढून त्याची गणना जवळ जवळ कुटुंबीय मंडळींत होऊं लागली. ते आपल्या धंद्यात ज्याप्रमाणें

निष्णात होते, त्याचप्रमाणें त्याचा स्वभावहि फार मन मिळाऊ आणि आनंदी होता. बिस्मार्क याचें प्रेम श्वेनिंगर याजवर फार जडलें. श्वेनिंगर चिकित्सापद्धतीचें शिक्षण देण्याकरतां एक वैद्यक पाठशाळा उघडण्याच्या बाबतींत बिस्मार्क यानीं बरीच खटपट केली. श्वेनिंगर याचा सल्ला घेण्याकरतां शेंकडों पत्रें रोज येऊं लागलीं. श्वेनिंगर हे ब्व्हेरियन असल्यामुळें प्रशियन वैद्यक मंडळांत त्याजबद्दल आरंभीं फारशी चहा नव्हती. इतकेंच नव्हे, तर पुष्कळांस त्याजबद्दल मत्सरहि वाटे; पण कालांतरानें श्वेनिंगर यांचें गुण व त्याची चिकित्सा पद्धति याची माहिती लोकांस होऊं लागली, तेव्हां त्याजबद्दलचा आदर वाढत जाऊन प्राशियांसहि ते फार लोकप्रिय झाले.

बिस्मार्क याच्या स्नेह्यांत लेनब्याक नावाच्या एका सुप्रसिद्ध बव्हेरियन चितान्याची गणना करणें अवश्य आहे. फ्रान्झ फॉ लेनब्याक हे अत्यंत कुशल चितारी होते. फ्रेड्रिकश्रू येथें बिस्मार्क याच्या कुटुंबांतील मंडळी जेव्हां जेव्हां एकत्र होत असत, तेव्हां तेव्हां लेनब्याकहि तेथें येत. बिस्मार्क याच्या वृद्धापकाळाचे दिवस सुखानें गेले, या गोष्टीचें श्रेय श्वेनिंगर यास ज्याप्रमाणें आहे, त्याच प्रमाणें लेनब्याक यासहि तें श्रेय देणें उचित होय. श्वेनिंगर यानीं जर्मनीच्या या अद्वितीय मुत्सद्यास आयुरारोग्याचा लाभ दिला व लेनब्याक यानीं चित्रांच्या रूपानें बिस्मार्क याच्या दर्शनाचा लाभ सर्व जर्मनांस सुलभ करून दिला, याकरतां सर्व जर्मनराष्ट्रानें या दोघांचें ऋणी असलें पाहिजे.

( द्वितीय खंड संपूर्ण. )

# भारत-गौरव-ग्रंथमाला.

## उद्देश व नियम

सर्व महाराष्ट्रीयांच्या आदरास, अभिमानास व प्रशंसेस पात्र झालेली अशी साऱ्या महाराष्ट्रांत ही एकच ग्रंथमाला असून महाराष्ट्रवाङ्मयाची उत्कृष्ट सेवा ही ग्रंथमाला किती बाणेदार वृत्तीनें बजावीत आहे, हें वाङमयभक्तांनीं माहीतच आहे. इतकी लोकप्रिय ग्रंथमाला महाराष्ट्रांत दुसरी कोणतीहि नसून अन्य कोणत्याहि ग्रंथमालेपेक्षां या ग्रंथमालेचा प्रसार दुपटी तिपटीनें अधिक आहे. आपण या ग्रंथमालेचे आश्रदाते असालच. नसल्यास तावडतोब पत्र पाठवून ग्रंथमालेचे आश्रयदाते व्हा. युरोपातील महायुद्धामुळें छपाईच्या सर्व वस्तु फार महाग झाल्यानें ग्रंथमालेस अधिक लोकाश्रयाची फार आवश्यकता आहे, तरी आपण स्वत: ग्रंथमालेस आश्रय देऊन व आपल्या मित्रवर्गांचाहि जोडून देऊन महाराष्ट्रवाङ्मयाची सेवा अधिक उत्साहानें करण्यास आम्हास कार्यक्षम करा. महाराष्ट्रसाहित्याची सर्वांगी सेवा करून सर्वोत्कृष्ट वाङ्मयाचा शक्य तितक्या कमी किंमतीनें प्रसार करणें, हा या ग्रंथमालेचा उद्देश आहे.

**नियम** —( १ ) आश्रयदात्यात केव्हांहि नांव दाखल करता येते. पहिली व्ही. पी. नाव नोंदणावळ म्हणून एक रुपया अधिक घेऊन पाठविली जाते या व्ही पी चा स्वीकार झाल्यावर आश्रयदात्यांस ग्रंथमालेचें प्रसिद्ध होणारें प्रत्येक पुस्तक साध्या बाधणीचें दहा आण्याच्या व्ही पी नें व कापडी बाधणीचें पुस्तक एक रुपायाच्या व्ही. पी. नें पाठविण्यात येतें. ( २ ) आश्रयदात्यांत नांव दाखल करताना मागील सर्व अथवा कांहीं पुस्तकें आश्रदात्यांनीं घेतलींच पाहिजेत असें नाहीं. परतु आश्रयदात्यात नाव दाखल झाल्यावर प्रसिद्ध होणारें प्रत्येक पुस्तक आश्रयदात्यांस घेतलेंच पाहिजे जीं पुस्तकें शिल्लक नाहींत, तीं देण्याची जबाबदारी ग्रंथमालेवर नाहीं ( ३ ) साधारण दोन महिन्यांनीं एक पुस्तक प्रसिद्ध होतें पुस्तक क्राऊन साईजचें, दोनशेंवर पानांचें व बहुतेक सचित्र असतें ( ४ ) पुस्तकें मागवितांना पुस्तकांचीं नावें स्पष्ट लिहावींत तसेंच पत्ता वगैरे स्पष्ट असावा ( ५ ) मागील पुस्तकाच्या किंमती वाढविल्या आहेत, तिकडे लक्ष्य द्यावें व पूर्वींचे सर्व नियम रद्द समजावेत.

# पुस्तकांचीं नांवें व किंमती.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| समाजकंटक प्रथम खंड | किं | ०१२ | आश्रयदात्यास | ०६ |
| समाजकंटक द्वितीय खंड | किं | ०१२ | आश्रयदात्यांस | ०६ |
| दैवलीला | " | ०१२ | " | ०६ |
| समाजरहस्य | " | ०१२ | " | ०६ |
| जन्मभूमि प्रथम खंड | " | ०१२ | " | ०८ |
| जन्मभूमि द्वितीय खंड | " | ०१२ | " | ०८ |
| प्रेममंदिर | " | ०१२ | " | ०८ |
| शिवाजीचा उजवा हात | " | ०१२ | " | ०८ |
| रजनी | | ०१२ | " | ०८ |
| जर्मनीचें पाताळयंत्र, केसरची प्रभावळ | " | १०४ | " | रु १ |
| स्वप्नमय आयुष्य | " | ०१२ | " | ०८ |
| मातृमूर्ति | " | ०१२ | " | ०८ |
| कर्मफल | " | ०१२ | " | ०८ |
| प्रिन्स बिस्मार्क प्रथम खंड | " | ०१२ | " | ०८ |
| सुखाचा शोध | " | ०१२ | " | ०८ |
| प्रिन्स बिस्मार्क द्वितीय खंड | " | ०१२ | " | ०८ |

**पूर्व आणि पश्चिम** छापत आहे ( सामाजिक कादंबरी. )

**सूचना:**—सावित्री-सत्यवान, प्रवासिनी, महात्मापरिचय, महात्मागौतम, जहागीर, जाईचा मंडप प्रथम खंड व जाईचा मंडप द्वीतीय खंड हीं पुस्तकें शिल्लक नाहींत

**प्रभाकर श्रीपत भसे,**

म्यानेजर, भारत-गौरव-ग्रंथमाला—गिरगाव-मुंबई.

IRBK-0100247

IRBK 0100247